२१९

# तृतीय वर्ष कला-मराठी
# अभ्यासपत्रिका क्र. चार

# प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास

(प्रारंभ ते इ.स.१८१८ पर्यंत)

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. देवानंद शिंदे**
प्रभारी कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
प्रभारी संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** — **प्रा.अनिल आर. बनकर,**
अधिव्याख्याता आणि सहाय्यक
संचालक दूर व मुक्त अध्ययन संख्या,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**समन्वयक** — **डॉ. धनाजी गुरव**
प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय महाड,
जि. रायगड

**लेखक** — **डॉ. वसंत शेकडे**
कणकवली महाविद्यालय, कणकवली, जि. सिंधुदूर्ग

**पुर्नमुद्रण : ऑक्टोबर २०१७, तृतीय वर्ष कला-मराठी - अभ्यासपत्रिका क्र. चार**
**प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (प्रारंभ ते इ.स. १८१८ पर्यंत)**

**प्रकाशक :** प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**प्रकाशन :** ACME PACKS AND PRINTS (INDIA) PRIVATE LIMITED
A Wing, Gala No. 28, Ground Floor, Virwani Industrial Estate,
Vishweshwar Nagar Road, Goregaon (East), Mumbai 400 063.
Tel. : 91 - 22 - 4099 7676

# अनुक्रमणिका


| क्रमांक | घटकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| १. | मराठी साहित्याची सुरुवात व आद्यग्रंथ | ०१ |
| २. | महानुभाव वाङ्.मय | १० |
| ३. | वारकरी संतांचे वाङ्.मय | २४ |
| ४. | पंडिती वाङ्.मय | ४२ |
| ५. | शाहिरी काव्य | ६६ |
| ६. | बखर वाङ्.मय | ७९ |
| ७. | इतर पंथीयांनी केलेली रचना : नाथ, दत्ता, समर्थ, लिंगायत | ८८ |
| ८. | इतरधर्मियांनी केलेली रचना | १०५ |
| ९. | मध्ययुगीन मराठीतील वाङ्मयप्रकार | ११२ |
| १० अ | ग्रंथ व ग्रंथकार याचा परिचय | १२५ |
| १० ब | ग्रंथ व ग्रंथकार याचा परिचय | १५२ |


❖ ❖ ❖

घटक क्र. १

१

# मराठी वाङ्मयाचा प्रारंभ व आद्यग्रंथ

## विषयप्रवेश

महाराष्ट्र या नावाने ओळखला जाणारा भूभाग गोदावरी, तापी, कृष्णा, कोयना, पूर्णा अशा नद्यांनी सुजलाम सुफलाम बनलेला आहे. या नद्यांच्या तीरावर फार प्राचीन काळापासून महाराष्ट्र (मराठी) संस्कृती नांदत आलेली आहे. या संस्कृतीने मराठी ही आपली भाषा मानलेली आहे.महाराष्ट्राच्या शेजारी गोवा, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरातचा काही भाग असे विविध भाषा बोलणारे प्रदेश आहेत. या प्रदेशाची भाषा मराठी भाषेपेक्षा वेगळी आहे. मराठी भाषेने प्रारंभापासून आपले अस्तित्व व स्वत्व राखण्याचा प्रयत्न केला आहे.महाराष्ट्रावर आत्तापर्यंत अनेक आक्रमणे झाली. ती विविध भाषिकांकडून झाली तरी मराठी भाषा व मराठी माणूस आपले वेगळेपण, स्वत्व सांभाळून राहिला आहे. म़हाराष्ट्र आणि मराठी भाषा हे समीकरण तयार झालेले चक्रधरस्वामी, मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, दासोपंत, फादर स्टीफन्स अशा अनेकांनी मराठी भाषेचा आग्रह धरला आहे. या आग्रहातून मराठी भाषेत विविध प्रकारची रचना झाली.

मराठी समृद्ध करण्यात अनेक संप्रदायांचा, विचार प्रणालीतील मराठी भाषिकांनी जाणिवपूर्वक प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नात कधी अजाणतेपणा दिसतो. तर कधी जाणतेपणा दिसतो. अशा या मराठी भाषेच्या जन्माविषयी, जन्मकाळाविषयी विद्वानात मतभेद आहेत.मराठीतील लिखित वाङ्मयांची परंपरा समृद्ध असली तरी आद्यग्रंथाविषयी विविध मतमतांतरे असलेली दिसतात. त्या सर्व मताचा व मराठीतील आद्यग्रंथेचा, आरंभीच्या रचनांचा विचार या अभ्यास घटकात अभिप्रेत आहे.

## महाराष्ट्र या नावाविषयी

महाराष्ट्र हे देशनाम फार पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. तरी या नामाविषयी विद्वानांमध्ये बरीच मतमतांतरे दिसून येतात. 'वायुपुराणात' महाराष्ट्राचा उल्लेख 'दंडकारण्य' किंवा 'दक्षिणापथ' असा उल्लेख केलेला आढळतो. महाभारताच्या सभापर्वात नरराष्ट्र असा उल्लेख आला आहे. मास्यपुराणात 'नवराष्ट्र' असाही उल्लेख महाराष्ट्राचा आला आहे. प्राचीन वाङ्मयात 'दक्षिणापथ' असा महाराष्ट्राचा उल्लेख आलेला आहे. ''दंडकाव्य'' म्हणजेच ''महाराष्ट्र'' असा समज जनमाणसात व संशोधनात रूढ आहे. ''महाराष्ट्र'' हे नाव इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून रूढ असल्याचे दिसते. मराठी ही भाषा महाराष्ट्रात वापरली जाते. त्यामुळेच महाराष्ट्र व मराठी असे समीकरण निर्माण झालेले आहे.

**महाराष्ट्रात अनेक साम्राज्ये आली. त्यामध्ये खालील साम्राज्ये महत्त्वपूर्ण आहेत.**

**१. राष्ट्रकूट साम्राज्य (पहिले)**
**२. सातवाहन साम्राज्य**
**३. वाकाटक आभीर अश्मक**

**४. बदामीचे चालुक्य**
**५. राष्ट्रकूट (दुसरे)**
**६. उत्तर चालुक्य**
**७. शिलाहार व कदेब**
**८. यादव साम्राज्य**

अशा विविध राजवटी महाराष्ट्रात होऊन गेल्या. या राजवटींच्या काळात मराठी भाषेचा उदय होऊन मराठी भाषा व संस्कृती वाढीस लागली. तिचा विकास संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश असा झाला. मराठीला महाराष्ट्री - महारट्ठी-मऱ्हाठी अशी नावे दिली गेली ती त्या त्या काळाशी सुसंगत होती. आज मराठी हे नाव या प्रातांतील भाषेला असल्याचे दिसते. तसे ते सर्वमान्य व सर्वश्रुत झालेले आहे.

## महाराष्ट्राचे प्राचीन उल्लेख

''महाराष्ट्र'' या शब्दाचा पहिला उल्लेख एरण येथील स्तंभलेखात आला आहे. हा शिलालेख इ.स. ३६५ मधला आहे.

वराहमिहिरने (सन ५०५) लिहिलेल्या 'बृहदसंहिंते'च्या दहाव्या अध्यायात महाराष्ट्रात या अर्थाने महाराष्ट्र हा शब्द वापरला आहे.

'बृहदसंहिते'वर भटोत्पाल याने केलेल्या टीकेत महाराष्ट्र हा शब्द आला आहे.

दंडीच्या 'काव्यादर्श' या ग्रंथात (इ.स. सातवे शतक) महाराष्ट्र व महाराष्ट्री हे शब्द आले आहेत.

इसवी सनाच्या नवव्या शतकातील राजशेखर याने अनेक वेळा 'महाराष्ट्र' हा शब्द वापरला आहे.

### महाराष्ट्र या नावाची उपपत्ती

'महाराष्ट्र' हा शब्द कसा तयार झाला या विषयी विद्वानामध्ये एकमत नाही. अनेक विद्वानांनी याविषयी मते मांडली आहेत. परंतु त्यामध्ये मतमतांतरे आहेत.

डॉ. जॉन विल्सन यांनी मोल्सवर्थ, कोशाच्या प्रस्तावनेत 'महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र' अशी उपपत्ती मांडली आहे. त्याच्या मते 'महार' हे महाराष्ट्राचे मूळ वसाहतकार आहेत. त्यांच्या जातीच्या नावावरून ('महार'वरून) महाराष्ट्र हे नाव या प्रदेशाला पडले असावे असे मत मांडले.

डॉ. ओप्पट यांनी वर उल्लेखिलेल्या डॉ. जॉन विल्सन यांच्या उपपत्तीस पाठींबा दिला. व तिच उपपत्ती पुढीलप्रमाणे मांडली आहे. त्यांच्या मते महाराष्ट्राचे मूळ, जुने नाव मल्लराष्ट्र असावे. मल्ल व मार हे एकच होय. मार-म्हार-महार यावरून महाराष्ट्र म्हणजे 'महारांचे राष्ट्र' असे त्यांनी म्हटले आहे.

डॉ. भांडारकर यांनी महाराष्ट्रात रसिक (संस्कृत रूप राष्ट्रीक) नावाचे लोक राहत (असावेत) होते. हे लोक पुढे स्वतःला राष्ट्रिक, रठिक, महाराष्ट्रिक, महारठी असे म्हणू लागल्याचे सांगितले आहे.

श्री. म. म. काणे यांनी 'महाराष्ट्र' हा अनेक राष्ट्राचा समूह असून 'महा-राष्ट्र ते महाराष्ट्र' असा विचार मांडला आहे.

श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी 'महारट्ठ' यात 'महार' आणि रट्ठ या दोन जातींच्या नावाचा संयोग होऊन महारट्ठ हे रूप तयार झाले. पुढे महारराष्ठीक आणि कालांतराने महाराष्ट्र असे संस्कृतीकरण झाले.

शं. बा. जोशी यांच्या मते, या देशाचे नाव मरहट्ट असे असावे. 'मरहट्ट' हा कानडी शब्द असून त्याचा अर्थ (मर-झाड, हट्ट-प्रदेश) झाडीमंडळ म्हणजे जंगलयुक्त प्रदेश असा आहे. प्राचीन काळी हा प्रदेश जंगलयुक्त असावा. दंडकारण्य, झाडीमंडळ या नावावरून ते स्पष्ट होते.

महाराष्ट्र या नावाविषयी संशोधकात एकमत दिसत नाही. इ.स.२२४च्या सुमारास लिहिलेल्या 'थेरो महाधम्म रख्खिता' या ग्रंथात महाराष्ट्र असा उल्लेख आढळतो. महाराष्ट्र म्हणजे 'महान राष्ट्र' असेच सर्वमान्य झालेले दिसते.

वरील विवेचनावरून सध्या अस्तित्वात असलेल्या आणि मराठी भाषा बोलणाऱ्या महाराष्ट्र या प्रदेशाला महाराष्ट्र हे नाव कसे पडले याविषयी अनेक विचार आहेत. या प्रदेशात मराठी भाषा बोलली जाते ही भाषा कधी, कोणत्या काळात, कोणत्या भाषेपासून तयार झाली याबाबतही समाधानकारक एकच एक उत्तर मिळत नाही. त्यामुळे मराठीच्या जन्मविषयीचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्यास तो पुढीलप्रमाणे घेता येईल. त्याविषयी असणारी विविध मते आणि मत्तांतरे पुढील प्रमाणे आहेत.

**मराठी भाषेचा उत्पत्तीकाळ**

मराठी भाषा कधी निर्माण झाली याचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्यास आपणास 'महाराष्ट्र' या नावाप्रमाणेच अनेक विचारवंताच्या मतांचा, पुराव्यांचा आधार घ्यावा लागतो. कारण कोणतीही भाषा अमुक एका वर्षापासून सुरू झाली असे म्हणता व मानता येत नाही.

मराठी भाषेचा विकास वैदिक संस्कृत - अभिजात संस्कृत-अपभ्रंश-प्राकृत-मराठी या क्रमाने झाला याबाबत संशोधकात, विद्वानात एकमत असल्याचे दिसते.

मराठी भाषेतील शब्द संग्रहाचा विचार करता मराठीतील शेकडा पंच्याहत्तर टक्के शब्द संस्कृत भाषेतून आलेले आहेत. किंवा संस्कृतपासून तयार झालेले आहेत.

ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी'तील शब्द संग्रहाचा विचार करता १२,१३व्या शतकातील मराठी भाषा वैभव संपन्न होती. प्रगल्भ होती. मराठीत त्यापूर्वीही चांगली वाङ्मय निर्मिती होत असावी. परंतु ती आज उपलब्ध नाही.

मराठी भाषा केव्हा जन्मास आली याचा शोध घेतला असता. ताम्रपट, शिलालेखांचे उल्लेख पुरावे म्हणून महत्त्वपूर्ण ठरतात. काही पुरावे पुढील प्रमाणे सांगता येतील.

**श्रवण बेळगोळ येथील शिलालेख -**
हा शिलालेख इ.स.१११६ - १७ (शके १०३८ - ३९) च्या सुमारचा आहे. गोमतेश्वराच्या दगडी पुतळ्याखाली कोरलेल्या शिलालेखात खालील वाक्यात मराठी ओळी आलेल्या आहेत.

।। श्री चामुण्डराजे — करवियले ।।
।। श्री चामुण्ड राये सुत्ताले करवियले ।।

वरील वाक्यातून तत्कालीन लोकांत मराठी भाषा प्रचलीत होती व लोक तिचा वापर करीत होते.

**२. 'मानसोल्लास' या ग्रंथातील पुरावा**
सोमेश्वर या राजाने 'मानसोल्लास' या नावाचा ग्रंथ लिहिला. (इ.स. ११२९) त्या ग्रंथात काही मराठी पदे आली आहेत.

**३. 'राजमती प्रबोध'** या नाटकातील पुरावा - इ.स. ११२८ (शके १०५०)च्या सुमारास गुजरात येथील यशचंद्र पंडित याने 'राजमती प्रबोध' हे संस्कृत नाटक लिहिले. या नाटकात महाराष्ट्रीय स्त्रीचे वर्णन मराठी भाषेतून आले आहे.

**४. 'अभिल षितार्थ चिंतामणी'** या ग्रंथातील पुरावा :
इ.स. १०२९ (शके १०५१) मध्ये लिहिल्या गेलेल्या 'अभिल षितार्थ चिंतामणी' या संस्कृत ग्रंथात रागतालाची माहिती देताना काही मराठी पदे आली आहेत.

**५. अक्षी येथील शिलालेख :**
इ.स. १०१२ (शके ९३४) मध्ये लिहिलेला अक्षी येथील शिलालेख आहे. त्यात मराठी वाक्य मिश्र स्वरूपात (सापडते) आहे.

**६. पळसदेव येथील शिलालेख :**
इ.स. ११५७ (शके १०७९) मधील हा शिलालेख सरडेश्वराच्या देवळावर आहे. त्यात मराठी शब्द आले आहेत.

**७. पाटण येथील शिलालेख :**
इ.स.१२०६ (शके ११२८)चा हा शिललेख चांगदेवाने खोदला असून त्यामध्ये मराठी क्रियापदाची रूपे आली आहेत.

**८. आंबेजोगाईचा शिलालेख :**
इ.स. १२२८ (शके ११५०) चा हा शिलालेख खोलेश्वराचा शिलालेख म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामध्ये मराठीचा वापर केला आहे.

**९. नेवासे येथील शिलालेख -**
इ.स. १२३९ (शके ११६१) नेवासे येथील हेमाडपंथी देवळाच्या दगडावर लिहिलेल्या लेखाची भाषा संस्कृत मराठी अशी आहे.

**१०. पंढरपूरचा शिलालेख :**
इ.स.१२३३ (शके११५५) पंढरपूरचा हा शिलालेख ज्या शिलेवर आहे. ती शिळा चौऱ्याऐशींचा शिला म्हणून प्रसिद्ध आहे. या शिलालेखातील अनेक शब्द मराठी वळणाचे आहेत.

**११. ताम्रपटातील पुरावा :**
इ.स. ६८० (शके ६०२) मधील ताम्रपटात 'सांब्राज्य', 'पन्नास', 'प्रिथिवी', असे मराठी वळणाचे शब्द आढळतात.

**११. चिकुर्डे येथील ताम्रपट :**
हा ताम्रपट इ.स. ६९९ (शके ६२१) मधील आहे. या ताम्रपटात 'आचलित', 'करवुन', 'करित' यासारखे मराठी शब्द आहेत.

वरील ग्रंथातील पुरावे, शिलालेख, ताम्रपट यामधील पुरावे पाहिल्यास व त्या आधारे मराठी भाषेच्या जन्माचा शोध घेतल्यास असे दिसते की, मराठी भाषा शब्दरूपाने सातव्या शतकात आढळते. अकराव्या शतकात शिलालेखात वाक्यरूपाने आढळते. बाराव्या शतकात ती ग्रंथात समाविष्ठ झालेली दिसते.

मराठी भाषा सातव्या शतकापासून बोलीरूपाने अस्तित्वात आली असावी. त्यानंतर ती भाषेच्या नैसर्गिक विकासाप्रमाणे विकसित होत होत अकराव्या - बाराव्या शतकापर्यंत बोलीचे स्वरूप बदलले आणि लिखित भाषेच्या दर्जापर्यंत ती पोहचली असावी. बाराव्या, तेराव्या शतकात मराठी भाषेत चांगल्या प्रकारची, दर्जेदार वाङ्मयनिर्मिती झाल्याचे दिसते. याचाच अर्थ मराठी भाषा बोली स्वरूपात अनेक शतके अस्तित्वात असावी. मराठी बोली स्वरूपात असल्याने मराठीत चांगले लोकसाहित्य म्हणजे साहित्याची लिखित परंपरा नसली तरी मौखिक परंपरा होती. या मौखिक परंपरेनेच तत्कालीन संस्कृती टिकविली. तिचे पुढील पिढ्यांसाठी जतन करून ठेवले. लोकगीते, लोकनाथ, कहाण्या, व्रतवैकल्पे हे सर्व मौखिक परंपरेत होते. लिखित परंपरा हळूहळू सुरू होताच या सर्वांचा अविष्कार त्यातून जोरकसपणे, पद्धतशीर, काटेकोरपणे सुरू झाला. त्यामुळेच मराठीतील प्रारंभीचे वाङ्मय 'लीळाचरित्र', 'ज्ञानेश्वरी', 'विवेकसिंधू' यांची मांडणी लक्ष वेधून घेणारी आहे.

थोडक्यात
मराठीतील शिलालेखाचा विचार करता साधारणपणे शके ९३४ च्या दरम्यानच्या शिलालेखातून संस्कृत प्राकृत मराठी वाक्ये डोकावताना दिसतात.ख्रिस्तपूर्व ३०० ते इ.स. १३०० या सोळाशे वर्षातील शिलालेखांचे अध्ययन केल्यानंतर श्री. बी. एन. नाईक यांनी पुढील मत मांडले आहे, बदामी चालुक्याच्या काळात प्रचलित असलेली मराठी बोली त्या वेळच्या अधिकृत लेखातून प्रवेश करण्यासाठी धडपडत होती. बदामी चालुक्याचा काळ इ.स.५ वे ते ७ वे शतक असा मानला जातो. त्याच्यापूर्वी चार शतके मराठी भाषा बोलीच्या स्वरूपात होती. मराठी लोकसाहित्याचे

अस्तित्व इ.स.६व्या शतकात होते. म्हणजेच मराठी लोकसाहित्य इ.सनाच्या सहाव्या शतकापासून चालत आलेले आहे, असे दिसते. इ.स. ६वे शतके ते १२वे शतक या काळात मराठी भाषा ग्रंथ भाषा नव्हती तरी तिचे अस्तित्व मात्र होते.

मराठी लोकसाहित्य कधी, कोणत्या काळात निर्माण झाले याविषयी निश्चित सांगता येत नसले तरी मराठी बोलीभाषेच्या विकासाबरोबरच त्यात उत्तरोत्तर भर पडत गेली.

**संस्कृत वाङ्मयाचा आदर्श**

मराठी भाषेतील साहित्यावर संस्कृत वाङ्मयाचा प्रभाव असल्याचे दिसते. कारण मराठी बोली स्वरूपात असताना ग्रंथभाषा, ज्ञानभाषा संस्कृत होती. तिच्यातील विचार जनसामान्यांना उपलब्ध करून देण्याच्या प्रेरणेतूनच मराठीतून रचना झाल्याचे दिसते. उदा. श्रीपतीने लिहिलेला 'ज्योतिषरत्न माला' हा ग्रंथ प्रथम संस्कृतमध्ये लिहिला गेला. त्यानंतर त्याच्यावर मराठी टीका लिहिली गेली. 'ज्ञानेश्वरी', 'विवेकसिंधू', हे ग्रंथही संस्कृतातील आध्यात्मिक विचारांवर आधारलेले आहेत. मराठी लिखित वाङ्मयाचा विचार करता मराठी लिखित वाङ्मय नंतरच्या काळात जन्मास आले असावे. 'ज्योतिषरत्न माला' या संस्कृत ग्रंथावर लिहिलेली मराठी टीका हा मराठी वाङ्मयाचा प्रारंभ ठरतो.

'ज्योतिषरत्नमाला' हा संस्कृत ग्रंथ श्रीपतीभट्ट यांनी लिहिलेला आहे. त्याने ज्योतिष या विषयावर अनेक रचना संस्कृत भाषेतून केलेल्या आहेत. उपरोल्लेखित ग्रंथ शके ९६१च्या सुमारास लिहिलेला आहे. त्या संदर्भात डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांनी 'प्राचीन मराठी गद्यः प्रेरणा आणि स्वरूप' या ग्रंथात पुढील मत मांडले आहे. 'ज्योतिषरत्नमाला' या ग्रंथावरील मराठी टीकेने मराठी वाङ्मयास (लिखित स्वरूपातल्या) प्रारंभ झाला असून मराठी भाषेतला पहिला ग्रंथ देखील तोच ठरतो.

डॉ. श्री. रं. कुलकर्णी या अभ्यासकांनी मांडलेले मत लक्षात घेतले तर मराठी वाङ्मयाचा प्रारंभ हा संस्कृत भाषेतील ग्रंथावरील टीकेने झालेला आहे. संस्कृत भाषेतील ग्रंथ घेऊन टीकाग्रंथ लिहिण्याची परंपरा येथूनच विकसित होत गेलेली दिसते.

**ज्योतिषमाला - या मराठी ग्रंथाविषयी**

'ज्योतिषरत्नमाला' हा मराठी टीका ग्रंथ ज्या काळात लिहिला गेला. त्याकाळात इतर ग्रंथ निर्मिती झाली नसावी. एखादाच ग्रंथ निर्माण झाला व अशा प्रकारचे लेखनाचे काम थांबले व नंतरच्याही बऱ्याच काळापर्यंत ते थांबले असे म्हणता येणार नाही. कारण ग्रंथनिर्मितीची परंपरा सुरू झाल्यानंतर ती तात्काळ बंद होते असे म्हणता येत नाही. त्या काळात तसेच नंतरच्या काळात ग्रंथनिर्मिती झाली असावी परंतु ती ग्रंथ निर्मिती सुरक्षित राहिली नसावी. त्यांचे ग्रंथ जतन झाले नाही किंवा कालौघात ते नष्ट झाले असावे. असे म्हणण्यास पुष्कळ वाव आहे. कारण नंतरच्या काळात बरेचसे प्रौढ व गंभीर स्वरूपाचे वाङ्मय मराठी भाषेत निर्माण झालेले दिसते.

श्रीपतीभट्ट हा संस्कृतच्या अभ्यासक होता. हे त्याच्या ग्रंथावरून दिसते. संस्कृत भाषेतूनच रचना करावी असा आग्रह त्या काळात होता. तसेच संस्कृत ही प्रतिष्ठितांची भाषा असा समज त्याकाळी असल्याने श्रीपतीने स्वतःच्याच संस्कृत ग्रंथाची टीकेसाठी निवड केली त्यातून संस्कृत

प्रतिष्ठा या समीकरणाला तडा देण्याचा त्याचा हेतू दिसतो. श्रीपतीने तत्कालीन अवघड तत्त्वज्ञान सांगणारे ग्रंथ टीकेसाठी न निवडता 'ज्योतिषरत्नमाला' यासारखा सामान्य विषयावरील ग्रंथ टीकेसाठी निवडला. या ग्रंथात मुहूर्त हा विषय आला आहे. मराठीत प्रथम गद्यलेखन झाले की पद्यलेखन असा विचार करता एक गोष्ट लक्षात येते ती अशी प्रथम गद्याची निर्मिती झालेली दिसते. गद्यलेखन अनेक ठिकाणी आढळते. शके ५०० पासून ११व्या शतकापर्यंत मराठी गद्य लेखाचे पुरावे सापडतात. पद्य मात्र ११व्या शतकानंतर आढळते.

आज उपलब्ध असलेल्या साहित्यात शके ५०० ते ९६१ या कालखंडातील एकही साधन उपलब्ध नाही. 'कुवलयमाला' या संस्कृत प्राकृत काव्यात मराठी माणूस व त्याची भाषा यांच्या स्वरूप वैशिष्ट्यांचा उल्लेख आला आहे. त्यावरून शके ७०० पूर्वी मराठी भाषा अस्तित्वात होती, असे दिसते. १३व्या शतकातील पालकुटी सोमनाथ या कवीच्या 'पंडिताराध्य चरित्र' या तेलगू ग्रंथात मराठी पद आलेले आहे.

## मराठीतील आद्यग्रंथ

मराठीच्या प्रारंभकाळातच मराठी भाषा अगदी सौंदर्यपूर्ण, काव्यमय रूप घेऊन अवतरली असे म्हणता येत नाही. मराठी भाषा लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधूपूर्व काळात मराठीत कथा, कहाण्या, स्त्रीगीते, लोकगीते, पत्रव्यवहार वैद्यक ज्योतिष इ. विषयावर त्रोटक वाङ्मय निर्माण होत असले पाहिजे.

लीळाचरित्र, विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी या वाङ्मयकृती अस्तित्वात येण्यापूर्वी मराठी भाषेत झालेली रचना उपलब्ध नसल्याने पुरावा म्हणून देता येत नसल्याने विसाव्या शतकाच्या अगदी शेवटपर्यंत 'विवेकसिंधू' या ग्रंथाला मराठीतील आद्य ग्रंथाचा मान दिला जात होता. परंतु अगदी अलीकडच्या दहा-बारा वर्षात 'विवेकसिंधू' हा मराठीतील आद्यग्रंथ नाही असा निर्वाळा काही संशोधकांनी दिला आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या अनेक ग्रंथात 'आद्यकवी मुकुंदराज व आद्यग्रंथ विवेकसिंधू' अशी माहिती उपलब्ध आहे. त्याचे कारण वाङ्मयीन मतभेद, मतमतांतरे ही एकदम तडकाफडकी नाहीशी होत नाहीत. त्यासाठी काही काळ जावा लागतो. मराठीतील आद्यग्रंथाबाबतही असेच म्हणता येईल.

मुकुंदराज आणि विवेकसिंधू
'विवेकसिंधू' हा ग्रंथ मुकुंदराज या कवीने लिहिला तो मराठीतील आद्यग्रंथ आहे असे सर्वच वाङ्मयेतिहासाच्या ग्रंथातून लक्षात येते अलीकडे काही ग्रंथातून हा मान 'लीळाचरित्र' या चरित्रग्रंथाला दिला जातो. तरीही 'विवेकसिंधू' या ग्रंथाला हा मान का दिला जात होता हे पाहणे त्याची कारणे शोधणे अपरिहार्य ठरते.

**'विवेकसिंधू' या ग्रंथाच्या काही प्रतीत खालीलप्रमाणे कालनिदर्शक ओवी आढळते.**

शके अकराशे दाहोत्तरे (१११०) साधारण नाम संवत्सरे ।
तै राजा शारंगधर । ग्रंथ उभारे तै जाला ।।

या ओवीत विवेकसिंधू या ग्रंथाची रचना शके अकराशे दहा मध्ये झाली असून त्यावेळी साधारण संवत्सर होते असे म्हटले आहे. 'महाराष्ट्र सारस्वत'कार वि.ल.भावे यांच्या मते साधारण संवत्सर शके १११० मध्ये न येता शके १११२ मध्ये येते असे म्हटले आहे. कु. पां. कुलकर्णी यांनी संपादित केलेल्या 'विवेकसिंधू' या ग्रंथात तीन प्रकारच्या कालगणना देऊन शके व संवत्सर

बोबडे व प्रा. सुरेश डोळसे यांनी 'विवेकसिंधू' या ग्रंथाची रचना शके अकराशे दहा मध्ये झाली असून शके व संवत्सर बरोबर असल्याचे मत मांडले आहे.

'विवेकसिंधू' हा मराठीतील तत्त्वज्ञानपर ग्रंथ आहे. मराठीच्या प्रारंभकाळीच इतक्या नीट नेटका ग्रंथ जन्मास यावा. याबाबत शंका निर्माण होणे साहजिकच आहे. या ग्रंथाची भाषा व रचना नंतरच्या काळातील असावी, असे वाटते. त्यामुळेच आजगावकर म्हणतात, ''ग्रंथाचा काटेकोर बांधणीमुळे मुकुंदराजास ज्ञानेश्वरोत्तर काळात आणून ठेवण्याची इच्छा प्रबल होते.''

मराठीतून वाङ्मयनिर्मिती बाराव्या शतकापासून सुरू झाली असावी. त्यापूर्वी वाङ्मयनिर्मिती झाली असली तरी उपलब्ध नसल्याने तिच्याविषयी मत मांडणे योग्य नाही. मराठीच्या प्रारंभकाळी जी रचना झाली ती संस्कृतच्या आधाराने किंवा अनुकरणाने. त्यामुळे संस्कृतातील धर्मविचार, तत्त्वज्ञान मराठीत येणे अपरिहार्य होते. संस्कृत भाषा तत्कालीन जनसामान्याला अगम्य होती. त्यामुळे जनसामान्यासाठी त्यांच्याच भाषेत रचना करावी या हेतूने मराठीत रचना झाली. मुकुंदराजांनी वरील दृष्टिकोनातून तत्कालीन जनमसामान्यासाठी 'विवेकसिंधु' या ग्रंथाची निर्मिती केली. 'विवेकसिंधू' हा ग्रंथ आध्यात्मविचारांचे निरूपण करण्यासाठीच लिहिला आहे. कवीचे वेदांतावरील प्रेम अभिमान व्यक्त झालेला आहे. आपला ग्रंथ सर्वसामान्य जनतेसाठी असून या ग्रंथातून सगुण भक्तीचेच निरूपण केले आहे. या ग्रंथात सुमारे पंचवीस संस्कृत ग्रंथातील आठशे अवतरणे आली आहे.

**लीळाचरित्र**

'लीळाचरित्र' हा मराठीतील आद्य ग्रंथ अशा प्रकारचा विचार संशोधन पुढे आले असले तरी अजून ते सर्वांपर्यंत पोहचलेले नाही. लीळाचरित्राचा लेखन काळ शके १२००च्या दरम्यान आहे. 'लीळाचरित्रां'ची मूळ प्रत खालशाच्या धाडीत नाहीशी झाली अनेकांनी तिचे पाठांतर करून ठेवले होते. हिराइसाच्या सांगण्यावरून परशराम बास 'लीळाचरित्र' पुन्हा लिहून काढले. शिवबास, मुरारीमल्ल यांनी लीळाचरित्राचे संकलन व संशोधन केले. नाथ बास, दत्तोबास तळेगावकर, वाईदेशकर यांनी पाठ लिहिले आहेत.

लीळाचरित्र या ग्रंथाची रचना म्हाईभट या महानुभाव शिष्याने केली. त्यासाठी त्याने खूप कष्ट उपसले. चक्रधर स्वामींच्या भक्तांना स्मरणभक्ती करण्यासाठी, पुढील भक्तांना मागदर्शन होण्यासाठी म्हाईंभटाने नागदेवाचार्यांना पुढील विनंती केली 'सर्वज्ञाचिया लीळा तुम्ही सांगा, आन् मी लिहिन.' लीळाचरित्रांची भाषा साधी, सोपी, अर्थवाही आहे त्यामुळे ते रूचिर बनले आहे. मानवी स्वभावाचे विविधरंगी दर्शन या भाषेतून घडते महानुभावाचे तत्त्वज्ञान, आचारधर्म, प्रसार, संघटन याविषयीची माहिती मिळत असल्याने हा महानुभाव संप्रदायात हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो.

'लीळाचरित्र' या ग्रंथाविषयी व. दि. कुलकर्णी यांनी पुढील विचार मांडले आहेत. 'लीळाचरित्र' ही साहित्यनिर्मिती वेगळ्याच जातीची आहे. तिचा घाट कलाकृतीचा नाही. भक्तिरसाने ओथंबलेले हे एक सरळ प्राजंळ असे 'प्रत्यक्ष'च (Fact)च आहे. 'जसे घडले तसे लिहिले' या जातीचे हे कथन एक प्रकारे इतिहासाचीच प्रकृती घेऊन आलेले आहे. कोणताही काव्यहेतू अथवा कलाहेतू मनात न बाळगता लिहिलेले हे 'लीळाचरित्र' आपली स्वतःचीच स्वतंत्र कथनशैली वर्णनपद्धती, संवादरिती घेऊन आले आहे. अशा प्रकारचा ग्रंथ मराठीत प्रथम निर्माण झाला. कोणतेही लेखनादर्श

समोर नसताना असे अलौकिक शब्दशिल्प मराठीत निर्माण झाले त्यामुळे याचे आश्चर्य वाटते.

**रसराजलक्ष्मी आणि विठ्ठल गलंड**

विठ्ठल गलंड याने संस्कृत व मराठी अशा दोन्ही भाषांतून ग्रंथनिर्मिती केली. त्याने आयुर्वेदावर मराठीतून ग्रंथलेखन केले. 'रसराजलक्ष्मी' व 'वैद्यवल्लभसंहिता' या त्याच्या स्वतःच्याच संस्कृत ग्रंथावर त्याने मराठीतून टीका लिहिली.

'रसराजलक्ष्मी' या ग्रंथाचा रचनाकाळ शके १२२२ आहे. विठ्ठल गलंड यांचा 'रसकौमुदि' हा ग्रंथ पद्यात आहे. त्याने तो संपादून प्रसिद्ध केलेला आहे. 'रससिंधू' या संस्कृत ग्रंथाचे लेखन विठ्ठल गलंड यांनी केले आहे. या ग्रंथाला वैद्यकशास्त्रात महत्त्वाचे स्थान मिळाले. तसे उल्लेख संदर्भ अनेक ग्रंथातून मिळतात.

**थोडक्यात :**

आयुर्वेदावर पहिली गद्य-पद्य रचना करणारा विठ्ठल गलंड हा मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील महत्त्वाचा लेखक ठरतो.

**समारोप**

मराठी भाषेत वाङ्मयनिर्मिती सुरू होण्यापूर्वी अनेक शतके मराठी भाषा बोलीभाषेच्या स्वरूपात वावरत होती तिच्या जन्माविषयी अनेक पुरावे उपलब्ध आहेत. तत्कालीन इतर भाषातील ग्रंथ, ताम्रपट, शिलालेख इ. यातून मराठी भाषा अस्तित्वात होती. हे समजते परंतु या भाषेतील ग्रंथ १२व्या, १३व्या शतकानंतरचेच आहेत. आणि उपलब्ध झालेले ग्रंथ रचना दृष्ट्या, वाङ्मयीनदृष्ट्या अतिशय दर्जेदार आहेत. त्यामुळे या ग्रंथांना अगदी प्रारंभकालीन ग्रंथ मानता येत नाही. त्यामुळेच विसाव्या शतकाच्या शेवटपर्यंत 'विवेकसिंधू' हा आद्यग्रंथ मानला गेला. त्याला अलीकडच्या काळातील ग्रंथ अशी मान्यता देण्यात आली आहे.

'लीळाचरित्र' हा म्हाईंभटाने लिहिलेले चक्रधरांच्या लीळांवर आधारलेला चरित्रग्रंथ आहे मराठीतील एक वाङ्मयीन लेणे आहे. सुंदर, सुंदर, छोटी वाक्ये, यांनी बनलेल्या या लीळातून तत्कालीन समाजजीवनावर प्रकाश पडतो.

अशा प्रारंभकालीन ग्रंथावरून मराठी भाषेत वाङ्मयरचना होत असली पाहिजे, असे म्हणता येते. परंतु यासाठी कोणताही ग्रंथ आधारासाठी देता येत नाही. त्यामुळे हे वाङ्मय आज उपलब्ध नाही. जे उपलब्ध आहे तिच परंपरा मानून लीळाचरित्र, ज्योतिषरानमाला, रसराजलक्ष्मी, वैद्यवल्लभसंहिता यासारखे ग्रंथ प्रारंभकाळात निर्माण झाले, असे म्हणता येते.

मराठीतील मौखिक वाङ्मयाची परंपरा समृद्ध आहे. तिचा उपयोग विविध काळातील लेखकांनी करून घेतला. त्यामुळे मराठी वाङ्मय समृद्ध होण्यास नकळतपणे मदतच झाली.

❖ ❖ ❖

घटक क्र. २

# २

# महानुभाव वाङ्.म-ा

**पाठाची रुपरेषा**


२.१. विष-प्रवेश

२.२. महानुभाव वाङ्.म-ा

२.३. साती ग्रंथ

- २.३.१ रुक्मिणी स्व-ंवर
- २.३.२ शिशुपाल वध
- २.३.३ उध्दवगीता
- २.३.४ वच्छाहरण
- २.३.५ ज्ञान प्रबोध
- २.३.६ सह्याद्री वर्णन
- २.३.७ ऋध्दिपूर चरित्र
- २.३.८ समारोप

२.४ महानुभावाचे आणखी काही ग्रंथ

- ४.१ लीळाचरित्र
- ४.२ दृष्टांतपाठ
- ४.३ सूत्रपाठ
- ४.४ स्मृतिस्थळ
- ४.५ पूजावसर
- ४.६ मूर्तिप्रकाश
- ४.७ स्थानपोथी
- ४.८ धवळे
- ४.९ मातृकी रुक्मिणी स्व-ंवर

२.५ समारोप


## २.१. विष-ा प्रवेश

महाराष्ट्रात वारकरी संप्रदा-ाची भरभराट होण्-ापूर्वी महानुभाव पंथाचा उद-ा झाला होता. महानुभाव पंथाच्-ा उद-ाचा काळ हा स्वातंत्र्-ाच्-ा काळ होता. -ा काळात व्रतवैकल्-ांना उत आला होता. अंधःश्रध्दा बोकाळली होती. -ाज्ञ-ाग व क्षुद्र दैवताच्-ा उपासनेत समाज रमला होता. उत्तरेत इस्लामी सत्ता स्थापन झाली होती. स्वकी-ा समाज ख-ा धर्मापासून वंचित झाला होता. धर्मज्ञान, विचार, संस्कृत भाषेतच अडकलेले होते. जैन, नाथ, लिंगा-ात, बौध्द इ. धर्म - पंथ आपले विचार मांडत होते. द्वैत- अद्वैत ज्ञान-ोग, कम-ोग, स्मार्त भागवत अशा विभिन्न प्रणाली समाजात रुढ होत्-ा.

थोडक्यात :- सर्वसामान्य समाजापासून धर्म व धर्मविचारदूर गेला होता. अशा समाजाला मार्ग दाखविण्यासाठी चक्रधरांनी महानुभाव पंथाची स्थापना केली.

## २.२ महानुभाव वाङ्मय

मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील फार मोठा कालखंड महानुभाव वाङ्मयाने व्यापला आहे. महानुभावांना मराठी भाषेविषयी खूप अभिमान आत्मियता होती चक्रधरांनी व नागदेवाचार्यांनी मराठी भाषा वापरण्यास, मराठीतून ग्रंथ निर्मिती करण्यास आपल्या पंथीयांना सांगितले होते. गद्य-पद्य अशा दोन्ही माध्यमातून महानुभाव लेखकांनी ग्रंथ निर्मिती केली आहे. एकूण प्राचीन मराठी साहित्यात गद्यवाङ्मय अल्पप्रमाणात आहे. परंतु यादवकाळात महानुभाव लेखकांनी मोठ्या प्रमाणावर गद्य लेखन केले आहे.

महानुभावांचे वाङ्मय पंथनिष्ठेतून निर्माण झालेले आहे. पंथ ही महानुभाव लेखकांची साहित्यप्रेरणा आहे. पंथप्रवर्तकाची चरित्रे, लीळा, वचने, आख्यायिका, तत्त्वज्ञान, आणि आचारधर्म यांचे जतन करणे, दर्शन घडविणे, प्रचार व प्रसार करणे हा महानुभाव लेखकांचा ग्रंथनिर्मितीमागील प्रमुख हेतू आहे. महानुभावांचे वाङ्मय विविध प्रकारचे आहे. यामध्ये गद्यग्रंथ, भाष्ये, टीका, क्षेत्रवर्णने, विविध स्तोत्रे, विदग्ध कथाकाव्ये, चरित्रे आहेत. या सर्व वाङ्मयातून महानुभाव पंडितांची भक्ती, प्रतिभा, प्रज्ञा आणि पंडित्य यांचे दर्शन घडते.

महानुभाव वाङ्मय पाच प्रकारात विभागलेले आहे.

(१) चक्रधरांच्या मुखातून निघालेली जी वचने ग्रंथबध्द केली आहेत. त्यांना श्रुती ही संज्ञा आहे. त्यामध्ये सूत्रपाठ, नित्यादिनी लीळा, दृष्टांतपाठ, लीळाचरित्र, आचारस्थळ इ.

(२) चक्रधरांच्यानंतर नागदेवाचार्य हे पंथाचे आचार्य झाले. त्यांच्या संबंधी किंवा त्यांच्या काळात जे वाङ्मय निर्माण झाले. त्या ग्रंथाना स्मृती असे म्हणतात.

उदा. स्मृतीस्थळ.

(३) नागदेवाचार्यानंतर विविध प्रचारकांनी आपली शाखा स्वतंत्रपणे पुढे चालविली त्यांना आम्नाय असे म्हणतात. परशुराम बास आणि तत्कालीन इतर आचार्य यांनी आचारविषयक जे विविध नियम केले त्यांना वृध्दाचार अशी संज्ञा आहे.

(४) त्यानंतर श्री गर्जर शिवबास, वाईदेशंकर इ.च्या काळात महानुभाव पंथासंबंधी आणि ग्रंथासंबंधी जी निरनिराळी भाष्ये निर्माण झाली त्यांना मार्गरुढी असे म्हणतात.

(५) त्यानंतरचे वाङ्मय वर्तमान या विभागात समाविष्ठ केले जाते.

थोडक्यात :- महानुभावाचे सर्व वाङ्मय श्रुती, स्मृती, वृध्दाचार, मार्गरुढी आणि वर्तमान या पाच विभागात वर्गीकृत केले आहे.

महानुभाव वाङ्मय पंथाचे आचारविचार तत्त्वज्ञानाने भरलेले आहे. परंतु त्यामध्ये लालित्य आणि वेगवेगळेपण जाणवते. मराठी भाषेत चरित्रवाङ्मयाची परंपरा महानुभावांनीच निर्माण केली. 'लीळाचरित्र'. 'गोविंदप्रभूचरित्र'. 'पूजावसर' ही महानुभावांची चरित्रपर रचना आहे. 'शिशुपालवध'. 'रुक्मिणी स्वयंवर' सारखे आख्यानकाव्ये, 'दृष्टातपाठांसारखे' प्राचीन कथांमधून तत्त्वज्ञान सांगणारे ग्रंथ 'धवळयांसारखी आद्य पद्य रचना करुन या पंथीयांनी मराठीचे भांडार समृध्द केले.

श्रीकृष्ण हे महानुभावांचे प्रत्-क्ष ईश्वर त्-ामुळे -ा कवींनी श्रीकृष्णचरित्रावर आख्-ानकाव्-े लिहिली, गीतेवर टीका लिहिल्-ा. त्-ामुळे मराठी वाड्.म-ात विविधता आली.

-ादवकाळात संस्कृत न -ेणाऱ्-ा लोकांसाठी महानुभावांनी आपली अधिकांश रचना मराठीतून केली. तत्त्वज्ञानानुसार व विष-ा सामान्-ातील सामान्-ा माणसाला देखील सहज समजावा. आपले धर्मशास्त्र त्-ांच्-ा बोलीभाषेत सांगून धर्मातील आचारविचारांचे निरुपण सुटसुटीतपणे करण्-ाचा महानुभावांचा प्र-ात्न होता. 'दृष्टांतपाठ' हे त्-ांचे उत्तम उदाहरण हो-ा.

## २.३ साती ग्रंथ

महानुभाव संप्रदा-ात महानुभाव कवींनी लिहिलेल्-ा साती ग्रंथांना विशेष महत्त्व दिले जाते. -ा ग्रंथांचे स्वरुप ओवीबध्द आहे. -ा साती ग्रंथाचे लेखक व्-ासंगी व प्रतिभाशाली पंडित होते. राजदरबारातही त्-ांना मान होता. त्-ांना चक्रधरांचा सहवास लाभला होता. श्रीकृष्ण -ा पंथाच्-ा पंचकृष्णांपैकी एक होत. त्-ामुळेच -ा कवींनी श्रीकृष्णाच्-ा जीवनावर काव्-े लिहिली, साती ग्रंथांचे लेखन पंचस्थापनेपासून शंभर वर्षातच झाले. -ा साती ग्रंथांबद्दल डॉ. अ. ना. देशपांडे लिहितात, '' श्रीकृष्ण भक्तीने उजळलेले महानुभावांचे साती ग्रंथ ही सगळी प्रबंध काव्-े आहेत.''

साती ग्रंथ पुढीलप्रमाणे

१) रुक्मिणी स्व-ंवर - नरेंद्र कवी शके १२१४
२) शिशुपालवध - भास्करभट बोरीकर शके १२३५
३) उद्धवगीता - भास्करभट बोरीकर शके १२३१
४) वाच्छारण - दामोदर पंडित शके १२३८
५) ज्ञानप्रबोध - विश्वनाथ पंडित शके १२५३
६) सह्याद्रीवर्णन - खळो व्-ास शके १२५४
७) ऋद्धिपूरवर्णन - नारा-ण पंडित शके १२८५

### १) रुक्मिणी स्व-ंवर (ओवीसंख्-ा - १८००)

'रुक्मिणी स्व-ंवर' हा ग्रंथ नरेंद्र कवीने लिहिला तो रामदेवराव -ादवांच्-ा दरबारात होता. त्-ांना हा ग्रंथ आवडला. हा ग्रंथ आपल्-ा नावावर केला तर आपण तुला प्रत्-ेक ओवीस एक सोनटका देऊ असे रामदेवाने नरेंद्रास सांगितले. परंतु आमच्-ा कवी कुलास कलंक लागेल असे स्पष्ट उत्तर देऊन नरेंद्राने नकार दिला.

-ा ग्रंथाची रचना संस्कृत महाकाव्-ाचा आदर्श समोर ठेवून झाली. आज -ा ग्रंथाच्-ा ८७९ ओव्-ाच उपलब्ध आहेत. रचना सर्गबध्द आहे. ना-कनाटिकांचे रुपवर्णन स्व-ंवरास आलेल्-ा राजांची वर्णने, सूर्योद-ा-सूर्यास्त -ांची वर्णने, रुक्मिणीची विरहावस्था द्वारकानगरी व तिच्-ा दिव्-ांचे वर्णन, नगरप्रदेश, वने, उपवने इ. वर्णने आली आहेत. परंतु स्व-ंवर वर्णन मात्र आलेच नाही. प्रस्तुत ग्रंथात सुदेव ब्राह्मण रुक्मिणीचे पत्र घेऊन द्वारकेप-र्यंत -ेतो. इथप-र्यंत वर्णन आले आहे. कथानिवेदन उत्तम, प्रमाणबध्द आहे. बहुवर्ण केल्-ास रसभंग होईल असे नरेंद्रास वाटते.

रुक्मिणीच्-ा विरहवर्णनात कल्पनारम्-ता, भावोत्कटता, प्रीती आणि भक्ती अशा अनेक छटा एकवटल्-ा आहेत. निसर्गवर्णने, व्-क्तिचित्रणे, प्रभावीपणे केली आहेत. भक्तिचा दुवा

कोठेही सुटत नाही. भाग कथेत नसलेले किन्नराचे उपाख्यान आले आहे. किन्नराचे गायन कौशल्य वर्णन केले आहे. त्यातून नरेंद्राचे संगीत, काव्य, शिल्प, स्थापत्य इ.चे ज्ञान दिसून येते.

नरेंद्रची वर्णनशैली चित्रमय होती.

डावा हात उसिसा घातला | उजवा ह्रदयावरी ठेविला |
जसा जिवसी देवो धरिला | निसटैल म्हणोनि ||

कवी नरेंद्राचे कृष्ण कथेवर असणारे प्रेम दिसते. कृष्णाच्या ठिकाणी आपला जीव विनटला असे तो म्हणतो. श्रीकृष्ण कीर्तिचंद्र वर्णितांना 'चढवीन सुखाचा समुद्र' असे तो म्हणतो.

नरेंद्राने हा ग्रंथ दरबारी मंडळीसाठी लिहिला त्यामुळे भक्तिभावनेपेक्षा काव्यानंदालाच महत्त्व दिलेले आढळते. तत्त्वज्ञानासाठी अनुकूल असणारी वृत्ती नरेंद्राजवळ नाही हेच खरे ! कविताकामिनीचा हात धरुन काव्यातील आशय डुलतडुलत रसरुपी काव्यावरील साहित्यरुपी कुंजाकडे चालला आहे असे नरेंद्र म्हणतो.

या ग्रंथात नरेंद्रने मराठीबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. परंतु पंथनिष्ठा मात्र दिसत नाही.

**प्रा. शेणोलीकर** म्हणतात,

'पंडित कवींच्या कुळात अग्रगण्य ठरण्याला आवश्यक तेवढी बहुश्रुतता व व्युपन्नता नरेंद्राजावळ आहे.'

**डॉ. अ.ना.देशपांडे** नरेंद्रचा गौरव पुढील शब्दात करतात. 'महाकवीचे सामर्थ्य असलेला तेराव्या शतकातील मराठीतील प्रतिभावान कवी.'

**डॉ. शं.दा. पेंडसे** यांनी 'नरेंद्र हा महाराष्ट्राच्या सारस्वतातील पहिल्या दर्जाचा पहिला प्रतिभासंपन्न प्रेमकवी' असल्याची ग्वाही दिली आहे.

**डॉ. रा.चि.ढेरे** नरेंद्राला 'कविंद्र' ही पदवी देऊन म्हणतात, 'जीवनाचा व्यापक अनुभव डोळसपणे घेऊन त्याचा गाभा शोधू पाहणारी, वेध घेऊ शकणारी दृष्टी जर नरेंद्रास लाभली असती तर त्याने एकीकडे कालिदासाशी पैजा मारल्या असल्या आणि दुसरीकडे भक्तिप्रवणतेमुळे ज्ञानेश्वरांशी जवळीक साधली असती.'

## २) शिशुपालवध (ओवी संख्या - १०८७)

'शिशुपालवध' हा ग्रंथ भास्करभटाने महानुभाव पंथाची दीक्षा घेतल्यानंतर लिहिला असे या ग्रंथातील मंगलाचरणावरुन समजते. श्रीकृष्ण, चक्रधर, नागार्जुन, यासारख्या कवीना नमन केले आहे. ग्रंथाच्या शेवटी आपल्या ग्रंथाचे प्रयोजन भास्करभटांनी सांगितले आहे.

'हा शिशुपालवधु : आईकता तुटे भव बंधु जीव होत प्रबोधु : परमतत्वाचा || असा जरी ग्रंथाचा हेतू सांगितला असला तरी ग्रंथात कृष्ण रुक्मिणी यांचा प्रेमकलह, जलक्रीडा रुक्मिणीची विरहावस्था या शृंगारिक विषयांना काव्यात प्रमुख स्थान मिळाले आहे.

शिशुपालवध हे नाव ऐकल्यावर हा ग्रंथ वीररसप्रधान असावा असे वाटते. परंतु या ग्रंथात वीररस नाही तर शृंगाररस आहे. वीररसाचे वर्णन शेवटच्या दोनशे ओव्यात आले आहे. तो उत्तम साधला आहे. या ग्रंथाची सुरुवात श्रीकृष्ण व रुक्मिणी यांच्या प्रेमकलहाने झाली आहे. निसर्गवर्णने प्रणय विरह यामध्ये ८५० ओव्या खर्ची पडल्या आहेत.

श्रीकृष्ण रुक्मिणीचा एकांतातील प्रणय व नर्म विनोद पाहून 'पुरुषा उपजती डोहाळे |' असे तो वर्णन करतो. रुक्मिणी व कृष्ण यांच्या प्रणयप्रसंगाच्या निमित्ताने कामेद्दिपक वर्णने अधिक आली आहेत.

या ग्रंथात कृष्ण रुक्मिणीस 'माकड' म्हणतो. तर रुक्मिणी कृष्णास 'गवळी' म्हणते. हा विनोद लक्षात घेण्यासारखा आहे. अर्जुनाचे युध्दकौशल्य, सैन्याची दाणादाण हा भाग अधिक रंगला आहे. तरीही कवीचे लक्ष वीर भक्तीरसापेक्षा शृंगाराकडे अधिक आहे. श्रीकृष्णापेक्षाही त्याला मदनच अधिक प्रिय आहे.

'शिशुपालवध' हा ग्रंथ तयार झाल्यानंतर भास्करभटांनी बाईदेवबास यांना दाखविला तेव्हा बाईदेवबास म्हणाले, कवीश्वरहा ग्रंथुनिका झालाः परि निवृत्ती जोगा नव्हेचि : हा शृंगारिया प्रवृत्त जोग जाला असे :'

भास्करभटाने या ग्रंथामध्ये आपला काव्याविषयक व ग्रंथविषयक आत्मविश्वासही व्यक्त केला आहे. भास्करभटाच्या कल्पनाविलासाचे रम्य स्वरुप पाहायचे असेल तर ते उद्यान वर्णनात वसंत ग्रीष्मादि ऋतूच्या वर्णनात आढळेल.

'शिशुपालवध' या ग्रंथातून भास्करभटाची पंथनिष्ठा, प्रज्ञा प्रतिभा यांचे दर्शन घडते. शृंगार, वेदांत, भक्ती, वीर, रसाळ वक्तृत्व, तत्त्वज्ञान, शीघ्र कवित्व यामध्ये असणारी गती दिसते. 'भास्करभटांचे गीताभाष्य ऐकून आपले अंतःकरण अवधे चंद्रमय होते.' असे नागदेवाचार्य म्हणतात. त्यांचे म्हणणे या ग्रंथातून पटण्यास काहीच हरकत नसावी.

'शिशुपालवध' या ग्रंथात प्रबंधकाव्य असे संबोधून डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात. ' बाणा विरक्त जोगिणीचा पण ओठांवर तरंगत असलेला शब्दसमूह मात्र शृंगारगीतांचा अशी त्याची अवस्था झाली आहे'.

### ३) 'उद्धवगीता' किंवा एकादशस्कंध (ओवीसंख्या - ८२७)

भास्करभटाने 'शिशुपालवध' हा ग्रंथ पूर्ण केल्यानंतर बाईदेवबासांचा ग्रंथ निवृत्ती जोगा नसल्याचा अभिप्राय ऐकल्यानंतर निवृत्तीपर ग्रंथ लिहिण्याचे ठरविले. यातून 'उद्धवगीता' या ग्रंथाचा जन्म झाला.

हा ग्रंथ भागवताच्या एकादशस्कंथावर आधारलेला असल्याने त्यास 'एकादशस्कंथ' असेही म्हणतात.

'उद्धवगीता' ही एकादशस्कंथावरील पहिली मराठी टीका होय. कृष्ण निजधामाला जाणार हे ऐकून उद्धवाला अतिशय वाईट वाटले. या प्रसंगावर भास्करभटांनी करुणरसाचा अविष्कार केला आहे. यदू अवधूत संवादातून भास्करभटांनी महानुभावीय तत्त्वज्ञान सांगितले आहे. 'पुरुरवा उर्वशी' या कथेमधून स्त्री धर्माच्या मार्गातील धोंड आहे. हा विचार मांडला आहे. स्त्रीबद्दल तो लिहितो,

हे कपटाची कसवटी | अनृत्याची महावना हे उकलली पुटी | क्रोध भुजंगाची ||

हे पापांची उत्तर पेठ | नरकाची राजवट की मुक्तीचे वज्रकपाट | कामिनी हे ||

स्त्री पुरुष परस्परांना मोक्षमार्गात विघ्नरुप आहे. म्हणून स्त्रीने पुरुषाचा व पुरुषाने स्त्रीचा त्-ाग करुन संन्-ास धारण करावा. हा महानुभाव सिध्दांत -ा ग्रंथात मांडला आहे.
थोडक्-ात :- भास्कराभटांनी -ा ग्रंथात स्त्री अधोगतीस नेते हे अनेक उदाहरणांच्-ा सहा–ाने सांगितले आहे. त्-ाबरोबर स्त्रीनिंदा केली आहे.

कृष्णकथेचा गौरव केला आहे. कृष्णकथा एवढी मधूर आहे की आपण ती गा-ला लागल्-ानंतर श्रोते आपणहून ती ऐका-ला -ेतील, असे म्हटले आहे. त्-ासाठी तो विचारतो, 'कमळांनी भ्रमरांना, मेघांनी चातकांना चंद्राने चकोराला कधी मूळ लागते का? -ातून त्-ाचा आत्मविश्वासच दिसून -ेतो.

'उद्धवगीता' हा ग्रंथ कृष्ण आणि उद्धव -ांच्-ा संवादाने बनला आहे. कृष्णाने उद्धवाचे सांत्वन केले. -ात लेखकाने २५० ओव्-ा खर्च केल्-ा आहेत. कृष्णांच्-ा विरहाने उद्ववास झालेले दु:ख उत्कटतेने व्-क्त केले आहे. एकादश स्कंदाशी तुलना केल्-ास हा ग्रंथ फिका वाटतो. कदाचित भास्करभटांचा पिंड रसिक कवीचा असल्-ाने तत्त्वज्ञान सांगताना कवी वृती उफाळून आल्-ामुळे औचित्-हानी होते.

**४)वच्छाहरण (ओव्-ा ५०३)**

भागवताच्-ा १२-१४ व्-ा अध्-ा-ात वत्सहरणाची कथा आली आहे. -ा कथेच्-ा आधारे दामोदर पंडिताने वत्सहरण हे काव्-य लिहिले.

श्रीकृष्णाने बालपणी अघासुराचा वध केला तेव्हा आपण कृष्णावताराची सत्-ासत्-ता पडताळून पाहवी असे ब्रह्मदेवाला वाटते. तेव्हा ब्रह्मदेवाने वृंदावनातील वत्सांचे हरण आणि एका वर्षानंतर, संवरस्तरानंतर -ेऊन पाहतात तो वत्से आपापल्-ा मातासमवेत चरत होती. तेव्हा त्-ांना कोडे उलगडले व कृष्ण हा परब्रह्म आहे हे समजले. हा कथाभाग -ामध्-े आला आहे.

श्रीकृष्ण, -मुनातीर, वृंदावन -ांचे वर्णन -ा ग्रंथात आले आहे. निसर्गवर्णनात सर्वच फळे एका ऋतूत वृक्षांना आली -ामुळे रसहानी झाली आहे. कृष्णवर्णन -मुनानदी, वृंदावन, ब्रह्मदेवाने केलेली कृष्णस्तुती रसाळ आहे. कृष्णाची सावळी मूर्ती कशी मिरवत होती तिचे वर्णन करताना दामोदर पंडित लिहितात,

''इंद्रनिळाची दीप्ती : नीलोत्पलाची क्रांती : एकवटली तैसी सावळी मूर्ती : मिरवतुसे''
पंडिताची कृष्णभक्ती अवर्णनी-ा आहे. श्रीकृष्णाचे चरित्र नवरसात्मक आहे. हे सांगताना दामोदर पंडित लिहितात,

''जी देवी रासक्रीडा खेळिन्निला : तै मूर्त शृंगारु जाला :
गौळणी विनोदे नाचविला : ते हास्-ारसू ||''
जसोदा भेडाविला : तै करुणारसू उठविला :
विषारु कालि-ा जितिला : तै रुद्र जाला ||
माते श्रीमुख दाखविले : तै अभ्दूतासी रुप जाले :
विश्वरुप प्रकटिले : तै भ-ानकु ||

दैत्ना करु संहारु : ते बीभत्सु आणि वीरु :
शांतु तो निरंतरु : तेथेचि असे ||

'' वत्साहरणातील श्रीकृष्ण वर्णन किंवा -मुनावर्णन वाचले तर प्रतिभा आणि पांडित्न -ांचे भांडवल दामोदर पंडिताजवळ कमी आहे.'' असे शेणोलीकरांचे मत आहे. वा. अ. भिडे -ांनी 'वत्साहरणाला शिशुपालवध व ज्ञानेश्वरीच्ना तोडीचे काव्न' मानले.

दामोदर पंडित हे एक चांगले गा-क होते. त्-ांची पत्नी हिराईसा हिने प्रथम महानुभाव पंथात प्रवेश केला नंतर दामोदर पंडित पंथात सामील झाले. केसोबास व दामोदर पंडित परमस्नेही होते. आपल्ना स्नेहाचे प्रतीक म्हणून दामोदर पंडिताने 'वछाहरण' हे ग्रंथाच्ना शेवटी कर्त्-ाचे नाव म्हणून केसोबासांचे नाव घातले आहे.

**५) ज्ञानप्रबोध (ओवी संख्ना - १२०४)**

'ज्ञानप्रबोध' हा ग्रंथ गीतेच्ना १३ व्ना अध्ना-ावर आधारलेला आहे. १३ अध्ना-ात ज्ञानाची लक्षणे सांगितली आहेत. -ामधील सातशे ओव्-ात आमानित्व, अदभित्व, अहिंसा, शांती ही ज्ञानलक्षणे सांगणा--ा श्लोकांचे स्पष्टीकरण आले आहे. उरलेली रचना स्वतंत्र आहे. 'सुरुवातीच्ना ज्ञानलक्षणे सांगणा--ा १२५ ओव्ना म्हणजे ज्ञानेश्वरीचा उताराच वाटावा' असे डॉ. तुळपुळे सांगतात.

'ज्ञानप्रबोधांत चक्रधरांचे आदराने वर्णन केलेले आहे. श्रीमूर्तीचे वर्णन शंभर ओव्-ात आले आहे. परंतु त्-ात भास्करकवीचा ओलावा नाही. कवी ज्ञानाकडे जास्त झुकला आहे. ग्रंथ वाचताना जाणकार वाचकांचे मनोरंजन होते. ग्रंथाच्ना शेवटी कवीने आपले दीनपण, रंकपण अगदी केविलवाण्ना सुरात व्-क्त केले आहे. विश्वनाथ बाळापूरकरांनी आपल्ना ग्रंथाची फलश्रुती पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

आणि सावधाने चित्ते | जे अभ्-ासिति-ा ग्रंथाते |
दैवी दशाचे सुख श्री त-ाते | अधिठी |

संत ज्ञानेश्वरांचा प्रभाव बाळापूरकरांवर पडलेला दिसतो. ज्ञानेश्वरांप्रमाणेच ते श्रोत्-ांचा अनुन्न करतात. तसेच शारदास्तवन, ज्ञानमहिमा गातात -ातही ज्ञानेश्वरीशी साम्न जाणवते. 'अमृतानुभवा'तील काही दृष्टांत आले आहेत.

**६)सह्याद्रीवर्णन (ओवी संख्ना - ५१७)**

महानुभाव पंथात दत्तात्रे-ाला परमेश्वरावतार मानले जाते. महानुभाव पंथात अधिकारी व्-क्तीच्ना चरित्राला त्-ाचे नाव न देता त्-ाचे वास्तव्न जे होते किंवा त्-ाच्ना लीळा ज्-ा परिसरात गाजल्ना त्-ा परिसराचे नाव देण्-ाची प्रथा आहे.

दत्तात्रे-ाचा अवतार सह्याद्रीत झाला म्हणून त्-ांच्ना चरित्रास 'सह्याद्रीवर्णन' असे नाव देण्-ात आले आहे. हा ग्रंथ ५१७ ओव्-ांचा असला तरी दत्तात्रे-ाचे मूर्तिवर्णन अवघ्ना 105 ओव्-ात आले आहे. रवळो व्-ास -ांनी ग्रंथाच्ना सुरवातीला ''त-ा श्री चक्रपाणिचेन : वरप्रसादे मी करीन मूर्तिवर्णन : दत्तात्रे-ाचे '' असे म्हटले आहे. चक्रधरांच्ना प्रसादावर कवीचे विशेष लक्ष दिसते पुढे तो म्हणतो, 'ज-न ज-न श्री चक्रेश्वर कृपा कारुण्न अवतारा' अशा शब्दात चक्रधरांना नमन करतो. त्-ानंतर पंथातील गुरुपरंपरेला वंदन करतो. आपण स्वतः हिरांबिकेचे शिष्न

आहोत असे म्हणतो. हा ग्रंथ वितराणी लोकांसाठी लिहिल्याचेही सांगतो. ‍या ग्रंथात चक्रधरांचेही चरित्र आले आहे. चक्रधरांच्या निर्वाणामुळे कविता झालेले दुःख वर्णन केले आहे. दत्तमूर्तीचे वर्णन भावमय, रमणीय आहे. दत्तचरित्रासाठी शेवटच्या पंचावन्न ओव्या खर्ची पडल्या आहेत. दत्तात्रेयांनी अलर्क, सहस्त्रार्जुन व परसराम यांच्यावर कृपा केल्याची माहिती आली आहे.

दत्तात्रेयांच्या चरित्राच्या निमित्ताने काही स्थानाचे वर्णन कवीने केले आहे. चक्रधर व दत्तात्रेय यांच्या वर्णनातून ईश्वरभक्तीचे महत्त्व वाचकांच्या मनावर ठसविणे हाच लेखकाचा हेतू आहे. ग्रंथाची फलश्रूती पुढीलप्रमाणे दिली आहे-

ऐसया ग्रंथाते जे पाठ करिती | तया भावपूर्वक आईकती. |
ते वाचे मंगलरु होती | म्हणताच राम ||

दत्तात्रेयाचे लीळाचरित्र म्हणजे गुरुभक्तीचा उत्कट अविष्कार. या ग्रंथात कवीची भूमिका भक्ताची उपासकाची आहे कवीची नाही. परमार्गाची आहे. भक्ताची आर्तता यामधून जाणवते. रवळो व्यासांनी नरेंद्र कवीचे अनुकरण केले आहे.

## ७) ऋध्दिपूर वर्णन (६४५ ओव्या)

महानुभाव ग्रंथात ऋध्दिपूरला धर्मक्षेत्र, तीर्थक्षेत्र मानले जाते. ऋध्दिपूर येथे गोविंदप्रभूचे वास्तव्य होते. गोविंदप्रभू व चक्रधर यांच्या स्पर्शाने ही भूमी पावन झालेली आहे. नारोव्यास स्वतः महानुभाव असल्यामुळे महानुभावांना या क्षेत्राबद्दल वाटणारा परमभाव माहीत होता. त्यामुळे या ग्रंथात ऋध्दिपूरबद्दलच्या पूज्यभाव व्यक्त झाला आहे. महानुभाव पंथाबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. पंथाची तत्त्वप्रणाली सांगितली आहे.

पंढरपूर दिसताच वारकऱ्यांची जी स्थिती होते. तीच स्थिती ऋध्दिपूर दिसताच लेखकाची, एका भाविक यात्रेकरुची झाली. गोविंदप्रभू व चक्रधरांच्या पदस्पर्शाने पावन झालेले तीर्थस्थळ दिसताच त्याने, यात्रेकरुने लोटांगण घातले. या क्षेत्रातील पक्षीगण, मंदिरे शिखरे, तलाव, पुष्करणी, रायांगण, राजमठ, मंदिराचे स्तंभ, ओटा, भोजनस्थान, महानुभाव संत इ.चे ह्रदयंगम वर्णन त्याने केले आहे.

भाविक यात्रेकरु श्रीमूर्तीचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यानंतर ‘अवलोककिता श्रीमूर्ती : न लगती नेत्राची पाती, ते जैसे डोळे वाट दाखविली : परमसुखाची’ ||असा विलक्षण सुखाचा अनुभव घेतो.

गोविंदप्रभूंच्या जीवनातील सर्व चमत्कार कथा या ग्रंथात आल्या आहेत. त्यांचे बोलणे, चालणे, वागणे, स्वभाव चित्रित केला आहे. नारोव्यासाच्या गुरुभक्तीच्या ओलाव्याने ओथंबलेला असा हा ग्रंथ आहे. त्यामधून त्यांची उच्च आध्यात्मिक योग्यता प्रतिबिंबीत झाली आहे. भाषा अत्यंत साथी, विचारांचा आणि भावनांचा प्रबळ वेग, ओघ, म्हणी, सुभाषिते यांचा वापर यामुळे ग्रंथ रसभरीत झाला आहे.

ऐतिहासिक व सामाजिक दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. -ा ग्रंथात अमरावती जिल्ह्यातील अनेक गावांचे उल्लेख आले आहेत. वऱ्हाडी भाषेचे स्वरुप -ा ग्रंथावरुन समजते. तत्कालीन लोकविचार रुढी, सण, समारंभ, व्रतवैकल्-े, स्पृश्-ास्पृश्-भाव -ाचेही ज्ञान -ा ग्रंथावरुन होते.

रीद्विपूर वर्णनाबद्दल डॉ. ल.रा.नसिराबादकर म्हणतात. 'भाषेची प्रासादिकता रसाळपणा हे -ा ग्रंथाचे खास वैशिष्ट्-ा आहे.' -ा ग्रंथात कवीने मराठी भाषेबद्दल गौरवाचे उदार काढले आहेत. तत्कालीन सामाजिक स्थितीचे दर्शनही -ा ग्रंथातून घडले. स्थलवर्णनपर असे -ा ग्रंथाचे स्वरुप आहे. प्रत्-ेक स्थलाशी कवीचे जिव्हाळ्-ाचे श्रध्देचे आत्मप्रत्-ा-ाचे आणि उत्कंठतेचे दुवे जोडलेले असल्-ाने साती ग्रंथात 'ऋध्दिपूर वर्णना'चे स्थान काव्-गुणदृष्ट्-ा स्वतंत्र व महत्त्वपूर्ण आहे.

'रीध्दिपूरवर्णन' -ा ग्रंथाचे 'गोविंदप्रभूचरित्र' असे नामकरण डॉ. वि.भि.कोलते -ांनी केले आहे.

**महानुभावांचे आणखी काही ग्रंथ -**

**१) लीळाचरित्र**

लीळाचरित्र हा ग्रंथ १५०९ लीळांचा आहे. त्-ाचे एकांक, पूर्वाध व उत्तरार्ध असे भाग आहेत. चक्रधरांचा राजधर्माचा काळ, शक्ती स्वीकाराचा काळ, नागांविकेला प्रेम दान, नागदेवाचा-ार्याचे अनुसरण आणि अखेरीस उत्तरपंथे प्र-ाण अशा प्रमुख घटना -ेतात.

म्हाइंभट ऊर्फ महिंद्रभट -ा पंडिताने चक्रधरांच्-ा लीळा गोळा केल्-ा. आठवणीच्-ा रुपाने सांगितले चक्रधरांचे चरित्रच आहे. मराठीतील हा पहिला चरित्र ग्रंथ मानला जातो. -ा ग्रंथाच्-ा कर्त्-ास म्हणजेच म्हाइंभटास मराठीतील पहिल्-ा चरित्रकाराचा मान दिला जातो.

म्हाइंभट अत्-ंत श्रीमंत व विद्वान होता. त्-ाला आपल्-ा श्रीमंतीचा गर्व होता. आपण इतरांना तुच्छ लेखतो हे सुचवण्-ासाठी तो पा-ात गवताची पेंढी घालीत असे. परंतु चक्रधरांच्-ा सहवासात आल्-ानंतर तो चक्रधरांचा एकनिष्ठ शिष्-ा बनला. चक्रधरांच्-ा प्र-ाणानंतर त्-ांच्-ा लीळा एकत्र करण्-ाची कल्पना म्हाइंभटास सुचली. नागदेवाचा-ार्यांनी -ा संकल्पास संमती दिली. त्-ाने जमा केलेल्-ा सर्व लीळांची विश्वसनी-ता स्पष्ट केली. त्-ासाठी त्-ाला खूप कष्ट पडले.

चक्रधरांच्-ा लीळा वर्णन करताना लेखकाने त्-ांची वचने, त्-ांनी सांगितलेले दृष्टांत दिले आहेत. -ासर्वांमधून चक्रधरांचे व्-क्तिमत्त्व, रुपसौंदर्-ा, कारुण्-ा, निस्पृहपणा, अहिंसा, वैराण्-ा -ांचे काटेकोर पालन, खेळकर विनोदी प्रवृत्ती -ांचे दर्शन घडते. म्हाइंभटाने केलेल्-ा सर्व लीळाचे निवेदन रसपूर्ण, भावपूर्ण झाले आहे. समकालीन प्रसन्न भाषा अकृत्रिम अर्थवाही आहे. प्रत्-क्ष तोंडची वचने आल्-ामुळे जिवंतपणा आला आहे.

बाईसा, नागदेव, सारंग पंडित, महदाईसा, दादोसा. अशापासून अगदी सामान्-ा मोळीविक्-ाप-र्यंतची शब्दचित्रे अतिश-ा बोलकी व भावमधूर आहेत.

चक्रधरांनी तत्कालीन महाराष्ट्रात भ्रमंती केली असल्-ामुळे तत्कालीन राजकी-ा, सामाजिक, भौगोलिक परिस्थितीचे प्रतिबिंब लीळाचरित्रात पडलेले दिसून -ेते. बारशे, उष्टावन,

मौजीबंधन, दिवाळी, शिमगा, ग्रामस्थांकडून न्-ा-निवाडा, परमार्थाविष-ी आस्था, अशा अनेक सामाजिक खुणांच-ा नोंदी लीळाचरित्रात आल-ा आहेत.

थोडक-ात :- म्हाइंटभटाने आपल-ा गुरुच-ा लीळा जतन करुन आदर व्-क्त करण-ाचा केलेला प्र-त्न खरोखरच उल्लेखनी-ा व महत्त्वाचा आहे.

## २) दृष्टांतपाठ

चक्रधरांनी सांगितलेले तत्त्वज्ञान -ा ग्रंथात केसोबास -ांनी दृष्टांतातून मांडले आहे. लीळाचरित्रातून ११४ दृष्टांत निवडून 'दृष्टांतपाठ' त-ार केला आहे.

चक्रधर आपल-ा तत्त्वज्ञानाचा प्रसार समाजातील सर्व लोकांमध-े करण-ाचा प्र-त्न करीत ते आपले विचार, तत्त्वज्ञान सोपे करुन सांगत. त-ासाठी मधूनमधून दृष्टांताचा वापर करीत. त-ांची भाषा सोपी व वाणी मधूर असल-ाने ती लोकांच-ा मनाचा ताबडतोब वेध घेई. चक्रधरांचे दृष्टांत लोकजीवनातून निवडलेले असत. त-ामुळे लोकांना तो आपलेच वाटत.

चक्रधरांच-ा दृष्टांताचे तीन भाग पडतात. प्रथम चक्रधरोक्त सूत्र, त-ा सूत्रातला किंवा तत्त्व पटविणारा दृष्टांत आणि शेवटी त-ा दृष्टांतातून त-ा सूत्राशी सुसंगत असे काढलेले पारमार्थिक निष्कर्ष म्हणजेच द्राष्टांतिक.

-ा ग्रंथातील सूत्र व दृष्टांत चक्रधरांचे आहे. तर दाष्टांतिक केसोबासाची आहेत.
उदा. - विष-ाचा दृष्टांत.
सूत्र - आर्ताते परमेश्वरु वाडोवाडी गिवसती
दृष्टांत - कव्हणी एकु वीख-ा असेः तो पात्रालागी देशोदेशी हींडतिः आर्त भेटे त-ासी

'दानदेती-ा ‖ दृष्टांताची एक पृथक्करणात्मक सूची केसोबासांनी त-ार केली आहे त-ास लापनिक' असे म्हणतात.

'दृष्टांतपाठांचे विवरण करणारे अनेक ग्रंथ पुढे महानुभाव पंथी-ांनी लिहिले आहेत. त-ापैकी 'दृष्टांतसूत्र' आणि 'दृष्टांतमालिका भाष-' हे दोन ग्रंथ महत्त्वाचे मानले जाता.

'दृष्टांतपाठ' हा ग्रंथ महानुभाव पंथात पवित्र मानला जातो. -ा ग्रंथातील दृष्टांत सुलभ व परिचित असूनही मार्मिक आहेत.

डॉ. तुळपुळे -ांच-ा मते, 'चक्रधरांचा दृष्टांतपाठ म्हणजे त-ांच-ा उदाहरण सिध्दांतावरील उपनिषदच आहे.'

डॉ. अ.ना.देशपांडे म्हणतात. 'चक्रधरांची जिवंतवाणी आणि केसोबासांची सुसंस्कारीत भाषासरणी -ांचा सं-ोग 'दृष्टांतपाठांत आढळतो.'

## ३) सूत्रपाठ

'सूत्रपाठ' हा ग्रंथ केसोबासांनी त-ार केला. -ामध-े चक्रधरांच-ा तोंडची १२५० सूत्रे आली आहेत. -ामध-े चक्रधरांनी आपल-ा शिष-ांना दिलेल-ा आज्ञा आल-ा आहेत. महानुभाव पंथी-ा लोक -ा ग्रंथाचे आदराने पठन करतात.

सूत्रपाठाचे अकरा भाग आहेत. उदा.- विद्यामार्ग, उद्गकरण, विचार मालिका वगैरे. चक्रधरांनी सांगितलेला विचार, त-ाचा अर्थ समजावा, त-ांचे ज्ञान व्हावे -ासाठी सूत्राचे अधिक विवरण केले आहे. -ा ग्रंथातील प्रत-ेक सूत्र पंथातील महत्त्वाचा विचार सांगते त-ामुळे ते सूत्र वाचकांच-ा मनावर ठसते. उदा.

'बाई परमप्रीती कीजे परि विशिष्ट बुध्दी न कीजे, प्रीती विखो होइजे, ज्ञानेविण वैराग्य काई काई करावे बापेया'. संसार भाणिजे हा दीर्घ स्वप्न गा, स्वदेशसंबंधु त्याज्यः स्वग्राम संबधु त्याज्यः संबधियांचा संबधु तो विशेषतः त्याज्य अशी चक्रधरांच्या विचारांची सूत्ररुपाने मांडणी केली आहे. परमार्थ विचारावरील निष्ठा आणि तात्त्विक भाषा यामुळे ती प्रभावी झाली आहेत.

''अल्पाक्षर रमणीयत्व'' हे या ग्रंथाचे एक वैशिष्ट्य आहे. लहान लहान वाक्यातून मोठा अर्थ सांगितल्यामुळे गंगा मे सागर भरल्याचा अनुभव येतो.'' ल.रा.नसिराबादकर.

'सूत्रपाठांतील एकेक सूत्र म्हणजे एकेक प्रभावी औषधी मात्रा आहे.' असे या ग्रंथाचे वर्णन डॉ. अ.ना.देशपांडे करतात.

**४) स्मृतिस्थळ**

चक्रधरांच्यानंतर महानुभाव पंथाचे प्रमुख नागदेवाचार्य झाले. नागदेवाचार्यांच्या स्मृती या ग्रंथात संग्रहित केल्या आहेत. नागदेवाचार्यांची वचने स्मृती या नावाने पंथात ओळखल्या जातात, नागदेवाचार्यांचा मृत्यू शके १२३० च्या सुमारास झाला.

'स्मृतिस्थळा'त नागदेवाचार्यांच्या २६१ स्मती आल्या आहेत. प्रथम रंगेल असणारे नागदेवाचार्य ऊर्फ भटोबास उतारवयात चक्रधरांचे एकनिष्ठ भक्त झाले. नागदेवाचार्य निरहंकारी, व्यवहारी, कर्तृत्ववान होते. चक्रधरांनी उत्तरपंथे गमन केल्यानंतर भिंतीच्या चिरेवर त्यांनी मारलेली पिचकारी पाहून जीभ खरडेपर्यंत चाटणाऱ्या नागदेवाचार्यांचे व्यक्तिचित्र अत्यंत अपूर्व असे आहे. नागदेवाचार्यांच्यानंतर त्यांच्या एवढ्या योग्यतेची व्यक्ती महानुभाव पंथात झालीच नाही.

नागदेवाचार्यांचे अंत्यसमथीचे उद्गार ह्रदयाला चटका लावतात ते म्हणतात ''गोसावियाचा व्यापारु चालविता, कोणास माझे वेकास गेल असेल तरी तुम्ही समस्ती क्षमा करावी.''

या ग्रंथात नागदेवाचार्यांशिवाय रामदेव, म्हाइंभट, नाथोबा, बाईदेव, दामोदर पंडित, हिराइसा, भास्करभट इ.ची सुबक शब्दचित्रे आली आहेत.

वाङ्मयीन व सामाजिक दृष्टीने स्मृतिस्थळांचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. महानुभावांच्या अनेक गोष्टी या ग्रंथात आहेत. अनेक ठिकाणी झालेल्या धमचर्चांचाही उल्लेख या ग्रंथात आला आहे. नागदेवाचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू या ग्रंथात मोठ्या सह्रदयतेने प्रकट केले आहेत. नागदेवाचार्यांची धर्मदीक्षा, गुरुभक्ती, चक्रधरांवरील निष्ठा, विनम्र, वृत्ती, मराठीचा अभिमान, संघटनाचातुर्य इ.गोष्टीवर प्रकाश पडतो.

'स्मृतिस्थळ' हा ग्रंथ संकलनात्मक आहे. त्याचा लेखक कोणी एक व्यक्ती नसून अनेकांच्या पाठांचे ते संकलन आहे.

नरेंद्र यव परशुराम हे मूळ लेखक आणि मालोबासशिवबासगुर्जर हे या ग्रंथाचे संस्करणकार आहेत असे डॉ.वा.ना.देशपांडे यांचे मत आहे.

**५) पूजावसर**

'पूजावसर' हा महानुभाव पंथातील बाईदेवबास -ांचा उल्लेखनी-ा ग्रंथ आहे. बाईदेवबास हे नेवासे प्रांतातील असून त्-ांचा चक्रधर व गोविंदप्रभू -ांच्-ाशी संबंध आला होता. -ा ग्रंथात चक्रधरांच्-ा नित्-ादिनी लीळा वर्णन केल्-ा आहेत. प्रातःकाळ, मध्-ानकाळ, सा-ंकाळच्-ा पूजाविधीचे प्रसंग -ा ग्रंथाचे आले आहेत.

चक्रधरांच्-ा बारीक सारीक गोष्टीचा नोंद -ा ग्रंथात आली असल्-ाने ऐतिहासिक व पंथी-ा दृष्टीने -ा ग्रंथाचे महत्त्व आहे. सूक्ष्म अवलोकन, सरळ, सुबोध, चटकदार, भाषा शैली -ामुळे 'पूजावसर' हा ग्रंथ आकर्षक झाला आहे.

भास्करभटाच्-ा शिशुपालवधा'वर 'कविश्वर हो ग्रंथु निका जाला' असा परखड अभिप्रा-ा देणारा बाईदेव तो हाच.

**६) मूर्तिप्रकाश**

हा ग्रंथ केशीराज बास -ांनी लिहिला आहे. चक्रधरचरित्र वर्णन करणे व संसारी व्-ाक्तींना भक्तीची शिकवण देणे असा दुहेरी उद्देश -ा ग्रंथाच्-ा निर्मितीचा होता.

-ा ग्रंथात लेखकाने चक्रधरांवरील आपली श्रध्दा व्-ाक्त केली आहे. आपल्-ा कवित्वाविष-ी गौरवोद्गार काढले आहेत. वाङ्.म-ीन दृष्टीने हा ग्रंथ रसाळ आहे. मोहक शैली, कोमल शब्दरचना, मनोहर दृष्टांत ही -ा ग्रंथाची वैशिष्ट-े होत. आपली कविता ब्रम्हविरोधी कसवटी, ज्ञानरत्नाची पेटी असल्-ाचे त्-ाने सांगितले आहे. ज्ञानेश्वरीच्-ा अगोदर एक वर्ष -ा ग्रंथांची निर्मिती झाली.

'केसोबासाची ओवी शैली, शब्दातील कोवळीक, अर्थघनता, दृष्टांतातील सौंद-र्ा इ. बाबतीत 'मूर्तिप्रकाश' वाचीत असताना अनेकदा ज्ञानेश्वरांची स्मृती होते.' असे डॉ. प्र.न.जोशी लिहितात.

**७) स्थानपोथी**

'स्थानपोथी'ची रचना शके १२३१ मध्-े झाली. 'स्थानपोथी'त गोविंदप्रभू व चक्रधर स्वामी -ांच्-ा स्पर्शाने पावन झालेल्-ा अनेक स्थळांचे वर्णन आले आहे. म्हणून -ा ग्रंथांचे नामकरण 'स्थानपोथी' असे करण्-ात आले. -ा ग्रंथात पंथी-ा दृष्टिकोनातून भौगोलिक व धार्मिक माहिती मिळते. तिच्-ात ११९ गावे आणि १५३ देवतांची नावे सापडतात.

**८) धवळे**

'धवळे' लिहिणारी चक्रधर शिष्-ा महदंबा ही मराठीतील आद्यकवि-त्री मानली जाते. तिने आपले संपूर्ण आ-ुष्-ा महानुभाव पंथाच्-ा प्रसारार्थ वेचले. ती चतुर आचारनिष्ठ व सडेतोड वृत्तीची होती. तिच्-ावर चक्रधरांचा विश्वास होता. चक्रधरांच्-ा अनुज्ञेने ती गोविंदप्रभूंजवळ राहिली. तिच्-ा जन्म मृत्-ूबद्दल माहिती नाही.

महानुभाव पंथात महदंबेचे धवळे प्रसिध्द आहेत. 'धवळे' म्हणजे लग्नप्रसंगी गाव-ाचे विवाहविष-क गीते होत. धवळ-ांच्-ा निर्मितीची घटना मजेशीर आहे. एकदा गोविंदप्रभूंना विवाह

प्रवृत्ती झाली, तेव्हा त्-ांनी महदंबेला विवाहविष्-क गीते म्हणाव्-ास सांगितली. -ा गीतात विवाहाच्-ा प्रारंभापासून अखेरीप-र्ंतचे वर्णन करण्-ात आले आहे. धवळ्-ामधील मुख्-न विष्-न रुक्मिणी स्व-ंवराचा आहे.

धवळ्-ाच्-ा प्रारंभी रुक्मिणीहरणाचा कथाभाग आला आहे. तर उत्तरार्धात स्व-ंवराचे वर्णन आले आहे. उत्तरार्धात पासष्ट कडवे आहेत. ते वाचताना महदंबेचे शीघ्र कवित्व स्पष्ट होते. आणि भाषेच्-ा बाबतीत जनाबाईची आठवण होते.

साधे वर्णन, साधी भाषा व साधे विचार, विकार असून एखादे काव्-न ह्रद-ंगम कसे होते. -ाचा धवळे हा उत्कट आदर्शच म्हटला पाहिजे.

## ९) मातृकी रुक्मिणी स्व-ंवर

महदंबेने 'मातृकी रुक्मिणी स्व-ंवर' -ा काव्-ाचीही रचना केली आहे. ओवी संख्-ा १०९ आहे. -ा काव्-ाचा विशेष असा की, -ातील मातृका अ आ इ पासूनची अक्षरे आणली आहेत.

कसे पिताबरु कंठी कुंदमाळाः
कांतु शोभे सावळाः रुक्मिमणीचा ‖ १ ‖
खंद्यावरी कावडी पडिभरे चालातुः
तो खेळे वनातुः दतुसहः ‖ २ ‖
गावो द्वारावरी गोमतीए प्रांतीः
गोदारी-े क्रीडतीः चक्रपाणी ‖ ३ ‖

प्रत्-ेक ओळीतील आद्य अक्षरांचा क्रम साधण्-ाचा तिचा प्र-ात्न आहे. हाच प्रकार नंतरच्-ा काळात पंडितीकाव्-ात दिसतो.

-ा काव्-ात महदंबेने श्रीकृष्ण रुक्मिणी -ांच्-ा विवाहाचा थाट निर्माण केला.

कृष्णवर्णन, विप्राची पाठवणी, कृष्णदर्शनामुळे रुक्मिणीने सज्जावरुन उडी घेणे इ. प्रसंग आले आहेत.

थोडक्-ातः- मातृकी रुक्मिणी स्व-ंवराच्-ा रचनेत सफाइदारपणा, ल-बध्दता व निवेदनाची गतिमानता आहे.

## महानुभावांच्-ा गुप्त लिप्-ा

-वनांच्-ा आक्रणानंतर आपले ग्रंथ टिकून राहावेत. त्-ांचे पावित्र्-न टिकून राहावे म्हणून महानुभावांनी गुप्त लिप्-ा त-ार केल्-ा सकळ व सुंदरी अशी -ा लिप्-ांची नावे आहेत. -ा लिप्-ातून आपले सर्व वाड्.म-न महानुभावांनी बंदिस्त केले. त्-ामुळे ते समाजापासून दूर गेले व अंधारात राहिले.

## समारोप

आठवणी, दिनच-र्ा, स्थलवर्णन कथात्मक, भावगीतसदृश्-न, तात्विक व विवेचनपर अशी विविध प्रकारची रचना महानुभावांनी केली. विविधता व वैचित्र्-ाच्-ा बाबतीत इतर कोणत्-ाही साहित्-ाला मागे टाकील असे महानुभाव वाड्.म-न आहे.

महानुभाव संप्रदा-ातील लेखक-कवींनी मराठी भाषेचा कैवार घेऊन मराठीतच रचना करण्-ाचा आग्रह धरला. त्-ातून फार मोठे वाङ्.म-ीन कार्-ं पार पडले. महानुभावि-ांनी मराठी वाङ्.म-ाच्-ा क्षेत्रात केलेले कार्-ं फार महत्त्वाचे आहे.

महानुभाव संप्रदा-ाचे वाङ्.म-ा मराठीच्-ा प्रारंभकाळातील असले तरी ते प्रौढ, परिपक्व, तत्त्वज्ञान पर असे आहे. वाङ्.म-ा आणि तत्त्वज्ञान अशा दोन पातळ-ावर हे वाङ्.म-ा असल्-ाने त्-ाला व्-ापक अशी सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभली असल्-ाचे दिसते.

मध्-ा-ुगीन महानुभाव कवितेवर संस्कृत महाकाव्-ाचा प्रभाव असल्-ाचे स्पष्ट दिसते. रत्नमाला स्तोत्र, दृष्टांतस्तोत्र, लक्ष्मणरत्नाकर, आचारमालिका -ासारखे ग्रंथ संस्कृतातून निरोपिले आहेत. त्-ाचप्रमाणे वार्निके, महावाक्-ामीमांसा, भाष्-े, महाभाष्-े, शब्दकोश, टीपग्रंथ, हेउस्थळ, अलंकारशास्त्र, मार्गप्रभाकर, वैद्यकशास्त्र, विधीन्-ा-ा ग्रंथ इ. महानुभावीच ग्रंथ संस्कृत शास्त्री-ा परंपरेला अनुसरुन त-ार झालेले आहेत.

महानुभावी-ा गद्यग्रंथाचे नंतरच्-ा काळात संस्कृतीकरण केले गेले. ललित गद्यनिर्मिती, संपादन व संकलन काही प्रमाणात झाले.

महानुभावी-ा कवींनी संस्कृत वाङ्.म-ातील परंपरेच्-ा तोडीस तोड अशी स्वतंत्र सधन गद्यपरंपरा -ासाठी मराठी भाषेचेच उप-ोजन केले.महानुभाव साहित्-ाचे प्रेरणास्थान ईश्वरचिंतन हेच आहे. ईश्वरचिंतनासाठी महानुभाव कवींनी माध्-ाम म्हणून बोलीभाषा मराठीचा वापर केला परंतु सिध्दांत व विचार मांडण्-ाची पद्धती संस्कृत परंपरेचीच स्वीकारली. म्हणून डॉ. उषा मा.देशमुख लिहितात ''मध्-ा-ुगीन मराठी कवितेवर विशेषतः महानुभाव कवितेवर संस्कृत साहित्-ाशास्त्राचा, संज्ञाचा, संकल्पनांचा, चिकित्सेचा प्रभाव आहे. संस्कृत विद्ग्ध महाकाव्-ावर नरेंद्र, मास्कर, दामोधर, विश्वनाथ -ांची अभिरुची पोसली गेली आहे. पण मन मात्र सांप्रदा-िकाचे आहे. मराठी भाषा ही धर्मभाषा म्हणून पंथाने स्वीकारली. म्हणून समकालीन वाङ्.म-ाभिरुचीचे व वाङ्.म-ीन प्रवाहाचे प्रतिसाद महानुभाव कवितेतून ऐकू -ेतात.''

❖❖❖

**घटक क्र. ३**

# ३

# वारकरी संताचे वाङ्मय्

**पाठची रुपरेषा-**


३.१ विष-प्रवेश
३.२ संत नामदेव
३.३ संत ज्ञानेश्वर
- ३.३.१ ज्ञानेश्वरी
- ३.३.२ अमृतानुभव
- ३.३.३ चांगदेव पासष्टी
- ३.३.४ अभंग व पदे
- ३.३.५ हरीपाठ
- ३.३.६ सारांश

३.४ निवृत्तीनाथ
३.५ सोपान
३.६ मुक्ताबाई
३.७ गोरा कुंभार
३.८ विसोबा खेचर
३.९ चोरवा मेळा
३.१० सावना माळी
३.११ सेना न्हावी
३.१२ जनाबाई
३.१३ कान्होपात्रा
३.१४ संत एकनाथ
- ३.१४.१ ग्रंथसंपदा
- ३.१४.२ चतुश्लोकी भागवत
- ३.१४.३ एकनाथी भागवत
- ३.१४.४ रुक्मिणी स्व-ंवर
- ३.१४.५ भावार्थ रामा-ण
- ३.१४.६ पदे व गौळणी
- ३.१४.७ अध्-ालिक प्रकरणे
- ३.१४.८ अभंग
- ३.१४.९ भारुडे
- ३.१४.१० थोडक्-ात

३.१५ संत तुकाराम
- ३.१५.१ अभंग गाथा
- ३.१५.२ आत्मचरित्रपर अभंग
- ३.१५.३ प्रासंगिक अभंग
- ३.१५.४ थोडक्-ात

३.१६ संत बहिणाबाई
३.१७ संत निळोबा
३.१८ समारोप

## ३.१. विष-प्रवेश

वारकरी संप्रदा-न हा महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रि-न असा संप्रदा-न आहे. हा संप्रदा-न भागवत, माळकरी, -ा अन्-न नावानीही ओळखला जातो -ा संप्रदा-ातील अनेक संतानी काव्-लेखन केले आहे. वैदिक धर्मातर्गत हा संप्रदा-न असल्-ाने वैदिक धर्माने प्रमाण मानलेले वेद उपनिषदे, भगवद्गीता, भागवत, ब्रहमसूत्रे, पुराणे इ. संस्कृत ग्रंथांना -ा संप्रदा-ाने प्रमाण मानले. उपरोक्त सर्व ग्रंथांविष-ी वारक--ाच्-ा मनात नितांत आदर आणि श्रध्दा असल्-ाचे नाणवते.

वारकरी संप्रदां-न हा अद्वैत तत्त्वज्ञानावर दृढ विश्वास ठेवणारा संप्रदा-न आहे. त्-ामुळे -ा संप्रदा-ातील अनेक संतानी हरिहर ऐक्-न, नाममहात्म्-न, भक्ती अशा विविध विष-ावर लेखन केले.

वारकरी संतानी भक्तीचे एक साधन म्हणून काव्-ाकडे पाहिले काव्-लेखन ही संतांच्-ा दृष्टीने एक प्रकारे भक्तीसाधनांच होती. मोक्षप्राप्तीसाठी भक्ती कर्ममार्ग आचरत असताना अनवधानाने, अजाणतेपणे संतांकडून काव्-लेखन झाले आहे. त्-ामुळे संतकाव्-न सहजतने, अकृत्रिमपणे निर्माण झाले. 'अंतरीचे घावे स्वभावे बाहेरी' -ा न्-ा-ाने संत काव्-न निर्माण झाल्-ाने निर्मळ खळाळणा--ा झ--ाप्रमाणे संत काव्-न निर्मळ आणि सहज, नैसर्गिकपणे समाजासमोर आले. समाजाला त्-ातील नैसर्गिकता, सहजता, भोळ भाव आवडला त्-ामुळे अनेक पिढ-ा संत काव्-न गात गातच घडल्-ा व संतकाव्-ाने भक्तीचे मळे फुलविले.

संत समाजातील विविध सामाजिक स्तरातून आलेले होते. त्-ाचप्रमाणे ते महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरच्-ा प्रांतातूनही आले होते. संताचे संतमंडळ ब्राहमणापासून अत्-ंजपर्-ंतच्-ा विविध जातीच्-ा संतानी निर्माण झाले होते. सामाजिक समतेचा वस्तुपाठ -ा संतानी समाजासमोर ठेवला. त्-ामुळे वारकरी संप्रदा-ातील संतानी अध्-ाालिक लोकशाही निर्माण केली असे म्हटले गेले. समाजातील विविध समाजघटकांच्-ा अनुभूती संतकाव्-ात आल्-ा आहेत.

संतकाव्-न लिहिणा--ा संताच्-ा नावांवरुन नजर टाकली तर एक गोष्ट सहज लक्षात -ेते ती म्हणजे हे संत वेगवेगळे व्-वसा-न करीत होते. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई, जनाबाई, विसोबा खेचर, गोराकुंभार, सेनान्हावी, सावता माळी, चोरवा महार, नरहरी सोनार, जोगापरमानंद, कान्होपात्रा, संत एकनाथ, संत तुकाराम, निळोबा, बहिणाबाई अशा कितीतरी संतानी वेगवेगळ-ा प्रांतांतून, समाज घटकातून -ेऊन पंढरपूरच्-ा विठ्ठलाच्-ा भक्तीसाठी वाड्.म-न निर्मिती केली -ा सर्व संताच्-ा लेखनाला संतकाव्-न म्हणून ओळखले जाते.

## ३.२ संत नामदेव

संत नामदेव (शके १२९ -

संत नामदेव शिंपी समाजात जन्माला आले होते. ते विठ्ठलाचे आवडते भक्त म्हणून संतमंडळात परिचित होते. नामदेव व ज्ञानेश्वरादी भावंडाची भेट झाल्-ानंतर त्-ांनी सर्वांबरोबर तीर्थ -ात्रा केली. गुरुकृपेनंतर अभंगनिर्मिती केली. नामदेवांनी लिहिलेल्-ा अभंगाची गाथा प्रसिध्द आहे. नामदेवांचे सुमारे ३००० अभंग आहेत. -ा अभंगातूंन नामदेवांची आध्-ालिक वाटचाल स्पष्ट दिसते. त्-ांच्-ा अभंगगाथेत ज्ञानेश्वरादी भावंडांची चरित्रे, आत्मचरित्र,

व्यक्तिचित्रे, लोककविता प्रवासवर्णने, कूटरचना, आख्यानकविता इ. वाङ्.मय प्रकारांनी समृध्द आहे. नामदेवाने मराठी, हिंदी, पंजाबी भाषेतही रचना केल्या आहेत.

**अभंगगाथा**

संत नामदेवाच्या अभंगगाथेत एवढे अभंग आहेत. त्यामध्ये मंगलाचरणाचे जे अभंग आहेत. त्यात त्यांनी गणेश, सरस्वती, देव, ब्राहमण, सज्जन यांना वंदन केले आहे. तसेच कोणाला जरी वंदन केले तरी ते विष्णूलाच पोहचते. असा अद्वैतविचार मांडला आहे. रामकृष्ण यांच्या बालक्रीडेच्या अभंगातून नामदेवाच्या रसाळ चित्रमय शैलीचे दर्शन घडते.

विठ्ठल हे नामदेवाचे अराध्य दैवत त्याचे महात्म्य त्यांनी अभंगातून सांगितले आहे. त्यांना विठ्ठल निर्गुण निराकार रुपात जाणवतो. कधी कृष्णरुपात, कधी माता, पिता बंधू, भगिनी इ. रुपात दिसतो. विठ्ठलाशिवाय त्यांना चैन पडत नाही. जन्मोजन्मी विठ्ठलांची चरणसेवा घडावी असे नामदेवांना वाटते. नामस्मरण पंढरीची वारी, संतसंग यात नामदेवानी अवीट गोडी होती ती त्याच्या अभंगातून व्यक्त झाली आहे. या गोष्टींपुढे त्यांना मोक्ष फिका वाटतो भक्तीसुखासाठी ते कोटी कोटी गर्भवास घ्यायला तयार आहेत.

ईश्वराविषयी आर्म प्रेम, करुणा, मनाची नगमग, इ. भावनानी नामदेवांचे अभंग आर्म बनले आहेत. साध्या सरळ शब्दांनी नामदेव विठ्ठलाला साद घालतात तेव्हा ऐकणाऱ्याचे ह्रदय पाझरते. स्वतःला मूल कल्पून विठ्ठलाला साद घालतात. उदा.

तू माझी माऊली मीवो तुझा तान्हा |
पाजी प्रेम पान्हा पांडुरंगे ||

संत नामदेवांनी आदी, समाधी, तीर्थावळी या प्रकरणातून संत ज्ञानेश्वरादी संताचे चरित्र लिहिले आहे. ही संतचरित्रे नामदेवाच्या ओघवत्या शैलीत आली आहेत. तीर्थयात्रांचे वर्णन तीर्थवळी या प्रकरणात आले आहे. त्यांनी प्रथम तीर्थावळी व समाधी ही प्रकरणे लिहिली. त्यांना पूर्तता यावी म्हणून आदी हे प्रकरण नंतर लिहिले. त्यातून ते ज्ञानेश्वर व इतर संताशी कसे समरस झाले होते. याचे प्रत्यंतर येते. ज्ञानेश्वरांच्या समाधीप्रसंगी नामदेव प्रत्यक्ष उपस्थित असल्याने समाधीप्रसंग ह्रदयस्पर्शी झाला आहे. निवृत्तीची अवस्था पुढीलप्रमाणे वर्णन केली आहे.

'बांधल्या तळाचा फुटलासे पाट | ओघ बारावाट मुरडताती || इतर भावंडाची व्याकुळता नामदेवांनी अत्यंत उत्कटतेने पुढील शब्दात वर्णन केली आहे.

हरिणीविण खोपी पडियेली ओस / दशदिशा पाडस भ्रमताती || संत नामदेवानी निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई चांगदेव यांची चरित्रे लिहून वारकरी संप्रदायातील पहिल्या चरित्रकाराचा मान मिळविला आहे.

संत नामदेवांनी स्वतःच्या जीवनचरित्रातले काही प्रसंग अभंगातून मांडले आहेत. त्यात स्वतःचे कुळ, जन्मशक, अशा आयुष्यातील ऐशी वर्षातील महत्त्वाच्या घटना १५२ अभंगातून मांडल्या आहेत. या घटना, प्रसंग त्रोटक असले तरी त्यातून त्यांचे चरित्र व्यक्त झाले आहे. त्यामुळे संत नामदेव हे मराठीतले पहिले आत्मचरित्रकार ठरतात.

संत नामदेव पंजाबात राहत असताना त्यांनी तेथील लोकभाषा अवगत करुन त्या भाषेत रचना केली. शिखांच्या पवित्र 'गुरुग्रंथसाहेब' या ग्रंथात नामदेवांची ६१ पदे समाविष्ट झालेली आहेत. नामदेवांच्या या पदात संतमहिमा, गुरुमहिमा, नाममहिमा, दुर्जनावर हल्ला असे

विषय आले आहेत. तसेच जीव, जगत, ब्रहम, भक्ती, पूजा अर्चन, लोकव्यवहारातील पारवंड असे अनेक विषय आले आहेत.
थोडक्यात

संत नामदेवानी आपल्या विविध रचनेतून भक्ती, विठ्ठल, संतचरित्रे, आत्मविकास, समाजस्थिती अशा अनेक विषयावर रचना करुन 'शतकोटी अभंग करीन' ही प्रतिज्ञा पुरी करण्याचा प्रयत्न केला. त्यातून त्यांची मधूर वाणी प्रकट झाल्याने तिला अमृतवाणीचे स्वरुप प्राप्त झाल्याचे मत अनेक संशोधकांनी मांडले.

## ३.३ संत ज्ञानेश्वर

संत ज्ञानेश्वर हे वारकरी पंथाचे मुख्य आचार्य मानले जातात. त्यांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला आणि धर्मनिष्ठा जागृत करुन महाराष्ट्राची अस्मिता कायम ठेवली. त्यासाठी साधा सोपा उपासनामार्ग सांगितला. भिन्न भिन्न उपास्यदैवते, उपासना पंथ मन प्रणालींना एकत्र आणले. त्यांनी लिहिलेल्या साहित्याला त्यामुळेच प्रमाण ग्रंथांचे स्वरुप वारकरी संप्रदायात निर्माण झाले. त्यांनी पुढीलप्रमाणे रचना करुन मराठी साहित्यक्षेत्रात सातशे वर्षापेक्षा अधिक काळ आपला ठसा कायम ठेवला आहे.

### ३.३.१ ज्ञानेश्वरी

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ भावार्थदीपिका या नावानेही ओळखला जातो. तो भगवद्गीतेवर आधारलेला आहे. त्याची रचना ज्ञानेश्वरांनी केली. या गीतेटीकेला ज्ञानेश्वरांनी 'देशीकारचे लेणे' असे म्हटले आहे. भगवद्गीतेवर आतापर्यंत झालेल्या मराठी टीकांमध्ये ज्ञानेश्वरी ही सर्वात लोकप्रिय टीका होय.

ज्ञानेश्वरी या ग्रंथात ९ हजार ओव्या असून अध्याय १८ आहेत. ज्ञानेश्वरी या ग्रंथाचा जन्म स्वधर्मापासून दूर जाऊ पाहणाऱ्या, खरा धर्म न समजणाऱ्या, योग्यायोग्यतेचा विचार न सुचणाऱ्या, कर्तव्यापासून दूर जाऊ पाहणाऱ्या संभ्रमित समाज घटकांसाठी झाला. अशा लोकांना कर्तव्यास मुख करण्यासाठी खरे ज्ञान देण्यासाठी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीचा प्रपंच केला. ज्ञानेश्वरांनी त्यासंदर्भात ज्ञानेश्वरीत लिहिले आहे.

'म्हणौनि मार्गाधारे वर्तावे | विश्व मोहरे लावावे |
अलौकिका नोहावे | लोकांप्रती || हेच ज्ञानेश्वरीचे प्रयोजन होते.

ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेवर टीका करणाऱ्या पूर्वसुरींविषयी आदरभाव व्यक्त केला तसेच मराठी भाषेविषयी अभिमान व्यक्त केला. त्यातून त्यांना स्वतःच्या प्रतिभेविषयी, कवित्वाविषयी असलेला आत्मविश्वासही दिसतो. ते लिहितात,

मी बोलेल बोल | अरुप रुप दाविन |
अतिद्रिय परि भोगविन | इंद्रियाकरवी ||

ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे स्वरुप गीतेप्रमाणेच संवादात्मक आहे. ज्ञानेश्वरीत श्रीकृष्ण-अर्जुन, संजय- धृतराष्ट्र, ज्ञानेश्वर- निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर- श्रोते असे संवाद आले आहेत.

ज्ञानेश्वरी या ग्रंथात मुख्यतः अद्वैतसिध्दांत, कर्मयोग, इ. विषय आले आहेत. तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा सुरेख संगम ज्ञानेश्वरांनी साधला आहे. ग्रंथाची फलश्रृती सांगितली आहे.

ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरांची काव्यप्रतिमा फुलून आली आहे. रुक्ष तत्त्वज्ञानाचे निरुपण करताना ज्ञानेश्वरांनी उपमा, उत्प्रेक्षा यासारख्या अलंकाराचा वापर केला आहे.

### ३.३.२ अमृतानुभव

'अमृतानुभव' हा ज्ञानेश्वरांचा वेदांतावर आधारलेला स्वतंत्र ग्रंथ होय. या ग्रंथात १० प्रकरणे असून ८०४ ओव्या आहेत. या ग्रंथात चिद्विलास हा ज्ञानेश्वराचा आवडता सिध्दांत आलेला आहे.

अनुभवामृताच्या पहिल्या पाच श्लोकात अक्षर, आनंद, अव्यय अशी परब्रहमाची विशेषणे सांगितली आहेत. निवृत्तीनाथांची ओळख करुन दिली आहे. शिवशक्ती प्रकृत्तीपुरुष यांच्या ऐक्याचे पती पत्नीच्या रुपकाने काव्यमय वर्णन केले आहे.

अमृतानुभवात दृष्टांताची बहार आहे. तत्त्वज्ञानाची उंची आहे. आत्मानुभवाची सीमा आहे. आणि क्वचित कोठे काव्य आहे. ग्रंथाचा प्रस्ताव आणि समारोप महत्त्वपूर्ण आहे.

### ३.३.३ चांगचांगदेव पासण्टी

योगी चांगदेवाने ज्ञानेश्वरांना पाठविलेल्या कोऱ्या पत्राला दिलेले हे काव्य पत्रोत्तर म्हणजे 'चांगदेव पासष्टी' हा ग्रंथ होय. हा. ग्रंथ पासष्ट ओव्यांचा आहे. जगात एकच परमात्मा आहे हे सांगण्यासाठी ज्ञानेश्वरांनी काही दृष्टांत दिले आहेत. या ग्रंथाची मांडणी सूजबध्द आहे. काव्याचा अंश अल्प आहे.

### ३.३.४ अभंग व पदे

ज्ञानेश्वरांनी केलेल्या अभंगरचनेची संख्या ७६५ आहे. हे अभंग कीर्तनाच्या ओघात आपला अनुभव व्यक्त करण्यासाठी, कधी उपदेश करण्यासाठी निर्माण झाले आहेत.

सगुण निर्गुण एकच असल्याची दृष्टी यातून दिसते. बाळक्रिडेच्या अभंगात अनेक रुपके आली आहेत. टिपरी पाळणा, घोंगडी, हमामा, फुगडी अशा रुपकातून भक्तिमार्ग सोपा करुन सांगितला आहे.

'चंदनाची चोळी अंग अंग जाळी' अशा विराण्यातून प्रपंच आणि परमार्थ यांचा सुंदर समन्वय आहे. परमेश्वर भेटीची आस भक्ताला लागलेली आहे. असे वर्णन अभंगातून आले आहे.

### ३.३.५ हरिपाठ

वारकऱ्यांच्या नित्यपाठासाठी हरिपाठाची रचना झाली. हरिपाठाचे २४ अभंग आहेत. या हरिपाठाना वारकरी संप्रदायात गायत्री मंत्राइतकेच महत्त्व आहे. नामभक्तीने सर्वसामान्याचा उध्दार होईल अशी ज्ञानेश्वरांची धारणा होती. त्यासाठी त्यांनी 'हरिमुखे म्हणा हरि मुखे म्हणा' असे आवाहन केले आहे.

हरिपाठाचे अभंग वारकऱ्यांच्या मुखात असतात. त्यांची भाषा सर्वांना समजेल अशी आहे. संत सहवास, भक्ती नाम स्मरण असे विषय अभंगात आले आहेत. ज्या लोकांना योग, याग, मत्र यासारखे कर्मविधी करता येत नाहीत अशा लोकांसाठी या ग्रंथाची निर्मिती झाली आहे. 'वारकऱ्यांची संध्या' असेच या ग्रंथाचे वर्णन केले जाते.

### ३.३.६ सारांश

ज्ञानेश्वरांनी आपल्या विचार कार्यातून महाराष्ट्राचा साधा सोपा उपासना मार्ग सांगितला. विविध उपासना मार्गात अडकलेल्या लोकांना एकत्र केले महाराष्ट्राची अस्मिता जागृत

केली. महाराष्ट्र वैचारिक, धार्मिक, सांस्कृतिक दृष्ट-ा गुलाम होऊ न-े अशा प्रकारचे प्र-ात्न केले.

## ३.४ निवृत्तीनाथ

निवृत्तीमाथांचे ३७४ अभंग आहेत. त्-ांचे व्-क्तिमत्त्व अबोल वाटत असले तरी ते विशाल व संपन्न होते. गुरुपरंपरेने ते नाथपंथी होते त्-ामुळे त्-ाच्-ा अभंगात -ोगानुभव, अद्वैतबोध व बालकृष्णाची भक्ती -ा विष-ाचे अधिक्य आहे.

निवृत्तीनाथांचे काही अभंग कृष्ण व विठ्ठल एकच आहेत हे सांगण-ासाठी अवतरले आहेत. निर्गुणरुप परब्रम्ह कृष्णरुपाने म्हणजेच विठ्ठल रुपाने पंढरीच्-ा विटेवर उभे आहे. हा बोध ज्ञानदेवाना व सर्व संताना निवृत्तीनाथांकडूनच मिळाला.

निवृत्तीने आपल्-ा अभंगातून हरिहर ऐक्-ा प्रतिपादन केले आहे.

## ३.५ सोपान

सोपान हे ज्ञानेश्वरांचे कनिष्ठ बंधू व विसोबा खेचराने गुरु होत. त्-ांनी आपल्-ा अभंगातून ब्रहमसाक्षात्काराचा अनुभव घेऊन विठ्ठल भक्तीचा पुरस्कार केला.

## ३.६ मुक्ताबाई

मुक्ताबाई व-ाने लहान होती तरी संत मंडळात तिचा अध्-ात्मिक अधिकार मोठा होता. -ोगानुभवात ती निष्णात होती. अद्वैतबोध, सगुणभक्ती -ा दोहोत तिची उत्कटता दिसून -ेते.

निवृत्तीकडून तिला ज्ञानप्राप्ती झाली होती. चांगदेव -ोगी -ांची ती गुरु होती. नामदेवासारख्-ा साक्षात्कारी संताला ती पुढीलप्रमाणे जाणींव करुन देते.

'अखंड ज-ाला देवाला दा शेजार | का रे अहंकार नाही गेला' -ातून तिचा स्पष्टवक्तेपणा स्पष्ट होतो.

मुक्ताईने ज्ञानेश्वरादी संताबरोबरच अभंगरचना केली आहे. पंढरी महात्म्-ा, संत समागम, नाममहात्म्-ा -ा विष-ावर तिचे अभंग आहेत. तिने लिहिलेले तटीचे अभंग गोड व प्रसिध्द आहेत -ा अभंगात तिचा लंडिवाळपणा, थोडीशी धीटाई व्-क्त झाली आहे. 'तुम्ही तरुनी' विश्व तारा' असे ती ज्ञानेश्वरांना सांगते. -ावरुन संतांच्-ा का-ार्ची तिची जाणीव व्-क्त होते.

मुक्ताईने हरिपाठ लिहिला आहे. तिने लिहिलेल्-ा ओव्-ातून तिचे -ोगमार्गाचे ज्ञान दिसते.

मुक्ताबाईने कूटरचना करुन त्-ा रचनेतून आपला अध्-ालिक अनुभव मांडला आहे. मुक्ताईच्-ा रचनेविष-ी 'महाराष्ट्र स्वारस्वत' -ा ग्रंथाचे लेखक वि.ल.भावे लिहितात, 'मुक्ताबाईची सर्वच रचना गोड आहे. स्त्रि-ांच्-ा कोमलपणाची छटा तीत पसरली आहे. सू-ोंद-ापूर्वी पक्षी किलबिल करु लागले म्हणजे जो आनंद होतो. तोच मुक्ताईचे अभंग वाचना होतो.'

## ३.७ गोरा कुंभार

गोरा कुंभार -ांची अभंग रचना अत्यल्प आहे. सकल संत गाथेत त-ांचे वीस अभंग आहेत. -ा अभंगातून त-ांचा भक्तिभाव व स्वानुभाव स्पष्ट झाला आहे. त-ांच-ा कडकडीत वैराग-ामुळे, वचननिष्ठेमुळे, करारीपणामुळे वरवर पाहता त-ांचे काव-ा रुक्ष वाटले तरी त-ातील अध-ात्म बाजूला सारले म्हणजे त-ात असलेल-ा काव-ाचे मनोरम दर्शन घडते. 'मुकि-ा साखर चारवा-ा दिधली | बोलता हे बोली बोलवेना ||' अशा प्रकारची काव-म-ा रचना गोरोबांनी केली आहे. त-ातून परतत्त्वाला स्पर्श करणारी काव-कल्पनाच दिसते. त-ांच-ा अभंगात ज्ञानदेवांच-ा विचारांचा प्रभाव जाणवतो. ज्ञानेश्वरांचे शब्द, उपमा, उत्प्रेक्षा त-ांच-ा अभंगात -ेतात.

गोरोबांनी जीवनमुक्त होण-ासाठी धडपड करणा--ा जीवावर झपाटलेल-ा वेड-ापिशाचे रुपक रचले आहे. त-ांच-ा वाणीत रसवत्ता नसली तरी तिच-ात अनुभूतीचा कंस विशेष आहे.

## ३.८ विसोबा खेचर

विसोबा खेचर हे नामदेवांचे गुरु व ज्ञानेश्वरांचे शिष-ा म्हणून प्रसिध्द आहेत. त-ांनी अभंगरचना केली आहे. सकलसंतगाथेत त-ाचे दोन अभंग आहेत.

विसोबा हे गुढवादी कवी होते अनादि अनंत अशा परब्रहमाची अनुभूती घेताना त-ांनी रुपकाचा अनुभव घेतला. लौकिक जीवनातील उपमा दृष्टांताचा वापर केला. त-ांच-ा काव-ात आढळणा--ा ध्वनितत्त्वामुळे काव-ा उच्च कोटीला जाऊन पोहचते.

विसोबांच-ा अभंगात त-ांच-ा खेच. व-वसा-ातील अनेक शब्द आले आहेत. ते ज्ञानी भक्त होते. तसेच संतकवी होते. त-ांच-ा काव-ातून सत-ा शिव सुंदरचे प्रतिबिंब पडलेले आहे.

विसोबानी आपल-ा अभंगातून नीतीपदेश केला आहे. ते म्हणतात 'अनाचारी मन केवळ | न-े वाटवू सर्वथा |', ' परस्त्री निमुकी जाण रे माता' अशा उपदेशातून त-ांची दृष्टी व-क्त होते.

विसोबा खेचरांना सोपान देवांची आरती लिहिली आहे. तसेच 'हरिश्चंद्रारव-ान' नावाचे प्रकरण लिहिले असावे असे सारस्वतकारांना वाटते.

## ३.९ चोरवामेळा

संत चोरवामेळा महार जातीत जन्माला आले होते. तरी ते पंढरपूरच-ा पांडुरंगाच-ा भक्तीत रमले. त-ांचे सर्व कुटुंबच विठ्ठल भक्तीत रमले त-ामुळे सर्वच कुटुंबि-ांनी अभंगरचना केली आहे.

चोरवामेळा -ांनी आपल-ा अभंगातून नाममहात्म-ा गा-ले आहे. नामाच-ा उच्चाराने शुध्द होता -ेते असे त-ांना वाटत असे ते म्हणतात 'खट नट -ावे, शुध्द होऊनी जावे, दवंडी पिटी भावे, चोरवामेळा'

'सकलसंत गाथेने चोरवामेळा -ांचे १५७ अभंग आहेत. त-ांच-ा अभंगातून त-ांच-ा अध-ालिक उन्नतीचा आलेख आला आहे. ते निरक्षर असल-ाने त-ांच-ा अभंगात पुनरुक्ती आढळते. रचनेत सफाईदारपणा नाही. हे दोष असूनही त-ांचे अभंग मनाची पकड घेतात.

## ३.१० सावता माळी

सावता माळी हे माळी समाजातील संत होते. ते वृत्तीने शांत, स्वभावाने प्रेमळ, समाधानी होते. त-ांच-ा अभंगातून त-ांच-ा उत्कट भक्तीचे प्रतिबिंब पडले आहे.

सावता माळी -ांना आपला मळा व जान -ामुळे भक्तीमार्गात काहीही अडचण आली नाही. स्वतःच-ा जातीविष-ी त-ांनी अभिमानच व-क्त केला आहे. 'बरी केली हीन -ाती | नाही वाढली महती' असा हा निरहंकारी माणूस होता.

'कांदा मुळा भाजी | अवघी विठाई माझी ||' हा त-ांचा अभंग प्रसिध्द आहे. त-ांनी त-ांच-ा व-वसा-ातील कितीतरी शब्द उपमा, रुपकांच-ा रुपाने -ेतात. त-ांची अभंगरचना खूप थोडी आहे. सकलसंतमाथेत त-ांचे १२ अभंग आहेत. त-ात भावनेचा भाग अधिक आहे. त-ांची वर्णनशैली अगदी साधी सोपी आहे. जातीने माळी असणा--ा -ा संताने आपल-ा मनात, अभंगात भक्तीचा मळा फुलविला. त-ांच-ा सुखी समाधानी जीवनाचे चित्रण त-ांच-ा अभंगात आले आहे. नामभक्तीच-ा पाण-ावर त-ांच-ा शेतातील 'शांती शेवंती फुलली | प्रेम जाई जुई चाली' ही ओळ त-ांच-ा प्रसन्न अभंगवाणीचे प्रतिक आहे.

## ३.११ सेना न्हावी

सेना न्हावी संत मंडळात सामील झाले ते ज्ञान नाम-ाच-ा प्रभावाने, त-ांची जात व व-वसा-ा न्हाव-ाचा. त-ांचे दीडशे अभंग उपलब्ध आहेत. त-ांनी सगुणभक्तीचा पुरस्कार केला आहे. त-ांनी त-ांच-ा अभंगातून सगुणभक्तीचा पुरस्कार केलेला दिसतो. नामभक्ती, नाममहात्म-ा त-ांनी आपल-ा अभंगातून वर्णन केले आहे. 'ज-ाच-ा मुखी राम नाही त-ाची संगती नको' असे ते म्हणतात.

सेना न्हावी -ांनी नीतीवर अभंग लिहून तत्कालीन ढोंगी साधूंवर टीका केली आहे. त-ांचा 'आम्ही वारीक वारीक | करु हजामत बारीक' हा अभंग प्रसिध्द आहे.

सेनाने गौळणी लिहिल-ा असून गौळणीतून राधा- कृष्ण प्रेम विशेषत्वाने रंगविले आहे. राधा -कृष्ण --शोदा -ांच-ातील संवाद चुरचुरीत आहेत.

## ३.१२ संत जनाबाई

संत जनाबाईनी अभंगरचना केली असून तिच-ा रचनेवर ज्ञानेश्वर व नामदेवांच-ा रचनेचा प्रभाव जाणवतो. तिने कृष्णजन्म, बालक्रीडा, काला, ज्ञानेश्वरस्तुती, दशावतार, थालीपाक, तीर्थावेळी, पाळणा, काकड आरती इ. विष-ावर अभंगरचना केली आहे.

तिच्या अभंगातून भक्ताची आर्तता गणवते. जनाबाई विठ्ठलाशी व पंढरपूरच्या वातावरणाशी एकरुप झाली होती. पांडुरंगाच्या भेटीसाठी ती व्याकुळ होते. विठ्ठलाने आपल्या चरणाशी घ्यावे म्हणून ती म्हणते,

मा-न मेली बाप मेला | आता सांभाळी विठ्ठल |
मी तुझे गा लेकरु | नको आता दुरी करु ||

देव भक्तासाठी धावून येतो असा तिचा विश्वास आहे. तो तिच्या अनेक अभंगातून व्यक्त झाला आहे.

जनाबाईचे अभंग साधे सरळ, सोप्या शब्दात अकृत्रिमपणे लिहिले गेलेले आहेत. तिने काही संताची चरित्र सांगणारी रचना केलेली आहे.

## ३.१३ कान्होपात्रा

कान्होपात्रा ही मंगळवेढ-याच्या शामा गणिकेची मुलगी. वेश्येच्या कुळात जन्म घेऊन तिने आपले नाव वारकरी संप्रदा-यात अजरामर केले. त्यात तिच्या भक्तीची आणि चारित्र्याची थोरवी आहे. तिचे अवघे २३ अभंग उपलब्ध आहेत. या सर्व अभंगातून तिने देवाचा धावा केला आहे.

कान्होपात्रेचे अभंग म्हणजे भक्ताच्या ह्रद-याचे आर्त व्रंदनच हो-न. तिने आपले तन मन कोण-या पुरुषाला विकण-याऐवजी विठ्ठलाला अर्पण केले होते.

तिच्या अभंगातून नाममहात्म्य, विषयत्यागाचा उपदेश आला आहे. ती म्हणते,

'घ्या रे घ्या रे मुखी नाम | अंतरी धरुनि-या प्रेम | ऐसी नाममाळा | कान्होपात्रा ल्याली गळा ||'

तिची काव्यरचना तिच्या ऐहिक जीवनातील कारुण्यातून निघाली होती. हे तिच्या अभंगातील आत्मनिवेदनातून दिसून येते. 'संचित माझे खोटे | मज असे ग्वाही | तुज बोल नाही | देवरा-या || असे ती म्हणते. आपले जीवन दु:खमय झाले याला कारण परमेश्वर आहे असे तिला वाटत नाही.

संतदर्शन, संतसहवास हा तिला एखाद्या पर्वणीप्रमाणे वाटतो. तो आनंद व्यक्त करताना ती म्हणते,

हरली ती तहान भूक निमाली | संताची देखिली चरणांबुजे |
कीर्तनाचे रंगी आनंदे नाचता | कान्होपात्रा चित्ता समाधान ||

कान्होपात्राच्या सौदर्याची कीर्ति बेदरच्या बादशहाच्या कानी गेल्यानंतर त्याने तिला बोलवणे पाठविले. त्यावेळी तिने केलेला परमेश्वराचा धावा भक्तिरसाबरोबरच कारुण्यानेही ओथंबलेला आहे. साध्या, सोप्या भाषेत कान्होपात्रा आपले अंतकरण परमेश्वराजवळ उघडे करते.

'सिंहाचे भानुके जंबुक पै नेता | थोंरांचिया माथी लाज वाटे ||
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले | मजलागी तैसे जाहले देवा ||
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणे | करावा जतन ब्रीदासाठी ||

हा कान्होपात्राचा धावा तिची असहा–यता, शरणागती दाखवतो.

थोडक्यात - कान्होपात्राने तिच्या भावनांचा अविष्कार कोणत्याही पध्दतीने केला असला तरी अविष्कारापेक्षा तिच्या भावनांकडेच लक्ष वेधले जाते.

## ३.१४ संत एकनाथ

संत एकनाथांना महाराष्ट्राचे नाथ म्हणून ओळखले जाते. ते गुरुपरंपरे दल संप्रदा-ी असले तरी वारकरी संप्रदा-ाशी एकरुप पावले होते. त-ांच-ा काळात सर्व वर्ण आपापले कर्तव-ा विसरले होते. कर्मकांडाला अत आला होता. शुद्र देवतांचे प्रस्थ वाढले होते. ब्राहमतेज आणि क्षाव्रतेज लोपून गेले होते. अशा अंधार-ुगातून महाराष्ट्राला बाहेर काढण-ाचे काम एकनाथांनी केले. समाजातील स्वार्थ, ढोग पारवंडीपणावर आणि अंध श्रध्देवर त-ांनी टीका केली. आणि समाजातील विविध समाजघटकांना वारकरी संप्रदा-ाची शिकवण दिली.

### ३.१४.१ ग्रंथसंपदा

चतुश्लोकी भागवत, एकनाथी भागवत, रुक्मिणी स्व-ंवर, भावार्थ रामा-ण, अध-ालीक प्रकरणे, संतचरित्रे, पौराणिक आरव-ाने, जोहार, अर्जदास्त, भारुडे, गोळणी, अभंग आरत-ा इ. विविध प्रकारचे लेखन एकनाथांनी केले आहे.

### ३.१४.२ चतुश्लोकी भागवत

जनार्दन स्वामींच-ा प्रेरणेने एकनाथांनी 'चतुश्लोकी भागवत' -ा ग्रंथाचे लेखन केले. हा ग्रंथ भागवताच-ा द्विती-ा स्कंधातील नवव-ा अध-ा-ातील ३२ ते ३५ श्लोकांवरील टीका आहे. -ा ग्रंथात 'सृष्टीरुपी मीच वसे' हा सिध्दांत -ा ग्रंथात मांडला आहे.

एकनाथांचा हा पहिलाच ग्रंथ आहे. त-ांच-ा वक्तृत्व शैलीतून नवरवेपणा वाटत नाही. भागवताचे सारे सार -ा चार श्लोकात अवतरले आहेत. त-ाचे नाथांनी सुबोध व समर्थपणे स्पष्टीकरण केले आहे.

एकनाथांनी अत-ंत विन-ाने -ा ग्रंथातील निरुपण केले आहे. कथारुपाने भक्तिज्ञान वैराग-ाची शिकवण दिली आहे. -ा ग्रंथरचनेचे सारे श्रे-ा जनार्दन स्वामींना दिले आहे.

### ३.१४.३ एकनाथी भागवत

एकनाथीनी भागवताच-ा एकादश स्कंधावर विस्तृत टीका लेखन केले. -ा ग्रंथाच-ा लेखनास तीन वर्ष लागले. -ा ग्रंथात ३१ अध-ा-ा असून ओवीसंख-ा १८८०० आहे. हा ग्रंथ मराठीतून लिहिला म्हणून प्रारंभी एकनाथांना विरोध झाला. परंतु नंतर -ा ग्रंथाची पालखीतून मिरवणूक काढण-ात आली.

भागवत धर्माची परंपरा, स्वरुप वैशिष्ट-े, ध-ो-ा, साधने -ांचे विस्तृत विवेचन केले असल-ाने वारकरी संप्रदा-ात -ा ग्रंथाला प्रमाण ग्रंथाचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

एकनाथी भागवतात एकनाथांनी साडेचारचरणी ओवी वापरली आहे. ग्रंथाचे स्वरुप श्रीकृष्ण-उध्दव संवादात्मक आहे. ग्रंथाचे वाचन करीत असताना ज्ञानेश्वरांचे विचार व शैली -ांचा एकनाथांवर असलेला प्रभाव जाणवतो. नाथांनी ग्रंथारंभी नामदेव, ज्ञानेश्वर, निवृत्ती व-ास -ांना वंदन केले आहे.

नाथांची भाषा प्रासादिक आहे. ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान प्रापंचिकांना त्यांच्याच भाषेत समजावून दिले आहे. भक्तीच्या द्वारे परमार्थाची प्राप्ती करुन देण्याचा सुलभ मार्ग प्रापंचिकांपुढे या ग्रंथातून ठेवला आहे. भक्तीमुळे सामान्य जनही भवसागर तरुन जातात हे त्यांनी पटवून दिले आहे.

मराठी भाषेचा अभिमान ग्रंथारंभीच व्यक्त केला आहे. हा भाषाभिमान व्यक्त करताना तत्कालीन पंडिताना नाथ इशारा देतात.

ग्रंथ देश भाषाव्युत्पत्ती | म्हणौनि नुपेक्षावर पंडिती |
अर्थ पाहवा यथार्थी | परमात्मस्मिती निननिष्ठा ||

तसेच 'प्राकृत निंध व संस्कृत वंध' हे बोलणे बरोबर नसल्याचे नाथांनी विनयाने सांगितले आहे.

### ३.१४.४ रुक्मिणी स्वयंवर

भागवतातील मूळ १४४ श्लोकांवर एकनाथांनी १७१२ ओव्याची रचना करुन 'रुक्मिणी स्वयंवर' या ग्रंथाची निर्मिती केली. या ग्रंथात १८ अध्याय आहेत.

या ग्रंथातील पहिल्या सात अध्यायात रुक्मिणीहरणाचा कथा, पुढील सहा अध्यायात युध्दवर्णन, शेवटच्या पाच अध्यायात विवाह समारंभाचे वर्णन आले आहे.

रुक्मिणीने केलेली कृष्णाची निंदा, तिची विरहावस्था, कृष्ण रुक्मि युध्द, रुक्मीची फजिती, कृष्ण रुक्मिणीचा विवाह, या प्रसंगांच्या वर्णनातून वीर, विनोद, शृंगार इ. रसांची निर्मिती झाली आहे.

एकनाथकालीन विवाह सोहळ्याचे सविस्तर वर्णन या स्वयंवर काव्यात आले आहे. त्यामुळे सोळाव्या शतकातील महाराष्ट्र संस्कृतीचे प्रतिबिंब पाहवयास मिळते. विवाहविषयी चालिरितीत रुखवत, सप्तपदी, कंकणबंधन, वरातीसमोर कुळवंतीणींचा नाच, दारुकाम इ. चे वर्णन आले आहे.

'रुक्मिणी स्वयंवर'ात आलेली युध्दवर्णने सांकेतिक नसून त्यात नाथांचा अभ्यास व अनुभव दिसतो. युध्दवर्णने जिवंत व प्रत्ययकारी वाटतात. रुक्मिणी व कृष्ण यासारख्या व्यक्ती लौकिक व अलौकिक अशा दोन्ही पातळ्यांवर वावरताना दिसतात. त्यामुळे अनेक ठिकाणी रसभंग होतो. भक्ती आणि रती यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न एकनाथांनी केलेला आहे.

एकनाथांनी पुराणिकाची भक्ति भावपूर्ण सुबोध शैली प्रारंभापासून अखेरपर्यंत स्वीकारली आहे. चातुर्यपूर्ण संवादरचना, प्रसंगयोजना, या ग्रंथातही केलेली आहे. ग्रंथाची भाषा साधी, लोकजीवनाचे चित्रण, अध्यात्माची बैठक यामुळे हे आख्यान काव्य यशस्वी ठरले. आख्यान काव्यांला लोकप्रियता नाथांनी मिळवून दिली. त्यामुळे आख्यानकाव्याची एक परंपरा मराठीत निर्माण झाली.

### ३.१४.५ भावार्थ रामायण

'भावार्थ रामायण' ही एकनाथांच्या जीवनातील शेवटची रचना होय. या ग्रंथाची पाच कांडे व युध्दकांडाचे सुरवातीचे ४४ अध्याय नाथांनी रचले. उर्वरित रचना एकनाथांच्या गावबा या शिष्याने पूर्ण केली.

'भावार्थ रामा-णा'चे स्वरुप एखाद्या महापुराणासारखे आहे. एकनाथकाळी उपलब्ध असलेल्-ा अनेक रामा-णातील कथांचा वापर त्-ांनी आपल्-ा रामा-णात केला आहे.

एकनाथांचा राम हा अवतारी राम आहे. श्रीरामाने कथा लिहिण्-ासाठी आपली पाठ पुरविली असे सांगून -ा काव्-लेखनामागील ईश्वरी प्रेरणा स्पष्ट केली आहे. ग्रंथारंभी गणेशाने आशीर्वाद दिला आहे.

एकनाथांची रामाची असलेली तन्न-ता व ध्-ास -ा ग्रंथातून दिसतो. -ा ग्रंथात एकनाथांनी रुपककथांचा वापर केला आहे. उदा. दशरथ म्हणजे दशद्रिंन्े, कौसल्-ा म्हणजे सद्विद्या, कौक-ी अविद्या, आत्मप्रबोध तो लक्ष्मण, भावार्थ तो भरत, विश्वामित्र हा विवेक, वशिष्ठ म्हणजे विचार, आत्मतत्त्व श्रीराम, शिवधनुष्-भंग म्हणजे आत्मज्ञानाने होणारा मा-ानाश हो-ा. श्रीराम व सीता -ांची एकात्मता दर्शविताना नाथांनी आपल्-ा प्रतिभेचा विलास दाखविला आहे. सीता जीव तर राम जीवन, सीता शर्करा तर राम गोडी, सीता डोळसना तर राम देखणा अशी एकात्मता वर्णन केली आहे. सीतारामाच्-ा एकरुपतेतून सीतेची पतीनिष्ठा एकनाथांनी वर्णन केली आहे.

हनुमानाची आदर्श रामभक्ती वर्णन केली आहे. अवतीभवतीच्-ा समाजाचे वर्णन आले आहे. समाजवर्णन करावे असे एकनाथांना वाटत असावे. तो त्-ांच्-ा भावार्थ रामा-णाचा हेतू होता. त्-ांच्-ा रामा-णात कर्मठ ब्राहमण, स्वतःचा पोकळ डौल मिरविणारे षंढ क्षनि-ा, द्रव्-लोलुप वैश्-ा, आणि अठरापगड जातींनी विस्कळीत झालेले शुद्र अशा चातुवर्णांचा उल्लेख आहे.

देवांचे बंधविमोचन करावे, स्वधर्माचे उत्थापन करावे. दुष्टांचे निर्दालन करावे. गोब्राहमणांचे रक्षण करावे. देव, देश व विश्वद्रोही अशा रावणाचा नाश करावा असे एकनाथ पुन्हा पुन्हा सांगून पारतंत्र्-ात -वनसेवारत झालेल्-ा हिंदू बांधवापुढे त्-ागी पराक्रमी, स्वाभिमानी व सहिष्णू अशा धीरोदा- रामचंद्राचा आदर्श त्-ांनी उभा केला.

### ३.१४.६ पदे व गौळणी

एकनाथांनी पदे व गौळणीतून अध्-ात्म सोपा करुन सांगितला. आजही एकनाथांची पदे व गौळणींचा उप-ोग कीर्तनात रोचकता आणण्-ासाठी करतात. अत्-ंत साध्-ा सोप्-ा भाषेतून नाथांनी बाळकृष्णाचे रम्-ा, सुंदर रुपवर्णन करतात.

'असा कसा देवाचा देव बाई ठकडा ग | देव एक पा-ाने लंगडा ग बाई' अशा सहज भाषेतून नाथांनी पदे लिहिली. त्-ांच्-ा पदातून तत्कालीन विटू दांडू, चेंडूफळी, लपंडाव, पटपट सावली इ. खेळांवर अध्-ात्मपूर्ण रुपके रचली.

नाथांच्-ा गौळणींना प्रतिष्ठित समाजात लोकप्रि-ता मिळाली गौळणींमधून उत्कट मधुरा भक्तीचा अविष्कार केला नाथांच्-ा गौळणी वरवर शृंगारिक वाटत असल्-ा तरी त्-ांचे अंतरंग मात्र भक्तीचेच आहे. उदा.

'तुझी संगती नाही कामाची | मी सुंदरा कोवळ-ा मनाची |
माझ वंश आहे मोठ-ाचा | तू तव -ाती ही गवळ-ाची |

### ३.१४.७ आध्-ालिक प्रकरणे

एकनाथांनी निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, गोराकुंभार, सावता माळी, चोरवा मेळा इ. वारकरी सांप्रदा-िक संताची चरित्र गा-ली त्-ाचप्रमाणे तुलसीमहात्म्य, हनुमानजन्म, ध्रुवचरित्र, उपमन्युकथा, सुदामचरित्र, सांदिपनकथा इ. आख्-ानांची रचना केली.

हस्तामलक, स्वालसुख, शुकापटक, आनंदलहरी, गीतासार, चिरंजिव पद, गीतामाहिमा अशी स्फुट प्रकरणे नाथांनी लिहिली आहेत. सर्व प्रकरणातून नाथांनी भक्तीचा उपदेश केला आहे. त्-ातून त्-ांची लोकशिक्षकाची भूमिका कोठेच सुटत नाही.
थोडक्-ात - एकनाथांनी नैतिक, अध्-ात्मीक शिकवण रचनात्मक पध्दतीने देऊन आत्मोद्धाराबरोबरच समाजोद्धाराचा प्र-ात्न केला.

### ३.१४.८ अभंग

एकनांथांनी कृष्णजन्म, बालक्रीडा, कृष्णमहात्म्-ा, पंढरीमहात्म्-ा, विट्ठल महात्म्-ा, राममहिमा, नाममहिमा, कीर्तनमहिमा, संतमहिमा, सद्गुरुमहिमा, अद्वैतज्ञान, आत्मानुभूती, उपदेश अशा विविध विष-ावर अभंग रचना करुन मराठी अभंग वाड्.म-ात महत्त्वपूर्ण भर घातली.

### ३.१४.९ भारुडे

संत एकनाथांनी सुमारे तीनशे भारुडे लिहिली. ती आजही लोकप्रि-ा आहेत. एकनाथकाळात बहुजन समाजाला मार्ग दाखविणा--ा वाटाड-ाची गरज होती. ही गरज नाथांनी भारुडांची निर्मिती करुन भागविली. सर्व सामान्-ांना त्-ांच्-ाच भाषेत परिवेषात उपदेश केला तर त्-ाचा अधिक फा-ादा होतो. हे लक्षात घेऊन एकनाथांनी भारुडांची रचना केली.

एकनाथांनी महार, गोंधळी, गारुडी, पाईक वासुदेव, बाळसंतोष, कोल्हाटिण, मुरळी, इ.च्-ा वेषात व चालिरितीतून सामान्-ाच्-ा भाषेत सामान्-ांना आत्मबोध होईल. अशी रचना केली.

नाथांनी दळण-कांडण, -ासारखे व्-यवहार भारुडातून आणले. बैल, सर्प, विंचू, कुत्रा इ. प्राणी, हमामा, हतूतू, विटी-दांडू फुगडी इ. खेळ जारवाई, जोखाई, मरिआई -ा देवतांना नाथांनी आपल्-ा भारुडाचे विष-ा बनविले.

एकनाथांची भारुडे म्हणजे लोकवाड्.म-ाचा उत्कष्ट नमुना हो-ा. नाथांच्-ा भागवतातील बोध समाजाच्-ा खालच्-ा थराप-ंत, खेड-ा-पाड-ातील लोकांप-ंत नेऊन पोहचविण्-ाचे कार्-ं भारुडांनी केले.

### ३.१४.१० थोडक्-ात

संत एकनाथांचे कार्-ं धर्मपालन, धर्म रक्षण हेच होते. -ासाठी वारकरी संप्रदा-ाला नाथांनी उचलून धरले. महाराष्ट्राची अस्मिता जागवण्-ाचा प्र-ात्न केला. भक्तिमार्गाला महत्त्व दिले. संसार, परमार्थ, द्वैत-अद्वैत, शैव-वैष्णव, दलसंप्रदा-ी -ा सर्वांना एकत्र आणण्-ाचा प्र-ात्न केला.

जनसामान्-ाना भगवद्भक्तीचे महत्त्व पटवून देणे हाच एकनाथांच्-ा रचनेचा प्रमुख हेतू होता. प्रपंचात राहून परमार्थ साधता -ेतो हे नाथांनी तत्कालीन समाजाला दाखवून दिले.

विविध प्रकारचे साहित्य लिहून नाथांनी मराठी भाषेला ऐश्वर्य प्राप्त करुन दिले. अंतस्फूर्ती, बाह्यसजावट, भक्तिभाव, पंडित्य, तत्त्वबोध, मनोरंजन या सर्व घटकांची त्यांनी सारखीच बूज राखली.

## ३.१५ संत तुकाराम

संत तुकारामांना वारकरी पथांच्या कळसाची उपमा दिली जाते. त्यांना त्यांच्या संसारात, व्यवहारात 'जग हे सुखाचे / दिल्या घेतल्याचे' असे जाणवल्याने ते देवाकडे विठ्ठलाकडे वळले. त्यांना बाबाजी चैतन्य नावाच्या सत्पुरुषाने स्वप्नात गुरुपदेश केला. तसेच संत नामदेव आणि पांडुरंग यांच्या आज्ञेवरुन कवित्व करण्यात सुरुवात केली. तुकारामाने मोठ्या प्रमाणात अभंगनिर्मिती केली.

### ३.१५.१ अभंगगाथा

संत तुकारामांची अभंगगाथा प्रसिध्द आहे. त्याच्या अभंगगाथेत सुमारे साडेचार हजार अभंग आहेत. या अभंगाच्या रचनेचा ठराविक असा क्रम नाही. हे सर्व अभंग अस्फुर्त व आत्माविष्काराच्या स्वरुपाचे आहेत. त्यातून तुकारामाचे जीवन उलगडण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे.

### ३.१५.२ आत्मचरित्रपर अभंग

तुकारामाच्या मनात ज्या ज्यावेळी ज्या भावना प्रबळ झाल्या त्यांना तुकारामाने शब्दरुप दिले आहे. आत्मचरित्रपर अभंगातून त्यांनी आपली कुळपरंपरा, दुष्काळासारखी संकटे वैराग्य साधकावस्थेतील अनुभव सांगितले आहेत. स्वतःची दुर्दशा, स्वतःच्या साधनेचा विकास, पारमार्थिक अनुभव, ईश्वरविषयक तळमळ कशी वाढली, दिव्यानंद कसा प्राप्त झाला, अशा अनेक प्रसंगाचे वर्णन अभंगातून आले आहे.

### ३.१५.३ प्रासंगिक अभंग

तुकारामाच्या जीवनातील काही प्रसंगावर आधारलेल्या अभंगात गुरुपदेश, परमेश्वर भेट, अभंगाच्या वहया इंद्रायणीत बुडविल्या तो प्रसंग, छ- शिवाजीने तुकारामास बोलवणे पाठविले अशा काही घटना आल्या आहेत.

भक्ती, संत, नाममहात्म्य, नामसंकीर्तन, प्रापंचिकास उपदेश, समाज निरीक्षण, समाजातील सोंगाढोंगावर तुकारामांचे भाष्य अशा अनेक विषयावर तुकारामाने रचना केल्या आहेत. या सर्व रचनातून तुकारामाचे कवित्व प्रकट झाले आहे.

तुकारामाचे अभंग प्रसंगपरत्वे निर्माण झाल्याने त्यांच्यात सहजता जाणवते. त्याची रचना एक प्रकारची भावगीतेच आहेत. त्यांचे अभंग वाचीत असताना तुकारामाची मूर्तीच डोळ्यासमोर उभी राहते. कवी प्रत्यक्ष वाचकासमोर बोलतो व काय सांगणे आहे ते आडपडद्याशिवाय स्वच्छ समोरासमोर सांगतो.

तुकारामाच्या अभंगातून त्यांच्या भाषेचे एक साधे मनोहर रुप धारण केलेले जाणवते. साध्या सोप्या शब्दांनी तुकाराम आपल्या मनातील भाव, भावना, विचार, राग, द्वेष व्यक्त करतात, उपदेश करतात, समाजातील निंद्य गोष्टींची अवहेलना करतात. तेव्हा थोड्या शब्दातून खूप मोठा आशय व्यक्त होतो.

बोलणे पाटीभर व अर्थ चिमूटभर असा प्रकार अभंगगाथेत कुठेही आढळत नाही. 'नाही काळाचा गुमान गोळी भ्रमरा सुमन' सारख्या ओळीतून खूप मोठा अर्थ सांगून जातात. 'साधुसंत येती घरा | तो चि दिवाळी दसरा' या काव्यपंक्तीतून कितीतरी मोठा आशय तुकाराम सांगून जातात.

तुकारामांना शब्दाची, अर्थांची जाण होती. शब्दांविषयी तुकाराम लिहितोत, `आम्हां घरी धन शब्दाचींच रत्ने | शब्दाचीच शस्त्रे करु' आपले शब्द आपले धन आहे. त्याचा वापर आपण शस्त्राप्रमाणे करु शकतो. याची जाणीव तुकारामाला दिसते. त्यांच्या अभंगातून दृष्टांत, उपमा, अनुप्रास या अलंकारांनी हजेरी लावली आहे. जिवंत अनुभव, सूक्ष्म निरीक्षण, चोरवंदळ बुध्दी, मधूर वाणी यामुळे तुकारामाचे अभंग श्रेष्ठ ठरले.

व्यवहारातील उदाहरणांच्या साहाय्याने थोडक्यात आशय सांगितल्यामुळे त्यांच्या अभंगाला सूत्राचे स्वरुप प्राप्त झाले आहे. अशा सूत्रमय पध्दतीमुळे तुकाराम गाथा अमर ठरली. तुकारामाचे गोड शब्द कोंदणात बसविल्यांमुळे शोभून दिसतात.

तुकारामाच्या स्वभावाची मृदुता, कठोरता, व्यापक अनुभवांने परिपक्व झालेले मनही त्यांच्या अभंगातून व्यक्त झालेले आहे. तुकारामाचे परिपक्व विचार अनेक अभंगात, चरणात आले आहेत. अशा चरणांना, शब्द प्रयोगांना, काव्यपंक्तीना मराठी बोलीभाषेत सुभाषिताचे महत्त्व प्राप्त झाले आहे. उदा. तुका म्हणे संता सोशी जगाचे अघात.

गाढव शृंगारले कोडे | काही केल्या नव्हे घोडे.

शुध्द बीजापोटी | फळे रसाळ गोमही असे कितीतरी चरण आजही मराठी मनात पक्के ठसून बसले आहेत.

तुकारामांच्या सुभाषितात प्रपंच, परमार्थ, काव्य सर्व काही आहे. वाणीतील भेदकता, बुध्दीचे स्वातंत्र्य व अंतरीचा प्रत्यय या तीन गुणामुळे तुकारामाचे काव्य श्रेष्ठ ठरले. तुकोबांचे अंतकरण अत्यंत पवित्र त्यात भक्तिरसाचा झरा वहात असलेला त्यामुळे तुकारामाच्या काव्यात खरी कळकळ व भक्तीचा जिव्हाळा भरुन राहिला आहे. आत्माविष्कार हाच त्यांच्या काव्याचा प्राण आहे. भक्तीच्या ज्या तुर्मी त्यांच्या ह्रदयात उमटत होत्या त्यांना तुकारामाने शब्दरुप दिले.

### ३.१५.४ थोडक्यात

संत तुकारामाने सांप्रदायिक, प्रासंगिक व स्फुट अशा विविध स्वरुपाची रचना केली.

## ३.१६ संत बहिणाबाई

भागवत धर्म मंदिराची ध्वजा म्हणून तिला ओळखले जाते ती बहिणाबाई ही तुकाराम शिष्या होती. तिचे ७४ आत्मचरित्रपर, ३५ निर्माणाचे, ४०० भक्तिपर अभंग आहेत.

आत्मचरित्रपर अभंगातून तिने स्वतःचे चरित्र सांगितले आहे. संसारात तिच्या मनाची होणारी तडफड अभंगातून उत्कटतेने व्यक्त झाली आहे. आत्मचरित्रपर अभंगात बहिणाबाईच्या वयाच्या तिसऱ्या वर्षापासून अठरा वर्षापर्यंतच्या जीवनाचा आलेख आलेला आहे.

तुकारामाच्या दर्शनासाठी हेलावणारे मन आणि भेट झाल्यानंतरचा आनंद, भावस्पंदने तिच्या अभंगात हळूवारपणे टिपली आहेत. हा आनंद व्यक्त करताना ती म्हणते,

बहिणी म्हणे जैसा समुद्र | ह्रदयाकाशी चंद्र बोले वाचा |

## ३.१७ संत निळोबाराय

निळोबा पिंपळनेरकरांना तुकारामांचा स्वप्न साक्षात्कार झाला त्यामुळे तुकारामाचे महत्त्व निळोबांच्या जीवनात अनन्यसाधारण असे होते. तुकारामाच्या भेटीसाठी बेचाळीस दिवस निळोबांनी उपोषण केले तेव्हा साक्षात विठ्ठलच त्यांच्यासमोर उभा राहिला. तेव्हा निळोबा म्हणतात,

येथे तुजपाशी बोलविले कोणी | प्रार्थल्याविण आलासी का ?
निळा म्हण आम्ही नोळखूच देवा | तुकयाचा धावा करितसे ||

निळोबांनी ७६० ओव्यात चांगदेव, ज्ञानेश्वरचरित्र लिहिले. गौळणी, कृष्णबाललीलापर पदे, विराण्या लिहिल्या. तुकारामाची स्तुती करणारे ३३३ श्लोक व आरती लिहिली. 'नमो सद्गुरु तुकया ज्ञानदीया' असे तुकोबांना वंदन केले आहे.

'वेणू वाजवित यमुनेच्या तटी' ही गौळण, पाहो गेलिये वो नंदाचा नंदना' ही त्यांची विरहिणी प्रसिध्द आहे.

संत निळोबांची रचना ओबड घोबड असली तरी तिच्यात प्रेमभाव ओतप्रोत भरलेला आहे. तुकारामाच्या अभंगाशी त्यांचे साम्य असलेले दिसते.

याशिवाय परिसा भागवत, जोगा परमानंद, जगन्नित्र नागा कान्हू पाठक, कचेश्वर ब्रह्मे, उध्दव चिद्घन, अशा अनेकांनी साहित्यनिर्मिती केली.

## ३.१८ समारोप

वारकरी संप्रदायातील संतानी विविध प्रकारची वाङ्मय रचना केली. ओवी, अभंग, भारुड गौळणी, पदे, आत्मपर (आत्मचरित्र) नाममहात्म्यपर, स्थलमहात्म्यपर, भक्तीपर अशी विविध वाङ्मय प्रकारांत रचना करुन मराठी साहित्याताला समृध्द केले.

संतानी उपनिषदे, बहमसूत्रे, षडदर्शने, श्रीमद्भगवद्गीता, श्रीमद्भागवत, यांचा बौध्दिक आणि वैचारिक वारसा आत्मसात करुन त्याचा सांधा विठ्ठलभक्तीशी जुळविला. वैदिक धर्माने मांडलेला तत्त्वविचार नव्या रुपात मांडला. त्यामुळे पूर्वीच्या वैदिक धर्माला, भागवत धर्माला नवे रुप प्राप्त झाले.

अद्वैतविचाराचा सर्वच संतानी पुरस्कार केला. त्यासाठी आपल्या विविध रचनांतून सामाजिक समतेचा आणि भक्तीचा गाभा सुदू दिला नाही. समाजातील सर्व समाजघटकात सामजस्य निर्माण व्हावे. यडा, व्रतवैकल्ये, ढोंग, तांत्रिक-मांत्रिक उपासना पध्दती टाकून नामभक्तीचा 'राम कृष्ण हरी' हा मंत्र दिला. त्यासाठी रचना केली.

संतकाव्य हे एकाच विशिष्ट ध्येयाने निर्माण न होता समाजासुधारणांसाठी, समाजधारणेसाठी आवश्यक असणाऱ्या चार पुरुषार्थाच्या प्राप्तीला जीवनात महत्त्व मिळावे, कोणीही आपल्या कर्मापासून दूर जाऊ नये ज्याने त्याने आपापले कर्म करावे त्यातूनच स्वधर्माचे आचरण होईल हा विचार संत साहित्याने मांडला. मोक्ष हे जीवनाचे अंतिम ध्येय (सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ) असला तरी इतरही पुरुषार्थ तितकेच महत्त्वाचे आहेत हे सर्वच संतानी सांगितले.

वारकरी संत विविध जातीत, व्यवसायात असले तरी त्यांनी आपापले कर्म सोडले नव्हते. कर्म सोडावे अन निखळ भक्ती करावी असे कोणत्याही संताने आपल्या काव्यातून

सांगितले नाही त्यामुळे संतकाव्य हे भक्तीकाव्य असले तरी संताची भक्ती ही कर्म प्रधान भक्ती असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळेच सावता माळी आपल्या मळ्यातच परमार्थ पाहतो. नरहरी सोनार व्यवसायानच भक्तीचा विचार मांडतो. सेना न्हावी आपल्या वारीकपणातच धन्यता मानून त्यातच तो परमार्थ विचार, कर्मविचार असल्याचे सूचित करतो.

संतानी समाजात वावरत असताना स्वतःकडे एक भक्त, समाजघटक, लोकशिक्षक अशीच भूमिका घेतल्याचे दिसते. त्यासाठी सर्वच संतकाव्यातून संतानी घेतलेला आत्मशोध दिसतो. तसाच समाजशोधही दिसतो. त्यामुळेच संतसाहित्यातून समाजातील विविध विषयांना स्पर्ध झाला आहे. भक्ती, ज्ञान, वैराग्य, यासाठी जरी संत काव्य अवतरले असले तरी समाजाला वळण लावण्याची भूमिका संतकाव्याने सोडलेली कोठेही दिसत नाही.

संतकाव्य धर्मजागृती, धर्मरक्षण, धर्मपालन, यासाठी अवतरले. आणि संतकाव्याने आपल्या ह्रदयीचा विचार प्रामाणिकपणे प्रत्यक्षात उतरविला. तो व्यक्त करत असताना समाजामध्ये रुढ असणाऱ्या बहुजनांच्या मान्य साधनांचा वापर त्यांनी केला. कथा, कीर्तने, भजने, गोंधळ, गौळणी, भारुडे यासारखी लोकमानसानली माध्यमे त्यांनी निवडली त्यातून संतविचार व्यक्त झाल्याने समाजाला तो आवडला तसेच संत स्वतः त्याच बहुजनसमाजाचे घटक असल्याने संताना वेगळी भूमिका घ्यावी लागली नाही. त्यामुळे संतकाव्य हा संत मनाचा सहज उद्‌गार ठरला. अंतरीचे जितक्या सहजतेने बाहेर येते आणि व्यक्त होते तितके संतकाव्य सहज जन्माला आले. सहज वाहणाऱ्या निर्झराचे सौंदर्य संतकाव्याला नरहरी सोनार, मुक्ताबाई, जनाबाई यांची कविता काव्यरुप ठरली आणि मराठी मनावर शेकडो वर्षे अधिराज्य गाजवित राहिली त्याचे कारण संतकाव्यातील सहजता होय.

संतकाव्यातील सर्वाचाच विचार भक्ती विरक्तीचा आहे. तोच समाजात पोहचविण्याचा संताचा मुख्य उद्देश होता. ईश्वर भक्तीचा तळमळ, परमेश्वर भेटीची आतुरता, संतकाव्यातून मोठ्या प्रमाणात व्यक्त होताना दिसते त्यामुळे संतकाव्यात साधकावस्थेपासून ईश्वराच्या साक्षात्कारांपर्यंतच्या अनेक मनोवस्था, भावच्छटा संतकाव्यातून व्यक्त झालेल्या आहेत.

संतकाव्यात संताच्या जीवनातील विविध प्रसंग व भावभावना व्यक्त झाल्या असल्या तरी संतकाव्यातील विविध रसामधून भक्तीलाच महत्त्वाचे स्थान मिळाले. याचा अर्थ संतकाव्यात फक्त भक्ती हाच एकमेक रस आहे असे नाही. करुण वात्सल, शांत, उदात्त, हास्य दूर रसांचा अविष्कारही संतकाव्यात झालेल्या आहे.

संतकाव्य सहजस्फूर्त आहे असे वर म्हटले आहे. त्याचे कारण संत हे व्युत्पन्न पंडित नव्हते. बहुजन समाजाचे तेही घटक होते. सर्वसामान्याप्रमाणेच प्रपंच करीत करीत भक्तीच्या मार्गाने मोक्ष प्राप्ती करावी. आपला अध्यात्मिक विकास साध्य करावा अशी संतांची भूमिका होती. या भूमिकेला न्याय देत असताना संताकडून काव्यलेखन झाले. हे लेखन कोणत्याही प्रकारचा पांडित्यप्रदर्शनाची भूमिका न घेता एका भक्ताची भूमिका घेऊन झालेले आहे. त्यामुळे त्यात पांडित्यप्रदर्शन नाही आपण रचना करतो आहोत अशी भावना नाही. सहज स्फुरलेले विचार काव्यरुपाने स्वाभिविकपणे प्रकट झाले एवढेच.

संतानी लिहिलेल्या काव्याविषयी त्यांची भूमिका भक्तीची आहे. भक्तीसाठी काव्य निर्माण झाले. आपले काव्य ही परमेश्वराचीच लीला आहे. त्याच्याच प्रसादाने आपण हे लिहित आहोत. एरवी आपली काव्यलेखनाची योग्यता नाही त्यामुळे संतकाव्यात मुद्दाम सौंदर्यनिर्मितीसाठी वृत्ते, अंलकरण यांचा वापर नाही. सहजस्फूर्त सहजोत्कट असे संतकाव्य असल्याने त्याची भाषा साधी सोपी, भावोत्कट, रसाळ, सहजमधूर झाली आहे. त्यामुळेच संतकाव्य खेडयापाडयापर्यंत,

वाङ्मयवस्त्रात पोहचले. सामान्यांचे मन संतकाव्याने जिंकून घेतले. सर्वसामान्यांना हेलावून टाकले.

सत्काव्य हे कपोलकल्पित अशा कल्पनाशक्तीवर आधारलेले काव्य नाही. तर ते संताच्या आत्मानुभवावर, आत्मप्रत्ययावर आधारलेले काव्य आहे. त्यामुळे तत्काळात संतकाव्य समाजाला चेतनादायी ठरले. तत्कालीन समाजाचा विचार करता समाजातील अस्मिता लोप पावली होती. लोक क्रियाशून्य झाले होते. सर्वत्र ढोंग माजले होते. दांभिकता, स्वत्वशून्यता या सर्वाने समाजाचे मानसिक अधःपतन झाले होते. अशा काळी समाजाचे मनोबल, निष्ठा, सामर्थ्य वाढविण्याचे बळ साहित्यातून समाजाला मिळाले.

संत कवींनी उपनिषदे, ब्रह्मसूत्रे, षडदर्शने, श्रीमद्भगवद्गीता, श्रीमद्भागवत, यांचा बौध्दिक आणि आध्यात्मिक वारसा आत्मसात करुन घेऊन त्याचा सांधा भगवद्भक्तींशी जोडलेला दिसतो.

संतानी आपल्या सर्वाच वाङ्.मयातून भागवत धर्माला नवे रुप दिले.

संत वाङ्.मयात आत्मशोध आहे तसा जीवनशोधही आहे. त्याचप्रमाणे आत्मसंवाद जसा आहे तसा लोकसंवादही आहे.

संतकविता ही प्रामुख्याने तत्त्वचिंतन करणारी कविता आहे. संत ज्या तत्वाचा शोध घेत होते त्या तत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या कवितातून पडलेले दिसते.

संतकविता लिहिणाऱ्या संतांचा स्वतःचा असा एक व्यवसाय होता. त्यांच्या दृष्टीने काव्य दुय्यम होते. काव्यलेखन हा पोटापाण्याचा व्यवसाय नव्हता. किंवा प्रसिध्दी मिळविण्याची त्यांना हावही नव्हती. कविता लिहावी नावलौकिक प्राप्त करुन घ्यावा. या हेतूने त्यांनी काव्यलेखन केलेले नाही.

संतकविता ही संताच्या उपासनेचा एक भाग होती. आपली आलिक उन्नती साध्य करण्यासाठी त्यांनी साधन म्हणून कवितेचा वापर केला.

संतकविता, संतांची तत्त्वकविता ही गुढवादाला जवळ असणारी कविता आहे. या कवितेच्या पाऊलखुणा उपनिषदापर्यंत दिसतात.

संत काव्याचे मूल्यमापन करताना डॉ. प्रकाश देशपांडे-केनकर लिहितात, ''मध्ययुग हे भारतीय संतकवितेचे सुवर्णयुग समजले जाते. मध्ययुगीन भारतीय कवितेच्या या वैभवात ज्ञानेश्वरांच्या या कवितेचा आणि पर्यायाने मराठी संतकवितेचा मोठा वाटा आहे.''

❖❖❖

घटक क्र. ४

# ४

# पंडिती वाङ्.मय

**पाठाची रूपरेषा**

४.१ विषय प्रवेश

४.२ मुक्तेश्वर

- ४.२.१ मुक्तेश्वराची वाङ्.मयसंपदा
- ४.२.१.१ संक्षेपरामायण
- ४.२.१.२ मुक्तेश्वरी महाभारत
- ४.२.१.२.१ मुक्तेश्वरांचा भारताभ्यास
- ४.२.१.२.२ मराठी भाषेचा अभिमान
- ४.२.१.२.३ मुक्तेश्वरांचा आत्मविश्वास आणि विनम्रता
- ४.२.१.२.४ गुरूबद्दल आदरभाव
- ४.२.१.२.५ मुक्तेश्वरांचे श्रोते
- ४.२.१.२.६ मुक्तेश्वरी महाभारताची कथा
- ४.२.१.२.७ मुक्तेश्वरी कथेतील बदल
- ४.२.१.२.८ महाभारतात मुक्तेश्वरकालीन समाजवर्णन
- ४.२.१.२.९ मुक्तेश्वरी शैली
- ४.२.१.३ मुक्तेश्वरी स्फुटकाव्ये समारोप

४.३ श्रीधर

- ४.३.१ श्रीधराची ग्रंथसंपदा
- ४.३.१.१ हरिविजय
- ४.३.१.२ श्रीरामविजय
- ४.३.१.३ पांडवप्रताप
- ४.३.१.४ शिवलिलामृत
- ४.३.१.५ जैमिनी अश्वमेध
- ४.३.१.६ श्रीधराचे काव्यविशेष

४.४ वामनपंडित

- ४.४.१ वामनाची ग्रंथसंपदा
- ४.४.१.२ निगमसार
- ४.४.१.३ समश्लोकी टीका
- ४.४.१.४ यथार्थदीपिका
- ४.४.१.५ वामनाची आख्याने
- ४.४.१.६ अध्यात्मिक प्रकरणे

४.५ रघुनाथ पंडित

- ४.५.१ रामदासवर्णन
- ४.५.२ गजेंद्रमोक्ष

४.५.३ नलदम-ंती स्व-ंवर
४.५.४ समारोप
४.६ सामराज
४.६.१ मुद्‌गलाख्-ान
४.६.२ रूक्मिणीहरण
४.६.३ समारोप
४.७ नागेश
४.७.१ ग्रंथरचना
४.७.१.१ सीतास्व-ंवर
४.७.१.२ चंद्रावळीवर्णन
४.७.१.३ थोडक्-ात
४.८ विठ्ठल बीडकर
४.८.१ पांचाली स्तवन
४.८.२ रूक्मिणी स्व-ंवर
४.८.३ सीतास्व-ंवर
४.८.४ रसमंजिरी
४.८.५ बिल्हणचरित्र
४.९ मोरोपंत
४.९.१ मोरोपंतांची काव्-लेखनाची भूमिका
४.९.२ मोरोपंतांची काव्-संपदा
४.९.३.१ आर्-ाभारत
४.९.३.२ मंत्ररामा-ाणे
४.९.३.३ मंत्रभागवत
४.९.३.४ श्रीकृष्णाविज-ा
४.९.३.५ ब्रह्मोत्तर खंड
४.९.३.६ स्फुटप्रकरणे
४.९.३.७ संश-ारत्नमाला
४.९.३.८ श्लोककेकावली
४.९.३.९ स्त्री गीते
४.९.३.१० थोडक्-ात
४.१० समारोप

## ४.१ विष-ाप्रवेश

मध्-ा-ुगीन मराठी काव्-ातील पंडिती काव्-ाचे दालन समृध्द असे आहे. मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित, सामराज, श्रीघर, नागेश, विठ्ठल, मोरोपंत -ा पंडित कवींना पंडितकवी म्हणून ओळखले जाते. -ा कवींनी संस्कृत काव्-ाच्-ा वळणावर, विविध गणवृत्तांत लिहिलेल्-ा आरण्-ानपर रचनेस पंडिती काव्-ा असे म्हणतात.

पंडित कवींनी रामा-ाण, महाभारत, भागवत, पुराणे, रघुवंश, कुमारसंभव, हनुमन्नाहक, शाकुंतलासारख्-ा संस्कृत काव्-ातील विष-ांना आपल्-ा काव्-ा लेखकाचे विष-ा म्हणून निवडले. -ा काव्-ातील विविध विष-ांवर आपापल्-ा शैलीने विविध मात्रा, वृत्ते अलंकार -ाचा वापर करुन काव्-लेखन केले.

पंडित कवींच्या रचनेचे प्रयोजन मोक्षप्राप्ती हे तर होतेच पण त्याचबरोबर काव्याचा रसिकतेने आस्वाद घेणे. आपली विद्वता, पांडित्य रसिकांना दाखविणे त्याचे प्रदर्शन करणे हा सुध्दा होता.

पंडित कवींना सामाजिक राजकीय आश्रय लाभलेला होता. पंडित कवींपैकी अनेकांचा व्यवसाय हा पुराणिकाचा होता. त्यामुळे त्यांना रचनेसाठी हवे असलेले सामाजिक, मानसिक स्वास्थ विपुल प्रमाणात लाभले होते. काव्य-शास्त्र पारंगत असा हा पुराणिकांचा वर्ग होता. या पंडिताने काव्याचा अभ्यास केलेला असल्याने काव्यालंकार, काव्यशास्त्र यामध्ये तो पारंगत होता. काव्यात विविध प्रयोग करणे पंडितांना सहज शक्य होते. त्यामुळे त्यांनी आपल्या काव्यात विविध प्रयोग केले.

वेणाबाईंनी लिहिलेल-ा पदामध-े स्वतःचा उल्लेख वेणी असा केला आहे. कधी वेणीस्वामी असाही उल्लेख त-ांनी स्वतःविष-ी केला आहे.

**७.४.२.५. कौल-**

कौल स्फुट काव-ात रामराज-ाचे स्वरुप स्पष्ट केले आहे.

**७.४.३. रामदास पंचक-**

रामदासकालीन असणा--ा ज-ारामस्वामी वडगावकर, रंगनाथस्वामी निगडीकर, केशवस्वामी भागानगरकर, आनंदमूर्ती ब्रहमनाळकर, आणि रामदास -ांना रामदास-पंचक असे म्हटले जाते. त-ांनी पुढीलप्रमाणे रचना केली.

ज-ारामस्वामी वडगावकर -ांनी 'सीतास्व-ंवर', 'रुक्मिणीस्व-ंवर', दशमस्कंध -ा ग्रंथावर भाष-ा, अभंगलेखन केले आहे.

रंगनाथ स्वामी निगडीकर -ांनी 'रामजन्म' 'गजेद्रातोक्ष', 'सुदामचरित्र', 'पंचीकरण' पदे लिहिली आहेत.

आनंदमूर्ती ब्रहमनाळकर -ांनी पदे आणि भूपाळ-ा लिहिल-ा आहेत.

रामदास पंचा-नातील कवींनी वरीलप्रमाणे रचना केली आहे. प्रा. ल. रा. नशिराबादकर -ांनी दासपंचातनमधील कवी रामदासी संप्रदा-ातील नव्हते. रामदास सोडून इतर कवी इतर संप्रदा-ाचे होते. असे म्हटले आहे.

**७.४.४.**

-ाशिवा-ा समर्थ संप्रदा-ातील पुढील कवींनीही काव-लेखन केले आहे. त-ामध-े गिरिधर स्वामींनी 'समर्थप्रताप', भीमस्वामींनी 'भक्तलीलामृत', आत्माराम महाराज एक्केहाळीकर -ांनी 'दासविश्रामधाम', दिनकर गोसावी -ांनी 'स्वानुभव दिनकर' -ा ग्रंथांचे लेखन केले आहे.

आत्माराम महाराज एक्केहाळीकर -ांनी लिहिलेले 'दासविश्रात धाम' हे समर्थचरित्र १६००० ओव्-ांचे असून समर्थ संप्रदा-ाचा विश्वकोश असे -ा ग्रंथाचे वर्णन केले जाते. गुरुभक्ती, गुरु स्मरण -ासाठी -ा ग्रंथाची निर्मिती झाली आहे.

**समारोप**

समर्थ संप्रदा-ातील विविध लेखकांनी पंथाचे आचरण, तत्त्वज्ञान, विचार, देवता -ांना समोर ठेवून विविध प्रकारची रचना केली आहे -ा रचनेत आरत्-ा, स्तोत्रे उपदेशपर टीका भाष्-े, आख्यान पर, कविता लिहिली. रामदासांनी आपल्-ा कवितेला आध्-ात्मिकतेबरोबरच ऐहिकतेचे ही रंग दिले.

**समारोप**

मध्-ा-ुगीन मराठीतील सर्वच वाड्.म-ा पंथ प्रेरणेतून निर्माण झालेले आहे. त्-ामुळे मध्-ा-ुगीन वाड्.म-ावर पंथी-ा, देवता, दृष्टिकोण, आचार संहिता, पंथी-ा संतंमहताच्-ा अवतार कथा -ांना महत्त्व मिळालेले दिसते.

मध्-ा-ुगीन वाड्.म-ासरिता पंथाच्-ा आधारानेच वाहत असल्-ाने तिने आपल्-ाबरोबर पंथी-ा दृष्टिकोन घेतलेले दिसतात. त्-ामुळे वाड्.म-ात वेगवेगळेपणा दिसतो. तरीही सर्वच वाड्.म-ा प्रवाह हिंदुधर्मांतर्गत असल्-ाने त्-ामध्-े समान तत्त्वज्ञान, देवदेवता -ांचा दुवा असल्-ाचे जाणवते.

मध्-ा-ुगीन मराठी वाड्.म-ात ज्-ा अविष्कार पद्धती आलेल्-ा आहेत त्-ा सुद्धा सर्व पंथी-ांच्-ा समानच असल्-ाचे जाणवते.

❖❖❖

घटक क्र. ८

८

# इतर धर्मि-ांनी केलेली रचना

**पाठाची रुपरेषा**

८.१ विष-प्रवेश
८.२ ख्रिस्ती धर्मी-ा कवींचे वाड्.म-ा
८.२.१ फादर स्टीफन्स
८.२.१.२ ख्रिस्त पुराण
८.२.२ फादर क्रुआ
८.२.३ फादर आंतोन सालंदाज
८.३ इस्लाम धर्मी-ा कवीचे वाड्.म-ा
८.३.१ शेख महमंद
८.३.१.१ ग्रंथ संपदा
८.३.१.२ -ोग संग्राम
८.३.२ हुसेन अंबरखान
८.४ जैन धर्मि-ा कवींचे वाड्.म-ा
८.४.१ ब्रहमगुणदास
८.४.१.१श्रेणिकचरित्र
८.४.१.२ रामचंद्र हळदुली
८.४.२ गुणकीर्ति
८.४.२.१ धर्मामृततत्त्वसार
८.४.२.२ रुक्मिणीहरण
८.४.२.३ रामचंद्र फाग
८.४.३ जिनदास
८.४.४ अभ-ाकीर्ति
८.४.५ चिमणपंडित
८.४.६ द-ासागर
८.५. समारोप

## ८.१ विष-ा प्रवेश

परधर्मिय कवी -

मध्-ा-ुगीन मराठी वाड्.म-ा विविध धर्मसंप्रदा-िकांती समृध्द केले आहे. हिंदू धर्मांतर्गत विविध संप्रदा-ा मध्-ा-ुगात आपापले वाड्.म-ीन का-र्ा करीत असताना परधर्मि-ा कवीही मराठी भाषेतून आपली वाड्.म-ीन निर्मिती करण्-ात मग्न होते.

मध्-ा-ुगीन मराठी वाड्.म-ा समृध्द करण्-ात काही परधर्मि-ा कवींनीही महत्त्वपूर्ण -ोगदान केले आहे. असे कवी संख्-ेने कमी असले तरी तत्काळातही मराठी -ा लोकभाषेत रचना करावी ही उर्मी त्-ांच्-ात होती हे महत्त्वाचे आहे.

परधर्मिन कवींनी मराठी भाषेत रचना करण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्या काळात धर्म विचार, धर्म यांचे समाजमनावर असणारे प्राबल्य होय. ख्रिस्ती धर्मिय मिशनरी, इस्लामधर्मिय कवी, जैनधर्मिय आपापल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी रचना करीत होते. ही रचना त्यांना येथील बोलीभाषा मराठीतूनच करणे भाग होते. कारण मध्ययुगीन राज्यकर्ते जरी परधर्मिय, परभाषिक असले तरी बहुसंख्य समाजाची बोलीभाषा मराठीच होती. तसेच तत्कालीन विविध सांप्रदायिक कवींनी बोलीभाषेचाच आग्रह धरलेला होता.

आपला विचार जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहचवायचा असेल तर बोलीभाषेइतके प्रभावी माध्यम तत्कालात परधर्मिय कवींसमोरही नव्हते. त्यामुळे धर्म विचार कोणताही असला तरी तो मराठीतच व्यक्त झाला. त्यामुळे मराठी भाषेत विविध धर्मिय विचारप्रणाली व्यक्त झाल्या. यामध्ये ख्रिस्ती, इस्लाम, जैन यांनी केलेल्या रचना महत्त्वाच्या आहेत. त्यांची माहिती या प्रकरणात करुन घ्यावयाची आहे.

## ८.२ ख्रिस्ती धर्मिय कवींनी केलेली रचना

ख्रिस्ती धर्मिय लोकांचे भारतात आगमन झाल्यानंतर त्यांनी येथील माणसांशी जुळवून घेतले. आपल्या धर्माचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी स्थानिक लोकांच्या लोकभाषेत रचना केली. येथील भाषा, समाज, संस्कृती या सर्वांचा अभ्यास करुन येथील परिवेषात आपल्या धर्माचे तत्त्वज्ञान मांडले यावरुन एक गोष्ट लक्षात येते की, मध्ययुगीन कवींनी जे लेखन केले ते आपल्या धर्माच्या प्रसारासाठी, आपले धर्मविषयक तत्त्वज्ञान आचारविचार, ग्रंथ देवता याविषयी विचार मांडून, त्यासाठीच रचना केल्याचे दिसते.

### ८.२.१ फादर स्टीफन्स

फादर स्टीफन्स हा भारतात आलेला पहिला इंग्रज होय. इ.स.१५७९ मध्ये तो ख्रिस्ती धर्मप्रचारासाठी भारतात आला. चाळीस वर्षे म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत तो गोव्यातच होता. गोव्यात तो विशेष लोकप्रिय होता. पाद्री एस्तेवॉ हे नाव गोव्यातील लोकांनी त्याला दिले होते. त्याचे मराठी कोकणी भाषेवर चांगलेच प्रभुत्व होते. त्याचे कोकणी भाषेवर चांगलेच प्रभुत्व होते. त्याने कोकणी मराठीचे व्याकरण 'Arte Da Lingoa Canarin' लिहिले. हे इंग्रजांनी लिहिलेले कोकणीचे पहिले व्याकरण होय.

फादर स्टीफन्स यांचा 'ख्रिस्तपुराण' हा ग्रंथ प्रसिध्द आहे. त्यांनी ते पुराण प्रथम पोर्तुगीज भाषेत लिहिले. नंतर १६१६ मध्ये मराठी वेष दिला. परंतु त्याने या ग्रंथाला 'ख्रिस्तपुराण' असे नाव दिले नव्हते. फादर मायगेल याने १६४९ मध्ये या ग्रंथाचे 'ख्रिस्तपुराण' असे नामकरण केले. हा ग्रंथ मूलतः रोमन लिपीत रचलेला व छापलेला आहे. नंतर त्याने देवनागरीत रचना केली. देवनागरीतील मूळ प्रत लंडन म्युझियममध्ये सुरक्षित आहे.

'ख्रिस्तपुराणा'ची रचना ओवीवृत्तात आहे. त्यालाच त्याने अभंग असे म्हटले आहे. ओवीसंख्या १०९६२ एवढी असून २५ सर्ग किंवा अवस्वर आहेत. हे पुराण दोन भागात विभागले आहे. त्याच्यावर ज्ञानेश्वरांचा प्रभाव जाणवतो. मराठीचे मोठेपण, महात्म्य वर्णन करताना त्याच्या प्रतिभेला बहर येतो.

तो म्हणतो,

जैसा हरळामाजी रत्नकिळा | की रत्नामाजि हिरा निळा |
तैसी भासामाजी चोखळा || भासा मराठी ||
जैसी पुष्पामाजी पुष्पामाजी पुष्प मोगरी | की परिमळामाजी कस्तुर |
तैसी भासामाजी साजिरी | भासा मराठी ||
पखि-ामध्ये म-ुरु | नृखि-ामध्ये कल्पतरु |
भासामध्ये मानू थोरु | मराठि-ेसी ||

ग्रंथाच्-ा गद्य प्रस्तावनेत सर्वांना उदंड आ-ुष्-ा व परमेश्वराची कृपा भाकून ही तारकाची कथा आपण मराठी भाषेत लिहित असल्-ाचे तो सांगतो, 'ही भास परमेश्वराचेआ वस्तु निरोपुसि -ोग्-ा ऐसी दिसली म्हणून आपण पुराण लिहिण्-ासाठी मराठी भाषा घेतली', असे तो सांगतो. -ा प्रस्तावनेतून सोळाव्-ा शतकातील मराठी गद्याचे स्वरुप लक्षात -ेते. तत्कालीन भाषेचे स्वरुप समजण्-ासही मदत होते.

'ख्रिस्तपुराणा'च्-ा प्रस्तावनेत तो आपल्-ा धर्माबद्दल अभिमानही व्-यक्त करतो. तो म्हणतो, 'जेतुके अंतर उजवडवा अंधारासि, सत्-ा वां लटिकासि वैकुंठा वा मलोकासि, परमेश्वरा व देवचारासि आहे' तितके अंतर आपला ख्रिस्ती धर्म व इतर धर्म -ांच्-ात आहे. -ावरुन त्-ाच्-ा धर्मप्रसाराचे स्वरुप लक्षात -ेते.

'ख्रिस्तपुराणा'तून ख्रिस्तचरित्राला हिंदू मनावर ठसविण्-ासाठी भारती-ा परिवेश दिला आहे. धर्मतत्त्वांना कुठल्-ाही प्रकारे बाध न आणता हा सर्व खटाटोप केला आहे. हे अतिश-ा अवघड काम धर्मप्रसारासाठी केले. त्-ामुळे त्-ाचे कौतुक वाटते. डॉ. तुळपुळे म्हणतात, 'आतील मूर्ती तेवढी -ेशू ख्रिस्ताची व बाकी मंदिराचा सारा थाट हिंदू पध्दतीचा अशी -ा पुराणाची रचना आहे.' स्टीफन्सच्-ा भाषेवर ज्ञानेश्वरीची दाट छा-ा दिसते. म्हणजे केवळ मराठी भाषाच नव्हे तर त्-ा भाषेतील पूर्वसूरीचे ग्रंथही त्-ाने आत्मसात केले होते असे वाटते. ही त्-ाची काव्-यकृती मराठीत अनेक दृष्टींनी अपूर्व आणि कौतुकास्पद आहे.

### ८.२.१. फादर क्रुआ

स्टीफन्सच्-ा ख्रिस्तपुराणाचे अनुकरण करण्-ाच्-ा प्र-ात्न अनेक ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी केला. ख्रिस्ताचे वधस्तंभारोहण हाच विष-ा सामान्-ातः सर्व कवींनी हातळलेला आहे. त्-ामध्ये फादर क्रुआ हा प्रसिध्द आहे. तो १६०२ मध्ये भारतात आला. त्-ाने सेंट पीटरचे महापुराण बारा ते पंधरा हजार ओव्-ांमध्ये रचले आहे. हा ग्रंथ तीन खंडात विभागला आहे. हा ग्रंथारंभ विश्वकर्त्-ाच्-ा नमनाने झाला आहे. -ा ग्रंथात फादर क्रुआने अनेक हिंदू देव देवतांवर प्रखर टीका केली आहे. श्रीरामाला स्त्री घातकी तर विष्णू पापाचारु | सर्वथा नव्हे परमेश्वरु | असा विष्णूवर हल्ला चढविला आहे. परशुरामाला मात्रुघ्न तर कृष्णाला कळीलावा म्हटले आहे. -ावरुन त्-ांच्-ा ग्रंथरचनेचे स्वरुप लक्षात -ेते. आपल्-ा धर्माच्-ा प्रसारासाठीचे त्-ाने लेखन केलेले दिसते.

### ८.२.२. फादर आंतोन सालंदाज

फादर आंतोन सालंदाज -ाने 'सांतू आंतोनीची जिवित्कथा' लिहिली. -ा सर्व ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्-ा काव्-ावर 'ज्ञानेश्वरी' '-ोगवसिष्ठ' व महानुभाव ग्रंथांची छाप पडलेली दिसून -ेते.

मध्-युगीन साहित्-य रचना ही धर्मभावनेच्-या जोपासनेसाठी झाली. आपल्-या धर्माचा प्रसार करावा -या हेतूने ख्रिस्ती मिशन--यांनी मराठीत वाङ्.म-यनिर्मिती केली. ही वाङ्.म-यनिर्मिती करताना परधर्मि-य कवींनीही मराठी बोलीभाषेचा वापर केला. त्-यातून मराठी भाषेचे एक वेगळेच रुप समोर -येते.

-या परधर्मि-य कवींचे स्वधर्मावरील प्रेम दिसते. तसेच आपल्-या हेतूंविष-यी, उद्दिष्टांविष-यी त्-यांनी तडजोड स्वीकारलेली दिसत नाही. आपला धर्मप्रसाराचा हेतू अबाधित ठेवून ते रचना करतांना दिसतात हे विशेष. त्-यामुळे त्-यांच्-या लेखनात पक्षपातीपणा -येणे स्वाभाविक होते. तसा तो आलाही आहे. ख्रिस्ती कवींच्-या काव्-यातून तत्कालीन मराठी भाषा समजण्-यास मदत होते. -या कवींची धर्मप्रसाराची जीवांच्-या उदधाराची तळमळ मात्र लक्षात घेण्-यासारखी आहे.

### ८.३.१. इस्लाम धर्मि-य कवींनी केलेली रचना.

### ८.३.२. शेख महंमद

मराठी संतमंडळात शेख महंमदाला कबीराचा अवतार मानतात. शेख महंमद हे सुप्रसिध्द हिंदू साधू चांद बोधले -यांचे शिष्-य होते. एकनाथाचे गुरु जनार्दन स्वामी व शेख महंमद गुरुबंधू होते. चांद बोधले -यांच्-याकडून शेख महंमदाने दीक्षा घेतल्-याने त्-यांच्-या परमार्थ विचारात हिंदू धर्म व सुफी पंथ -यांचा समन्व-य झालेला दिसतो.

### ८.३.२.१. ग्रंथसंपदा

-योगसंग्राम, पवनविज-य, निष्कलंक प्रबोध, रुपके, भारुडे, हिंदूधर्म कविता

### ८.३.२.२. -योगसंग्राम

'-योगसंग्राम' हा त्-याचा प्रमुख ग्रंथ त्-याची रचना शके १५६७. ओवीसंख्-या २६११, एकूण १७ प्रसंग -या ग्रंथात समन्व-याची भूमिका दिसते.

१) हुरळल्-या मेंढ-या | लांडग्-यापाठी लागल्-या | त्-याने भक्षिल्-या | फाडफाडू ||
२) दुरुनी डोंगर |दिसती शोभिवंत | जवळ गेल्-या आत | कांटवण ||
३) वाडाची साल |पिंपळा लावी जन ||
शेख महंमदाच्-या रचनेतून त्-याच्-या असणारा ज्ञानेश्वरांचा प्रभाव दिसतो.

शेख महंमदाने आपल्-या गुरुचा गौरव केला आहे. विद्यागुरुपेक्षा सदगुरु श्रेष्ठ आहेत. नाममहिमाही तो गातो, तो म्हणतो, अंतरी तत्त्वकळा, वाचा निजनाम ते संत उत्तम धर्मराज

शेख महामंदाच्-या भाषेविष-यी डॉ. रा. चिं. ढेरे लिहितात, 'शेख महंमदाची भाषा विविध संस्कारांनी भरलेली आहे. तिच्-या घडणीत, लोकाभिमुख स्वरुपात लोकसंस्कार आणि संतसंस्कार -यांचा मोठा वाटा आहे.

### ८.३.३. हुसेन अंबरखान

म्लेच्छ कुळात जन्म घेऊनही भगवद्गीतेवर टीका लिहून प्रसिध्द झालेला अंबरखान हा दौलताबादच्-या -याकुबखानचा मुलगा होता त्-यानी बैद्यनाथ नावाच्-या ग्रंथकाराने 'कलि-युगातील

देवाचा अवतार' असे म्हटले आहे. त्याची गीताटीका 'अंबरहुसेनी टीका' या नावाने ओळखली जाते. शके १५७५ ला त्याने हा ग्रंथ पूर्ण केला. त्याची गीताटीका समश्लोकी असल्याने ओव्याची संख्या ८७१ एवढीच आहे. आपल्या टीकेला तो 'गीताभावार्थदीपिका' असे म्हणतो. भाष्य शंकराचार्यांचे आणि व्याख्यान श्रीधर स्वामीचे पाहून त्याने ही टीका रचली आहे.

येथे न लिहिणे अव्यंग्यार्थ |आणि संपूर्ण पदांचा अर्थ |विचारुनि या वाक्यार्थ |तात्पर्यार्थ लिहिजे || अशा प्रकारे तात्पर्यार्थ सांगण्याकडे त्याचा कल दिसतो. त्यामुळे त्यात संपूर्ण विस्तार किंवा पाल्हाळ मुळीच नाही. मूळ संस्कृत शब्दाला नेमका शब्द योजून तो निवेदन करतो. यातून त्याचा संस्कृतचा व्यासंग दिसून येतो. पूर्वसुरींची गीतामध्ये त्याने वाचल्याचे जाणवते.

ग्रंथारंभी गणेश वंदन केले आहे. यातून त्याची समदृष्टीच दिसते. तो म्हणतो, 'भेदाभेदाचा आग्रह उदंड|तोचि विघ्नसमूह प्रचंड|तयाते नाशिता जो वक्रतुंड |तया नमस्कारु||'

या गीताटीकेत संस्कृत श्लोकाचे नेमके भाषांतर करण्याकडे त्याचा कल दिसतो. त्यामुळे दृष्टांत रुपकांचे काव्यसौंदर्य यामध्ये दिसत नाही. परंतु मराठी रचनेचे त्याचे कौशल्य विलक्षण आहे. काही ठिकाणी स्वतःचाही गौरव केला आहे. 'गीतगंगेत पावन झालेला यवन' असे त्याचे वर्णन डॉ. रा. चिं. ढेरे यांनी केले आहे.

## ८.४. जैन धर्मियांचे मराठी काव्यलेखन

मध्ययुगीन कालखंडात इतर धर्मिय कवींप्रमाणेच जैन धर्मिय कवीही मराठीत रचना करीत होते. इ.सनाच्या चौदाव्या शतकापासून जैन कवींच्या काव्यरचनेला प्रारंभ झाला. पुढील जैन धर्मिय कवींनी मराठी वाङ्मयात महत्त्वपूर्ण भर टाकली आहे.

### ८.४.१. ब्रहमगुणदास -

ब्रहमगुणदास हा पहिला जैन ग्रंथकार मानला जातो. ब्रहमजीनदास हा त्याचा गुरु होय. ब्रहमगुणदासाने आपल्या गुरुच्या 'श्रेणीकरास' या ग्रंथाच्या आधारे 'श्रेणिकचरित्र' या ग्रंथाचे लेखन केले.

### ८.४.१.१. श्रेणिक चरित्र

'श्रेणिक चरित्र' हा ग्रंथ ब्रहमजीनदास यांच्या 'श्रणीकरास' या गुजराथी ग्रंथाच्या आधारे लिहिले असून त्यांनाच अर्पण केले आहे.

श्रणिक हा महावीरकालीन मगध देशाचा सम्राट होता. त्याचे चरित्र काव्यमय असून मोठ्या भावमयतेने लिहिले आहे. यातील शब्द आणि वाक्यप्रचार अस्सल मराठी आहेत.

ब्रहमगुणदास या कवीने क्षमागीत, विंचूगीत, गा-हाणे यासारखी पाच, सहा, कडव्यांची छोटी गीतरचनाही केलेली आहे.

**८.४.१.२. 'रामचंद्र हळदुली'** ही ब्रहमगुणदासाने लिहिलेली रचना धवळ-ांसारखी आहे. श्रीराम व सीता -ांना हळद लावत असताना सुवासिनी गा-न करीत आहेत अशी कल्पना करुन ही रचना केली आहे.

### ८.४.२. गुणकीर्ती

गुणकीर्ती -ा जैनधर्मि-न कवीचा गुजराथी साहित्-ाचा मोठा व्-ासंग होता. गुणकीर्तीने पुढीलप्रमाणे रचना केली आहे. धर्मामृततत्त्वसार रुक्मिणीहरण रामचंद्रफाग, गौळणीभास, नेमिनाथ पाळणा, धंदागीत इ. रचना गुणकीर्तीच्-ा नावावर आहेत.

### ८.४.२.१. धर्मामृततत्त्वसार

जैन धर्मतत्त्वाप्रमाणे आदर्श गृहस्थाचे आचरण कसे असावे -ाचे वर्णन -ा ग्रंथात आले आहे.

### ८.४.२.२. रुक्मिणीहरण

ही गुणकीर्तीची ६४ कडव्-ांची रचना आहे. रुक्मिणी विवाह, रुक्मिणीसत्-ाभामाकलह, -ा कथा ग्रंथात आल्-ा आहेत. हे काव्-न गे-न स्वरुपाचे आहे. -ा काव्-ाच्-ा मूळ हस्तलिखितातील १२ ते २१ कडव्-ाप-र्ंतचा कथाभाग आज उपलब्ध नाही.

### ८.४.२.३. रामचंद्र फाग

रामचंद्र फाग ही गुणकीर्तीची छोटीशी रचना आहे. वसंतोत्सवात गा-ल्-ा जाणा--ा समूहगीतास फाग असे म्हणतात. -ा काव्-ातील वर्णन उत्सवपूर्ण आणि आनंदी असे आहे. -ा गीतातील भाषा गुजराथीमिश्रित आहे. वसंतोत्सवातील -ा गीतात गुजरी, तेलंगणी कानडी स्त्रि-ांनी भाग घेतल्-ाचे वर्णन आले आहे.

गुणकीर्तिने नेमिनाथ पाळणा, व नेमिनाथ विवाह अशी दोन आकाराने लहान असलेली काव्-े लिहिली आहेत. नेमिनाथ हे बावीसावे तीर्थकर समजले जातात. त्-ांच्-ाविष-ी लेखकाला जिव्हाळा असल्-ाचे दिसते. त्-ा विशेष जिव्हाळ-ातून -ा दोन छोट-ा रचना जन्मास आल्-ा आहेत.

'धंदागीता'तून गुणकीर्तीने वैराग-ाचा उपदेश केला आहे.

### ८.४.३. जिनदास

जिनदास -ा कवीने 'हरिवंशपुंराण' हे महाकाव्-न लिहिले आहे. श्रीकृष्ण व प्रभू नेमिनाथ -ांचे चरित्र -ा ग्रंथात आले आहे. -ा ग्रंथाचे ६७ अध्-ा-न आहेत. 'हरिवंशरास' -ा गुजराथी ग्रंथाचा आधार जिनदासाने -ा ग्रंथासाठी घेतला आहे.

एकनाथपूर्वकाळात जैन कवींनी वरीलप्रमाणे रचना करुन मराठी वाड्.म-ात महत्त्वपूर्ण भर घातली आहे.

### ८.४.४. अभ-ाकीर्ती

अभ-ाकीर्तीने 'अनंतव्रत कथा' -ा ग्रंथात अनंतचतुदशीस केल्-ा जाणा--ा अनंतव्रताचे महात्म्-न सांगितले आहे.

### ८.४.५. चिमणपंडित

चिमणपंडिताने 'तीर्थक्षेत्र महात्म्य' ब्रह्मपुण्यसागराने 'रविवार कथा', वीरदास ऊर्फ पासकीर्तीने 'सुदर्शनचरित्र' रामापंडिताने 'जंबूस्वामीचरित्र' आणि 'दानशीलतपभावना' हे टाळून जंबूस्वामींनी दीक्षा कशी घेतली याची माहिती आली आहे. 'दानशीलतपभावना' या ग्रंथात दान, शील, तप व भावना यात मोठे कोण? हे संवादरुपाने मांडले आहे. तसेच शुध्द भावाची गरज प्रतिपादन केली आहे.

### ८.४.६. दयासागर

दयासागर या कवीने सम्यकत्वकौमुदी आणि भविष्यदत्तबंधुदत्तपुराण' या दोन ग्रंथाची निर्मिती केली आहे. 'सम्यकत्वकौमुदी' ग्रंथात जैन तत्त्वावर विश्वास दृढ होण्यासाठी कथा सांगितल्या आहेत. या ग्रंथात जैन तत्त्वाप्रमाणे चालणाऱ्याचा विजय होतो हे सांगण्यासाठी भविष्यदत्त व बंधुदत्त यांची कथा सांगितली आहे.

याशिवाय पुढील जैन धर्मिय कवींनीही ग्रंथलेखन केले आहे. विशालकीर्ती, रत्नसा, गंगसा, महिचंद्र, महाकीर्ती ब्रह्मचिंतामणी रामकीर्ती, पुण्यसागर, ददमकीर्ती इ.

❖❖❖

घटक क्र. - ९

# ९

# मध्ययुगीन मराठीतील वाङ्मयप्रकार

मराठीतील रचना प्रकार

१. विषयप्रवेश

१. अभंग

२. आख्यान काव्ये

३. आत्मचरित्रपर लेखन

४. आर्या

५. आरती

६. ओवी

७. ऐतिहासिक पत्रे

८. कथा

९. कहाण्या

१०. गौळणी

११. चरित्रपर लेखन

१२. चंपू काव्य

१३. टीका ग्रंथ

१४. तत्त्वज्ञानपर ग्रंथ

१५. धवळे

१६. धावा

१७. बखर

१८. भारूडे (१८अ) भूपाळी

१९. पदे

२०. पाळणा

२१. पोवाडे

२२. प्रार्थना

२३. फटका

२४. लावणी

२५. विराणी

२६. सुभाषिते

२७. स्थल वर्णनपर लेखन

२८. स्तोत्रे

२९. स्त्री गीते

३०. श्लोक

## विषय प्रवेश

प्राचीन मराठी वाङ्मय प्रारंभापासून विविध प्रकारचे रचनाबंध, रचनाप्रकार घेऊन अवतरले आहे. रचनादृष्ट्या, आशयदृष्ट्या या कालखंडातील वाङ्मय विविध धर्मसंप्रदायाच्या आधाराने वाढलेले, विकसित झालेले दिसते. या वाङ्मयात विविध वाङ्मय प्रकार, रचना प्रकार कालानुक्रमे निर्माण होत गेले आहे. संतांनी लोकसाहित्याचा आधार घेत घेत आपला आध्यात्मिक अनुभव व्यक्त केला. महानुभव कवींनी मराठीचा कैवार घेऊन मराठीत विविध प्रकारची रचना केली. त्यामध्ये चरित्र, सूत्रपाठासारखे तत्त्वज्ञानपर ग्रंथ, दृष्टांत पाठासारखी रचना करून मराठीत गद्य वाङ्मयाचा पाया घातला. पंडित कवींनी संस्कृतचे अनुकरण करीत करीत संस्कृतातील विविध रचनाबंध मराठीत आणले.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या रचनाप्रकारांचा विचार करता एक गोपट लक्षात येते ती अशी की मराठीतील बहुतांश रचना पद्य या रचना प्रकारात आहे. गद्य हे पद्याच्या मानाने कमी आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येईल. पद्य हे पाठांतर सुलभ असते. तत्काळात मुद्रणाची सोय उपलब्ध नसल्याने नकला करण्यास गद्यापेक्षा पद्य सोपे असते. तसेच गद्यापेक्षा पद्यात मोठा आशय आपण व्यक्त करू शकतो. त्यामुळे गद्य वाङ्मय प्रकार, रचनाप्रकार कमी निर्माण झाले आहे. सोपेपणामुळे व गरजेमुळे पद्यातच मोठ्या प्रमाणावर रचना झाली असली तरी कधी कधी गद्यलेखनही दिसते.

मराठी वाङ्मयाच्या काव्याचा विकासात महानुभाव कवींचा फार मोठा हातभार लागला आहे. महानुभाव कवींनी मराठी भाषेचा (लोकभाषा) आग्रह धरला. त्यामुळे त्यांनी विविध टीकाग्रंथ, आरघान कविता, चरित्र, स्थलवर्णनपर लेखन तत्त्वहानपर ग्रंथ, धवळ्यासारखी रचना करून मराठी वाङ्मयात रचनेत विविधता आणली. मराठीतील वारकरी संतांची अभंग, ओवी, भारूड, गौळणी, विराव्या, धावे, चौपद्या, आत्मपर, चरित्रपर रचना केल्या. तसेच आरत्या, पाळणे अशी विविध रचना केली. मराठीतील शाहिरांनी लावणी, पोवाडे, कटाव, फटके अशी रचना केली. वीर, शृंगार, भक्ती, करूण अशा विविध रसांनी युक्त शाहिरी कविता रचनादृष्ट्या विविध रूपे घेताना दिसते.

मराठी वाङ्मयात बखर हा वाङ्मयप्रकार ऐतिहासिक दृष्टिने वेगळेपणा घेणारा आहे, असा वाङ्मय प्रकार आहे. ऐतिहासिक सत्य आणि कलात्मकता यांचा मेळ बखर वाङ्मयात दिसतो. पंडिती कवींनी स्वीकारलेले विविध रचनाबंध संस्कृत वाङ्मयातून स्वीकारले हे उघड आहे. त्यांच्या रचनावर संस्कृत काव्याचा पगडा आहे. त्यांच्या रचनावर संस्कृत काव्याचा पगडा आहे. श्लोक, सुभाषिते, आर्या, चंपूकाव्य, स्तोत्रे, महाकाव्यासारखी आरघान काव्ये यावर संस्कृत करण्याची दाट छाया आहे. संतांनी व शाहिरांनी संस्कृत काव्यातील रचनाप्रकारांचे अनुकरण न करता लोक साहित्याच्या मार्गाने आपल्या वाङ्मय रचना केल्या. त्यामुळे त्यात विविधता आली आणि मराठीपणा जोपासता आला. त्यामुळे मराठी कविता रचना दृष्ट्या समृद्ध झाले हे पुढील रचनाप्रकारांवरून लक्षात येईल.

### १. अभंग

'अभंग' हा मराठी छंद प्रकार आहे. अभंगात अक्षरसंख्या, चरणसंख्या कमी जास्त आढळते. त्यामुळे त्याला अनियमित छंद असेही म्हणतात. यमक रचना हे अभंगाचे लक्षणीय वैशिष्ट्य

होय. यमक दुसऱ्या तिसऱ्या चरणांनी असते. अभंगात परमेश्वरविषयक अनुभूती मांडावी असा संकेत आहे. अभंगातील अनुभव विचारावर दीर्घव लघु अभंगाची चरणसंख्या अवलंबून असते. दीर्घ अभंगाला 'देवद्वार' असे नाव असून तो कमीत कमी चार चरणांचा असतो. 'देवीवर' हा अभंग दोन ओळींचा असतो. अभंगात अक्षरसंख्या ८ अक्षरांपासून ६ ते ४ अक्षरापर्यंत एका चरणात असू शकते. अभंगाला आकृतीबंध (From) म्हणून मान्यता आहे. 'अभंग' या रचनाप्रकाराविषयी श्रीधर रंगनाथ कुलकर्णी लिहितात. ''गेली सात शतके अभंग मराठी वाङ्मयात रूढ आहे. ग्रामीण आणि नागर या समाजाच्या, दोन्ही वर्गाच्या तो परिचयाचा आहे. विशेषतः ग्रामीण जनमाणसावर त्याने सखोल परिणाम केलेला आहे. रचना लवचिक असल्यामुळे तो धावत्या चालीवर गाता येतो. तसाच रागदारीत देखील तो खुलतो. विष्णुदासांप्रमाणेच 'मेणाहून मऊ आणि वज्रापेक्षा कठोर' तो प्रसंगी होऊ शकतो. या प्रकृतीधर्मामुळेच संताच्या सहजोद्गाराचा तो वाहक बनतो. तसाच चरित्र आख्यानांचा प्रपंच देखील तो नेमकेपणाने सांभाळू शकतो.''

अभंग आप्तासारखा जवळचा, मित्राइतका निकटचा वाटावा एवढा जिव्हाळा अभंगाने निर्माण केला आहे. मराठीतील सर्वच संतांनी अभंगरचना केली आहे. उत्स्फूर्त काव्य आणि वेधक संगीत यांना एकत्र गुंफून ठेवण्याची किमया अभंगात आहे. अभंगाची प्रवृत्ती समूहमनाला आवाहन करणारी असते त्यामुळे आत्माविष्कार, भावाविष्कार, भक्तिभावनेचा प्रसार, अशा अनेक गोष्टी अभंगाने साध्य केल्या आहेत.

## २. आख्यान काव्ये

मराठी वाङ्मयात आख्यानकाव्यांची संख्या आणि स्वरूप लक्षात घेण्याइतके महत्त्वाचे आहे. आख्यान काव्य, कथाकाव्य यामध्ये रामायण, महाभारत, भागवतातील एखादी कथा घेऊन काव्यलेखन केलेले असते. आख्यान काव्याची रचना करताना मराठीतील कवींसमोर संस्कृत महाकाव्याचा आदर्श होता. मराठी आख्यान काव्याची परंपरा महानुभाव कवींपासून सुरू झाली. त्याचा उत्कर्ष पंडिती काव्यात झालेला पाहावयास मिळतो.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयात पुढील आख्यान काव्याची निर्मिती झालेली आहे.

नरेंद्र-रूक्मिणीस्वयंवर
दामोदर पंडित - वच्छाहरण
भास्कर कवी - शिशुपालवध
एकनाथ - रुक्मिणी स्वयंवर
नागेश- सीतास्वयंवर
या आख्यानकाव्याप्रमाणेच आणखी काही महाकाव्ये लिहिली गेली आहेत. विविध आख्यानांमधून विविध कथांना महत्त्व मिळाले आहे. आख्यान काव्यात एक मुख्य कथा त्याबरोबर विविध उपकथा आलेल्या दिसतात. भक्ती, शृंगार, वीर, करूण, बीभत्स अशा विविध रसांना आख्यानातून स्थान मिळाले आहे.

## ३. आत्मचरित्रपर लेखन

मराठी वाङ्मयात आत्मचरित्रपर लेखनाची परंपरा संत नामदेवापासून सुरू झालेली. संत नामदेवाच्या अभंगगाथेत आत्मचरित्रपर अभंग आले आहेत. संत जनाबाई, कान्होपात्रा, तुकाराम,

बहिणाबाई इत्यादी संतानी आत्मचरित्रपर लेखन केले आहे. ज्याला आपण 'आत्मचरित्र' म्हणतो असे तंतोतंत आत्मचरित्र असे प्राचीन मराठीतील आत्मचरित्राचे स्वरूप या लेखनाला नसले तरी त्या त्या संताचे चरित्र समजण्यास या लेखनावरून मदत होते. संत नामदेवा, तुकाराम, बहिणाबाई यांच्या चरित्राचा बराचसा भाग त्याच्या अभंगातून व्यक्त झाला आहे.

## ४. आरती

मध्ययुगीन मराठी वाङ्मय प्राधान्याने धर्म व भक्तिप्रधान असल्याने त्या वाङ्मयाची रूपेही धर्माचाराच्या अंगोपांगाशी अथवा उपासनाविधीशी निगडीत आहेत. आरती सर्वच भारतीय वाङ्मयात लोकप्रिय आहे. विशिष्ट आकाराच्या पात्रात तेल, तूप यात भिजविलेले वात पेटवून, कापूर पाजळून देवमूर्तीपुढे ती ज्योत ओवाळत राहणे म्हणजे आरती होय.

देवघरात रोजच्या देवपूजेनंतर केला जाणारा एक विधीं म्हणजे आरती होय. पूजेची सांगता आरतीने होते. साधारपणे आरतीचे पुढील प्रकार पडतात.

देवाला जागवल्यानंतर केली जाणारी काकड आरती.
सुख शयनासाठी केली जाणारी शेजारती
कल्याण, मंगल होण्यासाठी केली जाणारी मंगलारती.
कापूर पाजळून केली जाणारी कापूराती.
इतर पूजांच्या वेळी केली जाणारी आरती.

मराठीत अनेकांनी आरतीचे लेखन केले आहे. संत रामदास यांनी गणपतीची 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही आरती लिहिली. ती सर्वपरिचित आहे.

संत बहिणाबाईच्या अभंगगाथेत पुढील आरत्या आया आहेत. आरती श्रीरामाची, सूर्याची, आत्मारामाची, सद्गुरूची, विठ्ठलाची, तुळशीची, भगवद्गीतेची, श्रीरामाची, श्रीकृष्णाची, श्रीचंद्राची इ. तसेच ज्ञानदेव व निळोबा यांचीही आरती बहिणाबाईने लिहिली आहे. रामाजनार्दन यांची 'आरती ज्ञानराजा' ही ज्ञानेश्वरांची आरती प्रसिद्ध आहे. मुक्तेश्वरांने दत्त भक्तीवर आरत्या लिहिल्या आहेत.

## ५. ओवी

ओवी हा मराठीतील अत्यंत नियमित छंद आहे. या अक्षरसंख्या मोजली जाते. सर्व अक्षरे दीर्घ समजली जातात. प्रत्येक ओवीत चार चरण असतात. पहिल्या तीन चरणात ८ ते १० अक्षरे, चौथ्या चरणात ४ ते ६ अक्षरे अशी रचना असते. ओवीच्या पहिल्या तीन चरणात यमक साधलेले असते. ओवी प्रथम लोकगीतात होती. नंतर ग्रंथात आली. लोकगीतातील ओवी, ग्रांथिक ओवी असेही ओवीचे विभाजन केले जाते. ओवी ही मराठी वाङ्मयाची गंगोत्री मानली जाते. तिच्या गर्भातूनच मराठी साहित्य जन्मास आले, वाढले आणि विस्तारले.

सोमेश्वराने आपल्या शास्त्रग्रंथात ओवीचा वापर केला. 'मानसोल्लास' या ग्रंथात ओवीस छंद व प्रबंध या दोहोंच्या बरोबरीचे स्थान दिले आहे. ओवी काव्यग्रंथात येण्यापूर्वी शास्त्रग्रंथात मिरवली.

ओवी गेय असते. लोकगीतातून ओवीचे पुरातन रूप दिसते. 'लीळाचरित्र' या ग्रंथात ओव्यांचे गायन केल्याचे उल्लेख येतात.

### ६. ऐतिहासिक पत्रे

मराठीत ऐतिहासिक पत्रे मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. या पत्रात थोडक्यात मोठा आशय विविध बारकाव्यांसह समर्थपणे व सफाईदारपणे व्यक्त झालेला आहे. त्यामध्ये तत्कालीन पत्र लेखकांचे कौशल्य व्यक्त झालेले आहे. ही पत्रे मराठी भाषेतील गंधाचे वेगळे वळण स्पष्ट करणारी उदाहरणे होत. या पत्रात संस्कृत फार्शी मिश्रित शब्द रचना, म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर झालेला आहे. तत्कालीन राजदरबारातील दरबारी भारदस्त अभिजात मराठीचे दर्शन या पत्रातून दिसते.

मराठी भाषेतील ऐतिहासिक पत्राचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे कारण ही पत्रे इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. राष्ट्राच्या जीवनात जीवनाचे धागेदोरे गुंतले होते. अशा अनेकाच्या अंतरंगाची स्पंदने या पत्रातून पाहावयास व वाचावयास मिळतात. मध्ययुगीन मराठीतील ऐतिहासिक पत्रव्यवहाराचा विचार करता राजकीय घटनांवर आधारित पत्रे, व्यापारी पत्रे, ऐतिहासिक घटनावरील पत्रे, खाजगी पत्रे असे प्रकार पाडता येतील. यात शिवाजी राजे, पहिले बाजीराव पेशवे, चिमाजी, अप्पा, माधवराव पेशवे यांची पत्रे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहेत.

### ७. कथा

कथा हा रचनाप्रकार, साहित्यप्रकार पुरातन काळापासून मराठीत आढळतो. गद्य हा लेखनाची परंपरा मराठीत कमी आहे. 'पंचतंत्रासारखी' रचना आभावानेच झाली नंतरच्या काळात ती लुप्त झाल्याचे दिसते. पाठांतर सुलभता गेयता, स्मृतिसुलभता, श्रवणसुभगता अशा अनेक कारणांनी ओवी, अभंग या पाकृत छंदातून तसेच दृष्टांत रूपाने कथा प्रकट झाली. या कथा लोकमानसात रूतून बसलेल्या आहेत. धर्मपरंपरा, नानाविध व्रतवैकल्ये, पुराण, कीर्तने यासारखी माध्यमे कथेला अनुरूप ठरली.

कहाण्या, स्फुटथा या मानवी जीवनप्रवाहाबरोबरच चालत आलेल्या आहेत. लोककथा, दैवतकथा, अद्‌भूतरम्य कथा, आध्यात्मतत्त्वशानपर दृष्टांत कथा, प्राणी कथा, धार्मिक गोष्टी, दंतकथा, नीतीकथा, बोधकथा इ. सर्व प्रकारच्या कथा आबाल - वृद्धापर्यंत मानवी जीवनात वावरत असलेल्या दिसून येतात.

### ८. गौळणी

गौळणी एक हा गीतप्रकार आहे. एक किंवा अनेक. यशोदेपाशी आपण कृष्णाच्या खोड्यांनी कसे बेजार झालो आहोत. त्याची तक्रार करीत असताना त्याच्या बद्दलची लडिवाळ ओढ गवळणीतून व्यक्त होत असते. अशी जी रचना तिला गवळण असे म्हणतात. गौळण ही भक्ती प्रकट करणारी रचना असते. संतकाव्यातील गौळणीत परमेश्वर भेटीची ओढ किंवा आध्यात्मिक तत्त्व सांगितलेले असते. कृष्णाच्या प्रेमाने वेड्या झालेल्या गोपींच्या भूमिकेतून रचलेले भक्तिकाव्य म्हणजे गौळणी होय.

उदा. रात्र काळी घागर होय.

देव व भक्त यांच्यातील अद्वैत गौळणीतून व्यक्त होते. राधा - कृष्ण यांच्यातील अद्वैत. उदा. वारियाने कुंडल हाले.

गुरूशिष्य यांच्यातील आकर्षण ही गौळणीतून व्यक्त झाले आहे. थोडक्यात - गौळणीत गोपी कृष्णाचा शृंगार, कृष्णाने केलेल्या गोपींच्या खोड्या, गोपींची यशोदेकडे केलेली तक्रार, कृष्णविरहामुळे गोपींची झालेली करुण अवस्था, राधा कृष्णाचा शृंगार, रासक्रीडा असे अनेक विषय आले आहेत. होनाजीने लिहिलेल्या पंचवीस गौळणी उपलब्ध आहेत. त्याच्या गौळणीतून गोपींच्या मनातील भक्ती, करुण, वात्सल्य इ. भावना व्यक्त झाल्या आहेत.

## ९. चरित्रपर लेखन

प्राचीन मराठी वाङ्मयात चरित्र वाङ्मयाचा प्रवाह प्रारंभकाळापासून असलेला दिसतो. प्राचीन मराठीतील बहुतांशी चरित्रे पद्यातच लिहिलेली आहेत. महानुभाव कवींनी लिहिलेली लीळाचरित्र, गोविंदप्रभूचरित्र ही ही चरित्रे गद्यात आहेत. मराठीत चरित्रकारांचा पहिला मान म्हाईंभटाकडे जातो. पद्यमय चरित्राचाच विचार केला तर तो नामदेवाकडे जातो. पद्यमय चरित्रकार म्हणून नामदेवाला आपण आद्यचरित्रकार म्हणू शकतो.

प्राचीन मराठी वाङ्मयात पंथाचे प्रवक्ते, संस्थापक यांची चरित्रे लिहिली गेली. अशा चरित्रात दंतकथा, दैवी कथा, आख्यायिका यांचा आधार घेतला गेला. म्हाईंभटाने लीळाचरित्र लिहिताना ऐतिहासिक सत्य समोर ठेवून श्रद्धेने चरित्रलेखन केले आहे. प्राचीन कालखंडातील ही चरित्रे ऐतिहासिक सत्याच्या कसोटीवर टिकणारी नाहीत. महानुभाव कवींनी चरित्रपर लेखन केले. संत नामदेवांनी आदी, समाधी, तीर्थावळी या प्रकरणातून ज्ञानेश्वर व इतर भावंडांची चरित्रे लिहिली आहेत. तसेच कबीर, कमाल, मीराबाई, भानुदास, नरसी मेहता यांचे चरित्र लिहिले आहे.

मुक्तेश्वराने एकनाथांचे विठ्ठलाने भानुदास व संत सखूचे चरित्रलेखन केले. संत निळोबा यांनी तुकारामचे, आत्माराम यक्केहक्कीकर, मेरूस्वामी, गिरिधरस्वामी यांना समर्थ रामदासांचे चरित्र लेखन केले. श्रीधराने 'ज्ञानेश्वर चरित्र'. नाभाजी उद्धव चिदघन यांनी काही चरित्राचे लेखन केले आहे. नाभाजीचा 'भक्तमाला' हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. नाभाजीचा शिष्य प्रियादासने 'भक्तमाला' या ग्रंथावर 'भक्तरसबोधिनी' ही टीका लिहिली. मार्तंडबुवांनी 'भक्तिप्रेमामृत' ही टीका प्रियादासांच्या ग्रंथावर लिहिली. उद्धव चिद्घनाने बहिरापिसा, हेमराज, नागनाथ, मृत्युंजय, गोरा कुंभार याची स्फुट चरित्रे लिहिली. दासो दिगंबर या चरित्रकाराने 'संतविजय' हा ग्रंथ लिहिला. महिपतीबुवा ताहराबादकर यांनी सर्वाधिक चरित्रे लिहिली. त्यांची भक्तविनय, संतलीलामृत, भक्तालीलामृत, संतविजय ही चरित्रपर रचना सर्वश्रुत आहे. भीमस्वामी यांनी 'भक्तलीलामृत' हा ग्रंथ लिहिला तर राजाराम प्रसादींनी भक्तमंजिरी या चरित्रपर ग्रंथाची निर्मिती केली. अशा प्रकारे मराठीत अनेकांनी चरित्रपर लेखन केलेले आहे.

## १०. चंपूकाव्य

'चंपू' हा संस्कृत साहित्यातील एक साहित्यप्रकार आहे. त्यामध्ये गद्य-पद्य यांचे मिश्रण असते. मराठीत चंपूकाव्य हा रचनाप्रकार मोठ्या प्रमाणात अवतरला नसला तरी निरंजन माधव यांनी 'सुभद्राचंपू' या नावाचे एक चंपूकाव्य लिहिले आहे. 'सुभद्राचंपू' हा काव्यग्रंथ गद्य-पद्य मिश्रित

असून मराठीतील चंपूकाव्याचे ते एकमेव उदाहरण आहे. निरंजन माधवाने सुभद्राचंपू हे काव्य लिहिले आहे. यात अर्जुन आणि सुभद्रा यांच्या विवाहाची कथा आली आहे. पोवाडा या रचनाप्रकारात परिणाम साधण्यासाठी मधून मधून गद्याचा वापर केला जातो. म्हणजेच पोवाड्याची रचना गद्य-पद्य मिश्रीत अशी असते. त्यामुळेच इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी पोवाड्याला चंपूकाव्य असे म्हटले आहे. 'महिकावतीची बखर' गद्य-पद्य मिश्रित अशी आहे. परंतु उपरोक्त दोन्हींना चंपूकाव्य म्हटले जात नाही.

### ११. टीकाग्रंथ / टीकाभाष्ये

संस्कृत ग्रंथाच्या आधारे तर कधी कधी संस्कृतातील मूळ श्लोक उद्धत करून त्याचा निरूपणात्मक विस्तार टीकाभाष्यात केलेला असतो. गीता, भागवत, योगवसिष्ठ हे टीकाभाष्याचे आधारस्तंभ मानले जातात. मध्ययुगीन मराठी वाङ्मयात खालील टीका भाष्ये प्रसिद्ध व लोकप्रिय आहेत.

| ग्रंथाचे नाव | आधारभूत ग्रंथ | कवी / भाष्यकार |
|---|---|---|
| ज्ञानेश्वरी | भगवद्गीता | ज्ञानेश्वर |
| एकनाथाची | भागवत | एकनाथ |
| गीतार्णव | भगवद्गीता | दासोपंत |
| चमत्कारी टीका | भगवद्गीता | रमावल्लभदास |
| यथार्थटिका | भगवद्गीता | वामन पंडित. |

### १२. तत्त्वज्ञानपर ग्रंथ

मराठीतील बरेचसे वाङ्मय विविध संप्रदायाच्या आधारे निर्माण झालेले आहे. त्यामुळे प्रत्येक संप्रदायातील कवींनी आपापल्या धर्माचे, संप्रदायाचे तत्त्वज्ञान आपल्या ग्रंथांमधून मांडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ, लिंगायत इत्यादी संप्रदायातील लेखकांनी, कवींनी, पंथ प्रचारकांनी आपल्या ग्रंथातून आपापल्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. इस्लाम, ख्रिस्ती, जैन धर्मिय कवींनी आपापल्या धर्मांचे तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी हा टीकाग्रंथ, भाष्यग्रंथ असला तरी भागवत संप्रदाायाचे, धर्माचे तत्त्वज्ञान त्यामधून व्यक्त झाले आहे तिच गोष्ट एकनाथ, दासोपंत, समर्थ रामदास व महानुभाव कवी यांनीही केलेली आहे. 'चांगदेवपासष्टी', 'अमृतानुभव' यासारख्या ग्रंथातून ज्ञानेश्वरांचा चिद्विलासवाद, अद्वैत विचार व्यक्त झाला आहे. महानुभाव संप्रदायातील 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ' या ग्रंथातून महानुभव संप्रदायाचे तत्त्वज्ञान आले आहे. एकनाथ, रामदास यांच्या रचनेतूनही तत्त्वज्ञान आले आहे. फादर स्टीफन्स याने लिहिलेला 'ख्रिस्त पुराण' हा ग्रंथ. ख्रिस्ती तत्त्वज्ञान व त्यासाठी आवश्यक असणारी कथा सांगण्यासाठीच अवतरला आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, प्राचीन, मध्ययुगीन कालखंडातील वाङ्मय हे तत्त्वज्ञानपर आहे. तत्त्वज्ञान हा विषय कळत - नकळतपणे या काळातील ग्रंथातून व्यक्त झालेला आहे. अशा ग्रंथाची नावे पुढील प्रमाणे गोरक्षगीता, ज्ञानेश्वरी गीतार्णव, पदार्णव, दृष्टांतपाठ, सूत्रपाठ, योगसंग्राम, पवनविजय, सिद्धसिद्धांतपद्धती, ज्ञानप्रबोधर (एकादशस्कंध)

**१२. धवळे**

धवळे हा विवाहप्रसंगी गावयाच्या गीतांचा एक प्राचीन रचना प्रकार आहे. धवल म्हणजे विवाहप्रसंगी गायले जाणारे वरविषयक गीत होय. धवल या संस्कृत शब्दावरून 'धवळा', 'ढवळा' हा शब्द आलेला आहे. धवळे लौकिक विवाहप्रसंगी तसेच देवादिकांच्या काल्पनिक विवाहप्रसंगी भक्तांकडून गायले जात असत. प्राचीन काळातील लोकगीतातील धवळे उपलब्ध नसले तरी महदंबा, एकनाथ, दासोपंत, रामदास इ. कवींनी रचलेले धवळे उपलब्ध आहेत. महानुभाव पंथातील पंचकृष्णापैकी एक कृष्ण गोविंद प्रभू यांना विवाहाची इच्छा झाली. तेव्हा विवाहाचा एक सोहळा घडवून आणला. त्याप्रसंगी महदंबेला गोविंद प्रभूंनी धवळे गायला सांगितले. तेव्हा तिने धवळे गायले. या धवळ्यात कृष्ण रूक्मिणीची कथा रचली आहे. महदंबेच्या धवळ्यांची भाषा अतिशय साधी, सुबोध व तात्कालीक बोलीभाषेला जवळची आहे.

**१३. धावा**

प्राचीन मराठी वाङ्मयात धावा ही रचना आढळते. संकटात देवाने आपल्या मदतीसाठी धावून यावे आणि संकटातून आपली मुक्तता करावी. अशी भूमिका (भक्ताची) धावा या रचनेत असते. आर्त भक्ताने व्याकुळ होऊन देवाची, परमेश्वराची केलेली विनवणी हे धाव्याचे स्वरूप असते. धाव्यात आत्मनिवेदनाला महत्त्व असते. आपल्याला संकटातून सोडविणारा दुसरा तिसरा कोणीही नसून तूच आहे, असे भक्त परमेश्वराला सांगत धाव्यात सांगत असतो. धाव्याची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल. 'भक्ताने परमेश्वराला' 'भक्ताने दुःखाने गांजून परमेश्वराला मारलेली हाक किंवा टाहो म्हणजे धावा होय.' उदा. द्रौपदीने वस्त्रहरणप्रसंगी फोडलेला टाहो. धाव्यामध्ये आत्मनिंदा व परमेश्वरस्तुती असते.

**थोडक्यात** - धावा म्हणजे भक्ताने परमेश्वराची केलेली आर्त विनवणी होय. अनन्य भावाने मारलेली हाक, परमेश्वराने संकटातून सोडवावे म्हणून भक्ताने मारलेली हाक किंवा विनवणीचे गीत होय.

**१४. बखर**

'बखर' हा मध्ययुगीन मराठी गद्यवाङ्मयातील महत्त्वाचा रचना प्रकार. बखर गद्य म्हणून ओळखला जाणारा हा वाङ्मय प्रकार तत्कालीन राजकीय घडामोडींना महत्त्व देणारा असा वाङ्मय प्रकार ठरला. मराठीत शिवपूर्व काळातील, शिवकाळातील व पेशवे काळातील अनेक बखरी प्रसिद्ध आहेत. ऐतिहासिक दृष्टीने तसेच वाङ्मयदृष्ट्या बखर वाङ्मय महत्त्वाचे आहे. वाङ्मय व इतिहास यांच्यामध्ये वावरणारा हा वाङ्मयप्रकार खरोखरच अपूर्व असा आहे. मराठी वाङ्मयात पुढील बखरी महत्त्वपूर्ण आहेत. सभासदाची बखर, महिकावतीची बखर, भाऊसाहेबांची बखर, पानिपतची बखर, होळकरांची कैफियत, होळकरांची थैली.

**थोडक्यात**

बखरींचे लेखन गद्यातून असते. तिच्यातून तत्कालीन समाजजीवन, भाषा, चात्रिरिती, राजकारण अशी माहिती मिळते. इतिहास व काव्य यांच्यामध्ये वावरणारा असा हा रचनाप्रकार आहे.

**१५. भारूडे**

भारूडे, भारूड या शब्दाचे विविध अर्थ सांगितले जातात. बहुरूढ ते भारूड, भखाड या धनगर जातीच्या लोकांकडून गायले जाणारे हाडू म्हणजे गीत. भखाडहाडू या शब्दापासून भखाडहाडू-भखाडू-भराडू-भारूड अशी त्याची धुत्पत्ती झाली असावी. भारूड हा लोकगीताचा एक प्रकार आहे. कारण भारूडाचा लोकजीवनाशी जवळचा संबंध आहे. भारूडात लोकसंगीताची ओढ, समाज प्रबोधन, आध्यात्मिक निरूपण यांना महत्त्व असते. संत एकनाथांनी भारूडे समाजात लोकप्रिय केली आहेत. त्यांनी आपल्या भारूडातून समाजातील अनिष्ठरूढी परंपरेवर टिका केली आहे. भारूडाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले आहे. लोकजीवनातील विविध गोष्टींवर संतांनी आध्यात्मिक रूपके रचली. या रूपकातून लोकगीताचे रूप दिसते. भारूडे हा रचनाप्रकार लोककलावंतांनी गाऊन, नाचून नाट्यपूर्ण रितीने सादर करावयाचा असतो. त्यामुळे त्या रचनाबंधाची भाषा रूपकात्मक व खटकेबाज असते.

**१६. पदे**

पद म्हणजे कोणतीही गेय रचना होय. श्लोक किंवा ओवी, अभंग या छंदात नसलेली रचना म्हणजे पद अशी सर्वसाधारण समजूत असते. परंतु पद हा पद्बंध लोकपरंपरेतला नसून नागर आहे. तो लोकपरंपरेवर आधारलेला नसून रागदारी संगीत हा त्याचा आधार आहे. १३व्या शतकात मराठी पदांना प्रतिष्ठा व स्थैर्य प्राप्त झालेले होते. वारकरी व महानुभाव या दोन्हींनी पदनिर्मिती केली. ही निर्मिती निखळ आनंदासाठी झालेली आहे. समर्थांची कितीतरी पदे रागदारीत रचलेली आहेत. काळाच्या ओघातही बरचसे पद्वाङमय टिकून राहिले आहे. दासोपंतांनी पदांची निर्मिती केली आहे. सोहिरोबानाथ आंबिये यांनी पदे लिहिली. त्यांचे हरिभजनाविण काळ घालवू नको रे, हे पद प्रसिद्ध आहे. सोहिरोबानी मराठीत पदे लिहिली तशीच हिंदी व दख्खनी भाषेतही पद रचली.

शिवदिन केसरी यांचे 'भाव धरा रे, आपुलासा देव करा रे' हे पद सर्वश्रुत आहे.

'पाय तुझे गुरूराया माझी देवपूजा' हे पद रागदारीत आहे. श्री. रं. कुलकर्णी लिहितात, 'ज्यांच्या कर्तृत्वामुळे 'पद' हा वाङ्मयप्रकार मराठी साहित्यात भक्कम पायावर उभा राहिला संत नामदेव आणि ज्ञानदेव अभिजात संगीत प्रणालीचे जाणकार होते.' 'गुरूचरित्र' या ग्रंथात श्री व जोगी या रागातील दोन पदे ४१व्या अध्यायात आली आहेत. सतराव्या शतकात समर्थ रामदासाचा पदांनी तर संगीत रचनेचा उच्चांक गाठला होता. दासोपंतांनी सोळाव्या शतकात सव्वा लाख पदांचा 'पदार्णव' हा ग्रंथ लिहिला आहे. बहिणाबाईंच्या अभंगगाथेंत ६९० ते ६९५ क्रमांची पदेच आहेत. अमृतराय पदरचनेसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांनी१००, १५४ पदे लिहिली. मध्वमुनी आपल्या पदरचनेबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यांनी ६६९ इतकी पदे रचली आहेत. 'प्राण्या। तू सुसंगती जोड।। दुर्जनसंगती देईल दुर्गती । दुर्गद दुर्मती सोड।।' हे पद प्रसिद्ध आहे.

**१७. पाळणा**

पाळणा आपल्या अराध्य देवतेच्या गुणाचे पराक्रमाचे वर्णन 'पाळणा' या रचना प्रकारात असते. राम, कृष्ण, विठ्ठल प्रल्हाद यांच्यासारखे अद्वितीय कार्य पराक्रम करणाऱ्या व्यक्तींचे पाळणे लिहिण्याची व गाण्याची प्रथा आहे. विठ्ठल बीडकर यांनी 'जो जो जो जो रे कुलभूषणा ।

दशरथ नंदना' हा पाळणा लिहिला आहे. अनेक शतके हा पाळणा स्त्रिया व कीर्तनकार यांच्या मुखात रूळलेला आहे. जैन धर्मिय कवी चिमाना पंडित गुणकीर्तिने 'नेमिनाथ पाळणा' लिहिला आहे. त्यात नेमिनाथाचा जन्माचे वर्णन आलेले आहे.

**१८. पोवाडे**

पोवाडा हा वाङ्मयप्रकार भारताच्या सर्व भागात सापडतो. परंतु त्याला वेगवेगळ्या भागात वेगवेगळी नावे आहेत. मराठीत पोवाड्याला पवाड, बिरमाल, कडाका या नावांनीही ओळखतात. 'पोवाडा' या शब्दाचा अर्थ स्फूर्तिगान, कीर्तिकाव्य, भाटीव कवन असा आहे. डॉ. रा. चिं. ठेरे यांनी 'पोवाडा' या शब्दाचा अर्थ अद्‌भूत कृत्य, लीला, चमत्कार, विक्रम, ख्याती असा सांगितला आहे. पोवाडा म्हणजे भाटी व कवन असा उल्लेख लीळाचरित्रात आला आहे. पोवाडा म्हणजे ऐतिहासिक विषयावर आधारलेला असतो. ही समजूत अपुऱ्या माहितीवर आधारलेली आहे. पोवाडा ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक विषयावरही असू शकतो. पोवाडा वीरांच्या शौर्यगाथा गुंफणारा काव्यप्रकार असल्याने त्यामध्ये ओजस्वी भाषा, ओजोगुणांची व वीररसाची निर्मिती होणारी शब्द योजना आढळते.

**१९. प्रार्थना**

प्रार्थना सर्व धर्मात संप्रदायात आढळते. परमेश्वरास केलेली आर्त विनवणी म्हणजे प्रार्थना होय. प्रार्थनेत परमेश्वराची स्तुती वेगवेगळ्या प्रकारे आळवणी, त्याच्या रूपाचे, गुणांचे, शक्तीचे, श्रेष्ठपण सांगणारे वर्णन केलेले असते. परमेश्वराकडून इष्टाची प्राप्ती व्हावी. हा हेतू समोर ठेवून प्रार्थनेत विनवणी केलेली असते. अपराध क्षमा-याचना काही प्रार्थनेत असते प्रार्थनेत असाधारण शक्ती बळ, ताकद असते संकटकाळात ती भक्ताला, माणसाला बळ देते. मनाचे संतुलन राखते. प्रार्थनेचे प्रयोजन परमेश्वराचे आशीर्वाद प्राप्त करून घेणे हे असले तरी दुःखाची निवृत्ती व सुखाची प्राप्ती हे हेतूही प्रार्थनेच्या मुळाशी असलेले दिसतात. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत लिहिलेले 'पसायदान' ही प्रार्थनाच आहे.

**२०. फटका**

फटका हा शाहिरी काव्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण असा रचनाप्रकार आहे. त्यात लौकिक जीवनातील विचार परखडपणे मांडलेले असतात. उपदेश करणे हा फटक्यांचा मुख्य उद्देश असतो. निर्भिडपणा हे फटक्याचे वैशिष्ट्य ठरावे. सर्वसामान्य माणसाने आपले जीवन कोणत्या प्रकारे व्यतीत करावे. हे सांगण्याच्या हेतूने फटक्याचा जन्म झाला. फटका जोरकस आवेशपूर्ण भाषेत समाजातील दोषांवर आघात करून सद्‌वर्तन करावे असा उपदेश करतो.

शाहीर अनंत फंदी याने 'फटका' हा शाहिरी रचनाप्रकार लोकप्रिय केला. त्याचे उपदेशपर प्रसिद्ध आहेत.

उदा.

लंडे गुंडे दिरसे तट्‌टू । ह्यांची संगत धरू नको ।
नरदेहाशी येऊन प्राण्या। दुष्ट वासना धरू नको ।।

किंवा

जमाना आला उफराटा । सून सासूला लावी बट्टा ।।
जावई सासूला म्हणतो तू काशी। लवंडून देतो मातेशी ।।
मेहुणीचे चालवी लाड । बहिणीला म्हणे तू रांड ।।

## २१. भूपाळी

भूपाळी म्हणजे पहाटेच्या वेळी सुरम्य वातावरणात गावयाचे गीत होय.
होनाजी बाळा यांची 'घनश्याम सुंदरा श्रीधरा' ही भूपाळी अमर ठरली. होनाजीच्या भूपाळीतून तो संस्कृतचा जाणकार व बहुश्रुत आहे हे स्पष्ट दिसते. ही भूपाळी सोपेपणा सहजता (प्रसादगुण) या बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'अमर भूपाळीत' प्रभातकाळाचे हुबेहुब वातावरण ठसठसशीतपणे उभे केले आहे. त्यामुळे आजही ही भूपाळी रसिकमनात, हृदयात ठसलेली आहे. 'ऊठ झाला प्रातः काळ' ही परशूरामाने लिहिलेली भूपाळी प्रसिद्ध आहे. या भूपाळीत कोमलता व मोहकतेचा प्रत्यय येतो. तसेच शब्दचित्रे सुंदर उतरली आहेत.

## २२. लावणी

लावणी हा शाहिरी काव्यातील महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. लावणी पेशवेकाळात बहरली असली तरी तिच्या पाऊलखुणा संतवाङ्मयात आढळतात. विराव्या, गौळणी, गाथा यात लावणी गीतांच्या पाऊलखुणा आहेत. पेशवे काळात पौराणिक विषय मागे पडले तत्काळात प्रत्यक्ष वावरणारे वीर, सरदार, शिपाईगडी नायक बनले. कृष्ण गोपी यांची जागा विरहव्याकुळ व प्रेमातुर मराठमोळ्या स्त्रीपुरूषांनी घेतली. त्यातून लावणी मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. पेशवाईत असणाऱ्या सर्वच शाहिरांनी लावणी लिहिली. त्यात तत्कालीन समाजजीवनातील शृंगार वर्णन केला गेला आहे. लावणीचा आधार शृंगार वर्णन केला गेला आहे. लावणीचा आधार शृंगार असला तरी तो पराक्रमी, युद्धमग्न वीरांसाठीच आहे.

## २३. विराण्या / विराणी

विराणीमध्ये विरहिणीचा विरह शृंगार असतो. कृष्ण प्रियकर आहे असे समजून भक्त त्याच्या भेटीसाठी आसुलेला असतो. तो भक्त म्हणजे प्रेयसी किंवा विरहिणी होय. देवाच्या भेटीसाठी आसुसलेल्या विरहिणीच्या भावभावना विरहिणीतून व्यक्त होतात. परेमेश्वर भेटीची आर्तता तळमळ बेचैनीचे चित्रण विराण्यातून आढळते. उदा. घणु वाजे घुणघुणा विराव्यात वरवर विरह शृंगार वाटत असला तरी त्यामध्ये आशय आध्यात्माचाच असतो.

## २४. सुभाषिते

सुभाषिते, सुविचार यामध्ये अल्पाक्षर रमणीयत्व. मोठ्या प्रमाणात जाणवते. कमीत कमी शब्दात जास्तीतजास्त आशय सुभाषितात साठविलेला असतो. बोधपर विचार महत्त्वाचा मानून भाषा सौष्ठव व सौंदर्याचा महत्त्व देऊन सुभाषिते लिहिलेली असतात. मार्गदर्शनपर, चपखल उदाहरणाला महत्त्व देऊन आत्मंकारिकतेला महत्त्व देणारी रचना म्हणजे सुभाषिते होय. मध्ययुगीन मराठी वाङ्मयात अशी रचना विविध कवींच्या काव्यात आढळते. सुभाषितामध्ये मोठा आशय सामावलेला असतो. ही सुभाषिते कधी कधी विविध वाङ्मयात विखुरलेली दिसतात. संत, पंडित व शाहिरांच्या रचनांमधून अशी सुभाशित रचना विखुरलेली दिसते. रचना सौंदर्य व आशय सौंदर्यामुळे समाजाने त्यांचे जतन केलेले दिसते. उदा. रघुनाथ पंडिताच्या 'नलदमयंती' स्वयंवर काव्यातील पुढील वाक्याला सुभाषिताचे स्वरूप घेते. 'कठीण समय येता कोण कामास येतो.'

**२५. स्थलवर्णनपर लेखन**

सह्याद्रिवर्णन,

स्थलवर्णनपर स्वरूपाचे महानुभव कवींनी केले आहे. स्थानपोथी, ऋद्धिपूर वर्णन, ऋद्धि पूरमहात्म्य ही महानुभावाची स्थलवर्णन पर ग्रंथनिर्मिती आहे. याशिवाय विविध संत व पंडित कवी, शाहिरांच्या रचनेत स्थलवर्णनपर लेखन आले आहे ते स्वतंत्र नसले तरी त्यामधील स्थलवर्णने लक्ष वेधून घेणारी आहेत.

**२६. स्तोत्रे**

स्तोत्रे हा संस्कृतात असणारा रचना प्रकार प्राचीन मराठी वाङ्मयातही आढळतो. परमात्म्याची प्रशंसा आणि त्याची परोपरीची प्रार्थना या बाबींचा समावेश ज्यात असतो व जो अभंग व पद यांच्या मानाने दीर्घ असते त्या काव्यालाा स्तोत्र असे म्हणतात. ईश्वरस्तवन् हा स्तोत्राचा मुख्य उद्देश असतो. त्यात भक्त ईश्वराच्या थोरवीचे वर्णन करतो. स्वदोषाची कबुली देतो. मनातील दु:ख आशा आकांक्षा, स्वप्ने, मागण्या मोकळ्या मनाने मांडतो. परमेश्वरासमोर उभा राहून त्याच्याशी लीन होतो. स्तोत्रातून ईश्वरभक्तींच प्रकट होते. ईश्वराची शब्दाने केलेली स्तुती स्तोत्रात असते. त्याचबरोबर भक्त हृदयातील भावनांचा निचरा स्तोत्रात झालेला असतो. मराठीत पुढील कवींनी स्तोत्र रचना केलेली आहे.

**२७. मोरोपंत**

खंडोबास्तव, सिद्धेश्वरस्तव, श्रीविश्वेश स्तृती, नामसुधा चषक, श्रीहरिहरस्तव

**२८. श्रीधर**

महिम्नस्तोत्राचे प्राकृत समश्लोकी भाषांतर.

**२९. कृष्णदयार्णव**

मल्लारीस्तवन, भीमाशंकरस्तृती, महेशस्तृती

**३०.निरंजनमाधव**

सांबाशिवावटक, सांबशिवस्तुती ध्यान, श्रीमकारी स्तोत्र महिपती
अपराध निवेदन स्तोत्र, पांडुरंग स्तोत्र

**नागेश**

श्रीशिवस्तुती

**अज्ञानसिद्ध**

संकट हरिणी अशा प्रकारे अनेक कवींनी विविध काळात स्तोत्रांचे लेखन केलेले आहे.

**स्त्री गीते**

मोरोपंतांनी विविध प्रकारची रचना केली त्यामध्ये आपल्या साधेपणाने उठून दिसणारी रचना म्हणजे स्त्री गीते होय. त्यांनी सीतागीत, सावित्रीगीत, रूक्मिणीगीत अशी गीते लिहिली. ही गीते स्त्रीसुलभ भावना, प्रास्तादिकता, साधेपणा यामुळे आकर्षक ठरली.

**श्लोक**

श्लोक हा संस्कृतातील रचनाबंध काही मराठी कवींनी स्वीकारला. निरंजन माधव याने रामकथेवर 'चिद्बोधरामायण' ही रचना केली. ही रचना श्लोकबद्ध आहे.

**समारोप**

मराठी वाङ्मय विविध रचना प्रकारांनी समृद्ध आहे. विषय, आशयापेक्षा रचनावैविध्य हे मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे वैशिष्ट्य ठरावे. मध्ययुगीन मराठी वाङ्मयात पाठांतर सुलभतेमुळे पद्य या रचना स्वरूपात अवतरले. हे खरे असले तरी गद्य वाङ्मय नाहीच असे नाही. बखर, ऐतिहासिक पत्रे, ख्रिस्तपुराण या ग्रंथाची प्रस्तावना, चंपूकाव्य यात गद्य आलेले आहे. गद्याचा प्रवाह पद्याच्या मानाने काहीसा कमी प्रभावी दिसतो.

❖ ❖ ❖

घटक क्र. १०

# १०

# ग्रंथ व ग्रंथकार यांचा परिचय

## (अ)ग्रंथ

१. विवेकसिंधू
२. लीळाचरित्र
३. दृपटांतपाठ
४. नरेंद्रकृत रूक्मिणी
५. सह्याद्रि वर्णन
६. ऋद्धिपूरवर्णन
७. मूर्ति प्रकाश
८. स्थानपोथी
९. ज्ञानेश्वरी
१०. नामदेवाची गाथा
११. एकनाथकृत रूक्मिणी स्वयंवर
१२. भावार्थ रामायण
१३. एकनाथी भागवत
१४. एकनाथी भारूडे
१५. ख्रिस्तपुराण
१६. तुकारामाची अभंगगाथा
१७. दासबोध
१८. मनाचे श्लोक
१९. मुक्तेश्वराचे महाभारत
२०. दमयंती स्वयंवर
२१. सुभद्रा चंपू
२२. मोरोपंताची रामायणे
२३. आर्याभारत
२४. केकावली
२५. भाऊसाहेबाची बखर
२६. आज्ञापत्र

## (ब) ग्रंथकार

१. मुकुंदराज
२. नरेंद्र
३. म्हाईभाट
४. रवळोव्यास
५. महदंबा
६. ज्ञानेश्वर

७. नामदेव
८. मुक्ताबाई
९. सावतामाळी
१०. चोखामेळा
११. जनाबाई
१२. एकनाथ
१३. मुक्तेश्वर
१४. फादर स्टीफन्स
१५. दासोपंत
१६. तुकाराम
१७. रामदास
१८. निरंजन माधव
१९. सामराज
२०. विठ्ठल
२१. तुळशीदास
२२. श्रीधर
२३. महिपती
२४. मध्वमुनिश्वर
२५. सोहिरोबानाथ आंबिये
२६. शेख महंमद
२७. होनाजी
२८. रामजोशी
२९. प्रभाकर

## अ) ग्रंथ

### १. विवेकसिंधू

विवेकसिंधू हा मुकुंदराजांनी लिहिलेला ग्रंथ होय. या ग्रंथाच्या काळाबद्दल विद्वानामध्ये मतभेद आहेत. या ग्रंथाची रचना ओवीवृत्तात आहे. या ग्रंथातील ओघांची संख्या १६७१ आहे. या ग्रंथात मुंकुंदराज यांनी अद्वैत सिद्धांत प्रतिपादन केला आहे. शिव व विष्णू या दोन्ही देवतांना वंदन केले आहे. शिवा व विष्णू या दोन्ही देवतांना वंदन केले आहे. गुरूभक्ती, गुरूशिष्याची लक्षणे, जीव, ब्रह्म, सगुण-निर्गुण, माया, अविद्या, प्रपंच, परमार्थ अशा अनेक विषयांची चर्चा केली आहे.

मुकुंदराजांच्या काळात उपनिषदे, भगवद्गीता यासारखे संस्कृत ग्रंथ लोकांच्या वाचनात येत होते परंतु सर्वसामान्य माणसांना संस्कृत भाषा अवगत नसल्याने हे ग्रंथ सर्व सामान्याच्या उपयोगी पडत नव्हते. म्हणून सर्वसामान्यासाठी प्राकृत भाषेत रचना करणे ही काळाची गरज होती. ही गरज लक्षात घेऊन मुकुंदराज यांनी 'विवेकसिंधू' या ग्रंथाची रचना केली आहे.

'विवेकसिंधू'ची रचना गुरू-शिष्य संवाद रूपाने झालेली आहे. साडेतीन चरणी ओवी या ग्रंथात

वापरली आहे. मराठीतील हा पहिला ग्रंथ असा जरी या ग्रंथाचा लौकिक असला तरी रचना काटेकोर बांधणीची आहे. मराठीच्या आरंभकाळात इतक्या काटेकोर बांधणीचा ग्रंथ निर्माण झाला. त्याबद्दल शंका निर्माण होते. त्यामुळेच त्याच्या काळाबद्दल मतभेद निर्माण झाले. श्री. आजगावकर यांनी म्हटले आहे. ''ग्रंथाच्या काटेकोर बांधणीमुळे मुंकुंदराजास ज्ञानेश्वरोत्तर काळात आणून ठेवण्याची इच्छा प्राप्त प्रबळ होते.''

मुकुंदराजाची 'विवेकसिंधू' या ग्रंथात मराठी भाषेचा अभिमान व्यक्त केला आहे. आपल्या ग्रंथासाठी मराठी भाषेचा स्वीकार करून मराठी भाषिकाबद्दल त्यांनी तळमळ दाखविली आहे. 'विवेकसिंधू'ची भाषा मराठी असली तरी बाळबोध नाही. मराठी भाषेबद्दल त्यांचा आत्मविश्वास व्यक्त झाला आहे. समर्पक उपमा दृष्टांताच्या साहाय्याने विषय सोपा करण्याचा त्यांचा प्रयान आहे. वेदांताचे, अध्यात्माचे विवेचन करताना पंचवीस संस्कृत ग्रंथातील अवतरणे आली आहेत. त्यामुळे भाषा सौंदर्य अभावानेच जाणवते. मुकुंदराजांची भूमिका कवीची नसून ब्रह्म निरूपणकाराची आहे. याविषयी प्रा. अ. ना. देशपांडे लिहितात, ''मुकुंदराजांचा 'विवेकसिंधू' कवितारतीचे विलासन नव्हे तो योगश्वराचा आश्रम आहे.''

'विवेकसिंधू' या ग्रंथात अद्वैत मताचा पुरस्कार केलेला असून अवैदिक मतांचे खंडन केले आहे. योगाचा, सगुणभक्तीचा पुरस्कार केला आहे. योगाचा सगुणभक्तीचा पुरस्कार केला आहे. वेदांत प्रमाण मानावे असे मुकुंदराजांना वाटते. मुकुंदराज म्हणतात.

शांकरोक्तीवरी । मिया बोलिली ही वैखरी ।
म्हणोनि धरावी चतुरी। शास्त्रबुद्धी ।।
उपनिषदाच्या मंथनातून निर्माण झालेले नवनीत म्हणजेच 'विवेकसिंधू' होय. त्यांनी तशी कबुलीच दिलेली आहे.
'भाषा हो मराठी। परि उपनिषदाचीच रहाही ।।'

थोडक्यात -
'विवेकसिंधू' या ग्रंथाची निर्मिती मराठी बोली भाषेत करून मुकुंदराजांनी संस्कृतातील तत्त्वज्ञान मराठीत आणण्याचा केलेला प्रयत्न स्तुत्य मानावा लागतो.

## लीळाचरित्र

लीळाचरित्र हा म्हाईंभटाने लिहिलेल्या महानुभाव संप्रदायातील महत्त्वाचा चरित्र ग्रंथ होय. म्हाईंभट ऊर्फ महिंद्रभट याने चक्रधरांच्या लीळा गोळा केल्या. चक्रधर स्वामींच्या भक्तांना स्मरणभक्ती करण्यासाठी पुढील काळातील भक्तांना मार्गदर्शन होण्यासाठी म्हाईंभटाने नागदेवाचार्यांना पुढील विनंती केली. 'सर्वज्ञाचिया लीळा तुम्ही सांगा आन् मी लिहिन.'

लीळाचरित्र हा ग्रंथ एकांक, पूर्वार्ध, उत्तरार्थ अशा तीन भागात विभागलेला आहे.

चक्रधर अवताराचा स्वीकार, शक्ती स्वीकार, नागांबिकेला प्रेमदान, नामदेवाचार्यांचे अनुसरण, उत्तरपंथे गमन या 'लीळाचरित्रा'तील प्रमुख घटना आहेत.

'लीळाचरित्र' हा मराठीतील पहिला चरित्र ग्रंथ आहे. त्याचे स्वरूप गद्य आहे. त्याची रचना शके १२०० मध्ये झाले असावे असे डॉ. वि. भि. कोलते यांचे मत आहे.

म्हाईंभटाने चक्रधरांच्या लीळा वर्णन करताना त्यांनी सांगितलेले दृष्टांत वचने दिले आहेत. त्या सर्वामधून चक्रधरांचे व्यक्तिमत्त्व, रूपसौंदर्य, निःस्पृहपणा, अहिंसा वैराग्य, यांचे काटेकोरपालन, खेहकर विनोदी प्रवृत्ती यांचे दर्शन घडते. म्हाईंभटाने केलेल्या सर्व लीळांचे निवेदन रसपूर्ण, भावपूर्ण झाले आहे. समकालीन प्रसन्न भाषा अकृत्रिम व अर्थवाही आहे. प्रत्यक्ष चक्रधरांच्या तोंडची वचने दिल्यामुळे जिवंतपणा आला आहे.

चक्रधरांनी तत्कालीन महाराष्ट्रात भ्रमंती केली होती. त्यामुळे तत्कालीन सामाजिक, राजकीय, भौगोलिक परिस्थितीचे प्रतिबिंब 'लीळाचरित्रा'त पडले आहे. बारशे, नुष्टावन, मौजीबंधन, दिवाळी, शिमगा ग्रामस्थाकडून होणारा न्यायनिवाडा, परमार्थाविषयीची आस्था अशा अनेक सामाजिक खुणांच्यानोंदी 'लीळाचरित्रा'त आल्या आहेत.

थोडक्यात - तत्कालीन समाजजीवनाचा सामाजिक सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब 'लीळाचरित्रा'त पडले आहे. तत्कालीन व्रतवैकल्पे, श्रद्धा, समजुनी, रूणवार, वस्त्रप्रावरणे, खाणे - पिणे, उद्योग - घवसाय इ. ची माहिती 'लीळाचरित्रा'तून मिळते.

'लीळाचरित्र' हा आठवणींवर, लीळांवर आधारलेला चरित्रग्रंथ आहे. म्हाईंभटाने चक्रधरस्वामींची एकेक लीळा गोळा करण्यासाठी अपार कष्ट उपसले. खेईंभट या शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन त्याच्या मागेमागे फिरून म्हाईंभटाने त्याच्याकडून चक्रधरांची माहिती गोळा केली. त्यामुळे व्रतस्थ राहून भक्ताच्या कडून लीळा गोळा करणारे म्हाईंभट हे आदर्श मुलाखतकार होते.

'लीळाचरित्रा'तील लीळाचे साधारणपणे पुढील प्रमाणे वर्गीकरण करता येईल. प्रसंगचित्रणात्मक, आत्मनिवेदनात्मक, निवेदनात्मक, दृष्टांत कथारूप, तत्त्वनिरूपणात्मक इ.

लीळाचरित्राचा 'एकांक' व्यक्तिचित्र प्रसंगचित्रण, वातावरण निर्मिती, नाट्यात्मकता, संवेदनाचे प्रकटीकरण, संवाद कौशल्य, भावसौंदय आणि शैलीचे विविध रम्यविष्कार इ. अनेक गुणविशेषांनी नटलेले आहे.

लीळाचरित्रातील भाषेत गद्यकाव्याची अंगभूत लय दिसते. साभिनय कथन हा लीळाचरित्राच्या भाषेचा आणखी एक विशेष सांगता येईल.

## ३. दृष्टांतपाठ

महानुभाव संप्रदायाचे संस्थापक स्वामी चक्रधर यांनी सांगितलेले तत्त्वज्ञान या ग्रंथात केसोबास यांनी दृष्टांतातून मांडले आहे. 'लीळाचरित्र' या ग्रंथातून ११४ दृष्टांत निवडून केसोबासांनी 'दृष्टांतपाठ' हा ग्रंथ तयार केला.

चक्रधरस्वामी आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार समाजातील सर्व लोकामध्ये करण्याचा प्रयत्न करीत त्यावेळी ते आपले विचार सोपे करून सांगत असत. त्यासाठी मधून-मधून दृष्टांताचा वापर

करीत असत. त्यांची भाषा सोपी व वाणी मधूर असल्याने ती लोकांच्या मनाचा ताबडतोब वेध घेई. चक्रधरांचे दृष्टांत लोकजीवनातून निवडलेले असत. त्यामुळे लोकांना ते आपलेच वाटत.

चक्रधरांच्या दृष्टांताचे तीन भाग पडतात. प्रथम चक्रधरोक्त सूत्र, त्यानंतर त्या सूत्रातला विचार किंवा तत्त्व पटविणारा दृष्टांत आणि शेवटी त्या दृष्टांतून त्या सूत्राशी सुसंगत असे काढलेले पारमार्थिक निष्कर्ष म्हणजेच दृष्टांतिक.

दृष्टांतपाठ या ग्रंथातील सूत्र व दृष्टांत चक्रधराचे असून दृष्टांतिक केसोबासांची आहेत. त्याविषयी पुढील प्रमाणे लिहितात.

**सूत्र :** चक्रधर स्वामींचे, त्यात अल्पाक्षर रमणीयत्व आहे. दृष्टांनावरून निरूपण - केसोबास यांनी केले आहे.
दृष्टांत - यामध्ये लोकजीवनातील हकीकत, दाखले, कथा आल्या आहेत.

**दृष्टांतिक -** चर्चा करणारे, संदर्भ पुरविणारे, स्पष्टीकरण देणारे शास्त्रान्वय करणारे दृष्टांतिक आहे.

'दृष्टांत पाठ' हा महानुभव तत्त्वज्ञानाची उभारणी करणारा व्यवस्थापन करणारा ग्रंथ आहे.

यात केसोबासाची भूमिका व्यवस्थापकांची, संपादक अशा सांप्रदायिकाची आहे.

'दृष्टांत पाठा'तील काही सूत्रे वाक्यरूपी, संवादरूपी, आज्ञारूपी आहेत. काही सूत्रे दीर्घरूपी आहे. काही वेळा एकच सूत्र दोन ठिकाणी आले आहे.

'दृष्टांत पाठा'तील सूत्रात, दृष्टांतात उपदेशकाची भूमिका प्रभावी ठरलेली आहे. या ग्रंथातील तत्त्वविचार हा या ग्रंथाचा आत्मा आहे. त्याचा अविष्कार मात्र वाङ्मयीन स्वरूपाचा झालेला आहे.

उषा मा. देशमुख 'दृष्टांत पाठ' या ग्रंथाविषयी लिहितात, 'दृष्टांत पाठ' ही केवळ वाङ्मयीन कलाकृती नाही. तर ती तत्त्वचिंतनपर भाष्य करणारी ललित आणि ललितेतर अशी गद्य कृती ठरते. तिचा जन्म हेतू महानुभाव तत्त्वज्ञानाची व्यवस्था लावण्याचा आहे. त्यामुळे 'दृष्टांत पाठा'तील अनुभव व आशय हा तत्त्वविचारांनी माखलेला आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, 'दृष्टांत पाठ' हा ग्रंथ महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान सांगण्यासाठी, तत्त्वज्ञानाचे व्यवस्थापन करण्यासाठी जन्मास आला आहे.

## रूक्मिणी स्वयंवर

'रूक्मिणी स्वयंवर' हा नरेंद्र कवीचा प्रसिद्ध ग्रंथ होय. नरेंद्रकवी रामदेवराव यादवांच्या दरबारात होता. नरेंद्राने ग्रंथाचे लेखन झाल्यानंतर आपला ग्रंथ रामदेवराव यादव यास दाखविला. त्याला तो ग्रंथ आवडला. नरेंद्राने हा ग्रंथ आपल्या नावावर केला तर 'आपण नरेंद्रास प्रत्येक ओवीस

एक सोनटका देऊ' असे स्पष्ट उत्तर देऊन राजेंद्रास तसे करण्यासाठी नकार दिला.

'रूक्मिणी स्वयंवर'च्या ग्रंथाची रचना संस्कृत महाकाव्याचा आदर्श समोर ठेवून झाली. आज या ग्रंथांच्या ८७९ ओव्या उपलब्ध आहेत. रचना संर्गबद्ध आहे.

'रूक्मिणी स्वयंवरा'त नायक आणि नायिकांचे रूपवर्णन, स्वयंवरास आलेल्या राजांची वर्णने, सूर्योदय सूर्यास्ताची वर्णने, रूक्मिणीची विरहावस्था, द्वारकानगरी व तिच्या दिव्यांचे वर्णन, नगरे, प्रदेश, वने, उपवने इ.ची वर्णने आली आहेत. प्रत्यक्षात स्वयंवराचे वर्णन आलेले नाही. प्रस्तुत ग्रंथात सुदेव ब्राह्मण रूक्मिणीचे पत्र घेऊन द्वारकेपर्यंत येतो. इथपर्यंतचे वर्णन आले आहे.

रूक्मिणीच्या विरहावर्णनात कल्पनारम्यता, भावोत्कहता, प्रीती आणि भक्ती अशा अनेक छटा एकवटल्या आहेत. निसर्गवर्णने, व्यक्तीचित्रणे प्रभावीपणे केली आहेत. ग्रंथात भक्तीचा दुवा कोठेच सुटत नाही. कथेत नसलेले किन्नराचे उपाख्यान आले आहे. किन्नराचे गायनकौशल्य वर्णन केले आहे. त्यातून नरेंद्राचे संगीत, काव्य, शिल्प, स्थापत्य इत्यादीचे ज्ञान दिसून येते.

'रूक्मिणी स्वयंवर' नरेंद्र कवीची वर्णनशैली चित्रमय होताना दिसते.

डावा हात उसिसा घातला । उजवा हृदयावरी ठेविला ।
जसा जीवेसी देवो धरिला । निसटैल म्हणोनि ।।

यातून वर्णनशैली तर व्यक्त होतेच परंतु त्याबरोबरच नरेंद्राचे कृष्णकथेवर असणारे प्रेम दिसते. कृष्णाच्या ठिकाणी आपला 'जीव विनटला' असे नरेंद्र म्हणतो. श्रीकृष्ण कीर्तिचंद्र वर्णिताना 'चढवीत सुखाचा समुद्र' असे तो म्हणतो.

'रूक्मिणी स्वयंवर' या ग्रंथातील कथानिवेदन उत्तम, प्रमाणबद्ध आहे. बहुवर्णन केले तर रसभंग होईल असे नरेंद्रास वाटते.

नरेंद्रकवीने आपला ग्रंथ दरबारी मंडळीसाठी लिहिला. त्यामुळे भक्तिभावनेपेक्षा काव्यानंदाला महत्त्व दिलेले आढळते.

**५. सह्याद्रिवर्णन**

महानुभाव संप्रदायात दत्तात्रेयाला परमेश्वरावर मानले जाते. महानुभाव पंथात अधिकारी व्यक्तीच्या ग्रंथाला, चरित्राला त्याचे नाव न देता त्याचे वास्तव्य जेथे होते किंवा त्याच्या लीळा ज्या परिसरात गाजल्या त्या परिसराचे नाव देण्याची प्रथा आहे.

दत्तात्रेयाचा अवतार सह्याद्री पर्वतात झाला. म्हणून त्यांच्या चरित्रास सह्याद्रिवर्णन असे नाव देण्यात आले आहे. हा ग्रंथ ५१७ ओव्याचा असला तरी दत्तात्रेयाचे मूर्तिवर्णन अवघ्या १०५ ओव्यात आले आहे.

खळोव्यासांनी ग्रंथाच्या सुरूवातीला 'तया श्री चक्रपाणिचेनः वर प्रसादे मी करीन मूर्तिलीळा वर्णन : दत्तात्रेयाचे' असे म्हटले आहे. चक्रधरांच्या प्रस्तादावर कवीचे विशेष लक्ष आहे. पुढे तो म्हणतो, 'जय जय श्री चक्रेश्वर कृपा कारूव्य अवतारा' अशा शब्दांत चक्रधरांना नमन करतो. त्यानंतर पंथातील गुरूपरंपरेला वंदन करतो. आपण स्वतः हिराबिकेचे शिष्य आहेत असे म्हणतो. हा ग्रंथ वितरागी लोकांच्यासाठी लिहिल्याचेही सांगतो. या ग्रंथात चक्रधरांचेही चरित्र आले आहे. चक्रधरांच्या निर्याणामुळे कवीला झालेले दुःख वर्णन केले आहे. दत्तमुर्तीचे वर्णन भावमय, रमणीय असे आहे. दत्तचरित्रासाठी शेवटच्या पंचावन्न ओव्या खर्ची पडल्या आहेत. दत्तात्रेयाची अलर्क, सहस्त्रार्जुन व परसराम यांच्यावर कृपा केल्याची माहिती आली आहे.

दत्तात्रेयाच्या चरित्राच्या निमित्ताने काही स्थानाचे वर्णन कवीने केले आहे. चक्रधर व दत्तत्रेय यांच्या वर्णनातून ईश्वरभक्तीचे महत्त्व वाचकांच्या मनावर ठसविणे हाच लेखकाचा हेतू आहे.

श्रीदत्तात्रेयाचे लीळाचरित्र म्हणजे गुरूभक्तीचा उत्कट अविष्कार होय. या ग्रंथात कवीची भूमिका भक्ताची उपासकाची आहे. कवीची नाही. परमार्गाची आहे. भक्ताची अर्जता यामधून जाणवते.

खळोव्यासांनी ग्रंथाची फलश्रुती पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

ऐसाया ग्रंथ ते जे पाठ करिती । तया भावपूर्वक आईकती ।
ते वाचे मंगलरूप होती । म्हणताच राम ।।

असे प्रकारे सह्याद्रिवर्णन या ग्रंथाचे वाचन केल्यास त्या ग्रंथाचे श्रवण केल्यास त्यांचा लाभ होईल अशी फलश्रुती

## ६. ऋद्धिपूर वर्णन

ऋद्धिपूर या क्षेत्री महानुभाव संप्रदायातील महनीय, आदरणीय व्यक्ती गोविंदप्रभू यांचे वास्तव्य होते. त्यामुळे महानुभाव संप्रदायात ऋद्धिपूर या स्थानाला तीर्थक्षेत्राचे महत्त्व प्राप्त झाले आहे. गोविंदप्रभू व चक्रधरांच्या पदरचर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. नारो व्यास स्वतः महानुभाव असल्याने महानुभावांना या क्षेत्राबद्दल वाटणारा परामभाव माहीत होता. त्यामुळे या ग्रंथात ऋद्धिपूरबद्दलचा पूज्यभाव व्यक्त झाला आहे. महानुभाव पंथाबद्दल नारोबास बहाळिये यांनी आदरभाव व्यक्त केला आहे. पंथाची तत्त्वप्रणाली सांगितली आहे.

पंढरपूर क्षेत्र पाहताच दिसताच वारकऱ्यांची जी स्थिती होते तिच स्थिती 'ऋद्धिपूर दिसताच लेखकाची, एका भाविक यात्रेकरूची झालेली आहे. गोविंदप्रभू व चक्रधर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले हे क्षेत्र दिसताच, लेखकाने यात्रेकरूने लोटांगण घातले. या क्षेत्रातील पक्षीगण, मंदिरे, शिखरे, तलाव, पुष्करणी, रायांगण, राजमठ, मंदिरांचे स्तंभ, ओटा, भोजनस्थान, महानुभाव संत इ.चे हृदय म. वर्णन त्याने केले आहे.'

भाविक यात्रेकरू श्रीमूर्तीचे प्रत्यक्ष दर्शन झाल्यानंतर 'अवलोकिता श्रीमूर्ती : न लगती नेत्राची पाती, ते जैसे डोळे वाट दाखविती : परमसुखाची, असा विलक्षण सुखाचा अनुभव लाभ होतो.'

अत्यंत साधी भाषा, भवनांचा प्रबळ ओघ यामुळे सारेच काव्य वेधवती झाले आहे.

गोविंद प्रभूंच्या जीवनातील सर्व चमत्कार कथा या ग्रंथात आल्या आहेत. त्यांचे बोलणे, चालणे, वागणे स्वभाव चित्रिण केला आहे. नारोव्यासांच्या गुरूभक्तीच्या ओलाव्याने ओथंबलेला असा हा ग्रंथ आहे. त्यामधून त्याची उच्च आध्यात्मिक योग्यता प्रतिबिंबीत झाली आहे. भाषा अत्यंत साधी विचारांचा आणि भावनांचा प्रबळ वेग, ओघ म्हणी आणि सुभाषिते यांचा वापर यामुळे ग्रंथ रसभरीत झाला आहे.

ऋद्धिपूर वर्णन हा ग्रंथ ऐतिहासिक व सामाजिक दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा आहे. या ग्रंथात अमरावती जिल्ह्यातील अनेक गावांचे उल्लेख आले आहेत. वऱ्हाडी भाषेचे स्वरूप या ग्रंथावरून समजते. तत्कालीन लोकविचार, रूढी, क्षण, समारंभ, व्रतवैकल्पे, स्पृशास्पृश्यभाव यांचेही ज्ञान या ग्रंथावरून होते.

'ऋद्धिपूर वर्णन' या ग्रंथाबद्दल प्रा. ल. रा. नसिराबादकर लिहितात, ''भाषेची प्रास्ताविकता, रसाळपणा हे या ग्रंथाचे खास वैशिष्ट्ये आहे. या ग्रंथात कवीने मराठी भाषेबद्दल गौरवाचे उदगार काढले आहेत. तत्कालीन स्थितीचे दर्शनही या ग्रंथातून घडते. स्थलवर्णनपर असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. प्रत्येक स्थलाशी कवीचे जिव्हाळ्याचे श्रद्धेचे, आत्मप्रत्ययाचे व उत्कटतेचे दुवे जोडलेले असल्याने साती ग्रंथात 'ऋद्धिपूर वर्णना'चे स्थान काव्यगुणदृष्ट्या स्वतंत्र व महत्त्वपूर्ण आहे.''

'ऋद्धिपूर वर्णन' या ग्रंथाचे नामकरण 'गोविंदप्रभूचरित्र' असे नामकारण डॉ. वि. भि. कोलते यांनी केले आहे.

## ७. मूर्तिप्रकाश

'मूर्तिप्रकाश' हा ग्रंथ केशीराज बास यांनी लिहिला आहे. केशीराजबास यांना बालपणापासूनच चक्रधरस्वामी यांचा सहवास लाभला होता. त्याच्या 'मूर्तिप्रकाश' या ग्रंथाची रचना शके १२११ मध्ये झाली.

'मूर्तिप्रकाश' या ग्रंथनिर्मितीचे प्रयोजन चक्रधर चरित्र वर्णन करणे, संसारी व्यक्तींना भक्तीची शिकवण देणे, असे दुहेरी आहे.

'मूर्तिप्रकाश' या ग्रंथात लेखकाने चक्रधर स्वामींवर आपली निष्ठा व्यक्त केली आहे. आपल्या कवित्वाविषयी गौरवोद्गार काढले आहेत. या ग्रंथात श्री. चक्रधर मूर्तीचे वर्णन केले आहे चक्रधरांचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. चक्रधर मूर्तीचे वर्णन करणे केवळ निमित्तमात्र आहे. चक्रधरांचे तत्त्वज्ञान सांगणे हाच प्रधान हेतू केशीराजबास यांचा या ग्रंथात आहे. त्यामुळे अतिशयोक्तीवर लेखनही झाले आहे.

'मूर्तिप्रकाश' हा ग्रंथ वाङ्मयीन दृष्टीने रसाळ आहे. मोहक शैली, कोमल शब्दरचना, मनोहर दृष्टांत, ही या ग्रंथाची वैशिष्ट्ये ठरतात. आपली कविता ब्रह्मविद्येची कसवटी, ज्ञानरत्नांची पेटी असल्याचे लेखकाने सांगितले आहे. ज्ञानेश्वरीच्या पूर्वी एक वर्ष या ग्रंथाची निर्मिती झाली आहे.

केसोबासांचा हा ग्रंथ वाचीत असताना त्याच्या ओवीची शैली, शब्दांची कोवळिक, अर्थघनता, दृष्टांतातील सौंदर्य यातून ज्ञानेश्वरांची आठवण येते.

### ८. स्थानपोथी

'स्थानपोथी' या ग्रंथाची रचना शके १२३१ मध्ये झाली आहे. 'स्थानपोथी'त गोविंदप्रभू आणि चक्रधर स्वामी यांच्या स्पर्शाने, वास्तव्याने पावन झालेल्या अनेक स्थळांचे वर्णन आले आहे. म्हणून या ग्रंथाचे नामकरण 'स्थानपोथी' असे करण्यात आले आहे. या ग्रंथात पंथीय दृष्टिकोनातून भौगोलिक व धार्मिक माहिती मिळते. ११९ गावे व १५३ देवतांची नावे या ग्रंथात आली आहे.

## ९. ज्ञानेश्वरी

'ज्ञानेश्वरी' हा संत ज्ञानेश्वरांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. हा ग्रंथ 'ज्ञानेश्वरी' या नावाने ओळखला जात असला तरी ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' असे नाव या ग्रंथाला दिलेले नाही. 'भावार्थदीपिका' हे 'ज्ञानेश्वरी'चे आणखी एक नाव होय. ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथाला 'देशीकार लेणे' असे संबोधले आहे.

'ज्ञानेश्वरी' ही भगवद्गीतेवर लिहिलेली टीका होय. या टीकाग्रंथात सुमारे ९००० ओव्या आहेत. भगवद्गीतेतील ७०० श्लोकांवर ज्ञानेश्वरांनी केलेले भाष्य म्हणजे 'ज्ञानेश्वरी' होय. या ग्रंथात भगवद् गीतेतील तत्त्वज्ञान उपमा - दृष्टांताच्या आधारे सुलभतेने सांगितले आहे. आध्यात्मिक विषयाचे काव्यमय विवेचन या दृष्टीने हा ग्रंथ लोकोत्तर मानावा लागेल. ज्ञानेश्वरीत काव्य आणि तत्त्वाज्ञान यांचा सुंदर मिलाफ झालेला आहे. कोणत्याही भाषेत असा ग्रंथ उपलब्ध नाही. भगवदगीतेवर आत्तापर्यंत अनेक टीकाग्रंथ निर्माण झाले. परंतु या सर्व टीकांमध्ये लोकप्रिय असणारी टीका म्हणजे 'ज्ञानेश्वरी' होय.

संत ज्ञानेश्वरांचा काळ हा रामदेव यादवाचा काळ होय. या काळात सर्व वर्णातील समाज कर्तव्यापासून दूर गेलेला होता. यज्ञयाग, व्रतवैकल्पे या पुरताच धर्माचा अर्थ लावला जात होता. समाजाला खरा धर्म सांगावा. खरे धर्मज्ञान सांगून समाज कर्तव्यमुख करावा या हेतूने ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'चे लेखन केले. थोडक्यात असे म्हणता येईल की, गीतेचा जन्म स्वधर्मापासून दूर जाऊ पाहणाऱ्या, खरा धर्म न समजणाऱ्या, योग्या-योग्यतेचा विचार न सुचणाऱ्या, कर्तव्यापासून दूर जाऊ पाहणाऱ्या संभ्रमित अर्जुनासाठी झाला होता. तद्वतच 'ज्ञानेश्वरी'कालीन समाजातील हजारो अर्जुन आपल्या कर्तव्यापासून दूर झालेले होते त्यांना कर्तव्यसन्मुख करण्यासाठी खरे ज्ञान सांगण्यासाठी 'ज्ञानेश्वरी'चा प्रपंच केला.

म्हणौनि मार्गाधारे वर्तावे । विश्व हे मोहरे लावावे ।
अलौकिक नोहावे । लोकांप्रती ।। हेच ज्ञानेश्वरीचे प्रयोजन होते.

ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'त गीतेवर भाष्य केलेल्या पूर्वसुरींबद्दल आदरभाव व्यक्त केला आहे. शंकराचार्य, रामानुजाचार्य, व्यास यांच्याविषयी आदरभाव व्यक्त करताना ज्ञानेश्वर म्हणतात,
'तैसा व्यासांचा मागावा घेतु । भाष्यकाराने वाट पुसतु ।।'

यातून ज्ञानेश्वरांजवळ असणारा नम्र भाव दिसतो. जेव्हा ज्ञानेश्वरांनी बोलीभाषेतून 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ लिहिला तेव्हा संस्कृत भाषेला ज्ञानभाषेचे राजभाषेचे, शानभाषेचे, ज्ञानभाषेचे स्थान होते. यावरून ज्ञानेश्वर ज्ञानभाषेइतकेच लोकभाषेचेही अभिमानी होते. त्यामुळेच 'ज्ञानेश्वरी'त जागोजागी मराठी भाषेविषयी अभिमान व्यक्त होताना दिसतो.

'माझा मऱ्हाटीची बोलू कौतुके । परि अमृतातेही पैजा जिंके ।।
ऐसी अक्षरे रसिके मेळविन' यातून ज्ञानेश्वरांचा भाषाभिमानच व्यक्त होतो.

ज्ञानेश्वरीत अर्जुन - श्रीकृष्ण, धृतराष्ट्र - संजय, ज्ञानेश्वर - श्रोते, ज्ञानेश्वर निवृत्तीनाथ असे संवाद आले आहेत. श्रोत्याशी संवाद साधताना त्यांचा लडिवाळपणा, विनम्र भाव व्यक्त होतो. ते श्रोत्यांना मात, पिता, परीस असे संबोधतात तर स्वतःला लेकरू, बालक, लोखंड म्हणवून घेतात.

'ज्ञानेश्वरी'च्या १८ अध्यायापैकी १३ अध्यायाच्या प्रारंभी नमने आली आहेत. या नमनातून गुरू, देवता यांना वंदन केले आहे. पहिल्या अध्यायात ओकाररूपी गणपतीस वंदन केल्यानंतर पुढील अध्यायातील नमनाचा रोख निवृत्तीनाथावरच आहे.

'ज्ञानेश्वरी'त मुख्य सिद्धांत अद्वैतचाच आहे. सर्वत्र एकच आत्मतत्त्व भरून राहिले आहे. 'अहं ब्रह्मास्मि' मीच ब्रह्म माझ्याखेरीज दुसरे काहीही वेगळे नाही. आत्मतत्त्व म्हणजे दुसरे काही नसून मीच आहे असा भाव किंवा अवस्था निर्माण होणे म्हणजेच अद्वैतावस्था होय. अशी अवस्था निर्माण झाली असता ज्ञाता होय, भक्त-भगवंत, आत्मा-परमात्मा असे द्वैत मुरत नाही. 'ज्ञानेश्वरां'नी अद्वैतभक्तीचा पुरस्कार 'ज्ञानेश्वरी'त केला आहे.

'ज्ञानेश्वरी' हे काव्य व तत्त्वज्ञान अशा दोन भिन्न रंगाच्या उभ्या आडव्या धाग्यांनी विणलेले वस्त्र आहे. या ग्रंथात अनेक अहंकार आले आहेत. 'ज्ञानेश्वरी'तील ओवी साडेतीन चरणाची आहे. उपमा, अनुप्रास, दृष्टांत अशा अलंकाराचा मुक्त वापर 'ज्ञानेश्वरी'त आहे वारकरी संप्रदायात 'ज्ञानेश्वरी'चे स्थान अनन्यसाधारण असे आहे. काव्य, तत्त्वज्ञान या दोन्ही दृष्टीने 'ज्ञानेश्वरी' महत्त्व अनेक शतके मान्य झालेले आहे.

## १०. नामदेवाची गाथा

संत नामदेवाच्या अभंगनाथात प्रसिद्ध असून तिच्यात जवळ जवळ तीन हजार अभंग आहेत. त्यांच्या अभंगवाणीतून भक्त नामदेवांच्या वाटचालीचे विविध अनुभव उत्कटतेने प्रकट झालेले दिसून येतात. शिवाय ज्ञानदेवादी भावडाची चरित्रे, आत्मचरित्र, व्यक्तिचित्रे, लोक कविता, प्रवासवर्णन कूट रचना, आख्यानकविता इ. वाङ्मय प्रक्तरांनीही त्यांचे अभंग समृद्ध आहेत. संत नामदेवाची रचना फक्त मराठीतच आहे असे नाही तर हिंदी व पंजाबी भाषेतही आहे.

नामदेवाच्या गाभेत मंगलाचरणाचे जे अभंग आहेत. त्यामध्ये सरस्वती, गणेश, देव, ब्राह्मण, सज्जन इ.ना वंदन केले आहे. तसेच कोणत्याही देवतेला वंदन केले तरी ते विष्णूलाच पोहचते असे म्हटले आहे.

नामदेवांनी श्रीकृष्णाच्या बालक्रीडेचे अभंग लिहिले आहेत. शैशव, बाल व किशोरावस्थेतील क्रीडावर्णन केल्या आहेत.

नामदेवांनी कृष्णकथेप्रमाणेच रामकथा गायली त्यातून नामदेवाच्या रसाळ आणि चित्तमय शैलीचे दर्शन घडते.

विठ्ठल हे संत नामदेवाचे अराध्य दैवत. त्याचे महात्म्य त्यांनी वर्णन केले आहे. विठ्ठल त्यांना कधी निर्गुण, निराकार रूपात दिसतो, कधी कृष्णरूपात जाणवतो. तर कधी तो माता, पिता, बंधू, भागिनी, गुरू इ. रूपात दिसतो. विठ्ठलाशिवाय नामदेवाला क्षणभरही चैक पडत नाही.

ईश्वरांची, विठ्ठलसी चरणसेव जन्मोजन्मी घडत राहवी अशी नामदेवांची मागणी आहे. ते म्हणतात, 'हेच मागतसे तुज । जन्म देई मज । सुखे करोनि राहेन । तुझे चरण पाहीन ।।'

नामदेवांना जीवनात दुसरे तिसरे काही नको आहे ते पुढील गोष्टींवर संतुष्ट आहेत. 'पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणि दर्शन विठ्ठलाचे ।।'

विठ्ठल नाम संकीर्तनामध्ये नामदेवांना फार गोडी आहे. या गोडीमुळे नामदेवांना मोक्ष सुखाची पर्वा नाही. ते म्हणतात,
'सांडुनी पंढरीची वारी । मोक्ष मागती ते भिकारी ।।'
सत्संग व नामस्मरणाचे सुख यांची अवीट गोडी त्यांनी अनुभवली. तिच्यापुढे त्यांना मुक्तीपदही फिके वाटते. भक्तिसुखासाठी कोटी कोटी गर्भवासही घ्यायला ते तयार आहेत. ईश्वराविषयी आर्तप्रेम, करूणा, मनाची तगमग इ. भावनानी नामदेवाची वाणी आर्द्र बनली आहे. साध्या सरळ शब्दांनी नामदेव विठ्ठलाला साद घालतात. तेव्हा ऐकणाराचे हृदय पाझरते.

'देवा परदेशी झालो तुजविण। माझे समाधान कोण करी ।।
चातक चकोरापरी पाहे वास । तू का हो उदास पांडुरंग ।।'
असे म्हणतच नामदेव पांडुरंगासमोर आपले दुःख व्यक्त करतो. कधी ते लडिवाळ होऊन परमेश्वराला प्रश्न विचारतात.

विठ्ठल माऊली कृपेचे कोवळी । आठविता घाली प्रेम पान्हा ।।
असे असताना 'मज का मोकलिले कवणा निखले । कठिण कैसे झाले हृदय तुझे ।।' असा जाव ते विठ्ठलाला विचारतात.

''संत नामदेवांची सर्वच अभंगरचना मनाच्या अत्यंत तळमळीतून केलेली आहे. त्यांची रचना अत्यंत सुबोध आणि प्रास्तादिक असून त्यातून त्याच्या मनाची आर्तता घाकुळता अत्यंत जिव्हाळ्याने व्यक्त झाली आहे. भक्तीचे आणि कारूण्याचे मिश्रण त्यांच्या अभंगात ठिकठिकाणी इतके सुंदर झाले आहे की, ते वाचताना कंठ गदगदून येतो.'' असे अत्रे यांनी म्हटले आहे. ते योग्यच आहे.

संत नामदेवाच्या अभंगात विठ्ठलभक्तीची आर्तता, उत्कटता, आत्मसमर्पणाची ओढ व्यक्त झालेली आहे. त्यांच्या भावकोमल, भावमधूर अशा काव्यामुळे भावकवितेचे एक नवे दालनच मराठी काव्यात निर्माण झाले.

संत नामदेवांनी आदी समाधी, तीर्थवळी या तीन प्रकरणातून समकालीन संताची चरित्रे वर्णन केली आहेत. तर आत्मचरित्रपर अभंगातून त्यांचे आत्मचरित्र व्यक्त झाले आहे. संत नामदेवाची हिंदी रचना प्रसिद्ध आहे. त्यांच्या अभंगाविषयी प्रा. ह. श्री. शेणोलीकर लिहितात, ''त्यांच्या शब्दाशब्दात विठ्ठल प्रीतीची आर्तता, उत्कटता दिसून येते. आत्मसमर्पणाची असीम ओढ व्यक्त होते. संसारिक जीवनाबद्दल तीव्र अनुताप आणि आत्मविक्तसाची उत्कटता प्रकट होते. वृत्तीचा कडवटपणा किंवा तुकोबाप्रमाणे शब्दाचा तिखटपणा त्यांच्या अभंगात कुठेही आढळत नाही. त्यांच्या भावकोमल व भावमधूर अशा आत्मनिष्ठ काव्यरचनेमुळे मराठी साहित्यात भावकवितेचे नवे दालन उघडले जाऊन महाराष्ट्र शारदेला भावसंपन्नतेचे अलौकिक ऐश्वर्य लाभलेले आहे.''

## ११. एकनाथकृत रूक्मिणी स्वयंवर

संत एकनाथांचे काशी येथे वास्तव्य असताना मणिकर्णिला घाटावर रामनवमीच्या मुहूर्तावर 'रूक्मिणी स्वयंवर' या ग्रंथाचे लेखन संपन्न झाले. एकनाथाच्या 'रूक्मिणी स्वयंवर' या ग्रंथाची कथा भागवतातील आहे. भागवतातील १४४ श्लोकांवर नाथांनी १७१२ ओव्याची रचना केली. या ग्रंथात १८ अध्याय आहेत. 'रूक्मिणी स्वयंवर'च्या मूळ कथानकाला नाथांनी आध्यात्मिक रूपक बनविले आहे. कृष्ण-रूक्मिणी यांचा विवाह म्हणजे जीवाशिवाचे मीलन आहे. तशीच एकनाथांची श्रद्धा दिसते.

या ग्रंथातील पहिल्या सात अध्यायात रूक्मिणीहरणाची कथा, पुढील सहा अध्यायात युद्धवर्णने, शेवटच्या पाच अध्यायात कृष्ण-रूक्मिणी यांच्या विवाह समारंभाचे वर्णन आले आहे.

या ग्रंथात रूक्मिणीने केलेली कृष्णाची निंदा, तिची विरहावस्था, कृष्ण- रूक्मीणी युद्ध, रूक्मिणीची फजिती, कृष्ण-रूक्मिणीचा विवाह समारंभ इ.ची वर्णने आली आहेत.

एकनाथकालीन विवाह सोहळ्याचे सविस्तर वर्णन या स्वयंवर काव्यात आले आहे. त्यामुळे सोळाव्या शतकातील महाराष्ट्र संस्कृतीचे प्रतिबिंब या ग्रंथात पाहवयास मिळते. विवाह विषयक चालिरितीत रूखवत, सप्तपदी, कंकणबंधन, वरांती समोर कुळवंतीणींचा नाच, दारूकाम इ. चे उल्लेख आले आहेत. वाङ्मयाभिरूचीच्या दृष्टीने हा दोष ठरत असला तरी नाथांनी तत्कालीन समाजातील चालिरिती सांगितल्या आहेत.

एकनाथांनी 'रूक्मिणी स्वयंवर' या ग्रंथाचा प्रारंभी ग्रंथाची फलश्रुती सांगितली आहे. ती पुढीलप्रमाणे,
येथे भीमकीचे पुरले आर्थ । तो हा आदरे वाचता ग्रंथ ।
श्रोते यांचे मनोरथा कृष्ण समर्थ पुरविल ।। अशी फलश्रुती सांगून वाचकांना ग्रंथ वाचण्यास प्रवृत्त केले आहे.

'रूक्मिणी स्वयंवर' काव्यात आलेली युद्धवर्णने सांकेतिक नसून त्यामध्ये नाथांचा युद्धकलेचा अभ्यास व सूक्ष्म निरीक्षण, अनुभव दिसतो. युद्धवर्णने जिवंत व प्रत्ययकारी वाटतात. त्यातील व्यक्ती आपापल्या स्वभावानुसार वेगळेपणा दाखविणाऱ्या, तर प्रसंग नाट्यात्मक व आकर्षण बनलेले आहेत. रूक्मिणी व कृष्ण यासारख्या व्यक्ती लौकिक आणि अलौकिक अशा दोन्ही स्तरावर वावरताना दिसतात. त्यामुळे अनेक ठिकाणी विक्षेप होऊन रसभंग होतो. भक्ती आणि स्त्री यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न नाथांनी काव्यात केलेला आहे.

एकनाथांनी पुराणिकाची भक्तिभावपूर्ण सुबोध शैली प्रारंभापासून अखेरीपर्यंत स्वीकारली आहे. चातुर्यपूर्ण संवाद्योजना, प्रसंगयोजना या ग्रंथातही केलेली आहे. त्यामुळे मूळ कथेवरून वाचकांचे अंक्ष ढळत नाही.

अत्यंत साधी भाषा, लोकजीवनाचे चित्रण व आध्यात्माची बैठक यामुळे हे आरघानकाव्य यशस्वी ठरले. आरघानकाव्याची सुरूवात महानुभाव कवींनी केली असली तरी त्याला नाथांनी लोकप्रियता मिळवून दिली आणि नव्या आख्यानकाव्याची परंपरा निर्माण केली. नंतरच्या काळातील अनेक आख्यानकाण्यावर नाथांच्या 'रूक्मिणी स्वयंवर' या आख्यान काव्याचा अभाव पडला आहे.

एकनाथांच्या 'रूक्मिणी स्वयंवर'विषयी ल. रा. पांगारकर म्हणतात, ''ही मंगल कृष्णकथा आहे म्हणून भाविक रमतो. जीवशिवऐक्य प्रतिपादक आध्यात्मग्रंथ म्हणून ज्ञानी रमतो. आणि सुंदर विवाहवर्णन आहे म्हणून रसिक रमतो.''

## १२. भावार्थ रामायण

'भावार्थ रामायण' ही नाथांच्या आयुष्यातील शेवटची रचना. या ग्रंथाची रचना पाच कांडे व युद्धकांडाचे ४४ अध्याय एकनाथांनी रचले त्यानंतर त्यांचे देहावसान झाले. 'भावार्थ रामायण'चा उर्वरित भाग त्यांचा शिष्य 'गावबा' याने लिहून पूर्ण केला.

'भावार्थ रामायण' या ग्रंथाचे स्वरूप एखाद्या महापुरणासारखे आहे. एकनाथांनी त्यांच्या काळी उपलब्ध असलेल्या सर्व रामायणातील कथांचा वापर आपल्या उपलब्ध असलेल्या सर्व रामायणातील कथांचा वापर आपल्या ग्रंथात केला आहे. वाल्विकीरामायण, आनंदरामायण, आध्यात्मरामायण, हनुमन्नाटक, योगवसिष्ठ इ. ग्रंथांनी भावार्थ रामायणावर दाट 'छाप पाडली आहे. नाथांना ज्ञात असलेल्या रामायणांची यादीच त्यांनी अख्यंकांडात दिली आहे.'

संत एकनाथांनी वर्णन केलेला राम हा अवतारी राम आहे. श्रीरामाने कथा लिहिण्यासाठी आपली पाठ पुरवली असे सांगून या काव्यलेखनाची ईश्वरी प्रेरणा स्पष्ट केली. ग्रंथारंभी श्री. गणेशाचे वंदन करू लागताच 'भावार्थ रामायण चालवी वेगी' असा सूचक आशीर्वाद गणपतीने दिला आहे.

'भावार्थ रामायणा'त नाथाची श्रीरामाशी असलेली तन्मयता व श्रीरामाचा ध्यास स्पष्ट दिसतो. रामकथेत आध्यात्मविचार नाथ सहज स्पष्ट करतात.

एकनाथांनी 'भावार्थ रामायणात' आध्यात्म विचार स्पष्ट करण्यासाठी विविध रूपके घेतली आहेत. उदा. दशरथ म्हणजे दशेद्रिये, कौसल्या म्हणजे सद्विद्या, कैकयी ती अविद्या, आत्मप्रबोध तो लक्ष्मण, भावार्थ तो भरत विश्वामित्र हा विवेक, वसिष्ठ म्हणजे विचार, आनंदविग्रही पूर्ण आत्मतत्त्व म्हणजे श्रीराम, शिवधनुष्यभंग म्हणजे आत्मज्ञानाने होणारा मायानाश होय.

श्रीराम व सीता यांची एकात्मता दाखविताना नाथांनी आपल्या प्रतिभेचा विलास दाखविला आहे. सीता जीव तर रामजीवन, सीता शर्करा तर राम जोडी, सीता डोळसता तर राम देखणा अशी एकात्मता वर्णन केली आहे. एकनाथ रामसीतेच्या एकरूपते बद्दल लिहितात.

सीता रस श्रीराम स्वाद । सीता सुमन राम सुगंध ।।
सीता बुद्धी श्रीरामबोध । अनन्यासिद्धी येरयेर ।।

रामसीतेच्या एकरूपतेतून तिची प्रतिनिष्ठा एकनाथांनी वर्णन केली आहे. 'श्रीरामेविण उदक-पान । ते मरणप्रद विष दारूण। अशा प्रकारे पतिनिष्ठा वर्णन करून अद्वैत भक्तीचा आदर्श एकनाथांना निर्माण करावयाचा होता.'

एकनाथांनी हनुमंताची आदर्श रामभक्ती वर्णन केली आहे. तरीही केवळ परमार्थसाधन हा त्यांचा एकमेव हेतू नसावा. अवती भवतीच्या समाजाचे वास्तव चित्रण करावे असे एकनाथांना वाटत असावे. तसाच त्यांच्या भावार्थ रामायणाचा हेतू दिसतो. त्यांच्या रामायणात कर्मठ ब्राह्मण, स्वत:चा पोकळ डौल मिरविणारे षंठ क्षत्रिय, द्रव्यलोलुप वैश्य आणि अठरा-पगड जातीत विस्कळीत झालेले शुद्र अशा चार वर्णाचा उल्लेख आहे. याशिवाय स्वार्थात लडबडलेले तेली, सावकार, साळी, शिंपी रंगारी इ.ची हजेरी नाथांनी घेतली आहे.

''देवांचे बंधविमोचन करावे. स्वधर्माचे उत्थापन करावे. दृष्टांचे निर्दालन करावे. गोब्राह्मणाचे रक्षण करावे. देशद्रोही व देवद्रोही, विश्वद्रोही अशा रावणाचा नाश करावा. असे एकनाथ पुन्हा पुन्हा सांगून पारतंत्र्यात भवनसेवारत झालेल्या हिंदू बांधवामुळे त्यागी पराक्रमी, स्वाभिमानी, सहिष्णू अशा धीरोदात्त रामाचा आदर्श ठेवतात. शिवरामांच्या कार्याला पुढे उपयोगी पडलेल्या त्याग तपस्या, प्रभुत्व पराक्रम, स्वामीनिष्ठा व धर्मनिष्ठा इ. अलौकिक गुणांची ओळख एकनाथांच्या रामानेच महाराष्ट्राला करून दिली'' असे शेणोलीकर म्हणतात.

श्रीराम हा नाथांचा आदर्श पुरूष आहे. त्याच्याद्वारे त्याग, कर्तृत्व, भक्ती, स्वधर्मनिष्ठा, मानवता या आदर्शजीवन मूल्यांची ओळख नाथांनी करून देऊन समाजकर्तत्वास व राष्ट्रकर्तत्वास प्रेरणा दिली.

राष्ट्रीय भावना व त्या भवनेस अनुकूल असणाऱ्या गोष्टींचा प्रसार 'भावार्थ रामायण' या ग्रंथातून घडला. हे एक ऐतिहासिक कार्य एकनाथ व त्यांचा शिष्य गावबा यांच्याकडून घडले. म्हणूनच डॉ. शं.गो. तुळपुळे 'भावार्थ रामायणा'विषयी पुढील उद्‌गार काढतात. ते सार्थ आहेत, असे वाटते ''हा ग्रंथ म्हणजे महाराष्ट्राचा प्रापंचिक आणि पारमार्थिक उष:कालच आहे.''

## १३. एकनाथाची भागवत

एकनाथांनी चतु:श्लोकी भागवताच्या लेखनानंतर जनार्दन स्वामींच्या आज्ञेने एकादश स्कंदावर विस्तृत टीकालेखनास पैठण येथे प्रारंभ केला. या ग्रंथाच्या लेखनास तीन वर्षे लागली. ग्रंथाचा शेवट काशी येथे झाला.

एकनाथी भागवताचे ३१ अध्याय असून ओवीसंख्या १८८०० आहे. प्रारंभी हा ग्रंथ मराठी भाषेतून लिहिला म्हणून एकनाथांना विरोध झाला. नंतरच्या काळात काशी या क्षेत्री एकनाथी भागवताची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली.

या ग्रंथात भागवत धर्माची परंपरा, स्वरूप, वैशिष्ट्ये, ध्येय, साधने यांचे विस्ताराने विवेचन केले आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायात या ग्रंथास्त प्रमाण ग्रंथाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे.

एकनाथांनी या ग्रंथासाठी मूळ भागवत आणि भागवतावरील श्रीधरी टीका यांचा आधार घेतला आहे. नाथाची भाषा प्रास्ताविक आहे. संत ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान प्रापंचिकांना त्यांच्याच भाषेत नाथांनी समजावून दिले आहे. भक्तीच्या द्वारे परमार्थाची प्राप्ती करून घेण्याचा सुलभ मार्ग नाथांनी संसारी लोकांपुढे ठेवला. भक्तिमागाने जाण्यासाठी वेदांत शास्त्र, व्युत्पत्तीची आवश्यकता असत नाही. कर्माकर्म अगर विधी निषेधाची बाधा त्यास होत नाही. भक्तीमुळे सामान्यजनही भवसागर तरुण जातात हे त्यांनी पटवून दिले आहे.

एकनाथी भागवतात नाथांनी साडेचारचरणी ओवी वापरली आहे. ग्रंथाचे स्वरूप कृष्ण-उध्दव असे संवादात्मक आहे. या ग्रंथाचे वाचन करीत असताना संत ज्ञानेश्वरांच्या विचारांचा व शैलीचा प्रभाव जाणवतो. ग्रंथारंभी नाथांनी निवृत्ती, ज्ञानदेव, नामदेव, व्यास यांना वंदन केले आहे.

नाथांनी ग्रंथारंभीच मराठी भाषेतील अभिमान व्यक्त केला आहे. एकनाथी भागवतात तशा आशयाचे अनेक उल्लेख आढळतात. ते लिहित.

'ग्रंथादेशभाषा व्युंत्पत्ती । म्हणौनि नुपेक्षावर पंडिती ।
अर्थ पाहवा यथार्थो । परमात्मस्तिची निजनिष्ठा ।'

आपल्या देशभाषेविषयी अभिमान व्यक्त करीत असताना तत्कालीन पंडितांना नाथ इशारा देतात. 'संस्कृत वंद्य आणि प्राकृत निंद्य हे बोलणे योग्य नाही. हे सांगत असताना नाथांची विनयशील नाही दिसते.'

हरिकथानिरूपण संस्कृतात असो किंवा प्राकृतात

'भगवंत भावाचा भुकेला आहे' असे त्यांचे मत आहे. भक्ती, ज्ञान, वैराग्य, सत्संग, सच्चरित्र, गुरूसेवा इ. चे विवेचन केले आहे. या विषयावरील विवेचनात पुनरावृत्ती झाली आहे.

## १४. एकनाथांची भारूडे

संत एकनाथ व भारूडे यांचा संबंध अतिशय निकटचा आहे. आज भारूड हा शब्द उच्चारला की, एकनाथांचे नाव समोर येते. कारण भारूडांना लोकप्रिय करण्याचे, सर्व समाजात पोहचविण्याचे काम एकनाथी भारूडांनी केले आहे.

संत एकनाथांनी सुमारे तिनशे (३००) भारूडे लिहिली, ती अतिशय लोकप्रिय आहेत. नाथांच्या काळात दत्तसंप्रदायाचे पुनरूज्जीवन दत्त संप्रदायाने प्रारंभिले होते. परंतु हे कार्य ब्राह्मण वर्गापुरतेच मर्यादित होते. बहुजन समाजाला मार्ग दाखवू शकेल अशा वाटाड्यांची गरज होती. एकनाथांनी बहुजनांच्याच भाषेत भारूडे लिहून ती पूर्ण केली. सर्वसामान्यांना त्यांच्याच भाषेतून एकनाथांनी शिकवण दिली.

एकनाथांनी महार, गोंधळी, गारूडी, वासुदेव, बाळसंतोष, कोल्हाटिण, मुरळी इत्यादींचा वेषात आणि चक्रिरितीतून सामान्यांना सामान्यांच्या भाषेत सामान्यांना आत्मबोध होईल अशी रचना केली.

रहाट, जाते, दळण-कांडण इ. व्यवहार भारूडातून आणले. बैल, सर्प, विंचू, कुत्रा इ. प्राणी, हमामा हूतूतू विटी दांडू फुगडी इ. खेळ, जाखाई, जोखाई, मरिआई इ. दैवतांना नाथांनी आपल्या भारूडाचे विषय केले.

एकनाथांची भारूडे म्हणजे लोकवाङ्मयाचा उत्कृष्ट नमुना आहे. नाथांच्या भागवतातील बोध समाजाच्या खालच्या थरापर्यंत, खेड्यापाड्यातील लोकापर्यंत नेऊन पोहोचविण्याचे कार्य भारूडांनी केले.

प्रा. ह.श्री. शेणोलीकर भारूडाबाबत म्हणतात. ''सर्वांना आपल्या कवनांचा विषय करून त्यांच्या करवी आध्यात्माचा भक्तिमार्गाचा बोध जडजीवाना, बाळ्या भोळ्यांना पेलेल अशा लौकिक भाषेत एकनाथांनी केला. त्यामुळे समाजातील सर्व थरात तो पसरला. आणि इतका रूजला की, आजही त्याचे प्रत्यंतर येते.''

**१५. ख्रिस्तपुराण**

'ख्रिस्तपुराण' हा फादर स्टीफन्सने लिहिलेला प्रसिद्ध ग्रंथ होय. त्याने लिहिलेले हे पुराण प्रथम पोर्तुगिज भाषेत लिहिले. नंतर मराठी वेष दिला. फादर स्टीफन्सने त्याला 'ख्रिस्तपुराण' हे नाव दिले नव्हते. फादर मायगेल याने या ग्रंथाचे नाव 'ख्रिस्तपुराण' असे १९४९ मध्ये केले. हा ग्रंथ मूलतः रोमन लिपीन रचलेला व छापलेला आहे. नंतर त्याने देवनागरीत रचना केली. देवनागरीतील मूळ प्रत लंडन म्युझियममध्ये सुरक्षित आहे.

'ख्रिस्तपुराणा'ची रचना ओवीवृत्तात आहे. त्यालाच त्याने अभंग असे म्हटले आहे. ओवीसंख्या १०९६२ एवढी असून २५ सर्ग किंवा अवस्वर आहेत. हे पुराण दोन भागात विभागले आहे. त्याने मुकुंदराज, ज्ञानेश्वरांइतकेच मराठी भाषेबद्दल प्रेम व्यक्त केले आहे. त्यातून ज्ञानेश्वरांचा प्रभाव जाणवतो. मराठी भाषेचे मोठेपण, महात्म्य वर्णन करताना त्याच्या प्रतिभेला बहर येतो तो म्हणतो,

जैसा रत्नामाजि रत्नकिळा । की रत्नामाजि हिरा निळा ।
तैसा भासामाजि चोखळा । भासा मराठी ।।
जैसा पुष्पामाजि पुष्प मोगरी । की परिमळा माजी कस्तुर ।
तैसी भासामाजि साजिरी । भासा मराठी ।।
पंखियामध्ये मयुरू । नृखियांमध्ये कल्पतरू ।
भासामध्ये मानू थोरू । मराठियेसी ।।

ग्रंथाच्या गद्य प्रस्तावनेत सर्वांना उदंड आयुष्य व परमेश्वराची कृपा भाकून ही तारक्यांची कथा आपण मराठी भाषेत लिहित असल्याचे तो सांगतो. 'ही भासा परमेश्वराचेआ वस्तु निरोपुसि योग्य ऐसी दिसली.' म्हणून आपण पुराण लिहिण्यासाठी मराठी भाषा घेतली असे तो सांगतो. या प्रस्तावनेतून सोळाव्या शतकातील गद्याचे स्वरूप लक्षात येते. तत्कालीन मराठी भाषेचे स्वरूप समजण्यासही मदत होते.

फादर स्टीफन्सने 'ख्रिस्तपुराणा'च्या प्रस्तावनेत आपल्या धर्माबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. तो म्हणतो, 'ख्रिस्ती' 'जेतुके अंतर उजवडवा अंधारासि, सत्य वा लटाकासि, वैकुंठ व मलोकासि, परमेश्वर वा देवाचारासि आहे तितके अंतर आपला ख्रिस्ती धर्म व इतर धर्म यांच्यात आहे यावरून त्याच्या धर्मप्रसाराचे स्वरूप लक्षात येते. थोडक्यात फादर स्टीफन्सने लिहिलेला 'ख्रिस्तपुराण' हा ग्रंथ धर्मप्रसाराच्या हेतूनेच लिहिला आहे.'

'ख्रिस्तपुराणा'तून ख्रिस्त चरित्राला हिंदू मनावर ठसविण्यासाठी भारतीय प्रवेश दिला आहे. धर्मतत्त्वांना कुठल्याही प्रकारे बाध न आणता हा सर्व खटाटोप त्याने केलेला आहे. हे अतिशय अवघड काम त्याने धर्मप्रसारासाठी केले आहे. त्यामुळे त्याचे कौतुक वाटते. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी त्याच्याविषयी लिहिले आहे. 'आतील मूर्ती तेवढी येशू ख्रिस्ताची व बाकी मंदिराचा सारा थाट हिंदू पद्धतीचा' अशी या पुराणाची रचना आहे. स्टीफन्सच्या भाषेवर ज्ञानेश्वरीची दाट छाया दिसते. म्हणजे केवळ मराठी भाषाच नव्हे तर त्या भाषेतील पूरसुरींचे ग्रंथही त्याने आत्मसात केले होते, असे वाटते. ही त्याची कलाकृती मराठीत अनेक दृष्टींनी अपूर्व आणि कौतुकास्पद आहे.

## १६. तुकारामाची अभंगगाथा

संत तुकारामाच्या अभंगगाथेत सुमारे साडेचार हजार अभंग आहेत. या अभंगाच्या रचनेचा ठराविक असा क्रम नाही. हे सर्व अभंग उत्स्फूर्त व आत्मविष्काराच्या स्वरूपाचे आहेत. तुकारामाने आपल्या मनात ज्या ज्या वेळी ज्या भावना प्रबळ झाल्या त्यांना काव्यरूप दिले. आत्मचरित्रे अभंगातून त्यांनी त्यांची कुळपंरपरा, दुष्काळसारखी दैवी संकटे, साधकावस्थेतील अनुभव सांगितले आहेत. संसाराची दुर्दशा 'संसाराच्या तापे तापलो मी देवराया' या अभंगात सांगितली आहे. स्वतःच्या साधनेचा विकास, पारमार्थिक अनुभव, ईश्वरविषयक तळमळ अशी वाढली ? दिव्यानंदाचा अनुभव कसा झाला ? या सर्व घटनांचे वर्णन आले आहे.

तुकारामाने काही प्रासंगिक अनुभव लिहिले आहेत. गुरूपदेश, अभंगाच्या वह्या इंद्रायणीत बुडविल्याचा प्रसंग, छ. शिवाजीने तुकारामाला बोलवणे पाठविले या प्रसंगावर, परमेश्वर भेटीच्या प्रसंगावरून तुकारामाची अभंगनिर्मिती आहे.

तुकारामाच्या अभंगगाथेत त्यांचे भक्तीविषयक विचार व्यक्त झाले आहेत. भक्तीत चित्त शुद्धीला महत्त्व आहे. अद्वैत झाल्याशिवाय भक्तीचे सुख उपभोगता येत नाही. भक्तीने माणसांचा अहंकार नष्ट होतो. भक्ताने स्वतःच्या उद्धारांसाठी भक्तिमार्गाची निवड करावी. कारण भक्ती हा सोपा मार्ग आहे. भक्तीने पापी, चांडाळ, दुराचारी यांचाही उद्धार होऊ शकतो.

तुकाराम संत असल्याने त्यांनी संतविषयक विचार आपल्या अभंगात मांडला आहे. संत, साधू, सज्जन अशा शब्दातून ते संताचा महिमा वर्णन करतात. खरा संत कोण ? संताची लक्षणे कोणती ? साधू कसा ओळखावा ? संताचा धर्म कोणता ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांच्या अभंगगाथेतून मिळतात. 'जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा ।' हा साधुत्वाचे लक्षण सांगणारा तुकारामाचा अभंग प्रसिद्ध आहे. संत कसे असतात हे सांगताना तुकारामाने 'मऊ मेणाहून मऊ आम्ही विष्णुदास । कठीण वज्रासी भेदू ऐसे ।' अशा संतस्वभावाची दोन टोके सांगितली आहेत.

संत तुकारामाने भागवत धर्मातील नामसंकीर्तनाचे महत्त्व, अनेक अभंगातून सांगितले आहे. 'हरिनामाचा व्यापार करा.' असा संदेश ते देतात. 'हरिनाम घेतल्याने कोण वाया गेला ?' असा प्रश्न विचारतात. नामाशिवाय दुसरा कुठलाच मंत्र त्रिभुवतात नाही. नामानेच मनुष्य उत्तम गतीला जाऊ शकतो असे तुकारामाला वाटते.

तुकारामाने आपल्या अभंगातून अद्वैतविचार पुन्हा पुन्हा मांडला आहे. 'तरूवर बीजापोटी । बीन तरूवरा शेवटी ।।' या अभंगात एकाच बीजातून प्रचंड विश्व वृक्ष फोफावतो व त्या वृक्षाच्या फळातून बी तयार होते. पाण्यावर लाटा तयार होतात. त्या लाटांचे पुन्हा पाण्यात रूपांतर होते. त्याप्रमाणे व्यक्त जग अव्यक्यात विलीन होते. असेच देव व भक्त, आत्मा आणि परमात्मा यांचे आहे.

तुकारामाने मोठ्या प्रमाणात अभंगरचना केली त्याचे कारण तुकारामाच्या जीवनविषयक विचारात आहे. तुकारामाच्या धर्माची हेळसांड होत होती. अधर्माचे प्राबल्य वाढले होते. ढोंगी व समाज कंटकाच्या कारवायांना ऊत आला होता. अशा वेळी धर्माचे रक्षण करण्यासाठी तुकारामाने अभंगरचना केली ते लिहितात, 'बुडता हे जन देखवे डोळा' म्हणून बुडणाऱ्या समाजाला मार्ग दाखविण्यासाठी तुकारामने सामाजिक कळवळ्यातून, लोकशिक्षणाची भूमिका घेऊन अभंग लेखन केले आहे.

## १७. दासबोध

'दासबोध' हा समर्थ रामदास यांचा प्रमुख ग्रंथ. समर्थांचे विचारधन या ग्रंथात एकवटले आहे. या ग्रंथाची रचना शके १५५४ ते १६०३ अशी पन्नास वर्षे सुरू होती. मराठी सारस्वतकारांनी हा ग्रंथ एकटाळी असल्याचे सांगितले आहे. ते मत पटत नही. डॉ. तुळपुळे यांनी हा ग्रंथ तीन टप्प्यांनी लिहिला गेला असावा असे म्हटले आहे. 'वीस दशकी दोनशे समासी' असा हा ग्रंथ आहे. या ग्रंथाचे पूर्वार्ध, उत्तरार्ध असे दोन भाग असून ओवीसंख्या अनुक्रमे ३८६६ व ३८८५ एवढी आहे.

पहिल्या सात दशकात प्रमुख विषय आध्यात्म हाच असून अकराव्या दशकात राजकारणाचा विषय आला आहे. बाराव्या दशकात प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घातली आहे. यानंतरच्या दशकातून आधात्माबरोबरच राजकारण, समाजकारण, बुद्धिवाद, प्रयत्नपद, असे विषय निरूपले आहेत. परमार्थ हा समर्थ रामदासांचा प्रमुख, मुख्य विषय असल्याचा निर्वाळा ग्रंथांरंभी दिला आहे. तो पुढील शब्दात

ग्रंथनाम दासबोध । गुरू शिपयाचा संवाद ।
येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।।

'दासबोध' या ग्रंथात प्रसंगपरत्वे उपदेश केला आहे. 'उत्तमपुरूष निरूपणा'त आदर्श पुरूषाची लक्षणे सांगितली आहेत. 'मूखलक्षणात' दुर्गुणांचे विवेचन केले आहे. 'संसार मुळीच नासका विवेके करावा नेटका' अशी शिकवा दिली आहे. प्रापंचिकाला 'यज्ञ तो देव जाणावा' असे सांगून दुसऱ्यावर विसंबून राहू नये कारण जो 'दुसऱ्यावर विसंबला त्याचा कार्यभार बुडाला' असे सांगितले आहे.

'दासबोध' या ग्रंथाची रचना गुरूशिष्य संवादाने झाली आहे. शिष्याच्या मनात वेळोवेळी आलेल्या शंकाचे निरसन गुरू करतात. वेद-उपनिषदे, द्वादशगीता, भागवत इ. ग्रंथांचा उल्लेख प्रारंभी केला आहे. विचारांच्या दृष्टीने भगवद्गीतेचा प्रभाव अधिक जाणवतो! मुंकुंदराज, दासोपंत, त्र्यंबकराज, एकनाथ इ. पुर्वसुरीच्या लेखनाचा प्रभाव जाणवतो. मुकुंदराजाच्या 'विवेकसिंधूत' व 'दासबोधात' साम्य जाणवते. रामदास मुकुंदराजाप्रमाणेच गुरूला परिस, कामधेनू, कल्पतरू, चितामणी असे शब्द वापरतात. दासोपंताच्या 'ग्रंथराज' या ग्रंथाचा प्रभाव दासबोधात स्पष्ट दिसतो. दासोपंतांनी वापरलेले प्रचिती आणि प्रबोध हे शब्द रामदासांनी वापरले आहेत. वर्णनपद्धती दोहोतही सारखीच आहे. 'दासबोध' म्हणजे एक प्रकारची व्याख्यानच आहे. त्यामध्ये गद्याचे व वक्तृत्वाचे सारे विशेष दिसून येतात. त्यात माधुर्य आणि प्रसादगुण आढळणार नाही. ओजोगुणांचे मात्र भांडारच आहे. भावनांचा उद्रेक त्यात नाही पण विचारांचे गांभीर्य, निसंदिग्धता, रोख-ठोकपणा, ही वैशिष्ट्ये आढळतात. शब्दांच्या सौंदर्यांकडे रामदासांचे लक्ष नाही. व्याकरण शुद्धलेखन याची पर्वा त्यांनी केली नाही. स्पष्टता, तर्कशुद्धता, निश्चयात्मकता, सकसपणा, उत्कटता, ओजस्वीता आणि भेदकता आढळतो.

**१८. मनाचे श्लोक**

'मनाचे श्लोक' या रचनेला 'मनोबोध' या नावानेही ओळखले जाते. मनाचे श्लोक भुजंग प्रयात या वृत्तांत रचलेले आहेत. त्यांची श्लोकसंख्या २०५ आहे. रामदासांनी आपल्या मनाच्या निमित्ताने जनाना उपदेश केलेला आहे.

संत रामदास यांनी 'मना सज्जना भक्तिपंथेची जावे' असा भक्तिमार्गाचा उपदेश केला आहे. सतत राम चिंतीत जावा. राम आपल्या मनाची उपेक्षा करीत नाही. श्रीराम भक्तांना तारण्यास समर्थ आहे. समर्थ्यांच्या सेवकाकडे वक्र पाहण्याचे सामर्थ्य कोणातच नाही. असा धीरही समर्थ रामभक्तांना देतात.

'मना नापरि त्वा शिजावे' अशी लोकसेवेची शिकवण रामदास भक्तांना देतात. 'जगी सर्वसुखी असा कोण आहे ?' असा प्रश्नही ते विचारतात, 'क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे' असे सांगून क्रियेला महत्त्व देतात.

रामदासांनी आपल्या शिष्यासाठी मनाचे श्लोक लिहिले. शिक्षा मागत असताना रामदासी शिष्याने प्रत्येक घरासमोर उभे राहून एक श्लोक म्हणावा व पुढे जावे म्हणजे प्रत्येक घरात एकेक विचार दिल्याचे कार्य होईल या हेतूने मनाच्या श्लोकांची रचना झाली.

मनाचे श्लोक लिहिताना रामदासांनी मनुष्यांची अवनती त्याच्या मनोव्यापारावर अवलंबून मनुष्याची अवनती त्यांच्या मनोव्यापारावर अवलंबून असते हे गृहीत धरून केली आहे. रामदासांनी मनाला दूषण न देता त्याला सज्जना म्हटले, चुचकारले. प्रपंच आणि परमार्थ, प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा योग्य समन्वय साधण्याचा प्रयत्न मनाच्या श्लोकात केला आहे.

समर्थ रामदास आपल्या सर्व सामर्थ्यानिशी 'मनाचे श्लोक' मध्ये प्रकट झालेले पाहवयास मिळतात. 'मनाचे श्लोक' म्हणायला अतिशय सोपे, सुटसुटीत, गेयता, छंद बद्धता, यमक अनुप्रासादी अलंकार त्याच्याच जोडीला आशयघनता यामुळे वाङ्मयीन व आशयदृष्ट्या समृद्ध झालेले आहेत.

समर्थ रामदासांचे अनुभवविश्व भ्रमंतीमुळे समृद्ध झालेले होते याची साक्ष या श्लोकातून पटते. त्यांचे सर्वच बोलणे आत्मप्रचितीचे असल्याचे जाणवते.

मनाच्या श्लोकमधील श्लोक २ ते ११ मधील उपदेश पाहण्यासारखा आहे.

रामदासांनी 'मनाचे श्लोकां' मधून रामनामाचे सामर्थ्य अत्यंत सोप्या भाषेत सांगून सर्वांना पचेल, रूचेल असा उपदेश केला आहे. डॉ. शं. गो. तुळपुळे म्हणतात, ''हा मनोबोध म्हणजे खरोखर भगवद्गीतेच्या तोलाचे असे एक समथॉक्त उपनिषदच आहे.''

समर्थांच्या मनाच्या श्लोकांना आचार्य विनोबा भावे यांनी 'सोन्याची लगड' असे संबोधले आहे.

## १९. मुक्तेश्वराचे महाभारत

मुक्तेश्वराचे संपूर्ण महाभारताचे लेखन केलेले नाही. त्याने महाभारताचे आदि, सभा, वन, विराट, सौप्तिक अशी पाच पर्वे लिहिली आहेत. या पाच पर्वांची ओवीसंख्या १४०७९ एवढी आहे. मुक्तेश्वराची ही पाच पर्वेच उपलब्ध आहेत. यातून मुक्तेश्वराचे श्रेष्ठ दर्जाचे कलाकवीत्व दिसून येते. प्रतिभा आणि पांडित्य, विद्वत्व आणि कवित्व, रसिकत्व यांचा मनोहर संगम आढळून येतो. ओवी वृत्तावर त्याचे असामान्य प्रभुत्व दिसते.

मुक्तेश्वराला महाभारतामुळेच त्याच्या काळापासून आत्तापर्यंत मान मिळत आला आहे. त्याच्यावर स्तुतिसुमने उधळली जात आहेत. त्याला अनेक कवी आदराने वंदन करीत आहेत.

मुक्तेश्वराने महाभारत लिहिण्यापूर्वी अनेक प्राकृत भाषांमधील महाभारताचा अभ्यास केलेला होता. त्याच्या पूर्वी ज्यांनी ज्यांनी महाभारताचे लेखन केले त्या सर्वांचा त्याने आपल्या महाभारतात उल्लेख केला आहे. त्यांच्या उणिवा दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. यावरून मुक्तेश्वराची बंडखोर वृत्ती दिसते.

मुक्तेश्वराने आपल्या महाभारतात व्यासां बद्दल आदर व्यक्त केला आहे. 'व्याससंगती सोडू नये' असे त्याचे म्हणणे असले तरी व्यासकथेपेक्षा वेगळी कथा लिहिण्याचा प्रयत्न करतो. व्यासप्रमाणेच तो ज्ञानेश्वरानाही वंदन करतो.

मुक्तेश्वराने मराठी भाषाभिमान व्यक्त केला आहे. त्यातून त्याचे मराठी विषयीचे प्रेम व स्वतःच्या ग्रंथाबद्दलचा आत्मविश्वास व्यक्त झाला आहे. महाभारताविषयी तो लिहितो. 'आपल्या काव्यात राजांना वीररसवित्पांना वेदसारांश, परमहंसाना तत्त्वार्थबोध, चतुरांना युद्धिबुद्धीचा सागर, विलासी जनाना शृंगार, शास्त्री पंडितांना त्याच्या आवडीचे विषय याप्रमाणे ज्याला जे पाहिजे ते त्याला मिळेल व मराठी भाषा बोलणारांना हा काव्यरूप ग्रंथ गुरूसारखा वाटेल.'

मुक्तेश्वराने ज्ञानेश्वरांप्रमाणेच स्वतःकडे विनम्रता घेतली आहे. गुरूविषयी आदरभाव व्यक्त केला आहे. श्रोत्यांना मोठेपणा देऊन श्रोते स्थिरासनी, चित्रारहित, सात्विक, अर्थज्ञ, सदाचारी, क्षमशील व कथाश्रवणाची आवड असणारे असावेत. त्यांनी पृथ्वीएवढे मन करून अवघान द्यावे असे तो महाभारतात सांगतो.

मुक्तेश्वराने व्यासांच्या महाभारताचे तंतोतंत अनुकरण केले नाही. त्याचे महाभारत स्वतंत्र रचना आहे.

मुक्तेश्वर आदिपर्वात सर्वाधिक रमला आहे. आदिपर्वात सत्यवती - पराशर, गंगा - शांतनू, शंतनूं सत्यवती या प्रेमकथा वेगवेगळ्या प्रकारे कथन केल्या आहेत. शकूंतला - दुष्यंत, मेनका - विश्वामित्र, देवयानी - कर्च, देवयानी - चयानी, ययानी - शर्मिष्ठा या प्रीतीकथा आल्या आहेत.

सभापर्वात पंडूची स्वर्गप्राप्ती, जरासंघ वध शिशुपालवध, मयसभेत दुर्योधनाची फजिती, धूतक्रीडा, पांडवाचा वनवास इ. कथा आल्या आहेत.

वनपर्व अनेक दुय्यम कथांनी गजबजलेले आहे. युद्धपर्वात श्रीकृष्ण - शल्व, अर्जुन - शंकर युद्ध, पांडव - जयद्रथ युद्ध इ. युद्धे आली आहेत.

विराटपर्व घटनाप्रधान आहे. आचकवध, अनुकीचकवध या घटना आल्या आहेत. भीमास पराक्रमासाठी वाव मिळाला आहे.

मुक्तेश्वराने महाभारत कथेत अनेक बदल केले. काही ठिकाणी स्वतःच्या काळातील समाजस्थिती वर्णन केली. राजसूय चहा प्रसंगी केलेल्या भोजन समारंभाचे वर्णन मुक्तेश्वरकालीन आहे. महाभारतातील मल्लयुद्ध वर्णन करताना स्वकालीन कुस्त्यांचे वर्णन केले.

मुक्तेश्वर महाभारतात मुक्तेश्वराची डौलदार शैली दिसते. रम्य, अद्‌भूत, भव्य, उदात्त अशा अनेक प्रसंगाचे वर्णन केले. त्यामुळेच त्याच्या महाभारताला 'मराठी साहित्यातील कोहिनूर' ही पदवी शेणोलीकरांनी दिली तर राजवाडे मुक्तेश्वराला 'ऐतिह्य प्रतिभेचा कवी' म्हटले. तर महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे यांनी त्याच्या नवरसांची मंदाकिनी असलेल्या प्रतिभेचा मुक्त कंठाने गौरव करतात.

## दमयंती स्वयंवर

रघुनाथ पंडित हा अल्पवाङ्मयनिर्मिती करून मराठी वाङ्मयात अजरामर झालेला पंडितकवी होय. ते समर्थभक्त होते त्यांनी रामदासवर्णन, गजेंद्रमोक्ष व दमयंती स्वयंवर या तीन ग्रंथाचे लेखन केले.

'दमयंती स्वयंवर' हे निनांत रमणीय असे काव्य आहे 'दमयंती स्वयंवर' हे श्रेष्ठ पंडिती काव्य मानले जाते. हर्ष कवीचे 'नैषधीयचरित' हे महाकाव्य डोळ्यासमोर ठेवून रघुनाथ पंडिताने 'दमयंती स्वयंवर' रचले.

प्रदीर्घ कथानक, विषयवैचित्र्य, क्रीडा, विवाद, मसलती, युद्ध यांची भव्य वर्णने, चद्र - सूर्य उदय आणि अस्त, नगरे, समुद्र, पर्वत, ऋतू इत्यादीची सर्गबद्ध रचना यात कुठेही आठळत नाही.

'दमयंती स्वयंवर' या ग्रंथाची श्लोकसंख्या २५४ एवढी आहे. आटोपशिर निवेदनामुळे या स्वयंपूर्ण काव्यास प्रमाणबद्धता आणि आकृतीसौंदर्य लाभले आहे.

रघुनाथ पंडित काव्याच्या प्रस्तावनेत 'कथा बोलो हो मधूर - सुधा धारा होय. शृंगारा करूणरसा थारा' असे म्हणत असला तरी दमयंती स्वयंवरापर्यंतचाच कथाभाग यात आला आहे. कारूण्यपूर्ण रसाविष्काराला फाटा दिला आहे. यातून नवरसांपैकी फक्त शृंगारालाच थारा देऊन त्याने आपली रसिकता दाखविली आहे.

'ती शीतलोपचारी जागी झाली हळूच मग बोले औषध न लगे मजला, परिसुनि जननी बरे म्हणुनि डोले' अशी रम्य कल्पना प्रकट करणारे श्लोक रघुनाथ पंडिताची स्वतंत्र निर्मिती आहे. अशा प्रसंगनिर्मितीतून त्याची कल्पनाशक्ती दिसते. हंस आणि नल याची पहिली भेट, हंस-दमयंती संवाद, नल-दमयंती भेट, हे प्रसंग बहारीचे आहेत. नल-दमयंती, हसं यांचे स्वभाव अत्यंत पंडित्याला असलेली मनुष्य स्वभावाची कल्पना येते. मनुष्य स्वभावाचे सूक्ष्म ज्ञान त्याला असल्यानेच अशी सुंदर स्वभावचित्रणे तो करू शकला.

फारशी शब्द, उपमा, रूपक, श्लेष, अनुप्रास, स्वभावोक्ती असे अलंकार आले आहेत.

'कठीण समय येता कोण काणास येतो' यासारखी सुभाषित रचना या ग्रंथात आली आहे. विविध वृत्तांत रचना केली आहे. काही ठिकाणी चमत्कृतीमुळे व प्रदीर्घ सामासिकतेमुळे प्रसादहानी झाली आहे. कृत्रिमता आली आहे.

महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे रघुनाथ पंडितांच्या श्लोकरचनेबद्दल लिहितात, 'उत्तम पाणीदार हिऱ्यांचे तेज त्याच्या श्लोकात आहे. पण ताज्या खुडलेल्या फुलांची व फळांची बहार त्याच्यात नाही. त्याच्या कृतीने मनाला आनंद होतो. पण मन भरून येत नाही. ते उचंबळून उड्या घेऊ शकत नाही.'

## २१. सुभद्राचंपू

सुभद्राचंपू हा निरंजन माधव यांनी लिहिलेली ग्रंथ होय. हा ग्रंथ मराठीतील एकमेव चंपूकाव्य या रचना प्रकारात मोडणारा. ग्रंथ होय. या ग्रंथात अर्जुन आणि सुभद्रा याच्या विवाहाची कथा सांगितली आहे.
सुभद्राचंपू या ग्रंथाची रचना संस्कृत महाकाव्याच्या धर्तीवर केलेली आहे. गद्यभागाला चुर्णिका असे म्हटले आहे. पद्याचे ३९७ श्लोक विविध वृत्तांत रचले आहेत.

निरंजनमाधवाने मूळ महाभारत, पुराणातील अर्जुन सुभद्रा याच्या स्वयंवरावर महाकाव्याचा सुंदर साज चढविला आहे. त्यामध्ये नाट्यामयता आणि भवरचना आणली आहे. मूळ भारतात नसलेले प्रेमाचे, शृंगाराचे, विरहाचे रंग भरले आहेत. त्यामुळे महाभारतातील सुभद्रा अर्जुन यांच्या विवाहातील कथा आणि सुभद्राचंपू तील कथा यात अंतर पडले आहे.

'सुभद्राचंपू'ची कथा वाचत असताना वाचकांच्या मनात उत्कंठा निर्माण होते. संस्कृत महाकाव्याचा आदर्श समोर ठेवून लिहिलेले हे काव्य आहे. महाकाव्यात सर्ग, वृत्त निसर्गवर्णने, थोर पुरूषचित्रणे, लढाया, युद्ध, भक्तीवीर, शृंगार इ. रसांचा अविष्कार, सुसूत्र व भव्य कथा या गोष्टी असतात. त्या आणण्याचा प्रयत्न निरंजनमाधवाने आपल्या या काव्यात केले आहेत.

सुभद्राचंपूत अर्जुनाने यतिवेश धारण केला व त्याला बलरामाने घरी आणले त्यानंतर अर्जुनाने सुभद्रेसह पलायन केले असा कथाभाग घेतला आहे. या कथाभागावर 'कुमारसंभव' या संस्कृत ग्रंथाचा प्रभाव दिसतो.

मराठीत चंपूकाव्याची परंपरा नसतानाही त्याने चंपूकाव्य प्रकारात रचना केली हा त्याचा वेगळेपणा आहे. या ग्रंथात त्याचे कविकौशल्य दिसते. सुभद्रा व अर्जुन यांचे प्रारंभापासून एमेकांवर प्रेम असल्याचे कवीने वर्णन केले आहे. हा स्वतंत्र दृष्टिकोन आहे.

सुभद्रा व अर्जुन यांच्यातील प्रेम निरंजन माधवाने वर्णन केले आहे. ते काव्यमय उतरले आहे. अर्जुन सुभद्रेला पळवून नेतो तेव्हा यादव स्त्रिया आक्रोश करतात. हा आक्रोश पुढील काव्यपंक्तीतून व्यक्त झाला आहे.

'तेही काय म्हणोनि भिक्षुक रथी आरूढली संप्रती
जे का शिलवती महाशुभमनि मानित होतो किती'

यादवांनी अर्जुनाला शिक्षा करण्याची मनीषा व्यक्त करताच अर्जुन ओळख करून देतो व युद्धाची मनीषा असल्यास युद्ध करू असे सांगतो. हे संवाद वीररस निर्माण करतात तसेच काव्यात जिवंतपणा, ताजेपणा आणतात. अर्जुन म्हणतो,
'आहे मी समरी उभा जरी तुम्हा युद्धी असे वासना'

निरंजन माधवाने या काव्यात गद्याचा केलेला वापर लक्षवेधी आहे. दोन घटना जोडण्याचे काम तो करतो. गद्य चुर्णिकांच्या माध्यमातून निरंजनमाधवाने निवेदनाचे काम केले आहे. निवेदनाच्या आधारे राष्ट्रप्रेम, धर्मप्रेम याविषयीच्या भावना आल्या आहेत.

सुभद्राचंपू या काव्यात निसर्गवर्णने आली आहेत. सुभद्रेचे सौंदर्यवर्णन करताना सर्वांगाची वर्णने आली आहेत. बलराम, कृष्ण, अर्जुन यांचे स्वभावरेखाटन केले आहे. या काव्यातही भक्तीचा धागा त्याने सोडलेला नाही.

**थोडक्यात**

निरंजनमाधवाने मराठीत चंपूकाव्याची परंपरा नसतानाही 'सुभद्राचंपू' सारखे चंपूकाव्य लिहून संस्कृत भाषेतील चंपूकाव्याची परंपरा मराठीत आणली यात त्याची कलात्मकता दिसते. त्यातून त्याचा संस्कृत काव्याचा व्यासंग दिसतो.

## २२. मोरोपंताची रामायणे

मोरोपंतांनी अनेक रामायणे लिहिली. त्यांच्या प्रत्येक रामायणाची सुरवात 'श्रीराम जयराम जयजयराम' अशा तेरा अक्षरी मंत्राने साधलेली आहे. रामायणे लिहिण्याचा छंदच मोरोपंतांना जडला होता. या रामायणांना बाळमंत्र रामायण, मंत्रगर्भ रामायण, रम्यमंत्र रामायण, अद्‌भूत रामायण, दंडक रामायण, दासरामायण, परंतुरामायण, पीयूष रामायण, पुण्यरामायण, श्रीरामायण, सीतारामायण अशी नावे दिली आहेत.

मोरोपंताची ३१ मंत्रबद्ध रामायणे, १० चित्रबद्ध रामायणे, ३ निरूपणात्मक रामायणे, १५ विशिष्टनामक रामायणे, १५ विविध वृत्तात्क रामायणे आहेत. याशिवाय पंताची ११ अप्रसिद्ध रामायणे आहेत. या सर्व रामायणात मंत्ररामायणे विशेष उल्लेखनीय आहेत.

मोरोपंतांनी १०८ रामायणे लिहिली असे बोलले जाते. अभ्यासकांच्यामते १०० पेक्षा अधिक रामायणे लिहिली असावित. परंतु पंताची ७०च रामायणे उपलब्ध झाली आहेत. विविध प्रकारची रामायणे लिहिण्याच्या मागे पंताची भूमिका 'सदा राम गावा, स्मरावा' अशी आहे. रामकथा गाणे म्हणजे स्वतःच्या उद्धाराचा मार्ग शोधणे. काव्यसाधना कमी भक्ती साधनाच जास्त दिसते. पंतांच्या विविध रामायणातून त्यांचे भाषा प्रभुत्व दिसते. यमक अनुप्रास भरपूर आले आहेत. परंतु ईश्वरभक्तीचे अनुसंघान कोठेही कमी होताना दिसत नाही. पंताच्या रामायणातून विविध वृत्ते आली आहेत. अभंग, आर्या, पृथ्वी, दोहे इ. वृत्तरचना हा पंताचा एक विशेष दिसतो. काही रामायणे एकाच वृत्तात आली आहेत.

मोरोपंतांनी १०८ रामायणे लिहून आपल्या बुद्धीचा अपव्यय केला अशा प्रकारच्या आरोप त्यांच्यावर केला जातो. परंतु पंतांनी आपल्या उपास्य देवतेसाठी केलेली भक्ती म्हणजे ही रामायणे आहेत.

मोरोपंताच्या रामायणात रामभक्ती, बुद्धिवैभव, भाषा प्रभुत्व, प्रतिभासंपन्नता दिसून येते. प्रा. रा. श्री जोग लिहितात, ''पंतानी १०८ रामायणे लिहून वर्णमाला, शब्दांचे खेळ, वृत्तबंधन अशा अनेक कलकृती लोकांच्या समोर ठेवल्या. रामभक्तीच्या ओलाव्याने रामायणे लिहिली.''

## २२. आर्याभारत

''आर्याभारत'' हा मोरोपंत प्रसिद्ध ग्रंथ होय. त्यांच्या काव्यकलेचा उत्कर्ष ''आर्याभारत''त झालेला दिसतो. मोरोपंतांनी व्यासांना वंदन करून भारत इतिहास पंतांनी दहाबारा वर्षात लिहून पूर्ण केला ''आर्याभारत'' या ग्रंथात महाभारताच्या पर्वांना तीच नावे दिलेली आहेत. मूळ महाभारतातील कथांचा अनुवाद संक्षेपाने केलेला आहे. मोरोपंत स्वतःच लिहितात, ''व्यासकृत महाभारत लक्ष ग्रंथ भारी आर्या वृत्ते रचितो स्वल्पातच कथा सारी ।।'' मोरोपंतानी महाभारताचा संक्षेप केला. उपाख्यानांची उपेक्षा केली. मुख्य कथानकाला महत्त्व दिले. काही वेळा पुढील कथा अगोदर घेतल्यानंतर जुळवून घेतल्या.

मोरोपंताचे महाभारत सांगताना विशिष्ट धोरण दिसते. कथा सांगणे हा त्यांचा प्रमुख हेतू होय. पांडव पराक्रमाची कथा सांगताना प्रपंचातील नीतीबोध, काही प्रमाणात तत्त्वज्ञान असे त्यांना सांगायचे होते. ते त्यांनी स्वतंत्रपणे सांगितले आहे. त्यासाठी गोष्टी सांगितल्या आहे. व्यावहारिक उपदेश केला आहे. निवेदनशैली मनोवेधक आहे. मग ती कोणतीही कथा असो. पंताची मनोवेधक

निवेदनशैली सर्वत्र दिसते. द्रौपदीवस्त्रहरण, सावित्री आख्यान, श्रीकृष्ण शिष्टाई किंवा युद्धवर्णने अशा ठिकाणी गतिमान व प्रभावी रचना आहे.

मोरोपंतांनी सर्व कथानके सयंमाने मांडली आहेत. शृंगाराबरोबर वाहत जायचे नाही. एकाच कुटुंबात बसून खुशाल बिनधास्तपणे आर्या म्हणाव्यात अशी रचना आहे. या ग्रंथात काही ठिकाणी गुरूशिष्य, पिता-पुत्र, बंधु-मित्र इ. जोड्याबाबत मानवतावादाच्या दृष्टीने कर्तव्ये सांगितली आहेत. दया, क्षमा, शांती, धैर्य, परोपरकार, शालिनत्व यांचा गौरव कधी स्वतःवर कधी इतर पात्रांच्या तोंडून केलेला आहे. त्यासाठी लहान लहान कथा सांगितल्या आहेत.

मोरोपंताचा ''आर्याभारत'' म्हणजे त्याच्या प्रगल्भ बुद्धीचे फळ सरस होय. यात पंताच्या कवित्वशक्तीचे सारे गुण प्रकट झाले आहेत. व्यासप्रभूंना वंदन करून 'अमृताहूनही मधूर असा नवा रस मी तुम्हांला पाजीन असे पंत म्हणतात. कर्ण हा पंताचा आवडता मानसपुत्र होय. कर्णपर्वात मोरोपंताच्या प्रतिभेला विशेष बहर आला आहे. युद्धवर्णन व वीररस यातून भारतीय युद्धशास्त्राची चमक दिसते. वीरश्रीची भाषणे, शस्त्रांचा खणखणाट, यांची वर्णने प्रत्यक्ष दृश्यरूपाने साकार झाली आहेत.'

''आर्याभारता''तील आटोपशीर कथा संवाद, तालबद्दता, संस्कृतातील रस, अलंकार, उपमाचातुर्य, शब्दचमत्कार, ईश्वरभक्ती, नीतीशिक्षण इ.चा लाभ वाचनाने होतो. भीष्माचार्याची राजनीती, नारदनीती, गीतेवरील विवेचन यामध्ये आध्यात्म व नीती उपदेश आला आहे. यावरून पंतांची भूमिका नीतीशिक्षकाची दिसते.

''आर्याभारता''तील व्यक्तिचित्रणे अतिशय जिवंत रसरशीत आहेत. भीष्म कर्ण, द्रोण, कृष्ण, अर्जुन, द्रौपदी इत्यादींची स्वभावचित्रणे उत्कष्ट मानवी स्वभावाच्या विविध भावच्छटांचे दर्शन घडवितात.

द्रौपदी वस्त्रहरण, कीचकवध, अभिमन्यूपराक्रम, भीष्मार्जुन युद्ध इ. प्रसंगावरील आर्या महाराष्ट्रातील सर्व लहानथोर शाहिरांपर्यंत पोहचल्या आहेत.

''आर्याभारता''त पारतंत्र्यापेक्षा नरकवास बरा, हसत हसत कर्म करावे, कर्माचे परिणाम भोगावेत यासारखी काही सुभाषिते आहेत.

मोरोपंतांनी ''आर्याभारता''त संस्कृत कवींचे ऋण मान्य केले आहे. शेवटी परिशिष्ट्ये जोडली आहेत. थोडक्यात या कथेत श्रीकृष्णाला महत्त्वाचे स्थान दिले आहे.

## २४. केकावली

''केकावली'' ही मोरोपंताची रचना प्रसिद्ध व लोकप्रिय आहे. ''श्लोक केकावली'' लिहिण्यापूर्वी मोरोपंत या पंडित कवींने ''आर्या केकावली'' ची रचना केली होती. त्यातील आर्या अतिशय सुंदर व भावस्पर्शी होत्या. उदा. 'श्रीरामा तू असशी माझ्या शिरावरी जागा । आम्हां तुझ्या पायावाचून निर्भय नसे दुसरी जागा' अशी सुंदर रचना ''आर्या केकावली''मध्ये होती. ''श्लोक केकावली'' मध्ये शब्दांच्या चमत्कृतीकडे जास्त लक्ष दिले आहे.

स्वत:च्या उद्धारासाठी मयुराने जो करूण टाहो फोडल्या त्या केका म्हणजे मयुराच्या केकांचा संग्रह म्हणजे ''केकावली'' होय. ''केकावली'' हे प्रतिक अतिकारूण्यपूर्ण उतरले. दीर्घसमासाची रचना त्यामुळे समजण्यास कठीण झाली आहे. बुद्धिवैभव, विरहव्याकुळता, उपदेश, देवाविषयी लडिवाळपणा श्लोक ''केकावली''त आहे.

**सुसंगती सदा घडो । सुजन वाक्य कानी पडो ।**
**कलंक मातीचा झडो । विषय सर्वथा नावडो ।**

अशा स्वरूपाचे व्यापक विचार मांडले आहेत. आत्मिक उन्नती साधणे हा ''केकावली''चा उद्देश दिसतो.

श्लोक ''केकावली'' वाचताना रसिकांचे अंतकरण द्रवल्याशिवाय राहत नाही. हे काव्य अप्रतिम, अतिप्रेमळ आहे. मोरोपंताच्या बुद्धीचा पूर्ण विकास यात दिसतो. देवाविषयी लडिवाळपणा, भय, प्रेम, कवित्व, बुद्धिवैभव, या सर्वांचे मधूर मिश्रण म्हणजे ''श्लोक केकावली'' होय. प्रा. न. र. फाटक यांनी ''श्लोक केकावली''ची मुक्त कंठाने स्तुती केली.

मोरोपंताशी पुढे बोलण्याची पद्धती पुढे प्रसिद्ध पावली नाही.

## २५. भाऊसाहेबांची बखर

पानिपतच्या युद्धावर अनेक बखरी लिहिल्या गेल्या त्यापैकी अनेक दृष्टींनी उत्कष्ट बखर म्हणजे भाऊसाहेबांची बखर होय. कृष्णाजी शामराव हा पानिपतावरील ''भाऊसाहेबांची बखर''चा लेखक होय. परंतु या बखरीच्या कर्त्याविषयी मतभेद आहेत. वाङ्मय म्हणून या बखरीचे महत्त्व अपूर्व आहे. पानिपतच्या युद्धाने या बखरीचा दोन तृतियांश भाग व्यापला असून उरलेल्या भागात मराठ्यांचे पानिपतपूर्व राजकारण आले आहे. या बखरीतील व्यक्तिचित्रणे समृद्ध आहेत. भाषा प्रासादिक व जोमदार आहे, नाट्यपूर्ण आहे. उपमा-दृष्टांतांनी रूजविली आहे. म्हणी वाक्प्रचार यांचा वापर केला आहे.

''भाऊसाहेबांची बखर'' वाङ्मयदृष्ट्या महत्त्वाची बखर आहे. त्यात अनेक काव्यगुण आहेत. कथनपद्धती तत्कालीन भाषेचे सुंदर या बखरीत आहे.

या बखरीत पानिपतची तयारी, पानिपतचा तळ, दत्ताजी शिंदेचा पराक्रम, बळवंतराव मेहंदळे यांचा पराक्रम आणि त्यांच्या पत्नीचा शोक, मराठ्यांच्या सैन्यातील मतभेद या सर्वांचे नाट्यमय, काव्यमय वर्णन आले आहे.

पानिपतानंतर दोनच वर्षांनी ''भाऊसाहेबांची बखर'' लिहिली गेली आहे. त्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या या बखरीचे महत्त्व आहे.

प्रा. रा. ना. घाटोळे या बखरीविषयी लिहितात, ''बखरीची भाषा झोकदार असून, वाक्यरचना पल्लेदार आहे. बखरीचे संवाद नाट्यपूर्ण व भावपूर्ण आहेत. भाषा संस्कृत पारशी मिश्रित असून त्यात उपमा, रूपक, म्हणी, सुभाषिते, उपरोध, विनोद इ. वैशिष्ट्ये विखुरलेली आहेत. कृष्णाजी शामराव ह्यांची शैली अतिशय आकर्षक व डौलदार आहे.''

## २६. आज्ञापत्र

''आज्ञापत्र'' ऊर्फ मराठेशाहीतील राजनीती हा राज्यशास्त्रावरील एक वैशिष्ट्यपूर्ण असा प्रबंध आहे. या ग्रंथाच्या कर्त्याबाबत संशोधकात मतभेद आहेत. रामचंद्रपंत आमात्य हा ग्रंथाचा कर्ता मानतात. तर काहींच्या मते हा ग्रंथ शिवछत्रपतींनी लिहिला असावा. या ग्रंथाच्या कर्त्यांस राजकारणातील प्रदीर्घ अनुभव असावा. असे या ग्रंथावरून लक्षात येते.

छ. शंभू ते रामचंद्रपंत अमात्य यांच्याकडून प्रस्तुत ग्रंथाचे लेखन करून घेतले असावे. तसेच या ग्रंथातील अंतर्गत पुराव्यावरून हा ग्रंथ नीळकंठ मोरेश्वर पिंगळे या शंभू छत्रपतींच्या प्रधानांचा असावा असे वि. भि. कोलते यांचे मत आहे.

''आज्ञापत्र'' हा ग्रंथ कोणीही लिहिला असला तरी शिवछत्रपतींच्या राजनीतीवर प्रकाश टाकणारा, अभिजात भाषाशैलीने संपन्न असणारा ग्रंथ आहे.

''आज्ञापत्र'' या ग्रंथात एकूण नऊ प्रकरणे आहेत. पहिली दोन प्रकरणे प्रस्तावनावजा आहेत. यामध्ये शिवरायाचा इतिहास संक्षिप्तपणे मांडला आहे. दुसऱ्या प्रकरणात छ. राजारामाने मराठी राज्य संकटकाळी कसे शर्थीने वाचवले ते सांगितले आहे.

तिसऱ्या प्रकरणात राज्यशास्त्राच्या निरूपणाला प्रारंभ झाला आहे. त्यात राजाची जबाबदारी, कर्तव्ये, प्रधान व इतर नोकरवर्ग यांच्या कामांची माहिती दिली आहे. राज्यकारभाराविषयी छोट्या-छोट्या सूचना दिलेल्या आहेत.

चौथ्या प्रकरणात प्रधान, सरकारकून यांच्याविषयी माहिती दिली आहे. पाचव्या प्रकरणात सावकार या विषयाची माहिती दिली असून सावकराला राज्याची शोभा असे म्हटले आहे. सावकारांमध्ये फिरंगी, इंग्रज, वलंदे, फरांसीस, डिंगमारादी, टोपीकारांचाही समावेश केला आहे.

सहाव्या व सातव्या प्रकरणात राज्यातील वतनदार, देशमुख, कुलकर्णी, पाटील यांच्याविषयीचे धोरण कसे असावे ? याविषयी विचार मांडले आहेत.

आठव्या व नवव्या प्रकरणात राज्याच्या संरक्षणा विषयी माहिती दिली आहे. गड-कोट-किल्ले यांची आवश्यकता व स्थान सांगितले आहे. तसेच आरमाराचे महत्त्व सांगितले आहे.

''आज्ञापत्र'' हा ग्रंथ त्याच्या वेगळेपणामुळे विशेष उठून दिसतो.

''आज्ञापत्र'' या ग्रंथात छोटी छोटी सुंदर, समर्पक वाक्ये वापरली आहेत. उदा. 'ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र' 'राजास भूपति असे भूमीकरिता म्हणावे, ते भूमीच गेल्यावर राज्य कशाचे करणार ? पति कोणाचा होणार ?'

प्रा. ल. रा. नशिराबाद लिहितात, 'हा छोटा ग्रंथ म्हणजे राज्यशास्त्रविषयक विचारांचा आणि अनुभवांचा अर्क आहे. राज्यशास्त्रविषयक विवेचन करणारा ''आज्ञापत्र'' हा मराठी गद्यातील पहिला ग्रंथ आहे.'

❖ ❖ ❖

घटक क्र.१०

# १०

# ग्रंथ व ग्रंथकार यांचा परिचय

## (ब) ग्रंथकार

### १. मुकुंदराज

मुकुंदराज हे मराठीतील आद्यग्रंथकार म्हणून ओळखले जातात. 'विवेकसिंधू' व 'परमामृत' या दोन ग्रंथाची निर्मिती त्यांनी केली. ज्यांना शास्त्रप्रतिनी नाही जे तर्कमुद्रेची स्थिती जाणत नाहीत अशा भाविकासाठी वरील दोन ग्रंथांची रचना मराठीत केली आहे.

मुकुंदराज यांच्या स्थळ - काळाविषयी संशोधकांत मतभेद आहेत. या मतभेदाचे कारण 'विवेकसिंधू' या ग्रंथातील पुढील ओवी आहे.

वैनगंगेचिया तीरी । मनोहर अंबानगरी ।
तेथ प्रकटले श्रीहरि। जगरिश्वरू।।

या ओवीमध्ये जी अंबानगरी आली ती कोणती ? काही विद्वान अंबानगरी म्हणजे बीड जिल्हातील अंबेजोगाई म्हणतात तर काही विद्वान अंबानगरी म्हणजे बाणगंगेच्या काठी असणारे विदर्भातील अंभोरे हे गाव समजतात. दोन्ही ठिकाणी मुकुंदराजाचा संदर्भ मिळतो. मुकुंदराज यांच्या काळाविषयी सुद्धा विद्वानामध्ये मतभेद आहेत. त्या संदर्भात 'विवेकसिंधू'त पुढील ओवी आढळते.

'शके अकराशे दाहोत्तरे । साधारण नाम संवल्सरे ।'
तै राजा शारंगधर । ग्रंथ उभारे ते जाला ।।

या ओवी १११० शके आणि साधारण संवत्सर दिले आहे. काहीच्या मत १११० शके आणि साधारण संवासर जुळत नाही. तर काहींच्या मते जुळते असा मतभेदचा मुद्या या ओवीवरून निर्माण झाला आहे. मुकुंदराजांनी आपली गुरूपरंपरा सांगितली आहे ती अशी आदिनाथ हरिनाथ, रघुनाथ - मुकुंदराज. मुकुंदराज यांनी 'विवेकसिंधू', 'परमामृत' 'पवनविजय', 'पंचीकरण', 'मूलस्तंभ' इ. ग्रंथ 'अभंग व पदे लिहिली आहेत.'

### विवेकसिंधू

'विवेकसिंधू' हा मुकुंदराजांचा प्रमुख ग्रंथ हा ग्रंथ ओवीवृत्तांत आहे. त्यामध्ये अद्वैतसिद्धांत, प्रतिपादन केला आहे. शिव विष्णू या देवतांना सारखेच वंदन केले आहे. मुकुंदराजाच्या काळात उपनिषदे, भगवतगीता, अनुगीता इ. संस्कृत ग्रंथ लोकांच्या वाचनात येत होते. परंतु सर्वसामान्यात संस्कृत येत नसल्याने त्यांच्यासाठी 'विवेकसिंधू' या ग्रंथाचे लेखन लोकभाषा मराठीतून मुकुंदराजांनी केले.

'विवेकसिंधू'ची रचना ओवी वृत्तांत आहे. त्यात अद्वैत तत्त्वज्ञान सांगितले आहे. गुरूशिष्यसंवादातून या ग्रंथाची रचना झाली आहे. साडेतीन चरणी ओवी वापरली आहे. बांधणी काटेकोर पद्धतीची असल्यामुळे तो मराठीतील आद्य ग्रंथ असू शकेल ? यावर विद्वानांमध्ये मतभेद आहेत. 'विवेकसिंधू'चा प्रभाव नंतरच्या काळातील अनेक ग्रंथावर पडलेला दिसून येतो.

## परमामृत

मुकुंदराजाचा दुसरा ग्रंथ या ग्रंथात 'विवेकसिंधू'तील तत्त्वज्ञान तत्त्वज्ञान सांगितले आहे. ओवीसंख्या ३०३ आहे. 'विवेकसिंधू'चा अन्वय सारांश येथे कथन केला असल्याचे मुकुंदराजांनी म्हटले आहे.

योगवसिष्ठातील 'अमृतापरम' या शब्दसंहितेवरून 'परमामृत' हे नाव मुकुंदराजांना सुचले असावे, असे डॉ. अ. ना. देशपांडे यांनी म्हटले आहे.

## पवनविजय

'विवेकसिंधू' या ग्रंथातील विचार शिवपार्वतीच्या संवादरूपाने मांडला आहे. तो मुकुंदराजांनी लिहिला असल्याचे परंपरा यान ते परंतु कृ.पा. कुलकर्णी यांनी म्हटले आहे. मुकुंदराज हा मराठी साहित्यातील पहाटतारा मराठी सारस्वताला पडलेले गोड स्वप्न. मराठी भाषेचा अभिमानी, त्याचे ग्रंथ काव्य आणि तत्त्वज्ञान या दृष्टिने जितके महत्त्वाचे तितकेच वाङ्मयाचे दृष्टीने महत्त्वाचे आहेत.

मुकुंदराज हे मराठीतील आद्यकवी आहेत असा त्यांचा यथोचित गौरव होत राहिला परंतु त्याचे काव्य व काळ अलीकडचा ठरतो. आद्यान्वाचा मान इतरांकडे जातो.

## २. नरेंद्र

नरेंद्र कवी हा त्याने लिहिलेल्या 'रूक्मिणी स्वयंवर' या ग्रंथामुळे प्रसिद्ध आहे. तो रामदेवराव यादव या राजाचा आश्रित होता. त्याला नरसिंह व साल असे दोन भाऊ होते. त्याने स्वतःच्या कुळाच्या उल्लेख कविकुळ असे करतो. म्हणजेच नरेंद्राप्रमाणेच साल व नरसिंह हे देखील कवी होते.

नरेंद्र कवीने 'रूक्मिणी स्वयंवर' या काव्याचे लेखन केल्यानंतर त्याने ते काव्य रामदेव यादव यास दाखविले. त्या मोबदल्यात द्रव्य देण्याची तयारी दखविली परंतु नरेंद्राने त्याला विरोध केला. नरेंद्र आपला ग्रंथ अपूर्ण आहे असे सांगून तो तेथून निघाला. व महानुभाव पंथात सामील झाला. नरेंद्र कवीचे 'रूक्मिणी स्वयंवर' हे काव्य महानुभाव पंथाच्या आती ग्रंथात विशेषत्वात उठून दिसणारे आहे. 'रूक्मिणी स्वयंवर' हा ग्रंथ पंथीय दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. ग्रंथाची भाषा, कल्पकता, प्रतिमवैचित्र्य, भक्ती, शृंगार या दृष्टीने नरेंद्र कवीचा हा ग्रंथ उजवा आहे. नरेंद्राची प्रतिभाशक्ती आणि वृत्ती ही महाकाव्याला अनुकूल अशी होती. पौराणिक विषय, धीरोदात्त नायक, नगरे, वने, उपवने, उद्याने, जलक्रीडा, चंद्रोदय, सूर्योदय, विरह असे अनेक विषय त्याने आपल्या काव्यातून आणले आहेत. कल्पनाविस्तार, अलंकार बहुलता, काव्यात्म आशय हे महाकाव्याचे विषय त्याच्या काव्यात दिसतात. त्यातून महाकाव्य निर्मितीची क्षमता दिसते.

नरेंद्र हा संस्कृत काव्याचा अभ्यासक होता. तरी त्याला मराठी भाषेबद्दल आत्मियता होती. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मराठी भाषेचे सामर्थ्य त्याने ओळखले होते. त्याच्याविषयी महानुभाव साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. अविनाश आवल गावकर लिहितात. 'नरेंद्र हा सौंदर्याचा आस्वादहा होता. संगीत, नृत्य, चित्र, शिल्प इत्यादी कलांचा जाणकार अभ्यास होता. त्यामुळे त्याची

सौंदर्यदृष्टी' अधिक विकसित झाली होती. भक्ती हे या कालखंडातील सर्वच साहित्यनिर्मितीमागचे महत्त्वाचे तत्त्व होते. या तत्वाचा केंद्रवर्ती ठेवूनच कवी नरेंद्राने आपली साहित्यविषयक भूमिका मांडली आहे.

## ३. म्हाईंभट

म्हाईंभट ऊर्फ महेंद्रभट हा नगर जिल्ह्यातील सराळे गावचा ब्राह्मण होता. तो खूप श्रीमंत व विद्वान होता. त्याला आपल्या श्रीमंतीचा व विद्वतेचा खूप गर्व होता. गणपती आपयो हे त्याचे गुरू. चक्रधराशी संबंध आल्यानंतर त्याने चक्रधरस्वामींचे शिष्यत्व स्वीकारले. म्हाईंभट महानुभाव पंथात आल्यानंतर त्याची पत्नीही संप्रदायात आली.

म्हाईंभट हा मराठीतील आद्य चरित्रकार मानला जातो त्याने लिहिलेली 'लीळाचरित्र' व 'गोविंदचरित्र' ही महानुभाव सप्रदायातील महत्त्वपूर्ण अशी चरित्रात्मक निर्मिती आहे. चक्रधरस्वामींच्या प्रयाणानंतर त्यांच्या लीळा एकत्र करण्याची कल्पना म्हाईंभटास सुचली. नागदेवाचार्यांनी या संकल्पास मान्यता दिल्यानंतर त्याने लीळा गोळा केल्या, लीळांची विश्वसनीयता पारखली यासाठी त्याला खूप कष्ट घ्यावे लागले. या सर्वातून त्याची चिकाटी व गुरूविषयी स्वामींविषयी असणारा आदर स्पष्ट होतो.

म्हाईंभट हा चक्रधरांच्या भेटीपूर्वी अहंकारी होता. स्वतःला प्रतिसूर्य किंवा ज्ञानसूर्य म्हणवून घेत असे. दिवसा दिवटी पाजळत असे. पायात गवताची वाकी घालत असे. त्यातून इतर विद्वानांची हेटाळणी करणे व स्वतः विद्वान आहोत हे सिद्ध करण्याची वृत्ती होती. चक्रधरांची भेट झाल्यानंतर त्यांच्यात अविद्यायुक्त जीवाला मोक्ष्ज्ञ कसा मिळतो. या विषयावर चर्चा झाली तेव्हापासून म्हाईंभट बदलले. चक्रधरांनी त्यांना पुढील उपदेश केला. 'लोकीचा श्रेष्ठू तो एथीची नष्टू : एथीचा श्रेष्ठू तो लोकीचा नष्टू.'

चक्रधरांच्या लीळा गोळा करण्याची व त्यांचा ग्रंथ तयार करण्याची म्हाईंभटांची कल्पना ही खरोखरच त्या काळात रम्य कल्पना होती. स्वामींच्या लीळा गोळा करण्यात त्यांचा भक्तिभांव, निष्ठा, अलिप्तपणा, वस्तुनिष्ठपणा, सत्यनिष्ठा दिसते. म्हाईंभटाने चक्रधरांच्या हजार भटतील इतक्या आठवणींनी चक्रधरांचे व्यक्तिमत्त्व प्रकट केले आहे. यातून त्याचा हात कच्चा नाही तर तयार झालेला कसलेला वाटतो.

## ४. खळो व्यास

खळोव्यास हा कवी साती ग्रंथातील 'सह्याद्रीवर्णन' या ग्रंथाचा कर्ता होय. खळो व्यास याची गुरूपरंपरा जनार्दन - कमळांबा - हिरांबिकी - खळो व्यास अशी होती. राम व्यास हे त्याचे नाव असले तरी तो महानुभाव पंथात तो खळो व्यास या नावाने प्रसिद्ध आहे. खळो व्यास यांनी सकळी या लिपीचा शोध व वापर प्रथम केला. महानुभावाचे वाङ्मय पारतंत्र्यात सांभाळून ठेवण्यासाठी, शुद्ध ठेवण्यासाठी ही लिपी महत्त्वाची ठरली.

'सह्याद्रीवर्णन' हा खळोव्यास यांचा ग्रंथ साती ग्रंथात समाविष्ठ आहे. हा ग्रंथ केवळ स्थळवर्णन पर ग्रंथ नाही तर त्यात दत्तात्रेयप्रभूचे चरित्र वर्णन केले आहे. खळो व्यास यांनी दत्तात्रेयाचे चरित्र सांगत असतानाच श्री चक्रधरांचे व स्वतःचेही चरित्र 'सह्याद्रीवर्णना'त सांगून टाकले आहे.

## ५. महदंबा

महदंबा ऊर्फ महदाईसा या नावाने ओळखला जाणाऱ्या या कवयित्रीला आणखी काही नावे होती. ती आद्य मराठी कवयित्री होती. ती रूपाईसा या नावानेही ओळखली जात असे. तिने आपले संपूर्ण आयुष्य महानुभाव पंथाच्या प्रसारार्थ वेचले. ती चतुर सडेतोड वृत्तीची होती. तिच्यावर चक्रधरांचा विश्वास होता. चक्रधरांच्या अनुशेनेच ती गोविंदप्रभूजवळ राहिली. तिच्या जन्ममृत्युबद्दल माहिती नाही.

महानुभाव संप्रदायात तिचे धवळे प्रसिद्ध आहेत. धवळे म्हणजे लग्न - विवाहाप्रसंगी गावयाचे विवाहविषयक गीते होय. गोविंदप्रभूंना एकदा विवाह प्रवृत्ती झाली. तेव्हा त्यांनी महंदबेला विवाहविषयक गीते म्हणावयास सांगितली. या गीतात विवाहाच्या प्रारंभापासून अखेरीपर्यंत वर्णन आले आहे. धवळ्यातील मुख्य विषय रूक्मिणीस्वयंवराचा आहे. धवळ्याच्या प्रारंभी रूक्मिणीहरणाचा कथाभाग आला आहे. तर उत्तरार्धात स्वयंवराचे वर्णन आले आहे. उत्तरार्धात पासष्ट कडवे आहेत. ते वाचताना महदंबेचे शीघ्र कवित्व दिसते.

महदंबेने धवळ्याप्रमाणेच 'मातृकी रूक्मिणी स्वयंवर' या काव्याचीही निर्मिती केली आहे. त्याची ओवीसंख्या १०९ आहे. या काव्याचा विशेष असा की, यातील कडव्यात मातृकात अ आ इ ई पासूनची अक्षरे आणली आहेत. उदा. कासे पितांबरू कंठी कुंदमाळा : कांतु शोभे सावळा : रूक्मिणीचा ।।१।। प्रत्येक ओळीतील आद्य अक्षरांचा क्रम साधण्याचा तिचा प्रयत्न आहे. हाच प्रकार नंतरच्या काळात पंडिती काव्यात सर्वत्र दिसतो. कृष्णवर्णन, विप्राची पाठवणी, कृष्णदर्शनामुळे रूक्मिणीने सज्जावरून उडी घेणे इ. प्रसंग आले आहेत. 'गर्भकांड ओव्या' हे महदंबेने लिहिलेले एक छोटेसे प्रकरण आध्यात्मिक विषयावरच आहे.

महंदेबेचे महानुभाव संप्रदायात महत्त्वाचे स्थान होते. 'तरि मज वेष द्यावा' असे ती म्हणते. तिला पंथाचा वेष दिला जातो. ती मठव्यवस्था बघणे, सर्व भक्तांची उठाबस करते, चक्रधरांचा पूजावसर सांभाळते. संन्यासिनींवर करडी नजर ठेवते. त्यांना फटकारते. यावरून महानुभाव संप्रदायाची शिस्त तिने स्वीकारली होती. तिच्याविषयी डॉ. उषा मा. देशमुख लिहितात, 'तिच्या मानसिक आणि शारीरिक कोंडमाऱ्याचे चित्र तिच्या कृती-उक्तीतून लीळाचरित्रात दिसून येते. सैन्यासीपण, निवृत्ती, जीवन भोगापासून दूर राहणे आणि आध्यात्मिक पातळीवर विचारदर्शन घडविणे अशी महंदबेच्या आयुष्याची वाटचाल ठरली.' महदेबा संवेदनशील, सौंदर्यदृष्टी असलेली, नीटनेटकेपणा, चौकसपणा, जिज्ञासूपणा असलेली सुगरण, संगीताचा सूर असणारी, गाणे गाणारी, रांगोळी सुंदर काढणारी दक्ष कार्यकर्ती होती. नागदेवाचार्यांनी 'म्हातारी माझी प्रीतिदक्षः धर्मरक्षक की गाः' असे म्हटले आहे.

## ६. ज्ञानेश्वर (इ.स १२७५ ते इ.स. १२९६)

संत ज्ञानेश्वर हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे कवी होय. त्यांनी वारकरी संप्रदायाला नवे रूप, नवा आकार दिला. त्यांनी पुढील ग्रंथाचे लेखन केले आहे.

१. ज्ञानेश्वरी (इ.स. १२९०)
२. अमृतानुभव (इ.स. १२९२)
३. चांगदेव पासष्टी (इ.स. १२२४)

४. हरिपाठाचे अभंग
५. अभंग, गौळणी

याशिवाय उत्तरगीता, प्राकृतगीता, पंचीकरण, मुद्राप्रकाश इ. प्रकरणे ज्ञानेश्वराच्या नावावर आहेत. परंतु भाषादृष्ट्या आणि आशयदृष्ट्या ती त्यांची नसावीत असे संशोधकांचे मत आहे.

## ज्ञानेश्वरी (इ.स. १२९०)

ज्ञानेश्वरी ही ज्ञानेश्वरांची भगवद्गीतेवरील टीका होय. हा मराठीतील लोकप्रिय असा ग्रंथ असून वारकरी संप्रदायाचा पवित्र ग्रंथ आहे. भाषासौंदर्य, तत्त्वज्ञान, साक्षात्कार, भक्ती, अद्वैतविचार यांची सांगड या ग्रंथात घातली गेली आहे.

## अमृतानुभव (इ.स. १२९२)

ज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या निर्मितीनंतर वेदांतावर स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याच्या उद्देशाने अमृतानुभावाची निर्मिती झाली या ग्रंथात १० प्रकरणे असून ८०४ ओव्या आहेत. या ग्रंथात ज्ञानेश्वरांनी त्यांचा आवडता चिदविलासवाद सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

अमृतानुभाव हा ग्रंथ स्वतः ज्ञानेश्वरांच्या अनुभवावरच आधारलेला असल्याने या ग्रंथाचे नामकरण अमृतानुभव असे केले असावे. ज्ञानेश्वरांनी आपल्या या ग्रंथास 'अनुभवामृत' असे म्हटले आहे. अमृतानुवाच्या पहिल्या पाच श्लोकात अक्षर, आनंद, अव्यय अशी परब्रह्माची विशेषणे सांगून आपल्या गुरूची (निवृत्ती) ओळख करून दिली आहे. शिवशक्ती प्रकृत्ती पुरूष यांच्या ऐक्याचे वर्णन पती - पत्नीच्या रूपकातून काव्यमय असे केले आहे.

## चांगदेवपासष्टी (इ.स. १२९४)

चांगदेवपासष्टी हा ज्ञानेश्वराचा छोटा ग्रंथ आहे. योगी चांगदेव यांच्या कोऱ्या पत्रास उत्तर म्हणून पासष्ट ओव्यांचा जन्म झाला. हा ग्रंथ प्रासंगिक असला तरी तत्त्वज्ञानपर आहे. 'अमृतानुभव' या ग्रंथातील तत्त्वज्ञान सूत्रबद्ध रितीने आले आहे. चांगदेव पासष्टीतील भाषा प्रासादिक व माधुर्यपूर्ण आहे.

स्वस्ति श्री वहेशु। जो लपोनि जगद्भासु ।
दावी मग ग्रासू । प्रकटला करी ।।

जगात परमात्मा एकच आहे. हे सांगण्यासाठी दृष्टांत दिले आहेत. ज्ञानेश्वर व चांगदेव एकच आहेत असे ऐक्य सांगितले आहे.

**अभंग व पदे**

ज्ञानेश्वरांच्या अभंगाची संख्या ७६५ आहे. जीवनदृष्टी आणि तत्वज्ञान सर्वसामान्यपर्यंत पोचवणे हे त्यांच्या अभंगरचने मागील हेतू होता. कीर्तनाच्या ओघात आपला अनुभव व्यक्त करण्यासाठी, कधी उपदेशासाठी अभंग निर्मिती झाली आहे. कृष्णलीला, बालक्रीडा असे वर्णनपर अभंग आहेत. टिपरी, पाळणा, हमामा, घोंगडी, फुगडी अशा रूपकांच्या द्वारे भक्तिमार्ग सोपा करून सांगितला आहे.

**हरिपाठ**

वारकऱ्यांच्या नित्यपाठासाठी हरिपाठाचा जन्म झाला. लहान-लहान असे २८ अभंग हरिपाठात आहेत. 'हरिपाठ' गायत्री मंत्राइतकेच वारकरी संप्रदायात पूज्य मानले जातात.

संत ज्ञानेश्वरांचे वारकरी संप्रदायात व मराठी वाङ्मयात महत्त्वाचे स्थान आहे. संत बहिणाबाईंनी वारकरी संप्रदायाचा इतिहास एका अभंगात सांगितला आहे. त्या म्हणतात, 'ज्ञानदेवे रचिला पाया' यावरून वारकरी संप्रदायाचा पाया घालण्याचे काम ज्ञानेश्वरांनी केले आहे. संत मंडळाचे अध्यक्ष, आचार्य, गुरू ज्ञानेश्वर हेच आहेत. त्यांनी संत संघटना केली. सर्वांना एकत्र आणले. सर्वांना स्वसुखाचा मार्ग दाखविला. त्यांच्या कार्याविषयी प्रा. घाटोळे लिहितात, ''धर्मनिष्ठा जागृत करणे, धर्माच्या रूपाने महाराष्ट्राची अस्मिता कायम ठेवणे. भिन्न भिन्न उपास्यदैवते व उपासना संप्रदायांना एका सूत्रात आणण्याचे कार्य वारकरी पंथाच्या द्वारे ज्ञानेश्वरांनी केले हेच त्यांचे खरे कर्तव्य होय.''

## संत नामदेव (इ.स. १२७० ते इ.स. १३४०)

संत नामदेव हे शिंपी जातीत जन्माला आलेले संत होते. त्याच्या घराण्यात पंढरपूरच्या विठ्ठलाची उपासना होती. बालपणापासूनच त्यांना नामस्मरणाचा छंद होता. नामदेवांची कीर्ति ज्ञानेश्वर व भावडांच्या कानावर गेल्यानंतर त्यांनी पंढरपूरला नामदेवांची भेट घेतली. ज्ञानेश्वरांच्या भेटीनंतर नामदेवांनी तीर्थयात्रा केली. गुरूकृपेनंतर त्यांनी अभंगरचनेस प्रारंभ केला. कथा कीर्तनाच्या माध्यमातून भक्तीचा प्रभावी प्रसार नामदेवांनी केला. त्याचे कार्य फक्त महाराष्ट्रापुरतेच मर्यादित नव्हते तर त्यांनी पंजाबात, उत्तर भारतात जाऊन वारकरी पंथाची शिकवण तेथील लोकांपर्यंत पोहचविली.

संत नामदेव यांच्याविषयी बरेच वाद (मतमतांतरे) दिसतात. त्यांच्या जन्माविषयी, जन्मकाळाविषयी, जन्मगावाविषयी, एक की अनेक याविषयी वाद आहेत. नामदेवाने आपल्या जन्माविषयी लिहिल्या लिहिलेल्या काव्य पंक्ती पुढीलप्रमाणे आहेत. अधिक ब्याण्णव गणित अकराशंने । उगवता अदित्य रोहिणीशी ।
शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार । प्रमोद संवासर शालिवाहन शके ।।

संत नामदेवांची गुरूपरंपरा निवृत्ती, सोपान, विसोबा, खेचर, नामदेव परिसराभागवत अशी आहे. संत नामदेवांनी अभंगनिर्मिती केली. त्यांच्या अभंगागाथेत त्याच्या संत होईपर्यंतच्या वाटचालीचे विविध अनुभव उत्कटतेने व्यक्त झाले आहेत. ज्ञानेश्वर व त्यांची भांवडे, समकालीन संत चरित्रे, आत्मचरित्रे, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन, कूटरचना, आख्यान कविता इ. प्रकारची रचना केली आहे. तसेच नामदेवाने मराठी प्रमाणेच पंजाबी व हिंदी भाषेतूनही अभंग लिहिले आहेत. संत नामदेवांच्या अभंगगाथेतून त्यांच्या संसारिक जीवनावर प्रकाश पडतो. विठ्ठल हे नामदेवाचे आराध्य दैवत, त्यांनी विठ्ठलाचे निर्गुण-निराकर रूपात वर्णन केले आहे. ईश्वराची चरणसेवा जन्मोजन्मी घडत राहावी असे नामदेवाला वाटते. नामदेव हेच मागणे परमेश्वराजवळ मागत आहे. नामदेवांची अभंगवाणी मनाच्या अत्यंत तळमळीतून जन्मास आली आहे. विठ्ठलभक्तीची आर्तता व नामदेवाच्या शब्दाशब्दामधून व्यक्त होते. नामदेवाने आपल्या अभंगातून ज्ञानेश्वरादी भावंडाची चरित्रे सांगितली आहेत. 'समाधी' प्रकरणात या चार भावंडाच्या समाधी प्रसंगाचे वर्णन केले आहे. समाधीप्रसंगी नामदेव स्वतः असल्याने ते प्रसंग हृदयद्रावक झाले आहेत.

'बांधल्या तळ्याचा फुटलासे पाटाओघा बारा घाट मुरडताती' अशी निवृत्तीची अवस्था वर्णन केली आहे. इतर भावंडाची अवस्था, व्याकुळता अत्यंत उत्कटतेने पुढील प्रमाणे व्यक्त होते.

हरिणीविण खोंपी पडियेली ओस । दशदिशा पाडस भ्रमताती ।।

नामदेवाने लिहिलेले हे अभंग अत्यंत आत्मियतेने लिहिलेले आहे. नामदेवांनी लिहिलेल्या आत्मपर अभंगातून त्याचे आत्मचरित्र आले आहे. त्याच्या ८० वर्षाच्या दीर्घायुष्यातील अनेक घटना - प्रसंगाचा उलगडा या अभंगातून होतो. नामदेव उत्तर भारतात अगदी पंजाब पर्यंत पोहचले तेथे त्यांनी नामभक्तीचा प्रसार केला त्यासाठी तेथील लोकभाषा त्यांनी स्वीकारली व आत्मसात केली हिंदी भाषेत रचना केली. त्यांची एकसष्ट पदे शिखांच्या 'ग्रंथसाहेब' या ग्रंथात समाविष्ठ केली आहे. त्यामुळे पंजाबातील लोकांना नामदेव परके वाटत नाहीत.

नामदेवाच्या हिंदी रचनेत संतमहिमा, गुरू महिमा, नाममहिमा, दुर्जनावर हल्ला असे विषय आहेत. तसेच ब्रह्म जीव जगत, भक्ती, पूजन - अर्चन, लोकव्यवहारातील पाखंड इ. संबंधीचा दृष्टिकोन प्रकट झाला आहे. 'शतकोटी अभंग करीन' अशी प्रतिज्ञा करणाऱ्या नामदेवाचे वर्णन 'लोकमतानुवर्ती कालाचे प्रवर्तक' असे गुरूदेव रानडे यांनी केले आहे.

## ८. मुक्ताबाई (इ.स १२७७ ते इ.स १२९७)

मुक्ताबाई ही संत ज्ञानेश्वरांची लहान बहीण होय. ती संतमंडळात सर्वांत लहान असली तरी तिची आध्यात्मिक योग्यता, अधिकार खूप मोठा होता. तिला निवृत्तीनाथांकडून ज्ञानाधिकार प्राप्त झालेला होता. योगानुभावात ती निष्णात होती. अद्वैतबोध, सगुणभक्ती यामध्ये तिची उत्कटता दिसून येते. योगी चांगदेवाची ती गुरू होती. नामदेवाचा अहंकार तिनेच दूर केला. ज्ञानेश्वरांसारख्या महान संताला कार्यप्रवृत्त केले यावरून तिचा अधिकार स्पष्ट होतो.

संत मुक्ताबाईने अभंगरचना केली आहे. पंढरीमहात्म्य नाममहात्म्य, संत समागम या विषयावर तिने अभंगरचना केली आहे. तिचे ताटीचे अभंग गोड आणि प्रसिद्ध आहेत. ज्ञानेश्वरांचा सामाजिक जाचाचे खिन्न झाले आणि आपल्या झोपडीचे दार बंद करून बसले तेव्हा मुक्ताबाईनेच त्यांना कार्यप्रवृत्त केले या अभंगात जनाबाईने पुढीलप्रमाणे आवाहन ज्ञानेश्वरांना केले आहे

मजवर दया करा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।
संत जेणे व्हावे । तेणे जग बोलणे सोसावे ।।

या अभंगातून तिचा लडिवाळपणा, धिटाई व्यक्त झाली आहे. यातून तिला असणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या योग्यतेची जाणिवही व्यक्त झाली आहे. 'तुम्ही तरूनी विश्व तारा' असे ती ज्ञानेश्वरांना म्हणते. ज्ञानेश्वरांसारख्या ज्ञानयोगी संताचा रूसवा त्यांच्या लहान बहिणीने काढावा हा प्रसंग भावपूर्ण व नाट्यमय आहे. ताटीच्या अभंगातून तिचे ज्ञानेश्वराविषयीचे प्रेम दिसते तसेच त्यांना कार्यप्रवृत्त करण्याची तळमळ सुद्धा दिसते.

संत मुक्ताबाईचे हरिपाठ प्रसिद्ध आहेत. संत जनाबाईबरोबर तिने म्हटलेल्या ओव्यांमधून योगमार्गाचे ज्ञान प्रकट झाले आहे. तिने कूटकाव्यासारखी रचना केली आहे. 'मुंगी उडाली

आकाशी । तिने गिळिले सूर्याशी । थोर नवलाव जाहला । वांझे पुत्र प्रसवला । विंचू पाताळाशी जाया शेष माथा वंदी पाया । माशी घाली घार झाली। देखोनि मुक्ताई हसली ।।' अशा कूट रचनामधून मुक्ताबाईने आपले आध्यात्मिक अनुभव व्यक्त केले आहेत. मुक्ताबाई आपले आध्यात्मिक अनुभव व्यक्त केले आहेत. मुक्ताबाई चांगदेवासारख्या योग्याची गुरू झाली 'मुक्ताईने चांगा घेतलासे पोटा' यावरून तिची आध्यात्मिक योग्यता लक्षात येते. तिने योगी चांगदेवाला लहान मूल मानले. ती त्याला ज्ञानामृताने न्हाऊ घालते. अव्यक्ताने विणलेल्या अविनाशी पाळण्यात टाकते. त्याचे नामकरण करते अनुहात टाळी वाजवून त्याला स्वरूपी निजविते आणि मनरूपी पवनाची दोरी घेऊन त्याचा डोळा अलक्षी स्थिर करते. ही सांगरूपकाची पद्धत तिने ज्ञानेश्वरांकडून स्वीकारली असावी.

मुक्ताबाई शेवटपर्यंत विरक्त वृत्तीने राहिली. मरणसमयी तिचे वय सोळा वर्षाचे होते. तिने अभंग, पदे, कल्याणपत्रिका, हरिपाठ इ. रचना केल्या आहेत.

## ९. सावता माळी (इ.स १२४० ते इ.स १२९५)

संत मंडळातील समतेच्या वातावरणामुळे समाजातील विविध समाजघटकातील, जातीतील संत वारकरी पंथाच्या झेंड्याखाली एकत्र आले. त्यातील एक महत्त्वाचा संत म्हणजे सावता माळी होय. ते माळी समाजातील होते. त्यांचे वास्तव्य अरणी या गावी होते.

ज्ञानेश्वरांच्या प्रभावाने ते संप्रदायात दाखल झाले. नामदेवांचाही त्यांच्यावर प्रभाव पडला. त्याचा स्वतःचा शेत मळा होता तरी त्यांच्या भक्तिमार्गात अडचण आली नाही. सावता माळी वृत्तीने शांत, स्वभावाने प्रेमळ व समाधानी होते. त्यांच्या अभंगातून उत्कट भक्तीचे प्रतिबिंब दिसते. आपल्या स्वतःच्या जातीबद्दल त्यांनी अभिमान व्यक्त केला आहे. ते म्हणतात,
'बरी केली हीन याती । नाही वाढल्झी महती ।' असा हा निरहंकारी माणूस होता. सावता माळी यांना परमेश्वराच्या सर्वव्यापित्वाबद्दल शंका नव्हती. आपल्या व्यवसायातही त्यांनी परमार्थ पाहिला.

कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ।।
लसून मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरि ।।
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।
सावता म्हणे केला मळा । विठ्ठल पायी गोविला गळा ।।

अशा प्रकारे त्याच्या अभंगातून त्याच्या व्यवसायातील कितीतरी शब्द, उपमा, रूपकांच्या रूपाने येतात. सावता माळी यांची अभंगरचना खूप थोडी आहे. सकल संत गाथेत सावताचे फक्त बारा अभंग आलेले आहेत. पण त्यामध्ये भावनेचा भाग अधिक आहे. वर्णनशैली साधी, सोपी आहे. सहजसुंदर आहे जातीने माळी असल्याने त्यांनी आपल्या मनातही भक्तीचा मळा फुलविला ते सुखी समाधानी असल्याने त्यांच्या मनाचे प्रतिबिंब अभंगात पडले आहे. नामभक्तीच्या पाण्यावर त्यांच्या शेतातील 'शांती शेवंती फुलली । प्रेम जाई जुई घाली' ही ओळ त्यांच्या प्रसन्न अभंगवाणीचे प्रतिक आहे.

सावतामाळी शेतकरी असल्याने शेती व्यवसायातील भाषेतून परमार्थ सांगण्याचा प्रयत्न सावता माळी यांनी केला आहे. ते वारकरी पंथाचे तत्त्वज्ञान सुलभतेने सांगताना दिसतात. त्यात

शेतीव्यवसायाशी संबंधित शब्द, प्रतिमा येतात. उदा.

कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ।
किंवा आमुची माळ्याची जात । शेत लावू बागाईत ।।
लसून मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।।
अशा प्रकारे स्वधर्माचरणातून परमार्थाची वाटचाल स्पष्ट दिसते.

नाममहात्म्याबद्दल सावता माळी लिहितात, 'नामाचित्रे बळे न भिऊ सर्वथा । कळिकाळाचेही माथे सोटे मारू ।। आपण कष्ट करीत सर्व आयुष्य घातले. नामभक्ती पासून दूर राहिलो. याची खंत सावळी माळी व्यक्त करतात. ती पुढील शब्दांत,

कष्ट करीता जन्म गेला । तुझा विसर पडला ।।

संत नामदेवाने - सावता माळी यांचे वर्णन 'सावता सागर प्रेमाचा सागर' असे करतात. सावतामाळी याचे एक भावकवी म्हणून स्थान महत्त्वाचे नसले तरी आध्यात्मिक लोकशाहीचा घटक म्हणून त्यांचे स्थान निश्चितच वरचे आहे. भक्तिकाव्याचा प्रवाह समाजातील खालच्या थरापर्यंत पोहोचलेला होता. याचे ते निदर्शक आहे. संयमित शब्दातून प्रकट झालेल्या भवनांचा आस्वाद घेताना हृदय शांतरसाने भरून जाते.

## चोखा मेळा (इ.स १२४० ते इ.स १३३८)

चोखा मेळा हा नामदेवाचा शिष्य असून मंगळवेठा येथे राहणारा होता. संत नामदेवांनी त्यांची पंढरपूर येथे समाधी बांधली आहे. हे महार जातीत जन्माला आले होते. त्यांना वारकरी संप्रदायाच्या उदार विचारामुळे, वागणुकीमुळे हीन जातीत जन्माला येऊनही चांगली वागणूक मिळाली. त्यामुळे ते विठ्ठलाच्या भक्तीत व वारकरी संप्रदायात रमले. त्याचे सर्व कुटुंबच विठ्ठलभक्तीत रमले होते. पत्नी सोयराबाई बहीण-निर्मळा, मुलगा कर्ममेळा, मेहुणा बंका या सर्वांनी वाङ्मय रचना केली आहे. या सर्वांनी आपापल्या अभंगातून सरळ, सोप्या, शब्दांमधून आपली सामाजिक व्यथा व्यक्त केली आहे. चोखा मेळा हा अत्यंज असल्याने त्याचा छळ होत असे त्याचे वर्णन त्याने आपल्या अभंगातून केले आहे.

हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ।।
किंवा मज दूर दूर हो म्हणती ।। तुज भेटू कवण्या उपायी ।।

ही व्यथा व्यक्त होते. कधी त्यांच्यावर अन्याय होत असताना तो परमेश्वराला हाक मारतो. विठ्ठलाचा धावा करतो. 'धाव घाली विठू आता चालू नको मंद' आपण अस्पृश्य आहोत. आपल्यामुळे सर्वांना पावन करणारा देव वाटतो. देवाला विटाळ होते ही कल्पनाच त्याला पटत नाही. त्यामुळे तो परमेश्वराला रोखठोक प्रश्न विचारतो, 'कोण तो सोवळा । कोण तो ओवळा । या दोहांच्या वेगळा । विठू माझा ।।' सोवळ्या ओवळ्यांचे बंड माजविणाऱ्यांना 'देहासि विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध बद्ध ' अशी समज चोखोबांनी दिली आहे. 'सोवळा - ओवळा' या अभंगात सोवळ्या-ओवळ्यात न गवसलेले परमार्थ चोखोबांनी मार्मिक शब्दात व्यक्त केले आहे. चोखा मेळा याने नाममहात्म्य मुक्त कंठाने गायले आहे. 'अवघ्या साधनांचे सार रामकृष्ण हा उच्चार' या अभंगात ईश्वरनामाचे महात्म्य त्यांनी सांगितले आहे. नामाच्या उच्चाराने शुद्ध होता

येते असे त्यांना वाटत असे. ते म्हणतात, 'खट-नट यावे शुद्ध होऊनि जावे, दवंडी पिटी भावे चोखा मेळा' वारकरी संप्रदायाच्या झेंड्याखाली सर्व पतितांनी यावे व शुद्ध होऊन जावे असे आवाहन चोखा मेळा यांनी आत्मविश्वासाने केले आहे.

विठ्ठलाचे वर्णन करताना 'वैकुंठ पंढरी भीवरेच्या तीरी ।। प्रत्यक्ष श्रीहरि उभा तेथे ।। पंढरीचा महिमा ते पुढील शब्दात गातात' 'पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी । प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे ।। पंढरपूर क्षेत्राबद्दल चोखोबा आपला अनुभव व या क्षेत्राचे वेगळेपण व्यक्त करतात.' 'बहुत हिंडलो देशदेशांतरा । परि मन नाही स्थिर झाले कोठे ।। पंढरपूर येथे आल्यानंतर कष्ट दूर झाले असे चोखा मेळा यांनी म्हटले आहे.' चोखामेळा यांचे अभंग भक्तिभावाने ओथंबलेले आहेत. त्यामध्ये त्यांची जिवंत अनुभूती व्यक्त होते. त्या अभंगात कारूण्यही भरलेले आहे. चोखामेळा कधी परमेश्वराचे प्रेम, कधी उदासिनता, कधी चिंता, कधी कारूणा, अशा भावना व्यक्त करतात. त्यातून त्यांचा विठ्ठलाच्या ठिकाणी असणारा शुद्ध भाव व्यक्त होतो. त्यासाठी त्यांनी सुरेख उपमा वापरल्या आहेत.

ऊस डोंगा परि रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरीलिये रंगा ।।
नदी डोंगी परि जल नोहे डोंगे । काय भुललासी वरीलिये रंगे ।।
चोखोबांच्या प्रसिद्ध अभंगातून त्यांच्या कवित्वशक्तीचा प्रत्यय येतो. आणि अंतकरणातील शुद्ध भावही समजतो. संत चोखा मेळा यांचे 'रूक्लसंतगाथे'त १५७ अभंग आहेत. त्यांच्या नावावर 'विवेकदर्पण' नावाचे एक प्रकरणही आहे. संत चोखा मेळा यांच्या अभंगातून त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीचा उल्लेख आलेला आहे. चोखोबा निरक्षर असल्याने त्याच्या अभंगात पुनरावृत्ती आढळते. रचनेत सफाईदारपणा नाही. हे दोष असूनही त्यांचे अभंग मनाची पकड घेतात.

## ११. जनाबाई

जनाबाई ही आई-बापाविना पोरकी झालेली कवयित्री म्हणजे संत मेळ्यातील एक भूषण होय. तिच्यावर संत ज्ञानेश्वर व नामदेवांचा प्रभाव पडलेला दिसतो. तिच्या अभंगात ज्ञानेश्वरांची योगानुभूती व नामदेवांची सगुणभक्ती दिसते. जनाबाईने कृष्णजन्म, बालक्रीडा, काला, ज्ञानेश्वरस्तुती, दशावतार, थालीपाक, तीर्थावली, पाळणा, काकड आरती इ. विषयावर अभंगरचना केली आहे. जनाबाईने लिहिलेल्या अभंगातून भक्ताची आर्तता जाणवते. जनाबाई विठ्ठलाशी व पंढरपूरच्या वातावरणाशी एकरूप झाली होती. पांडुरंगाच्या भेटीसाठी ती व्याकुळ होते. विठ्ठलाने आपल्याला त्यांच्या चरणापाशी घ्यावे म्हणून ती म्हणते,
माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।।
मी तुझे गा लेकरू । नको आता दूरी करू ।।
देव सहजासहजी भेटत नाही. त्याच्यासाठी देहभाव विसरणे आवश्यक आहे.

'विराल्यावाचुनी देह अहंभाव । जनी म्हणे देव हाता नये ।।
देव भावाचा भुकेला आहे. तो भक्ताच्या हाकेला धावून येतो. तो उच्च - नीच पाहत नाही. असा तिचा दृढ विश्वास आहे. देव भक्तांसाठी धावून आल्याचे तिच्या अनेक अभंगातून उदाहरणासह दाखविले आहे.' जनाबाईच्या अभंगातून तिच्या भावना अकृत्रिमपणे व्यक्त होतात. ती देवाला आंजारते - गोंजारते, त्याची विनवणी करते. त्याच्यावर रागावते, त्याला शिव्या देते, शिव्या देताना म्हणते, 'अरे विठ्या अरे विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ।। तुझे गेले मठे । तुला पाहूनि काळ रडे ।। उभी राहूनी अंगणी शिव्या देती दासी जनी ।।' जनाबाईच्या अंतकरणात त्या त्या

क्षणी निर्माण झालेल्या हर्ष-मर्षादि भावना अभंगरूप झाल्या आहेत. त्यामुळे तिच्या काव्यात भावनेचा सहजोद्रेक झालेला दिसतो. त्यामुळे तिच्या रचना खऱ्या अर्थाने उत्कृष्ट भावगीतेच आहेत. जनाबाईच्या अभंगातून सर्वच भावना व्यक्त झाल्या आहेत. तिच्या अभंगात उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत ज्ञानेश्वर नामदेवासारखेच असले तरी तिची बावनकशी तळमळ व्यक्त होते. तिच्या काव्यात सफाईदारपणा आढळत नाही. हा त्या काव्याचा दोष न ठरता गुणच ठरतो.

जनाबाईने नाममहात्म्य मोठ्या भक्तिभावाने गायले आहे. नामभक्तीचा मार्ग सोपा असल्याचे सांगितले आहे. 'नाम फुकट चोखा । नाम घेता नन ये वीटा जड शिला ज्या सागरी । आत्मारामे नामे तारी ।। ' असे नाममहात्म्य सांगितले असून 'नाम विठोबाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे । नाम तारक हे थोर । नामे तारिले अपार । असा उपदेश ती करते. पांडुरंग नामाचा जप हे आपले महातप आहे. असा तिचा दृढ विश्वास आहे.' जनाबाई कधी पांडुरंगाला भेटीची विनंती करते त्याला लहान मूल कल्पून त्याच्याशी प्रेमाने बोलते. कधी तो संतांसाठी, भक्तासाठी कसा धावून येतो. याचे वर्णन करते. पंढरीचा पांडुरंग द्वाड आहे. तो आपल्याला भेट देत नाही. म्हणून ती रागावते. त्याच्याशी भांडते त्याला शिव्या देते. स्वतः निराधार आहोत त्याच्याशिवाय आपल्याला कोणीच नाही असे सांगते. या सर्वातून जनाबाईच्या मनातील विठ्ठलाविषयीचा आर्त भाव, त्याच्या भेटीची तळमळ, उताविळता, तो भेटल्यानंतर होणारा हर्ष, परमेश्वरावर व्यक्त होणारा संदेह, त्याने भेट द्यावी म्हणून भाकलेली करूणा, त्याच्यावरचा अविश्वास, अशा परस्पर - विरोधी भावना व्यक्त होतात.

विठ्ठल व संतमेळा यांचे सुंदर चित्र जनाबाईने 'विठू माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।' या अभंगात रेखाटले आहे.

येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई । भीमा आणि चंद्रभागा । तुझ्या चरणीच्या गंगा ।। अशी विठ्ठलाची विनंतीही ती करते. यामधून तिची वत्सल भावनाच व्यक्त होते.

जनाबाईने लिहिलेल्या नामदेव, ज्ञानदेव, सेना न्हावी यांच्या चरित्रपर अभंगातून तिच्या असामान्य विठ्ठलभक्तीचे वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरांबद्दलचा आदरभाव पुढील पंक्तीतून व्यक्त झाला आहे.

ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ।
मरोनि या जावे । तुझ्या पोटा यावे ।।

जनाबाईचे सर्वच अभंग गोड आहेत. साध्या सरळ शब्दात अकृत्रिमपणे सर्व भावना व्यक्त केल्याने तिचे अभंग परिणामकारक झाले आहेत. प्रा. ह. श्री. शेणोलीकर लिहितात, 'जनाबाई भक्तिसंप्रदायातील एक पाईक असली तरी काव्यदृष्ट्या तिच्या अभंगवाणीचे स्थान फार वरचे आहे. आध्यात्मिक अधिकाराच्या दृष्टीनेही जनाबाई मुक्ताबाईच्या जवळ गेल्यासारखे वाटते.'

## १२. एकनाथ (इ.स १५३३ ते इ.स १५९९)

संत एकनाथ महाराष्ट्राचे नाथ म्हणून प्रसिद्ध आहेत. एकनाथांचे कीर्तन फार लोकप्रिय होते. त्यांचे लोकजागृतीचे कार्य मराठीतूनच चालत असे. त्याच्या काळात महाराष्ट्रात पारतंत्र्य

होते. मुसलमानी आक्रमणामुळे बरीच बंधने महाराष्ट्रावर पडली होती. मराठी भाषा संस्कृती, हिंदू धर्म यांची गळचेपी झालेली होती. सर्व वर्ण आपापले कर्म विसरले होते. कर्मकांडालाच महत्त्व प्राप्त झाले होते. ब्राह्मणतेज, क्षात्रतेज लोपून गेले होते. अशा अंधारयुगातून महाराष्ट्रातील लोकांना बाहेर काढण्याचे काम एकनाथांनी केले.

**ग्रंथसंपदा**

एकनाथाची भागवत, चतु:श्लोकी भागवत, रूक्मिणीस्वयंवर, भावार्थ रामायण, अभंग, आरत्या, गोळणा, भारूडे, अर्जदास्त्र, जोहार, पौराणिक आख्याने, आध्यात्मिक प्रकरणे, संत चरित्रे इ.

## चतु:श्लोकी भागवत

भागवताच्या द्वितीय स्वंधातील नवव्या आध्यायातील ३२ ते ३४ या श्लोकावर केलेली मराठी टीका म्हणजे चतु:श्लोकी भागवत होय. त्यामध्ये नाथांच्या स्वभावातील नम्रता दिसते. आत्मविश्वास कोटीक्रम वक्तृत्वशैली, परमंतखंडन, चातुर्यपूर्ण संवादयोजना, या ग्रंथात दिसते. भागवताचे सार या ग्रंथात एकटवले आहेत.

## एकनाथी भागवत

चतु:श्लोकी भागवताच्या निर्मितीनंतर संपूर्ण एकदश स्कंघावर निर्मिती करावी या हेतूने या ग्रंथाची निर्मिती झाली आहे. भागवत धर्माचे स्वरूप, तत्त्वज्ञान, ध्येय, उद्दिष्ट्ये, वैशिष्ट्ये यांचे विस्तृत विवेचन केले आहे. या ग्रंथात नाथांनी मराठी भाषाभिमान व्यक्त केला आहे. एकनाथांनी या ग्रंथाची मराठीतून रचना केली म्हणून प्रारंभी विरोध झाला परंतु नंतरच्या काळात या ग्रंथाची काशी क्षेत्री पालखीतून मिरवणूक निघाली.

## रूक्मिणीस्वयंवर

रूक्मिणीस्वयंवर या ग्रंथात नाथांनी या विवाहासमारंभ आध्यात्मिक रूपक केले आहे. त्यांच्या काळातील विवाह समारंभच या ग्रंथातून सांगितला आहे. रूक्मिणी - कृष्ण ही पात्रे लौकिक व अलौकिक अशा दोन्ही पातळीवर वावरताना दिसतात.

## भावार्थ रामायण

'भावार्थ रामायण' या ग्रंथाचे स्वरूप महाकाव्यासारखे आहे. एकनाथांनी रामायणात अनेक रामायणातील कथांचा सामावेश केला. या ग्रंथातून पराक्रमाचा संदेश एकनाथांनी समाजाला दिला आहे.आध्यात्मिक प्रकरणातून एकनाथांनी संताची चरित्रे कथन केली आहेत. या प्रकरणातून त्यांनी भक्तीचाच प्रसार केला आहे. त्यातून त्यांची लोकशिक्षकाची भूमिका कोठेच सुटत नाही. 'सगुण चरित्रे परमपवित्रे सादर वर्णावी' हा विचार ही दिसतो. नैतिक आध्यात्मिक शिकवण रचनात्मक पद्धतीने देऊन आत्मोद्धाराबरोबरच समाजोद्धाराचा प्रयत्न केला. एकनाथांनी अभंगरचना केली या अभंगातून कृष्णजन्म बालक्रीडा, कृष्णमहात्म्य, पंढरीमहात्म्य, श्रीविठ्ठलमहात्म्य, रामनाम महिमा, संतमहिमा, कीर्तनमहिमा, आत्मानुभूती, अद्वैत विचार उपदेश अशा विविध विषयावर लेखन केले. एकनाथांचे हरिपाठ ही ज्ञानेश्वराप्रमाणेच नाममहात्म्य वर्णन करणारे आहेत. एकनाथांनी सुमारे ३०० भारूडे लिहिली ती समाजाच्या सर्व सत्तात लोकप्रिय

आहेत. त्यांनी भारूडाची रचना बहुजन समाजासाठी, बहुजनांना वाट दाखविण्यासाठी केली. भारूडांनी समाजात मोठे जागरण घडवून आणले. एकनाथांच्या नावावर अर्ज, अर्जदास्त्र, अर्जाचा जाब, अभयपत्र, ताकीदपत्र, जाबचिठी इ. गद्यलेखनही आहे.एकनाथा वारकरी संप्रदायाला उचलून धरले. महाराष्ट्राची अस्मिता जागृत केली. भक्तीला महत्त्व दिले. संसार-परमार्थ, अद्वैत - अद्वैत, वैष्णव - दत्तसंप्रदायी सर्वांना एकत्र आणले. त्यांची लोकसुधारणा करणाऱ्या लोकसुधारक, समाजसुधारकाची भूमिका सुटत नाही. प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय साधता येतो. हे त्यांनी आपल्या उदाहरणाने समाजाला दाखवून दिले.

## १३. मुक्तेश्वर

मुक्तेश्वर हा मराठी पंडित कवीमधील एक अग्रगण्य रसाळ आख्यानकर, श्रेष्ठ कलाकवी म्हणून ओळखला जातो. त्याच्या चरित्र व काव्याबद्दल खूप थोडी माहिती उपलब्ध आहे.

## मुक्तेश्वरांची काव्यसंपदा

'संक्षेपरामायण', 'मुक्तेश्वरी महाभारत', 'स्फुट प्रकरणात' 'हरिश्चंद्रारघान', 'शतमुखरावणवधाख्यान', 'मूर्खाची लक्षणे', 'भागवद्गीता', 'शुकरंभा संवाद', 'एकनाथचरित्र', 'दत्तभक्तीपर आरत्या, पदे' अशी रचना मुक्तेश्वरांच्या नावावर आहे.

### संक्षेप रामायण

मुक्तेश्वराने एकनाथांकडून प्रेरणा घेऊन 'संक्षेप रामायण' रचले असावे. विविध छंदामध्ये या रामायणाची रचना आहे. रामायण लिहिण्यापूर्वी त्याने विविध रामायणांचा अभ्यास केला होता, असे दिसते. मुक्तेश्वरांचे वर्णन केलेला राम हा अवतारी राम आहे. रामायणातील काही प्रसंग त्याने ऐहिक पातळीवरून वर्णन केले आहेत. ताटका, रावण, कुंभकर्ण यांना रामबाणाने मृत्यु येतो तेव्हा त्यांना स्वर्गप्राप्ती होत नाही. मुक्तेश्वरी राम हा सीतेसाठी शोक करतो. सुग्रीवा वर चिडतो. त्यामुळे तो मानवी वाटतो.

मुक्तेश्वराने वाल्मिकी रामायणातील उत्कट, प्रसंग जसेच्या तसे घेतले आहेत. 'बालकांडात, श्रावणवध, दैत्यांशी युद्ध, कैकयीचे साहय, इंद्र ब्रहस्पतीचा संतोष इ. कथाभाग आले आहेत' 'अयोध्याकांडात राम - दशरथ - भरत यांना महत्त्व आले आहे. अनेक संघर्ष आहेत. रामाचे आदर्श कठोर, धीरोदात्त, कोमल असे व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. 'अरण्यकांडाची सुरवात भरती रामकथेप्रमाणेच आहे. अनेक युद्ध प्रसंगातून वीररस निर्माण झाला आहे.' किंष्किंधाकांडात राम हनुमान युद्ध, सुग्रीव -वाली युद्ध असा कथाभाग आला आहे.

मुक्तेश्वराचे रामायण त्याच्या महाभारताच्या अगदी सामान्य आहे. बाह्य सजावट चांगली असली तरी रसपरिषोष समाधानकारक नाही. भाषा संस्कृत प्रचुर आहे.

## मुक्तेश्वरी महाभारत

मुक्तेश्वराने महाभारताचे आदि, सभा, वन, विराट, सौप्तिक अशी पाच पर्वे लिहिली. कदाचित इतरही पर्वांचे लेखन केले असेल. परंतु आज त्याची उपरोक्त पर्वेच शिल्लक आहेत. या पर्वातून त्याचे श्रेष्ठ दर्जाचे कलावित्व प्रकट झाले आहे. ओवी वृ.वर त्याचे असामान्य प्रभुत्व दिसते.

महाभारतामुळेच त्याच्यावर त्याच्या काळापासून आजपर्यंत स्तुतिसुमने उधळली जात आहेत. त्याचे महाभारत व्यासांच्या महाभारताचे तंतोतंत अनुकरण नाही. मुक्तेश्वराने व्यास, ज्ञानेश्वर यांना वंदन केले आहे. ज्ञानेश्वराप्रमाणे मराठी भाषेविषयी अभिमान व्यक्त केला आहे. त्यातून त्याची विनम्रता व आत्मविश्वास दिसतो. मुक्तेश्वरांचे मुक्तेश्वरी महाभारतातून श्रोत्यांविषयी विचार मांडले आहेत. श्रोते स्थिरासनी, चिंतारहित, सात्विक, अर्थज्ञ, सदाचारी, क्षमाशील व कथाश्रवणाची आवड असणारे हवेत. मुक्तेश्वरी भारतात अनेक कथा आल्या आहेत. त्यातून शृंगार १ वीटरसास चांगला वाव मिळाला आहे. मुक्तेश्वर तत्कालीन समाजजीवन रंगवितो. त्यामुळे कालहानी झाली आहे. तो दुष्टांताला गोब्राह्मण प्रतिपालक म्हणून संबोधतो. मुक्तेश्वराच्या नावावर असणारी स्फुटरचना सर्वच्या सर्व त्याची नाही. एकनाथ चरित्रात नाथांच्या जीवनातील चमत्कार सांगितले आहेत.

थोडक्यात -
मुक्तेश्वराच्या सर्व रचनामध्ये त्याचे महाभारत श्रेष्ठ ठरते. रामायण व स्फुट काव्ये महाभारताच्या मानाने सामान्य आहेत.

## १४. फादर स्टीफन्स

फादर स्टीफन्स हा भारतात आलेला पहिला इंग्रज होय असे म्हणतात. इ.स. १५५९ मध्ये ख्रिस्ती धर्माच्या प्रसारासाठी भारतात आला. चाळीस वर्षे म्हणजे मृत्युपर्यंत तो भारतात राहिला. गोव्यात तो विशेष लोकप्रिय होता. प्राद्री एस्तेवाँ हे नाव गोव्यातील लोकांनी त्याला दिले होते. त्यांचे मराठी, कोकणीवर चांगलेच प्रभुत्व होते. त्याने कोकणी मराठीचे व्याकरण 'Arte Da Lingoa' हे लिहिले. हे मिशनऱ्यांनी लिहिलेले कोकणीचे पहिले व्याकरण होय. फादर स्टीफन्स हा गोवा, वसई येथे राहिला मराठी भाषा आत्मसात केली आणि लोकभाषेचाच वापर आपल्या ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी करावा. असे केले तरच त्याला यश येईल ही गोष्ट ओळखून मराठीत रचनान केली. कोकणी भाषा त्याने गोव्यात अभ्यासून या भाषेचे व्याकरण लिहिले. कोकणीचे व्याकरण लिहिण्याचा पहिला मान फादर स्टीफन्स यांना दिला जातो. हे व्याकरण मिशनरी लोकांसाठी त्यांनी लिहिले आहे. हे व्याकरण मध्ययुगीन मराठी गद्य समजून घेण्यास उपयुक्त ठरते. ख्रिस्ती धर्मतत्त्व कोकणी भाषेत लिहिण्याचा प्रयत्न त्याने गुरूशिवाय संवादरूपाने केला आहे.

फादर स्टीफन्स याने लिहिलेला 'ख्रिस्तपुराण' आ ख्रिस्ती धर्मविचार, सांगणारा मराठीतील महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. या ग्रंथातून त्याच्यावर असणारे ज्ञानेश्वरांसारख्या कवीचे प्रभुत्व स्पष्ट दिसते. त्याने या ग्रंथाला 'पुराण' असे म्हटले आहे.

## दासोपंत (इ.स १५५१ ते इ.स १६९५)

दासोपंत हे एकनाथ पंचकातील प्रमुख कवी होत त्यांना दत्तसंप्रदायी कवी म्हणूनही ओळखले जाते. ते साक्षात्कारी संत होते. त्यांनी शभटेक ग्रंथाची निर्मिती केली त्यापैकी ४८ ग्रंथांची यादी 'महाराष्ट्र कवी' या मासिकात दिली आहे. त्यांचे लेखन इतके व्यापक होते की, त्याकाळी त्यांना एका ढबूची शाई दररोज लागत असे.

## ग्रंथसंपदा

ग्रंथराज, गीतार्णव, गीतार्थबोधचद्रिका, पदार्ण व वाक्यवृत्ती हा गद्यग्रंथ, पंचीकरण, दत्तात्रेय महात्म्य, इ. ग्रंथ, नामामृत स्तोत्र, प्रबंध स्तोत्रे, शिवस्त्रोत्र, गुरूस्तोत्र, षोडसस्तोत्रे इ. रचना केली.

## गीतार्णव

'गीतार्णव' हा मराठीतील एक प्रचंड ग्रंथ आहे. या ग्रंथाची ओवी संख्या सव्वा लाख आहे. ओव्यांचा (अर्णव) सागर असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. या ग्रंथाच्या १२०५५ एवढ्याच ओव्या आज शिल्लक आहेत. गीतेसारखा ग्रंथ शास्त्रीय परिपाठी बाजूस ठेवून सर्वसामान्य मराठी माणसाला सहज समजावा इतका सुबोध करून लिहिला आहे. स्वानुभवाला प्रमाण मानले आहे. वेदातील कल्पना व सिद्धांताची या ग्रंथात दाटी झाली आहे. आपण हा ग्रंथ कोणत्याही भावयांच्या आधारे न लिहिता स्वानुभवानेच लिहिला असल्याचे ते सांगतात. ग्रंथारंभी दत्तात्रेयाला वंदन केले आहे.

या ग्रंथांत आरंभी दासोपंतानी आपली भूमिका मांडली आहे. त्यातून अहंकाराचे दर्शन घडते. गीता ही केवळ ब्रह्मकथा आहे असे सांगून कौरव पांडवांवर रूपक बांधले आहे. अर्जुन जीवात्मा, श्रीकृष्ण परमात्मा, कुंती शुद्ध विद्या, युधिष्ठिर स्वात्मभाव, भीम भेदनिवारक, नकुल निराभिमान, सहदेव ज्ञानभाव अशी अनेक रूपके घेऊन सगुणभक्ती नामस्मरणाचा उपदेश केला आहे. 'गीतार्णवात' सुभाषितांची अनेक रत्ने सापडतात.

## ग्रंथराज

ग्रंथराज या ग्रंथाला दासबोधाचा पूर्वावतार मानतात. या ग्रंथाची ओवीसंख्या १२०० आहे. स्वधर्माची ज्योत तेवत ठेवण्याचा संदेशे या ग्रंथात दिला आहे. प्रयत्न प्रबोध गुरू लक्षणे, स्थूल देह, लिंगदेह, पंचीकरण, अष्ट देह निरसन असे विषय या ग्रंथात आले आहेत.

दासबोध व ग्रंथराज या दोन ग्रंथातील आध्यात्मविषय आणि विवेचन यामध्ये साम्य आहे. प्रपंच आणि प्रबोध हे रामदासांचे आवडते शब्द या ग्रंथात पुन्हा पुन्हा आले आहेत. सदगुरू, मूर्ख, सद्च्छिष्याची लक्षणे सांगितली आहेत.

## पदार्णव

'पदार्णव' हा दासोपंताचा सव्वा लाख पदांचा ग्रंथ आहे. आज या ग्रंथातील जेमतेम सोळाशे पदे शिल्लक आहेत. या पदातून दासोपंताची काव्यप्रतिभा दिसते. दत्त दर्शनाची तळमळ व्यक्त होते. ही रचना छोटी पण अकृत्रिम, काव्यगुणयुक्त रसपूर्ण झाली आहे. गेयता हा या पदाचा खास विशेष आहे. टिपरी, गोफ, भूपाळ्या.

## गीतार्थबोधचंद्रिका

हा दासोपंतांनी लिहिलेला गीतेवरील टीकाग्रंथ होय. या ग्रंथातील ओव्यांची संख्या ८८८९ आहे 'गीतार्णव' हा ग्रंथ रचनादृष्ट्या विशाल झाला आहे. म्हणून आपण ही गीता टीका केली. या ग्रंथात निष्काम कर्मयोगाचे महात्म्य त्यांनी व्यक्त केले आहे. प्रत्येक ओवीखाली संस्कृत भाष्यही दिले आहे.

## पासोडी

दासोपंतांनी लिहिलेली पासोडी प्रसिद्ध आहे. त्यामध्ये पंचीकरणाचा विषय आला आहे. ४० फूट पासोडीवर हा विषय मांडला आहे.

याशिवाय टिपरी, गोफ, भूपाळी, आरती, शेजारती, पाळणे, स्तोत्रे, विरहिणींची क्रंदने अशी अनेक प्रकारची रचना दासोपंतांनी केली आहे.

दासोपंतांच्या विविध रचनेतून त्यांची दत्तभक्तीच व्यक्त झाली आहे. त्यांच्या निर्मळ भक्तीचे प्रतिबिंब पडले आहे. त्याच्या ग्रंथाच्या वाङ्मयीन मूल्यापेक्षा आध्यात्मिक मूल्य मोठे आहे.

दासोपंत हा मध्ययुगीन काळातील अधिक लेखन करणारा, स्वतंत्र प्रदोचा पंडित कवी होय.

## १६. तुकाराम (इ.स १५९८ ते इ.स १६४०)

भागवत धर्माच्या मंदिराचे काम करणाऱ्या संत तुकारामाच्या घरात विठ्ठलाची उपासना व पंढरीची वारी होती. त्यांचे जीवन वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत अत्यंत सुखात गेले. परंतु नंतरच्या काळात त्यांच्यावर अनेक संकटे आली. 'जग हे सुखाचे दिल्या घेतल्याचे' असा अनुभव आल्याने तुकारामने संसाराकडे पाठ फिरवली. देवाकडे विठ्ठलाकडे वळले. ज्ञानेश्वरी, गीता, एकनाथी या धर्माचे वाचन करून, संत सहवास वाढविला. कीर्तने करू लागले. 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी' असे म्हणत निसर्गात रमू लागले.

तुकाराम अशा अवस्थेत असमानाच बाबाजी चैतन्य या महापुरूषाने स्वप्न दृष्टांत दिला. त्यानंतर संत नामदेवाने कवित्व करण्याची प्रेरणा दिली. त्याविषयी तुकाराम लिहितात,
'नामदेवे केले स्वप्ना माजी जागे । सवे पांडुरंग येवोनिया ।
करावे कवित्व । वाऊगे निमित्त बोलो नको ।।'

## तुकाराम गाथा

तुकारामाची अभंग गाथा प्रसिद्ध आहे. त्या गाथेत सुमारे चार हजार अभंग आहेत. या अभंगाच्या रचनेचा ठराविक असा क्रम नाही. हे सर्व अभंग उत्स्फुर्त व आत्माविष्काराच्या स्वरूपाचे आहेत. आत्मचरित्रपर अभंगात तुकारामाने आपल्या मनात वेळोवेळी निर्माण झालेल्या प्रबळ भावनांना काव्यरूप दिले आहे. त्यात त्यांनी आपली कुळ परंपरा दुष्काळ, दैवी संकटे यासारखी संकटे यांची वर्णने केली आहेत. प्रासंगिक अभंगात जीवनातीला महत्त्वाचे प्रसंग आले आहेत. भक्तिविषयक असे अभंग आहेत. त्यामध्ये भक्ती, भक्तीचे महत्त्व, भक्तीतील मनशुद्धीचे महत्त्व, देव-भक्त अद्वैतभाव असे विचार आले आहेत. भक्तिमार्ग सोपा असला तरी ती सुळावरील पोळी असल्याचे तुकारामाने आपल्या अभंगातून सांगितले आहे. तुकारामाच्या मते नामाशिवाय दुसरा कुठलाच मंत्र त्रिभुवनात नाही. सर्व साधनात भक्तिमार्ग सोपा असा आहे. तुकारामाने आपल्या अभंगात अद्वैत तत्त्वज्ञान मांडले आहे गोडी आणि साखर जशी एकरूप असते तशी हरिहर ऐक्य आहे. पाणी आणि लाटा याप्रमाणे जगाचे आदिकरण आहे. लाटा पाण्यातून निर्माण होतात व लाटांचे पुन्हा पाणी होते. असे देव व भक्त, जीव व शिव एकमेकांत मिसळून गेलेले आहे.

तुकारामाने आपल्या डोळ्याने समाज पाहिला. समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले. ढोंगी, लबाड लोकांविरूद्ध लढण्याचा तुकारामाचा संकल्प होता. 'बुडता हे जन देखवेन डोळा' अशी अवस्था तुकारामाची होती. त्यामुळे जगाला बुडण्यापासून वाचविण्यासाठी अभंगनिर्मिती केली.

प्रापंचिकाना उपदेश करताना तुकाराम लिहितात, 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे वागावे दुसऱ्यावर उपकार करावा. परस्त्री आई-बहीणीसारखी मानावी. दुसऱ्याची निंदा करू नये. वडीलधाऱ्यांचा मान ठेवावा समाजातील सोंगाढोंगावर तुकारामाने अभंगातून टीका केली. दुष्ट, ढोंगी स्वतःच्या ज्ञानाचा, पंडित्याचा देखावा करणाऱ्या पंडितांना त्यांची जागा दाखवून दिली. शेंदऱ्या दैवतां, त्यांना लागणाऱ्या हिंसक नैवद्यांचा तुकारामाने निषेध केला.'

तुकाराम हा मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील सर्वात लोकप्रिय कवी ठरला. त्याची अभंगगाथा अभंग राहिली. त्याचे कवित्व हे जातिवंत असे आहे. त्यात त्याच्या साध्या, सोप्या मराठीचे रूप दिसते. त्यांना शब्दाची जाण होती. थोडक्यात मोठा आशय त्यांनी व्यक्त केला. पाडित्य प्रदर्शन टाळले. निर्झरासारखी सरळ स्वाभाविक परंतु सुंदर रचना तुकारामाचीच आहे. सोपी आशयघन रचना असल्याने तुकारामाने अल्पाक्षर स्मणीय काव्य समाजाच्या मुखी जाऊन बसले. त्याला सुभाषितांचे महत्त्व प्राप्त झाले. उदा. 'नाही निर्मळ जीवन । काय करील साबण ।', 'साधुसंत येती घरा । तो चि दिवाळी दसरा' लवण मेळविता जळे । काय उश्रले निराळे ।' तुकारामाच्या अभंगातून त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रकट झाले आहे.

## १७. रामदास (इ.स १६०८-इ.स १६८१)

समर्थ रामदास महाराष्ट्रातील संतमंडळात आपल्या वेगळेपणाने उठणारे दिसणारे संत आहेत. त्यांनी आपल्या आत्मारामास गुरू मानले. बारा वर्षे साधना व तितकीच वर्षे तीर्थाटन केले. या काळात वेद, उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्रे योगवसिष्ठ, रामायण, महाभारत इ. ग्रंथाचा अभ्यास केला. कथा, कीर्तना, प्रवचने या मार्गानी ज्ञान मिळविले.

### ग्रंथसंपदा

दासबोध एकवीस समासी ऊर्फ जुना दासबोध लघुरामायण, मोठे रामायण, चौदा ओवीशते, लघुकाव्ये, करूणाष्टके, मनाचे श्लोक, भारूडे, स्फुट पदे इ.

### करूणाष्टके

करुणाष्टके ही समर्थाची प्रारंभीची रचना. साधकावस्थेतील रामदासांच्या अंतःकरणाचे प्रतिबिंब त्यामध्ये व्यक्त झाले आहे. स्वजनांचा त्याग केला. स्वतःच्या दोषांची जाणीव झाली तरी परमेश्वर भेट देईना अशा पश्चातापदग्ध अतःकरणातून निघालेले बोल म्हणजे करूणाष्टके, 'रडविणारी कविता ती करुणाष्टके' अशी श्री देवांनी करूणाष्टकांची व्याख्या केली आहे. ती लक्षणीय आहे.

करुणाष्टकात कारूण्य, असहाय्यता, आगतिकता, आर्तता, ओतप्रोत भरली आहे. डॉ. श. गो. तुळपुळे म्हणतात. ''करुणाष्टकात रामदास देवासाठी अक्षरशः रडले आहेत. प्रपंचासाठी आपण सारेच रडतो. परमार्थासाठी रडणारे मात्र रामदासच.''

रामदास पुढील शब्दात रामाची करुणा भाकतात. अनुदित अनुतापे तापलो रामराया । परमदिनदयाळा नीरसी मोहमा अचपळ मन माझे नावरे आवरिता । तुजविण शिण होतो धावरे आता ।। या भजनविरहित जन्म गेल्याने दु:खही रामदास व्यक्त करतात. 'घडि घडि बिघडे निश्चय अंतरीचा' अशी अगतिकताही व्यक्त करतात. 'सकलजन भवाचे अथिले वैभवाचे' तेव्हा श्रीरामा तुझ्याशिवाय मला कोण आहे ? असे श्रीरामाला विचारतात.

समर्थाच्या करूणाष्टकात जे कारूण्य, भावनांचा ओलावा दिसतो. तो नंतरच्या काव्यात दिसत नाही. 'भावनेची सूक्ष्मता, व्यापकता, उत्कटता आणि परिणामाची एकात्मता या भावगीताच्या कसोट्या करुणाष्टकांना लावल्या तर करुणाष्टके उच्च दर्जाची भवगीते ठरतात.'

**रामायणे**

राम या पुरूषोत्तमाची कथा दोन ग्रंथातून सांगितली आहे. रामकथेकडे रामदास वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात. देवांना वंदिवासातून सोडणारा राम रामदासांना भावतो. लघुरामायणाची रचना प्रामाणिका छंदात, श्लोकांसंख्या १२५, यामध्ये युद्धकांडच आले आहे. 'लहानसा कवी नवा' असा स्वत:चा उल्लेख रामदास करतात. बंदिवासातील देवांच्या हाल-अपेष्टांचे वर्णन बारकाव्याने केले आहे.

**मोठे रामायण** या ग्रंथाची रचना १४६२ ओव्यात केलेली आहे. राजकारण, समाजकारण व परमार्थाचा आधारे प्रयत्नवाद या तीन गोष्टींची शिकवण दिली आहे.

**एकवीस समासी ऊर्फ जुना दासबोध** ओवी संख्या १३४० आहे. विषय परमार्थ विवेचन हा आहे. एकवीस समासी हा ग्रंथ निवृत्तीचा आहे. त्यामध्ये राजकारण नाही, सावधपण नाही परमार्थाशिवाय काही नाही.

**'मनाचे श्लोक'** हा ग्रंथ 'मनोबोध' या नावानेही ओळखला जातो. रचना भुजंगप्रयात वृत्तांत, श्लोकसंख्या २०५ आहे. मनाच्या निमित्ताने जनांना उपदेश केला आहे.

**'दासबोध'** या ग्रंथात समर्थांचे विचारधन एकवटले आहे. तो तीन टप्प्यांनी लिहिला असावा. रचना गुरूशिष्य संवाद रूपाने केली आहे.

**स्फुटप्रकरणे** - रामदासांनी स्फुट प्रकरणांचे लेखन केले आहे. त्यामध्ये अस्नानी - सुलतानी, परचक्रनिरूपण, आनंदवन - भुवन, राम - वरदायिनी, जुनाटपुरूष, चौदा ओवीशते, जनस्वभाव, गोसावी इ.चा समावेश होतो.

पद व पदांतरे, भारूडे, गौळणी, कामडी, खोळ्या, गोंधळ, पिंगळा यासारखे लेखनही रामदासांनी केले आहे. रामदासांचे साहित्य म्हणजे विश्वकोशच आहे. त्यांच्या स्वभावाप्रमाणेच त्यांचे साहित्य तेजस्वी, निर्भीड, गंभीर, रोख-ठोक व मर्दानी झाले आहे. त्यांच्या साहित्यातून क्षात्र धर्माची शिकवण दिली आहे. देशनिष्ठा, धर्मनिष्ठा, व्यक्त झाली आहे. रामादासांचे साहित्य समाजमनात जाऊन बसले आहे.

## १८. निरंजन माधव (इ.स १७०३ ते इ.स १७९०)

निरंजन माधव हे तंजावर येथे बाजीराव पेशवे यांचे वकील होते. निरंजन हे संप्रदायाचे नाव, माधव हे वडीलांचे नाव घेतले. नोकरी निमित्ताने प्रवास घडला. व्यासंग वाढला, अवलोकन वाढले.

### ग्रंथसंपदा

निरंजन माधव यांनी पुढील प्रमाणे रचना केली आहे. साप्रदाय परिमल, चिदबोध रामायण, सुभद्राचंपू, ज्ञानेश्वरविजय, मंत्ररामचरित, निर्वोष्ठ, राघवचरित्र, वृत्तमुक्तावली, वृत्तवनमाला, कृष्णानंदर्सिधू, स्तोत्रकलाप हा स्तोत्र संग्रह इ.

### सांप्रदाय परिमल -

साप्रदाय परिमल या ग्रंथात निरंजन माधव यांचे चरित्र आलेले आहे. आपल्या पत्नीस आपल्या गुरूपंरपरेची हकीकत सांगण्यासाठी या ग्रंथाचे लेखन झाले आहे. या ग्रंथात सिद्धेश्वर संप्रदायाची हकीकत, माहिती आली आहे. हा ग्रंथ निरंजन माधवाच्या एखाद्या शिष्याने सांगितला असावा. लिहिला असावा असेही मत मांडले जाते.

### चिद्बोध रामायण

'चिद्बोधरामायणाची' रचना श्लोकबद्ध आहे. या ग्रंथाचे बालकांड उपलब्ध आहे. सात सर्गात ४२२ श्लोक असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. श्लोकरचना विविध वृत्तांमध्ये केलेली आहे. अमृतध्वनी या नवीन वृत्ताची रचना त्यांनी ग्रंथात केली आहे. कवीने मूळ वाल्मिकी रामायण, हनुमन्नाटक, रघुवंशाचा आधार घेतला आहे. आपल्या रामायणाचे स्वरूप सांगून यामागे प्रेरणा श्रीरामाची आहे. मराठी भाषाभिमान व्यक्त केला आहे. ग्रंथाची फलश्रुती सांगितली आहे. या ग्रंथाचे उपलब्ध असलेले बालकांड ही महाकाव्यासारखे आहे.

'चिद्बोध रामायणाची श्लोकरचना अत्यंत प्रौढ व सरस असून महाकाव्याला शोभणारी आहे.' असे के.ना. वाटवे यांनी म्हटले आहे.

### ज्ञानेश्वर विजय

निरंजन माधवानी ज्ञानेश्वरांविषयी आदर व श्रद्धा होती. त्यामुळेच ते 'ज्ञानेश्वरविषय' या ग्रंथाच्या लेखनास प्रवृत्त झाले. हे काव्य सात अध्यायात विभागले असून श्लोकसंख्या १०३८ आहे. नामदेवाने लिहिलेली आदि, समाधि ही प्रकरणे समोर ठेवून त्याने वृत्तरचना केली आहे. नामदेवाच्या वाणीतील प्रसन्नता, सोज्वळता, आर्तता दिसत नसली तरी प्रास्ताविकता मात्र आहे. कवी या काव्यास 'महाकाव्य' म्हणत असला तरी अंतरंग मात्र आख्यानकाव्याचेच आहे. आपण नामदेवाच्या रचनेचा आधार घेतला आहे हे कवी मान्य करीत आहे. 'कृपानंदसिंधू', 'ज्ञानसुधा' हे निरंजनमाधवाचे आणखी ग्रंथ निरंजन संप्रदायात मान्यता पावले आहेत. परंतु ते आज उपलब्ध नाहीत. निरंजनमाधवांनी छंदशास्त्राचा सखोल अभ्यास केलेला असावा. त्यांनी शंकराचार्यांच्या 'वाक्यसुधा' व स्वात्मनिरूपणा यावर अनुक्रमे 'बोधप्रदीपिका' व 'अद्वैतामृत' या गद्यटीका लिहिल्या. पेशवेकालीन गद्याचा एक नमुना म्हणून या टीकेचे महत्त्व आहे. 'वृत्तमुक्तावली', 'वृत्तवनमाला' या वृत्तविषयक ग्रंथाचे लेखन केले. या ग्रंथामध्ये 'बालालांगी पद्यरचना सुबोध घडाया' यासाठी ग्रंथ लिहिला असे या ग्रंथात कवीने (निरंजनमाधव) म्हटले आहे.

निरंजनमाधवांचा एकविस स्तोत्रांचा 'स्तोत्रसंग्रह' या शीर्षकाचा संग्रह आढळतो. यातील तेरा स्तोत्रे देवावर, सहा स्तोत्रे देवतांवर, नद्यावरही त्यांनी स्त्रोत्ररचना केली. निरंजन माधव यांच्या अंत:करणातीला भक्तिभाव व रसिकता यांचे दर्शन स्तोत्रांमधून घडते.

निरंजनमाधवाने 'सुभद्राचंपू' हे गद्य-पद्य मिश्रित काव्य महाकाव्याच्या धर्तीवर लिहिले आहे. त्यात सात सर्गात कथा सांगितली आहे. 'कुभारसंभव' या काव्याचा प्रभाव 'सुभद्राचंपू'वर पडलेला आहे. निरंजन माधवाने विविध प्रकारची रचना करून मराठी काव्य समृद्ध करण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.

## १९. सामराज

सामराज हे शिवकालीन कवीत सर्वांत श्रेष्ठ कवी होत. ते भोसल्याचे आश्रीत होते. त्याने छ. शिवाजी, संभाजी, राजाराम या तीनही छत्रपतींच्या कारकीर्दीत पाहिल्या. त्यांच्या काव्यातून त्यांना सामराजाला राजदरबारातील रितीरिवाजांचा, लोकव्यवहाराचा चांगला परिचय असल्याचे जाणवते. सामराज या कवीचे 'कुद्ग्लाख्यान' व 'रूक्मिणी स्वयंवर' हे दोन ग्रंथ आहेत.

### मुद्ग्लाख्यान

मद्गल हे सामराजाचे कुलदैवत होय. त्याने त्याच्या कुलदेवतेविषयीच्या लेखनाने काव्यरचनेस प्रारंभ केला. त्याचे मुद्ग्लख्यान हे काव्य जैमिनी अश्वमेघ, महाभारतातील वनपर्व, पद्मपुराण या आधारलेले आख्यान आहे. युधिष्ठाराने केलेल्या अश्वमेघ यशाच्या प्रसंगवर्णनाच्या निमित्ताने मुद्गल नावाच्या दानशूर पुरूषाचे चरित्र या ग्रंथात आले आहे. या आख्यानकाव्यात सामराजाने वर्णाश्रम धर्माचा पुरस्कार करून मोक्षासाठी गृहस्थाश्रम धर्म आवश्यक असल्याचे सांगितले आहे. या ग्रंथात मद्गलाची दिनचर्या व यात्रेस निघालेल्या पशु-पक्ष्यांची विकल अवस्था सामराजाने मोठ्या बहारीने व्यक्त केली आहे.

### रूक्मिणीहरण

'रूक्मिणीहरण' या काव्यामुळेच सामराज आज प्रसिद्ध आहे. या ग्रंथाची कथा भागवताच्या एकादश स्कंधावर आधारलेली आहे. 'रूक्मिणी स्वयंवर' या ग्रंथाची रचना आ. सर्गात महाकाव्यासारखी असून श्लोकसंख्या ११४० आहे. भागवतातील कथा रूक्मिणीहरणाच्या निमित्ताने लिहित असून ती 'सकलजगदानंदजननी' आहे. असे स्मरण तो प्रत्येक सर्गाच्या शेवटी तो करून देतो. भगवद्भक्ती हेच त्यांच्या काव्यलेखनाचे ध्येय आहे. हे काव्य सामराज याने हे आयुष्याच्या उत्तराकाळात लिहिले असावे. त्याच्यावर संस्कृत पंचमहाकाव्य, एकनाथ, वामन, माघ यांचा प्रभाव जाणवतो. तसेच त्याने पुराण वेदांतांचा अभ्यास केला असावा.

सामराजाने 'रूक्मिणीस्वयंवर' या काव्यात आपल्या प्रतिभेने अनेक प्रसंग निर्माण केले आहेत. रूक्मिणीच्या सौंदर्य व विरह वर्णनात आपल्या प्रतिभेने रंग भरले आहेत. त्याचे स्वभाव रेखाटनाचे कौशल्य अजोड आहे. काव्यात तो कल्पनारम्य वर्णन करून त्यात अध्यात्माचे रंग भरले आहेत. रूक्मिणीचा विरह, तिने केलेला कृष्णाचा धावा, याचना काही प्रसंगी उपहास असे विविध भाव सामराज कौशल्याने रंगवितो. रूक्मिणीची शालिनता, मनाचे सौंदर्य, समयसूचकता इ. गुणवर्णनामुळे तिचे चित्र आकर्षक झाले आहे. तसेच काही ठिकाणी रसहानीही झालेली आहे.

रूक्मिणीची आई तिला नववधूंचे सासरी कसे वागावे ? याचा उपदेश करते. 'कुळस्त्रीला बाई पतिविण नसे दैवत दुजे ।' या उद्‌गारावरून एक प्रेमळ, व्यवहारदक्ष माता उभी राहते. आपल्या काव्याचे प्रयोजन सांगताना तो म्हणतो, 'अगत्य नाही जनरंजनाचे । लागे तुज ध्यान निरंजनाचे ।।' या भक्तीच्या पाश्वर्भूमीवर शृंगाराचेही वर्णन करतो. कृष्णाकडे सर्वांचेच लक्ष लागल्यामुळे रूक्मिणीची अवस्था फारच दयणीय होते. 'डसे तुला कृष्ण भुजंग बाई' असे तिला तिची दासी म्हणते. यातून सामराजकवीचे चातुर्य दिसून येते.

सामराज भक्ती शृंगार, वीर, हास्य अशा विविध रसांची निर्मिती करतो. त्याची भाषा प्रासादिक आहे. संस्कृतप्रचूरता व सामाजिकता ही त्याच्या भाषेची वैशिष्ट्ये आहेत. त्याचबरोबर जुने मराठी, ग्रामीण, फार्शी शब्द काव्यात आढळतात. म्हणी आणि सुभाषिते यांचे तर भांडारच काव्यात उघडले आहे. सामराजाच्या शब्दसंपदेत अलंकाराचे ऐश्वर्य असल्याने वर्णने वैभवशाली झाली आहेत.

'रूक्मिणीहरण' या ग्रंथात त्याच्या अंगचे गुण प्रकट झाले आहेत. महाकवीच्या तोलाची त्याची प्रतिभाशक्ती दिसते. साधे, सरळ, प्रासादिक, निवेदने हे त्याच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

## २०. विठ्ठल बीडकर (इ.स १६२६ ते इ.स १६९०)

विठ्ठल बीडकर हा शिवकालातील आख्यान कवी होय. तो बीड जिल्ह्यातील गौरीपूरचा रहिवासी. त्याचा व्यवसाय वाण्याचा होता. तो बीड जिल्ह्यातील असल्याने बीडकर या नावाने ओळखला जातो. त्याला संस्कृत प्राकृत भाषांची व साहित्याची चांगली जाण असावी. त्याने रामायण, महाभारत, रघुवंश, भागवत इ. ग्रंथांचे चांगले वाचन केलेले असावे.

### ग्रंथरचना

कवी विठ्ठलाच्या नावावर रूक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर, रसमंजिरी, विल्हणचरित्र, पांचालीस्तवन, द्रौपदी वस्त्रहरण, विद्‌वजीवन इ. काव्य रचना आहे.

### रूक्मिणीस्वयंवर

विठ्ठलाने 'रूक्मिणीस्वयंवर' या ग्रंथाची रचना महाकाव्याच्या धर्तीवर करण्याचा प्रयत्न केला आहे. या ग्रंथात वेगवेगळ्या गणवृत्तात रचना केली आहे. या ग्रंथात सात सर्ग असून श्लोकसंख्या ३५३ आहे. अनेक वृत्तात रचना आहे. त्यातून शाब्दिक कसरतच अधिक जाणवते. सहजता जाणवत नाही. त्याचा महाकाव्य लेखनाचा प्रयत्न सफल झालेला दिसत नाही.

छत्र, चामर, द्वादश, वापी, माला अशा चित्रबंधानही त्याने स्वयंवर कथा बांधली आहे.

### सीतास्वयंवर

'सीतास्वयंवर' हा त्याचा दुसरा ग्रंथ असून हरीवर्णन करणे हा आपल्या काव्याचा पवित्र हेतू असल्याचे त्याने सांगितले आहे. विठ्ठलाने सीतास्वयंवराची कथा हनुमन्नाटक, रघुवंश, श्रीरामायण यांचा अभ्यास करून तयार केली आहे. तसेच लेखनापूर्वी त्याच्यासमोर एकनाथांचे 'भावार्थ रामायण' हा ग्रंथही असावा तसेच मुक्तेश्वराची रचनाही त्याने समोर ठेवली असावी.परंतु मूळ ग्रंथातील सौंदर्य विठ्ठलाच्या रचनेत नाही हेच खरे.

## रसमंजिरी

'रसमंजिरी' हा ग्रंथ संस्कृत साहित्यातील भनुदासाने केलेल्या 'रसमंजिरी'चे भाषांतर आहे. या ग्रंथात षोडस नायिका, नवरस, सखीकर्म, इतिकर्म यांचे विवेचन केले आहे. ग्रंथाच्या प्रारंभीच श्रीकृष्णाचे वर्णन कवीने पुढीलप्रमाणे केले आहे.

'कासे सोनसळा दिसे झळफळा रंगीत माळा गळा भाळी पीताटीळा, नवीन विपुल माळा गळा पुष्कळा' या वर्णनातून त्याच्या लेखनात पांडित्याला असणारे प्राधान्यच दिसते.

### बिल्हणचरित्र

बिल्हण कवीने लिहिलेल्या 'चौरपंचाशिका' या काव्याचे हे भाषांतर आहे. या काव्यात शृंगाररस प्रमुख असून वसंततिलका या एकाच वृत्तांत रचना केलेली आहे. विक्रमलादेवाची कन्या शशिकला आणि काश्मिरातून आलेला शिक्षक बिल्हण यांच्या प्रेमाची कथा बिल्हणचरित्रात आली आहे. या काव्यात शृंगाराचा अतिरेक झाला आहे.

### पांचालीस्तवन

'पांचालीस्तवन' हे काव्य अगदी छोटे म्हणजे फक्त २३ श्लोकांचे आहे.

### विद्वजीवन

'विद्वजीवन' हे काव्य भागवतातील कथेच्या आधारे लिहिलेले आहे. हा ग्रंथ २६५ श्लोकांचा आहे. कृष्णाच्या बाललीला राधाकृष्णप्रेम, रासक्रीडा याविषयीचे वर्णन आले आहे. केवळ पंडितासाठी लिहिलेली असा हा ग्रंथ आहे. विठ्ठलकवीने क्रूर रचनाही केलेली आहे. तसेच त्याने लिहिलेल्या दशरथनंदनाचा पाळणा प्रसिद्ध आहे.

## २१. तुळशीदास

तुळशीदास हा शाहीर होता. त्याच्याविषयी अधिक माहिती उपलब्ध नाही. परंतु हा शाहीर शिवकालीन असावा. या शाहिराचा 'तानाजीचा पोवाडा' प्रसिद्ध आहे.

तानाजीने शिवछत्रपतींच्या आज्ञेनुसार कोंडणा किल्ला सर करण्याची मोहिम आखली या मोहिमेत तानाजी अतुल पराक्रम करून धारातीर्थी पडला, कामास आला या विषयावर तुलशीदासाने आपल्या पोवाड्यातून प्रकाश टाकला आहे.

तानाजीच्या पोवाड्यात त्याचा पराक्रम वर्णन केल्यामुळे वीर रस आला आहे. तसेच तानाजीला वीरमरण आले. त्यामुळे त्या पराक्रमाला दु:खाची किनार गडद आहे. त्यामुळे या पोवाड्यात वीर व करुण रस आले आहेत.

तानाजी व शिवाजी या दोन इतिहासातील व्यक्तींच्या पराक्रमाची साक्ष देणारा आणि तात्कालीन वातावरणात घेऊन जाणारा हा पोवाडा आहे. शिवाजी, जिजाबाई, उदेभानू, तानाजी व शेलारमामा ही या मोहिमेतील प्रमुख पात्र तुळशीदासाने रेखाटली आहेत. ती जिवंतपणे साकार झाली आहेत. या पात्रातील संवादरचना चातुर्यपूर्वक केलेली आहे.

## २२. श्रीधर

श्रीधर नाझरेकर म्हणजे भक्तिमृताचा झरा आपल्या रसाळ वाणी, लेखणीने सर्व सामान्य लोकापर्यंत पोहचविणारा लोकप्रिय पंडितकवी होय. त्याचे वास्तव्य व लेखन पंढरपूर येथेच झाले. श्रीधर हा महाराष्ट्राचा अत्यंत आवडता कवी होय. त्याचे ग्रंथ आजही महाराष्ट्रातील घरोघरी वाचले जातात. श्रीधराने आपली गुरूपरंपरा पुढीलप्रमाणे सांगितली आहे. रामानंद - अमलानंद - सहजानंद - पूर्णानंद - दत्तानंद - बृह्मानंद - श्रीधर या परंपरेनुसार श्रीधराने गुरू त्याचे वडीलच ठरतात. श्रीधराने हरीविजय, रामविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत पांडुरंग महात्म्य, व्यंकटेश महात्म्य, वेदांतसूर्य, ज्ञानेश्वरचरित्र इ. याशिवाय काही संस्कृत स्तोत्रे, पदे, संस्कृत, तत्त्वगीता, मल्हारीविजय, जैमिनीप्रकरण इ. रचना केली आहे.

### हरिविजय

हरिविजय हा ग्रंथ कृष्णचरित्रपर आहे. भागवताचा दहावा स्कंघ हा या ग्रंथाचा आधार आहे. नारदपुराणा, हरिवंश, पद्मपुराण, ब्रह्मांडपुराण इ. मधून काही कथा घेतल्या आहेत. नाट्यमय प्रसंगनिर्मिती प्रभावी व्यक्तिरेखा, सरळ व सुगम भाषा, नित्य परिचित दृष्टांत, भक्ती रसाचा प्रभावी आविष्कार, निवेदनकौशल्य इ.मुळे हा ग्रंथ आकर्षक व रसाळ झाला आहे.

### रामविजय

'रामविजय' हा ग्रंथ वाल्मिकी रामायण, आधात्म रामायण, हनुमन्नाटक, अग्निपुराणा, इ. आधारलेला असतो. 'रामविजय' लिहिताना त्याने पुढील प्रयोजन सांगितले आहे. 'सामान्य स्त्रियांना संस्कृत कळत नाही. आडामध्ये निर्मळ पाणी असते. त्यासाठी दोर पात्र पाहिजे. सरोवराचे पाणी प्यावे व तहान शमावी तसे आपले ग्रंथ आहेत.'

'रामविजय' वाल्मिकी रामायणाच्या आधारे सांगत आहोत असे तो म्हणतो. रामजिनधामास गेला इथपर्यंतची कथा त्याने सांगितली आहे. त्याची कथा सुखांत असते.

### पांडवप्रताप

'पांडवप्रताप' हा श्रीधराचा अत्यंत लोकप्रिय असा ग्रंथ आहे. आजही या ग्रंथाचे वाचन मोठ्या श्रद्धेने केले जाते. श्रीधराने मुक्तेश्वराच्या महाभारताचे वाचन केले होते. त्याचा वापर त्याने आपल्या 'पांडवप्रताप' या ग्रंथात केला आहे. सुबोध निवेदन, संसार - वेदात- आध्यात्म यांचा त्रिवेणी संगम, घरगुती दृष्टांत, अतिशय सोपी प्रभावी प्रवाही सामान्यजनाना समजेल अशी भाषा त्यामुळे त्याचा हा ग्रंथ स्वतंत्र प्रतिभेचा अविष्कार वाटतो.

### शिवलीलामृत

'शिवलीलामृत' या ग्रंथाचे वाचन पुण्यप्रद मानले आहे. या ग्रंथाची कथा स्कंध पुराणातून घेतली आहे. 'या ग्रंथांच्या श्रवण - पठणाने पातकांचे पर्वत जळतील. अपार आयुष्य, आरोग्य, संतती, संपत्ती मिळेल असे तो म्हणतो.' 'शिवलीलामृता'त भक्ती, शांत, करूण व वीररसांचा प्रभाव आहे. काही ठिकाणी शृंगाराचा अतिरेक झाला आहे. 'जैमिनी अश्वमेघ' या ग्रंथात जैमिनी अश्वमेघाची कथा आली आहे. श्रीधराच्या निवेदन शैलीची सर्व वैशिष्ट्ये या ग्रंथात आली आहे. श्रीधराचा नावावर पंढरीमहात्म्य, ज्ञानेश्वरचरित्र, मल्हारीविजय या लहान ग्रंथाचे कर्तृत्व आहे. श्रीधराने आपल्या ग्रंथाची नावे विजयाकडे झुकणारी अशी ठेवली आहेत. तो पराक्रम सांगतो.

विजयाचे वर्णन करतो. ईश्वरी योजनेचे सूत्र कथाभागातून गोवतो. सर्व गोष्टी योजून सुंदर काव्यनिर्मिती करतो. त्यामुळे श्रीधर कवी महाराष्ट्रात सर्वाच्या घरोघरी पोहचलेला आहे.

## २३. महिपतीबुवा ताहराबादकर

महिपतीबुवा ताहराबादकर हे अहमदनगर जिल्ह्यातील ताहराबाद येथे राहणारे होते. त्यांचे नाव कावळे असे होते. ते संसारी असूनही भक्त होते. पेशवेकाळातील महत्त्वाचा ग्रंथकार म्हणजे महिपती होय. संत तुकरामाने महिपतीला स्वप्नात येऊन आदेश दिला की, 'नामदेवांची शतकोटी अभंगाची प्रतिज्ञा मी पूर्ण केली तू संतचरित्रे वर्णन करण्याचे काम करावे.' या आज्ञेप्रमाणे महिपतीने आमरण चरित्रलेखन केले.

महिपतीबुवा ताहराबादकर यांची ग्रंथसंपदा पुढीलप्रमाणे आहे. भक्तविजय, संतलीलामृत, भक्तलीलामृत, पांडुरंगमहात्म्य, संतविजय, असे चरित्र ग्रंथ, कथासारमृत, तुलसीमहात्म्य, गणेशपुराण, दत्तात्रयचरित्र, ऋषिपंचमी, अनंतचतुर्थी ही लहान मोठी प्रकरणे लिहिली. तसेच अपराधनिवेदन स्तोत्र व पांडुरंग स्तोत्र ही स्तोत्रे लिहिली.

### भक्तविजय

महिपतीने 'भक्तविजय' हा ग्रंथ लिहिण्यापूर्वी नामदेव नाभाजी, उद्धवचिद्घन यांच्याचरित्रपर ग्रंथाचा अभ्यास केला. संत एकनाथ, तुकाराम यांच्या वंशजाकडून त्यांनी माहिती मिळवली. 'मी अनुभवाशिवाय बोलत नाही.' असे महिपती म्हणतो. तरी त्याने लिहिलेल्या चरित्रातील अनेक संतांची माहिती विश्वसनीय नाही. त्याची भूमिका भक्ताची आहे. इतिहासकाराची नाही. 'संतचरित्रे, पवाडे वर्णन करणे' हे त्याचे ब्रीद आहे. सर्व ग्रंथकार 'ग्रंथवदविता रूक्मिणीपती मी तो मंदमती अज्ञानी' अशी भूमिका त्याने स्वीकारली आहे. 'भक्तविजयात नामदेव, ज्ञानदेव, दामाजी, उद्धवचिद्घन, भानुदास, एकनाथ, तुकाराम यांची चरित्रे आली आहेत. चरित्रगायन हा सुद्धा भक्तीचाच भाव आहे, असे तो म्हणतो.'

### संतलीलामृत

'भक्तविजय' या ग्रंथात जी चरित्रे आली नाहीत ती संतलीलामृत या ग्रंथात आली आहेत. या ग्रंथात महिपतीने पुढीलप्रमाणे कबुली दिली आहे. 'आधिल मागील कोणते संत । हे तरी मी नेणेचि संत।।' अशी त्याची भूमिका असली तरी चरित्र वर्णन करावे ही त्याची आंतरिक इच्छा आहे. महिपतीने चांगदेवचरित्र दहा अध्यायातून वर्णन केले आहे. शेवटच्या दहा अध्यायात पन्नास संतचरित्रे आली आहेत. त्यामुळे प्रमाणबद्धता आली नाही. एकनाथ, रोहिदास, एकनाथ, तुकाराम यांचीही चरित्रे आली आहेत. ग्रंथाच्या शेवटी परमेश्वराची, पांडुरंगाची प्रार्थना केली आहे.

### संतविजय

'संतविजय' हा महिपतीचा अपूर्व ग्रंथ आहे. अध्याय २६ असून, ओवीसंख्या ४०६२८ एवढी आहे. समर्थ रामदास व बाबाजी गोसावी यांचे चरित्र या ग्रंथात आले आहे.

### पांडुरंग महात्म्य

'पांडुरंग महात्म्य' या ग्रंथात भक्त पुंडलिकाचे चरित्र शिव-पार्वती संवादरूपाने आले आहे.

'कथासारमृता'त व्रताच्या कथा आलेल्या आहेत.

पांडुरंग स्तोत्रात पांडुरंगाला पत्र लिहिले असून महिपतीचे आत्मचरित्र आले आहे.

महिपतीबुवा ताहराबादकरांची भाषाशैली सरळ, रसाळ, सुबोध व प्रास्ताविक आहे. लेखन करताना त्याची भूमिका भाविकाचीच आहे. पंडिती काव्यातील शाब्दिक कसरत येथे पाहावयास सांपडणारी नाही. कधी कधी महिपतीची भाषा गद्यप्राय वाटते. त्यामुळे तिच्यात प्रत्ययकारकता कमी आढळते. महिपतीने मराठीत जेवढी संतचरित्रे कोणीच लिहिली नाहीत.

## २६. मध्वमुनीश्वर (इ.स १६८० ते १७३४)

मध्वमुनीने नाव त्र्यंबक त्यांचे घराणे कट्टर माध्वसंप्रदायी वैष्णव होते. माध्वाचार्याकडून त्यांना मध्वमुनी हे नाव प्राप्त झाले. ते आपल्या पदरचनेबद्दल प्रसिद्ध आहेत. ते उत्तम कीर्तनकार होते. त्यामुळे कीर्तनासाठी अनुकूल रचना करण्याकडे त्यांचा कल होता. त्यांच्या रचनेत चरित्रे, आरत्या, हिंदी, संस्कृत रचनाचाही समावेश आहे. त्यांनी त्यांच्या पदामधून समाजाला उपदेश केला आहे.

समाजात वाढलेला कर्मकांडावर त्यांनी टीका केली. वेदशास्त्राची मर्यादा उडाल्याची खंत ते व्यक्त करतात. तत्कालीन ढोंगी साधूचे वर्णन त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.
'माथा टोप गळ्यात एक कफनी, रंगीत काठी करी, डोळे झाकुनि भस्म लावूनि बसे, शिष्यिण सेवेकरी ।।'

मध्वमुनींची पदे रागदारीतील चालीमुळे, नादमाधुर्यामुळे खूपच आकर्षक बनली 'उध्दवा शांतवन कर जा । त्या गोकुळवासी जनांचे ।' किंवा 'हरि तुझी मुरली ऐकून गोड । नीरस तरुवर फुटती । निघती पल्लव व मोड । सखियेस जीव होते । ते स्थळी निर्जिव खोडा' यासारखी पदे संगीतानुकूल रचनेमुळे गोडबनली आहेत. यमक प्रास नादमाधुर्य इ. गोष्टी लक्षात घेऊन त्यांनी काव्यात अंतरंगाप्रमाणे बहिरंगालाही महत्त्व दिले.

मध्वमुनींनी लिहिलेल्या भक्तिरसपूर्ण कवितेत आशयपेक्षा नादमाधुर्यानेच वर्चस्व गाजविलेले आढळून येते. 'काळे तुझे बाल राधे गोरे तुझे गाल' यासारख्या पदामधून भक्तिऐवजी शृंगाराचेच दर्शन घडते.

कृष्णक्रीडेतील त्याच्या पदातून नर्म विनोदही येतो. कृष्णविरहाची व्यथा 'राधे विधिता माझे प्राण। तुझे लोचन बाण' या पदातून नेटकेपणा व्यक्त झाली आहे. कधी कधी त्यांची पदे लावणीवजा झालेली आहेत.

'डोळे लावून शब्द बोलता अशी अवस्था का घडली कोण पदनारी तुम्ही भोगली, तुमची परीक्षा मज कळली ।' या पदामधील राधेने कृष्णाशी केलेला संवाद लावणीची आठवण करून देतो. समाजातील लोकांना भक्तिऐवजी शृंगाराचीच अधिक गोडी लागली आहे. ते म्हणतात,

'शृंगारप्रिय सर्व लोकविषयी जाले विलासी महा
राधा माधव नावडेच हृदयी येकादशी नेम हा ।'

श्रीराम व श्रीकृष्ण यांच्या बाललीळांचे वर्णन त्यांनी केले आहे. त्यात वत्सलरस आला आहे. बालरामाचे वर्णन करताना ते रमून जातात.

'चिमणासा श्रीराम । त्याचे चिमणेसे स्वरूप । चिमणे सगुण ब्रह्मा । चिमणे लावण्य अनुप ।।'
चिमणी माजी कट्यार । बांधी चिमणीशी तरवार । चिमणी पाठीशी ढाल । थाटी चिमणासा दरबार ।।

मध्वमुनींने लोकव्यवहारातून भक्तीभावनेची अभिव्यक्तीची पद्धत स्वीकारली. पिंगा, दळण, कांडण, टिपरी अशा प्रकारची रूपके रचली. संसार, सासरा, अविद्या ही सासू अशी रूपके रचली.मध्वनीने काही श्लोक आरती, अभंग यांचीही रचना केली. प्रल्हादचरित्र, मत्स्येद्रचरित्र, गणेशाष्टक, धनेश्वरचरित्र अशी रचना केली.

धनेश्वर किंवा चौल राजांची कथा हे आख्यानकाव्यही लिहिले.

मध्वमुनींच्या कवितेतं संतकवी प्रमाणे भक्ती व पंडित कवीप्रमाणे शृंगारही आला आहे. राम हे त्याचे दैवत असले तरी शृंगाराच्या आविष्कारासाठी राधा, कृष्ण यांचा आश्रय घेतला आहे. त्याच्या अनेक गीतांना नाट्यगीताचे स्वरूप आलेले दिसते.

## २५. सोहिरोबानाथ आंबिये

सोहिरोबा हे जातीने सारस्वत ब्राह्मण असून ते सावंतवाडी संस्थानातील बांदेगावचे रहिवाशी होते. त्यांचे घराणे म्हणजे गावच्या कुलकर्ण्याचे परंतु सोहिरोबा वृत्तीने सात्विक होते. परंतु व्यवहारकुशल नव्हते. त्यामुळे त्यांना दारिद्र्यात जीवन कंठावे लागले. सोहिरोबांचा ओढा प्रपंचापेक्षा परमार्थाकडे अधिक होता. अनेक संस्कृत प्राकृत ग्रंथाचे वाचन करून त्यांनी विद्वत्ता वाढवली. त्यांच्या साधुत्वाविषयी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. सावंतवाडी संस्थानात जात असताना त्यांना गौबीनाथांचा साक्षात्कार झाला त्यानंतर त्यांनी नोकरी सोडून दिली आणि साध्या, सोप्या भाषेत लोकांना उपदेश करू लागले. पदे व ग्रंथरचना करण्यास प्रारंभ केला. सोहिरोबांची सर्व कविता दुसऱ्यानीच लिहिली आहे. त्यांच्या बहिणीने त्यांचे काव्यलेखन करून दिले. काही रचना कागदावर तर काही कागद महाग असल्याने झाडांच्या पानावर लिहिलेली आहे. का झाडाची पाने कचरा म्हणून त्यांच्या आईने फेकून दिले तसेच त्यांचे वास्तव्य एका ठिकाणी नव्हते त्यामुळे त्यांची कविता नष्ट झाली. सोहिरोबा नाथ आंबिये हे उत्तरेस काशी, दिल्ली, प्रयाग, उज्जैन अशा अनेक ठिकाणी गेले. त्याचे परंपरेचे विविध ठिकाणी मठ आहेत. त्यांची ग्रंथरचना पुढीलप्रमाणे आहे.

### १) अक्षयबोध

'अक्षयबोध' हा ग्रंथ सावंतवाडी येथे लिहिला. यामध्ये आ. प्रकरणे असून ओवीसंख्या ५०० आहे. या ग्रंथाचे वर्णन सोहिरोबांनी पुढीलप्रमाणे केलेले आहे.
'अज्ञानाचित्रे वाचे करवी । बोलविले पूर्ण ज्ञान अनुभवी ।।'

### २) महद्नुभवेश्वरी

या ग्रंथाची रचना 'ज्ञानेश्वरी'च्या धर्तीवर केलेली आहे. यात स्वानुभव रहस्य सांगितले आहे. या ग्रंथात १८ अध्याय असून ओवीसंख्या ९०२२ एवढी आहे.

### ३) पूर्णाक्षरी

पूर्णाक्षरी या ग्रंथाची रचना ओवीवृत्तात असून ओवीसंख्या ५०० एवढी आहे. साधूची लक्षणे हा या ग्रंथाचा विषय आहे.

### ४) अद्वयानंद

'अद्वयानंद' या ग्रंथात १० प्रकरणे असून ओवीसंख्या १००० आहे. वेदांत विषयावर आधारलेली असा हा ग्रंथ आहे.

### ५) सिद्धांतसंहिता

सिद्धांतसंहिता हा ग्रंथ संस्कृत श्लोकांवर मराठीत केलीली टीका आहे. यात १८ अध्याच असून ओवीसंख्या ४९४१ एवढी आहे.

याशिवाय सोहिराबांनी काही पदांचे लेखन केले असून आहे. 'हरिभजनाविण काळ घालवू नको रे', 'हरीने माझे हरीले मन' यासारखी कितीतरी पदे त्यांनी रचली असून त्यातील काही रचना, पदे रागदारीवर आधारलेली आहेत.

## २६. शेख महंमद (इ.स १५६० ते इ.स १६५०)

मराठी संत मंडळात शेख महंमदाला कबीराचा अवतार मानतात. शेख महंमद हा सुप्रसिद्ध हिंदू साधू चाँद बोधले यांचा शिष्य होता. एकनाथाचे गुरू जनार्दन स्वामी व शेख महंमद गुरूबंधू होत. चांद बोधले यांच्याकडून शेख महमंदाने दीक्षा घेतल्याने त्यांच्या परमार्थविचारात हिंदू धर्म व सुफी पंथ यांचा समन्वय झालेला दिसतो.

### ग्रंथसंपदा

'योगसंग्राम', 'पवनविजय', 'निष्कलंक प्रबोध', 'रूपके', 'भारूडे', 'हिंदूधर्म कविता' इ.

### १) योगसंग्राम

'योगसंग्राम' हा शेख महंमदाचा प्रमुख ग्रंथ होय. त्याची रचना शके १५६७ मध्ये झाली असून ओवी संख्या २३१९ एवढी आहे. या ग्रंथात १७ प्रसंग आले आहेत. शेख महामदाची भूमिका समन्वयाची दिसते. संत ज्ञानेश्वरांचा त्याच्यावर असणारा प्रभाव दिसतो.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या १२व्या अध्यायात योगदुर्गाचे व योगसंग्रामाचे रूपक घेतले आहे. त्यातून शेख महंमदाने 'योगसंग्राम' या ग्रंथात तसेच रूपक घेतले आहे. या ग्रंथात आत्मा हा योद्धा आहे. या योद्ध्याचे अहंकाराशी युद्ध मांडले आहे. संकल्प, विकल्प, कामक्रोध, आळस, या अवगुणांनी युक्त असे अहंकाराचे सैन्य आहे. या सैन्यावर मात करून आत्म्याने ब्रह्मांड शिखर गाठले की, योगसंग्राम संपतो.

### २) पवनविजय

पवनविजय या ग्रंथात शिव-कार्तिक संवाद आहे. 'शिवस्वरोदय' या संस्कृत ग्रंथाचा अनुवाद आहे. तत्त्वसार, पवनविजय, व काळज्ञान असे तीन खंड या ग्रंथात आहेत. संत ज्ञानेश्वरांचा 'पवनविजय' व शेख महंमदाचा 'पवनविजय' यातील बराचसा भाग सारखाच आहे.

### ३) निष्कलंक प्रबोध

'निष्कलंक प्रबोध' या ग्रंथात महंमदाने परमार्थाचे मर्म विशद करीत असतानाच बाह्य अवडंबावर आघात केला आहे. शूद्र देवतांची उपासना, उपासनेचे अमंगल स्वरूप, महानुभाव मठातील अनाचार, जन्मजात श्रेष्ठ यातील थोतांड यासारख्या विषयावर त्याने परखड मते मांडली आहेत.

शेख महमंदाने हिंदू धर्म आणि इस्लाम धर्म यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परधर्मिय कवींमध्ये त्याचे कार्य व वाङ्मयरचना आपल्या वेगळेपणाने उठून दिसते.

## २७. होनाजी (इ.स १७५४- इ.स१८४४)

होनाजी या शाहिराचे नाव शिलारखाने, जात गवळ्याची, पिढीजात गायक, त्याचा आजा साताऱ्या व चुलता बाळा हे नामांकित शाहीर होते. होनाजीबाळा या दुक्कलतील दुसरी व्यक्ती म्हणजे बाळा करजकर. हा जातीने शिंपी होता. होनाजी कवित्व करी व बाळा त्यावर स्वरांचा

पेहराव चढवित असे. त्यांनी तमाशाचा फडचालविला होता. ते आपल्या कवनाच्या शेवटी 'होनाजीबाळा' अशी नाममुद्रा लावीत असत.

'घनश्याम सुंदरा' ही अमर भूपाळी लिहून अमर झालेल्या या शाहिराने अनेक शृंगारिक लावण्या लिहिल्या. त्याच्या काही लावण्या अश्लिलतेच्या कोटीत जाऊन बसणानय आहेत. होनाजीने ईश्वरस्तुतीवर, क्षेत्रवर्णनपर, सामाजिक वर्णनपर, पौराणिक कथावर, संतमहात्म्यापर, कृष्णाच्या बाललिलापर अशा लावण्या लिहिल्या आहेत. 'सरळ चिरी कुकाची कपाळी लाल जशी पिकली मिरची' असा रचनेतील सुबोधपणा, रसाळपणा नजरेत भरतो. शब्दातून चित्र उभे करण्याचे प्रतिभेचे सामर्थ्य वाखाणण्यासारखे आहे. होनाजीबाळा आंतरिक प्रीतीचे महात्मदेखील वर्णन करतो. त्यावेळी दिलेले दृष्टांत पाहण्यासारखे असतात. उदा.
'जगी सागतात प्रीत पतंगाची खरी । झडप घालून देई प्राण दीपकाचे वरी'

होनाजी पेशवाईच्या अंघःपतनाचे चित्र रंगवले आहे ते करूणोत्कट आहे. होनाजीने लिहिलेले खालील पोवाडे विशेष प्रसिद्ध आहेत.

रंगाचा पोवाडा हा होनाजीचा पोवाडा प्रसिद्ध आहे.
१) खर्ड्यात लढाईचा पोवाडा
२) खडकीच्या लढाईचा पोवाडा
३) रंगाचा पोवाडा

होनाजीने पेशवाईच्या अधःपतनाचे चित्र रंगविलेले आहे. ते फार करूणोत्कट आहे. त्याच्या कवना उत्कट शृंगार आढळतो. त्याचप्रमाणे नीतीबोधही आढळतो. त्याची पद्य रचना, सोपी, रम्य तसेच अर्थगंभीर आहे. त्याच्या लावण्या शिष्ट मान्य होत्या. काही लावण्या रागदारीवर रचलेल्या होत्या.
होनाजीने लिहिलेली 'घनश्याम सुंदरा श्रीधरा अरूणोदय झाला' ही भूपाळी फार प्रसिद्ध व काव्यमय आहे. ही भूपाळी अजरामर भूपाळी म्हणून प्रसिद्ध आहे.

## २८. रामजोशी (इ.स. १७६२- इ.स.१८१२)

शाहीर रामजोशी हा सोलापूरचा. तो ब्राह्मण पंडित घराण्यात जन्माला आला होता. संस्कृत काव्याचा त्याल चांगलाच परिचय होता. तो तमासगीर होता. प्रथम तो धोडींबा महाराच्या फडात होता. नंतर त्याने स्वतःचा फड सुरू केला. विद्वता, व्यासंग, बुद्धिकौशल्य, यामुळे त्याच्या लावण्या काव्यगुणसंपन्न झाल्या. त्यामुळे रामजोशी हा सर्व शारिरामध्ये मानाचा ठरला. त्यामुळे त्याला 'शाहिराचा तुरा' म्हणतात. तो स्वतःला 'कविराय' अस म्हणवून घेत असे. तो जरी स्वतःला कविराय म्हणवून घेत असला तरी शिष्ट समाजात त्याला व त्याच्या कवितेला प्रतिष्ठा मिळाली नाही. आणि तरीही शाहीर म्हणून त्याचे श्रेष्ठत्व कमी झाले नाही.

'सुंदरा मनामध्ये भरली । जरा नाहिठरली । हवेलीत शिरली । मोत्याचा भांग' असा शृंगारपर लावण्य लिहिणाऱ्या रामजोशीने देवतापर, तीर्थवर्णनपर आणि वैराग्य उपदेशपर लावण्याही लिहिल्या आहेत.

हटातटाने पटा रंगवून जटा धरिशी का शिरी ।
मठाची उठाठेव का करी । ही त्यांची वैराग्यपर लावणी त्यांच्या रचनेतील पंडिती वळण स्पष्टपणे दाखविणारी आहे. अर्थचमत्कृती, खटकेबाजपणा, प्रास्ताविकता ललितसुंदर भाषा, यमकानुप्रासाचे प्राबल्य, ही रामजोशींच्या लावण्यांची वैशिष्ट्ये आहेत. 'छेकापन्हुती' या अलंकारात रामजोशी लिहिलेली लावणी फारच प्रसिद्ध आहे.

अंबरगतपरि पयोधराने रगडुनी पळती दुरी ।
काय हा धीट म्हणावा तरी ।
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हैया हरी ।
नव्हे गे मारूत मेघोदरी ।।

अशा शृंगारपूर्ण पण तितक्याच अर्थ चमत्कृतीपूर्ण ओळीतून रामजोशींचे भावावैभव प्रकट होते.

संस्कृत काव्याचा अध्ययनामुळे रामजोशींच्या लावण्यात संस्कृत प्रचूरता फक्त तीन पोवाडे उपलब्ध आहेत. पुण्याचा पोवाडा, शुक्रवारवाड्याचा पोवाडा यात पारंपरिक स्थलवर्णन आहे. १८०२ साली पडलेल्या दुष्काळावर रचलेल्या पोवाड्यात आशयापेक्षा अभिव्यक्तीकडेच अधिक लक्ष दिलेले आहे. 'फंद मानले धुंद झाली बेबंद' अशा ओळीतून त्याची अनुप्रासांची कसरतच आढळते.

रामजोशींना आयुष्याच उत्तरार्धात अहिल्याबाई होळकर यांनी उपदेश केला. त्यामुळे त्याने लावणी करण्याचे सोडून कीर्तन करण्यास आरंभ केला असे म्हणतात. डॉ. के.ना. वाटवे म्हणतात, 'पांडित्य आणि पाचकळपणा, विद्वता आणि ग्राम्यता, वैराग्य आणि व्यसनांधता याचे काही अलौकिक मिश्रण त्याच्या चरित्रात आणि कवित्वातही आढळते.' त्याच्या काव्याविषयी श्री. म.वर्दे यांनी पुढील मत मोडले आहे. 'शिष्ट समाजाचे प्रभावी संस्कार त्याच्या वाङ्मयात जास्त दिसतात. एकंदर शाहिरी वाङ्मयात त्याची सभ्यता, विशेष दिसते. त्याच्या लावण्यात स्त्रीच्या यौवनाची, प्रियकरासाठी होणाऱ्या तळमळीची वर्णने असली तरी ती सर्व वैवाहिक जीवनातील प्रस्थापित नीतीच्या राहिली आहेत.'

## २९) प्रभाकर (इ.स.१७६५- इ.स.१८४३)

प्रभाकर दातार हा पुण्याच्या रास्ते सरदारांचा कारकून होता. त्याचा जन्म गंगापूर झाला. तो तमाशात नव्हता परंतु तमाशासाठी कवने लिहित असे. तो बाजीरावाच्या खास मर्जीतला होता. प्रभाकराच्या काव्यातून खर्ड्याची लढाईपासून पेशवाईच्या अंत:पर्यंतच्या सर्व घटनावर प्रकाश पडतो. त्याच्या तीस-पस्तीस लावण्या आहेत. परंतु त्याचे उज्ज्वल काव्य पोवाड्यातून दिसून येते. इतर हिरापेक्षा प्रभाकराने जास्त ऐतिहासिक तीन सवाई माधवरावांवर, दोन रावबाजीवर, दोन पेशवेवंशवर्णनपर, दोन दुसऱ्या सयाजीराव गायकवाडांवर, एक अहिल्याबाई होळकरांवर, एक राघोजी आंग्रे त्यांच्यावर एक चौक प्रसिद्ध आहे. या सर्व पोवाड्यात रंगाचा पोवाडा सरस ठरतो. श्रीमंतांची स्वारी चालली असता. त्याचे केलेले वर्णन बहारीचे आहे. रंगाचा पोवाडा होनाजीचाही आहे. पण प्रभाकराच्या रंगाच्या पोवाड्यात रचनेची सफाईदारपणा, शब्दांची निवड, आशय घनता आणि अभिव्यक्तीतील सौंदर्य, भाषेतील प्रास्ताविकता या सर्वच दृष्टींनी प्रभाकराचा पोवाडा सरस आहे.

उदा. जसा रंग श्रीरंग खेळले वृदावनी द्वापारात । तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगात अतिआदरात । सवाई माधवरावांच्या मृत्यूचा पोवाडा फारच सुरेख आहे. त्यांच्या अकाली निधनामुळे झालेला शोक प्रभाकराने पोवाड्यात व्यक्त केला आहे. तो म्हणतो, कमि नव्हते पृथ्वीत अवांतर प्राणी न्यायाला । औक्ष के कमि झाले सवाई माधवरावाला ।।प्रभाकराने बाजीरावाच्या विलासाचे वर्णन अगदी मनापासून केले आहे. 'पुण्यशिल राजा पृथ्वीवर याची द्वाही कितिक रूपवत्या मुख बघुनि बुलाया येती' असे प्रभाकर बाजीरावाचे वर्णन करतो. तर कधी 'करता मन कठोर का हो

कृपाळा । कर शांत नृपाळा’ असे विलाससुखासाठी, आपल्यावर प्रसाद करण्यासाठी, त्याला विनवण्या करणाऱ्या तरुणीचे वर्णन करतो.

पेशवाई बुडाल्यानंतर प्रभाकराचा राजाश्रय संपला त्याला फार हालाखीची स्थिती प्राप्त झाली. पेशवाईचे वैभव पाहिलेल्या या शाहिराला पोटासाठी मुंबईतील धनिक व सरकारी अधिकाऱ्यांच्या स्तृतीची कवने करावी लागली. त्याच्या लावण्या शृंगारिक असल्या, त्यात कामवासनेचे भडक चित्रण आले असले तरी रा. श्री. जोग त्याला मुक्तेश्वराच्या वर्गातील कवी म्हणतात.

प्रा. गंगाधर मोरजे प्रभाकराविषयी लिहितात, ‘वर्णनाचा नेमकेपणा, अर्थानुकारी शब्दयोजना, रसनिर्मितीची जाणीव इतर लावणीकारांपेक्षा प्रभाकराजवळ अधिक होती. केवळ शब्दांचा खेळ म्हणजे कविता असे तो मानीत नाही.’

महाराष्ट्रात सारस्वतकार वि.ल. भावे यांच्या मते ‘चित्पावन कोकणस्थ ब्राह्मणात जे थोडे कवी झाले. त्या प्रभाकर हा वरच्या पैकी दिसतो.’

श्री. म. वर्दे प्रभाकराच्या काव्याविषयी लिहितात, प्रभाकराच्या वैषयिक लावण्या गुणदोष युक्त आहेत. त्याच्या काव्यात पदलालित्य आहे. वर्णनात उठावदारपणा आहे. परंतु कल्पनाचातुर्य नाही. आणि अर्थवैभवही नाही. रसिकाच्या हृदयाला भेदणारी अशी कल्पना त्यांच्या काव्यात सापडत नाही. वर्णनाचा सूक्ष्मपणा भरपूर आहे. तो पोवाड्यात खुलतो. परंतु लावण्यातील शृंगाराला उणेपणा आणतो. त्याचो पोवाडे मनाचे समाधान करतात. क्वचित पूर्व वैभवाची स्मृती देऊन चित्र उद्विग्नही करतात.

❖ ❖ ❖

## नमुना प्रश्नपत्रिका (एक)

**वेळ ३ तास**

**गुण १००**

सूचना – १) प्रश्न १ ते ८ पैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा
२) प्रश्न नववा आवश्यक आहे.
३) एकूण पाच प्रश्न सोडवा
४) सर्व प्रश्नाना समान गुण आहेत.

प्रश्न १ महानुभाव गद्य साहित्यातील चरित्रग्रंथ व तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ यांचे स्वरूप व वैशिष्ट्ये साधार विशद करा.

प्रश्न २ संत साहित्याच्या निर्मितीची प्रेरणा सांगून प्रमुख संताच्या वाङ्मयीन कार्याची ओळख करून द्या.

प्रश्न ३ पंडिती साहित्याचे स्वरूप स्पष्ट करून त्यांची वैशिष्टये स्पष्ट करा.

प्रश्न ४ ''शाहिरांनी लावणी व पोवाडे याद्वारे मध्ययुगीन मराठी साहित्याला प्रथमच मराठी समाजजीवनाचे रंग प्राप्त करून दिले'' हे विधान उदाहरणसह स्पष्ट करा.

प्रश्न ५ नाथ, दत्त, समर्थ, लिंगायत पंथानी प्राचीन मराठी साहित्याला दिलेले योगदान स्पष्ट करा.

प्रश्न ६ जैन, मुस्लीम, ख्रिस्ती धर्मियांनी मध्ययुगीन मराठी साहित्याला दिलेले योगदान उदाहरणासह विशद करा.

प्रश्न ७ बखर वाङ्मयाचे स्वरूप सांगून बखरीचा आढावा घ्या.

प्रश्न ८ मध्ययुगीन बखर साहित्याचा प्रेरणा सांगून ठळक विशेष लिहा.

प्रश्न ९ प्रत्येकगटातील दोन टिपा लिहा (एकूण चार)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | विवेक सिंधू | १ | जनाबाई |
| २ | ज्ञानेश्वरी | २ | नरेंद्र |
| ३ | मनाचे श्लोक | ३ | श्रीधर |
| ४ | नरेद्रकृत – रूक्मिणी स्वयंवर | ४ | रामजोशी |

❖❖❖

.

## नमुना प्रश्नपत्रिका (दोन)

**वेळ ३ तास**

**गुण १००**

सूचना – १) प्रश्न १ ते ८ पैकी कोणतेही चार प्रश्न सोडवा
५) प्रश्न क्र. नववा आवश्यक आहे.
६) एकूण पाच प्रश्न सोडवा
७) सर्व प्रश्नाना समान गुण आहेत.

प्रश्न १ महानुभाव गद्य वैविध्य पूर्ण व वाङ्मयीन गुणांनी संपन्न आहे या मताचा परामर्श घ्या.

प्रश्न २ वारकरी संत साहित्याची परंपरा सांगून ठळक स्वरूप विशेष स्पष्ट करा.

प्रश्न ३ पंडित कवींच्या आख्यानकाण्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये उदाहरणासह लिहा.

प्रश्न ४ शाहिरी साहित्याचे स्वरूप स्पष्ट करून लावणी व पोवाडा रचनेतील साम्य भेद स्पष्ट करा.

प्रश्न ५ महाराष्ट्रातील विविध पंथ कोणते ते सांगून कोणत्याही एका पंथाच्या वाङ्मयीन कार्याची ओळख करून द्या.

प्रश्न ६ इतर धर्मियाने मराठी साहित्याला ऐतिहासिक परिणाम प्राप्त करून दिले या विधानाचा परामर्श घ्या.

प्रश्न ७ मध्ययुगीन मराठी साहित्यात आशयाच्या व रचनेच्या अंगाने निर्माण झालेल्या साहित्य प्रकारा विषयी विवेचन करा.

प्रश्न ८ बखर वाङ्मयाच्या प्रेरणा सांगून ठळक विशेष लिहा.

प्रश्न ९ प्रत्येक गटातील दोन टिपा लिहा. (एकूण चार)

| | 'अ' | | 'ब' |
|---|---|---|---|
| १ | विवेक सिंधू | १ | म्हाइंभट |
| २ | सुभद्राचंपू | २ | महिती |
| ३ | भाऊसाहेबांची बखर | ३ | संत तुकाराम |
| ४ | सह्याद्रीवर्णन | ४ | मुक्ताबाई |

❖❖❖